# उद्याच्या उंबरठ्यावर

म. ग्रं. सं. ठाणे
विषय प्रवास
सं. क्र. 223
9८५७




REFBK-0009743

# उद्याच्या उंबरठ्यावर

मूळ लेखक : रॉबर्ट वेथॅम् ❀ अनुवादक : प्रा. भा. म. गोरे, एम्. ए.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थानांतर
अनुक्रम 22640 वि.
क्रमांक 223 ता. 9/7/40

REFBK-0009743

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 9483
ग्रंथ शाखा

मूल्य दोन रुपये

प्रकाशक : **पंडित अनंत कुलकर्णी**, कुलकर्णी ग्रंथागार, १८६ शनिवार पुणें २.
मुद्रक : **न. शं. कुलकर्णी**, टीचर्स प्रिंटिंग प्रेस, ७७, शनवार, पुणें करितां.

# ग्रंथपरिचय

'The Day Before Tomorrow' या पुस्तकाची ही संक्षिप्त आवृत्ति आहे.

लंडन येथील 'न्यूज् क्रॉनिकल' या वृत्तपत्राचे प्रतिनिधि म्हणून अमेरिकेंत काम करणाऱ्या श्री. वेथॅम् नांवाच्या पत्रकारानें हें पुस्तक लिहिलें आहे. लंडन व युरोपमध्यें घालविलेलीं तीन वर्षे वजा केल्यास १९३७ पासून सदर वृत्तपत्राचे प्रतिनिधि या नात्यानें या गृहस्थानें अमेरिकेंत काम केलें आहे.

श्री. वेथॅम् यांनीं अमेरिकेंत खूप प्रवास केला आहे. अमेरिकेचें संपूर्ण ज्ञान होण्याइतकें त्यांचें त्या देशाचें व्यासंगपूर्ण निरीक्षण आहे. तथापि आपला ब्रिटिश दृष्टिकोन त्यांनीं सतत कायम ठेवला आहे. त्यांनीं जें जें पाहिलें त्याची छाननी ते वस्तुनिष्ठ भूमिकेवरून करूं शकतात. म्हणून हें पुस्तक म्हणजे एका परदेशीय गृहस्थानें केलेलें अमेरिकेचें **माहितीपूर्ण निरीक्षण** होय. न्यूयॉर्क किंवा वॉशिंग्टनमध्यें कांहीं महिने राहून, आगगाडी किंवा विमानांतून देशाची धावती सफर करून, 'अमेरिकेचें परिपूर्ण ज्ञान झालें' अशा भूमिकेवरून केलेल्या छाननीपेक्षां हें विवेचन अर्थात् अगदीं निराळें आहे !

" The Day Before Tomorrow "

*By*

ROBERT WAITHMAN

Published by Charles Scribner's Son's, New York.

Copyright, 1951, Robert Waithman.

22450 223

## यात्रिक-कथा—

मॅसॅच्युसेटस् संस्थानांतील प्लायमाउथ शहरांत, समुद्रकिनाऱ्यावरील एका हिरव्यागार टेकडीवर, प्लायमाऊथ रॉक हॉटेल हा पथिकाश्रम होता. त्यांतील शेजघराच्या खिडकीच्या थोडें खालीं एक कीर्तिस्तंभ असून, त्याच्यावर त्या किनाऱ्यावरील पहिल्या हिवाळ्यांत मृत्युमुखीं पडलेल्या, 'मे-फ्लॉवर' या जहाजांतील यात्रिकांचीं नांवें कोरलीं होतीं. त्यापलीकडे, थोड्याच अंतरावर, या यात्रिकांनीं ज्यावर प्रथम पाय ठेवला तो प्रसिद्ध खडक आहे. आतां त्याभोंवतीं खांब रोवलेले असून त्यांवर मेघडंबरी उभारलेली आहे. त्याभोंवतीं एक कठडा केला आहे. या रीतीनें त्या स्थळाचें संरक्षण केलेलें असून तें दृश्य मोठें भव्य दिसतें.

पानखर ऋतूच्या ( उन्हाळ्यानंतरच्या काळांतील ) एखाद्या संध्याकाळीं हिरवळीवर कांहीं मुलें खेळत असावयाचीं, आणि तुरळक लोक शतपावली करीत असावयाचे. पण सारें दृश्य कसें शांत आणि व्यवस्थित असें वाटे. कठड्यावर रेलून, त्या खडकाकडे तुम्ही तासभर नजर लावून उभे राहिलांत, तरी तुमच्या चिंतनांत कोणीहि व्यत्यय आणणार नाहीं.

हे यात्रिक ज्यावर उतरले तो खडक हा नव्हे, अशी दुसरी उपपत्ति बसवावयाची असेल तर त्यासाठीं काळजीपूर्वक दीर्घ संशोधन करावयास पाहिजे. त्यासाठीं आयुष्याचा बहुतेक भाग खर्ची टाकण्याची तयारी हवी. एवढ्या खटाटोपानंतर फारतर इतकें सिद्ध करतां येईल कीं, 'यात्रिकांचा खडक' तो हा नसून, तो या किनाऱ्यावरील पुढें किंवा मागें असलेला, त्याच्यासारखाच दुसरा एखादा खडक होता. आणि या साऱ्या वादाचा उपयोग काय ? खरें म्हणजे तो खडक कोणी थोडा इकडेतिकडे सरकवला

असेल, त्याचे दोन तुकडे केले असतील, नाहींतर आणखी एखादा प्रकार असेल, असें जें म्हटलें जातें, त्यांतहि कांहीं फारसं महत्त्वाचें नाहीं.

यापेक्षां आपण असें गृहीत धरलेलेंच बरें कीं, इंग्लंडच्या अनेक भागांतून आलेले ते एकूण १०२ उतारू 'मे-फ्लॉवर' जहाजापासून किनाऱ्यापर्यंत फेऱ्या करणाऱ्या एका छोटया पडावांतून किनाऱ्यावरील त्या खडकावर उतरले. तें गलबत शिडें गुंडाळून आखातांत, किनाऱ्याजवळील शंभर एक यार्डांवर नांगरून उभें होतें. जहाजाच्या तक्तपोशीवर फिरणारे, किनाऱ्याकडे टक लावून पाहणारे लोक दुर्बिणींतून सहज दिसूं शकतील इतक्या जवळच्या टप्प्यावर होते. फक्त त्यांच्याकडे तसें पाहण्यास किनाऱ्यावर कोणींच माणसें नव्हतीं एवढेंच. समुद्रावर दीर्घकाळपर्यंत लाटांचे तडाखे खाऊन, आज ज्याला 'केप कॉड' हें नांव आहे तो प्रदेश त्यांच्या दृष्टिपथांत आला; त्यांच्या आनंदाला पारावार उरला नाहीं. समजा, तुम्ही स्वतः एखाद्या १८० टनांच्या लाकडी जहाजांत हेलकावे खात आहांत. आणखी १०१ माणसें त्या छोटया जहाजांत ठेचून भरलीं आहेत – हिवाळा तोंडावर आल्यानें दर्या खवळला आहे – अशा स्थितींत तब्बल सप्टेंबर, ऑक्टोबर, नोव्हेंबर तीन महिने तें करकरणारें, झोकांडे खाणारें जहाज अॅटलांटिक महासागरावरून पुढें चाललें आहे – अशा स्थितींत अखेर एकदां जमीन दिसल्यावर तुम्हांला खूपसा आनंद वाटणारच !

अमेरिकेचें दर्शन घडण्यापूर्वींच विल्यम बुटेन हा बिचारा वृद्ध गृहस्थ मृत्यु पावला. हा एक नोकर होता. जहाजावर चढतांना, 'ही सारी धडपड कशासाठीं आहे' याची त्याला कदाचित् नीटशी कल्पनाहि आली नसेल. त्याचे मालक खंबीर व धार्मिक वृत्तीचे असल्यास, आपण हा अॅटलांटिक महासागर ओलांडून जावें कीं नाहीं हा निर्णय त्याला घेण्याची जरूरहि लागली नसेल. 'नोकर म्हणून राहावयाचें कीं नाहीं,' एवढेंच त्याला ठरवावें लागलें असेल. त्यानें अस्तिपक्षीं निर्णय घेतला याचें कारण एवढेंच असेल कीं त्याला करतां येत होतें तें काम एकच – तें म्हणजे नोकर म्हणून राबण्याचें. सौ. स्टीव्हन्स हॉपकिन्स् ही स्त्री या सफरींतच प्रसूत झाली. निर्जंतुक कापसाच्या पट्टया, जंतुप्रतिबंधक चाळणी तोंडावर बांधलेल्या सेविका – यांपैकीं कांहींच उपलब्ध नव्हतें. अशा परिस्थितींत जन्माला

आलेलें हें बालक जगूं शकेल, याची कितीशी खात्री आधुनिक प्रसूति-शास्त्रज्ञांनीं दिली असती बरें ?

१५ एप्रिल १६२१ रोजीं हें जहाज इंग्लंडला परत फिरलें. हिंवाळा संपला होता. मृतव्यक्तींना मूठमाती देण्यांत आली होती. सूर्यानें पुन्हा तोंड वर काढलें होतें. आपण ज्यांतून आलों तें जहाज मायदेशीं परत चाललें आहे, हें उघड्या डोळ्यांनीं पाहण्याइतपत धैर्य तेथें उरलेल्या पन्नास लोकांच्या हृदयांत होतें, हें खरें. पण तें जहाज दृष्टीआड झाल्यावर त्यांना फार उदासवाणें वाटलें असेल, हेंहि तितकेंच खरें. सूर्य मावळत होता. यानंतर कायम कपाळीं आलेल्या अंधाऱ्या रात्रींपैकीं पहिली रात्र सुरू होत होती !

अमेरिकेच्या पहिल्या हिंवाळ्यांतील उदासीनता आणि मृत्यु यांचें वर्णन करणारें एक पत्र ' मे-फ्लॉवर ' या जहाजांतून या योजनेच्या भागीदारांकडे रवाना झालें होतें. उदरनिर्वाहाला आवश्यक अशा संपत्तीपेक्षां अधिक संपत्ति पदरीं बाळगणाऱ्या कांहीं इंग्रज लोकांनीं ही संस्था उभी केली असून तिच्या खर्चाची व्यवस्था केली होती – ती धार्मिक वृत्तीनें नव्हे, पण फक्त एक व्यापारी योजना म्हणून.

सात महिन्यांनंतर इंग्लंडहून दुसरें एक जहाज या वसाहतींत आलें. ' मे-फ्लॉवर ' जहाजांतून विक्रीला योग्य असा कोणताच माल परत पाठविला नाहीं, याबद्दल तक्रार करणारें, संस्थेचे प्रमुख भागीदार श्री. वेस्टन यांचें एक पत्र या जहाजांतून आलें होतें. गव्हर्नर ब्रॅडफर्ड आणि त्याच्या जबाबदार सहकाऱ्यांना हें पत्र मिळालें. ती संध्याकाळ फार खिन्नतेची गेली असेल. " शारीरिक दुबळेपणापेक्षां तारतम्याचा दुबळेपणा हेंच आपल्या परिस्थितीचें कारण असावें " असे कानउघाडणीचे शब्द श्री. वेस्टन यांनीं त्या पत्रांत लिहिले होते.

वेस्टन व ' मे-फ्लॉवर 'च्या भागीदारांनीं ' धाडसी ' असें नांव धारण केलें होतें. आपण खूप धीट आणि धाडसी आहोंत, अशी त्यांची समजूत असावी. तत्कालीन व्यापारी दृष्टीनें, आणि विशेषत: आजच्या व्यापारी दृष्टीनें पाहतां ते लोक तसे होतेहि. तशा धाडसी योजनेसाठीं भांडवल मागणाऱ्या व्यक्तीला आजची बँक काय उत्तर देईल ? वेस्टन आणि त्यांच्या सहकाऱ्यांना पडत असलेलीं स्वप्नें हीं त्यांच्या अनुभवाच्या कक्षेपलीकडील अशीं होतीं. ' मे-फ्लॉवर ' या जहाजांतून एका केविलवाण्या पत्राखेरीज

कांहींच परत आलें नाहीं, हें पाहून त्यांना निराशेचा मोठा धक्का बसला असेल. निराशा आणि राग यांच्या प्रभावामुळें त्यांची साहजिकपणें अशी समजूत झाली असावी कीं या यात्रिकांचें अपयश म्हणजे त्यांच्याच मूर्खपणाचा परिणाम असावा.

या खडकाशेजारीं एखादें लघु-लहरींचें बिनतारी तारायंत्र उभारून, त्यावरून रोजच्या प्रगतीचा अहवाल पाठविणें गव्हर्नर ब्रॅडफर्डला त्या वेळीं शक्य झालें असतें, किंवा जवळच्या तार-ऑफिसांतून तारेनें संदेश पाठवूं शकणारे ३-४ चांगले वार्ताहर 'मे-फ्लॉवर' जहाजांतून आले असते तर वेस्टन यांनीं तसें उत्तर लिहिलेंच नसतें. दळणवळणाचीं अधिक चांगलीं साधनें, वृत्तपत्रें आणि संदेश हीं अॅटलांटिक महासागराच्या दोन्ही तीरांवर त्या वेळीं उपलब्ध असतीं, तर त्यानंतरचा क्रांतिसंग्राम दुरापास्त किंवा अशक्यहि झाला असता. एखादें युद्ध होऊन गेल्यावर अल्पावधींत (आणि शतकें उलटत जातात त्या मानानें अधिक अल्पावधींत) एक सत्य बहुतेक सर्वांच्या स्पष्टपणें लक्षांत येत असतें. तें म्हणजे दोन्ही लढाऊ पक्षांच्या मूळ गुन्ह्यांत, दोषांत, प्रथम वाटत होतें तेवढें अंतर मुळींच नसतें. त्यानंतर असें आढळून येतें कीं, एका पक्षाचा (बहुतकरून पराभूत पक्षाचाच) मूळ प्रश्नाबद्दल पूर्णपणें गैरसमज झाला होता. खरे मुद्दे कोणते हेंच त्या पक्षाला समजलें नव्हतें. राज्यकर्त्यांमुळें, भावनांच्या भारामुळें (किंवा दोन्हींच्या प्रभावामुळें) ते लोक चुकीच्या मार्गानें गेले आणि साराच ब्रह्मघोटाळा झाला! किंवा (कंकॉर्ड शहरांतील) एका शिक्षकानें म्हटल्याप्रमाणें अनेक गैरसमज सांचत जाऊन, त्यांचाच अखेर हा परिपाक झाला.

त्या वेळीं, हल्लींसारखी एखादी लोकमताची चांचणी घेतली असती, तर दोन्ही पक्षांतील आत्मविश्वासांत मोठाच कमकुवतपणा दिसून आला असता. आधुनिक कसोटी लावून पाहिलें असतां ब्रिटन आणि अमेरिकन वसाहती या दोन्ही देशांतील जनतांचा आत्मविश्वास, धैर्य हीं या लढाईंत नष्ट झालीं होतीं, असेंच दिसून येतें. अशी कल्पना करा कीं इ. स. १७६० सालापासून, वसाहतींत झालेल्या सर्व सभा, सर्व घटना, सर्व तक्रारी यांचीं मुलाखती व चित्रांसह संपूर्ण बातमीपत्रें ब्रिटिश वार्ताहरांनीं मायदेशाला पाठविलीं असतीं; त्याप्रमाणें, इंग्लंडमध्यें असलेल्या पन्नास अमेरिकन

वार्ताहरांनीं तेथील पार्लमेंटमधील वादविवाद, सार्वजनिक प्रतिक्रिया यांबद्दल सविस्तर बातमीपत्रें अमेरिकेंत पाठविलीं असतीं, तर काय झालें असतें ? सर्वांना एकमेकांचीं मनें कळलीं असतीं – कदाचित् त्या योगानें पुढील लढाईहि राजकीय दृष्टचा अशक्यच झाली असती ! !

## उपनगर

धुरानें काळवंडलेल्या लोकलगाडीच्या डब्यांतला, हातांत वृत्तपत्र घेतलेला, हा पांढऱ्या केसाचा, सुरकुतलेल्या मायाळू चेहऱ्याचा एक म्हातारा गृहस्थ आहे. आपण त्याला विचारूं या. – " बाबासाहेब ! कुठें राहतां हो तुम्ही ?" – गाडींतून उतरल्यावर रस्ता ओलांडा, औषधविक्रेत्याचें दुकान, किराणा वस्तु भांडार, स्थावर व्यवहार कचेरी, बँक, या इमारती मागें टाकून, पेट्रोलपंपाच्या बाजूनें वळा; रस्ता ओलांडून जा. मग एक चौक वर जाऊन, अर्धा चौक पुढें व्हा. झाडांच्या छायेंत, जाळीच्या पडवीपुढें 'लॉरेल'चीं झुडपें दिसतात तेंच त्यांचें घर !

घराच्या दोन पायऱ्या चढून जाळीचें दार उघडा, पडवी ओलांडून बैठकीच्या खोलींत प्रवेश करा. स्वयंपाकघराच्या दाराकडे नजर टाका. तें दार उघडेल आणि आंतून गृहिणीचा आवाज येईल –

– " कोण, तुम्ही कां ते ?"

– " काय ग ?"

– " जेवायचं झालंय्, म्हटलं !"

कोचासमोरच्या कॉफीच्या टेबलावर घडी केलेलें वृत्तपत्र ठेवा. जेवण झाल्यावर वाचण्यासाठीं तें हाताशीं हवेंच. तुमचा ओव्हरकोट फडताळांत टांगून ठेवा आणि टोपी मांडणीवर ठेवून द्या. लाकडी जिन्यावरून वर जाऊन, डावीकडील दार उघडा. आंतून मुलाचा आवाज येईल –

– " कोण, बाबा का ?"

– " काय रे ? जेवण तयार आहे असं तुझ्या आईनें सांगितलंय्."

– " ठीक आहे."

सारें कांहीं जसें असायला हवें तसेंच आहे. अगदीं ठाकठीक ! न्हाणीघरांत ऊन पाणी आहे. सुगंधी साबण आणि जवळच अंगपुसणेंहि ठेवलें आहे.

कांहींच परत आलें नाहीं, हें पाहून त्यांना निराशेचा मोठा धक्का बसला असेल. निराशा आणि राग यांच्या प्रभावामुळें त्यांची साहजिकपणें अशी समजूत झाली असावी कीं या यात्रिकांचें अपयश म्हणजे त्यांच्याच मूर्खपणाचा परिणाम असावा.

या खडकाशेजारीं एखादें लघु-लहरींचें बिनतारी तारायंत्र उभारून, त्यावरून रोजच्या प्रगतीचा अहवाल पाठविणें गव्हर्नर ब्रॅडफर्डला त्या वेळीं शक्य झालें असतें, किंवा जवळच्या तार-ऑफिसांतून तारेनें संदेश पाठवूं शकणारे ३-४ चांगले वार्ताहर ‘ मे-फ्लॉवर ’ जहाजांतून आले असते तर वेस्टन यांनीं तसें उत्तर लिहिलेंच नसतें. दळणवळणाचीं अधिक चांगलीं साधनें, वृत्तपत्रें आणि संदेश हीं अॅटलांटिक महासागराच्या दोन्ही तीरांवर त्या वेळीं उपलब्ध असतीं, तर त्यानंतरचा क्रांतिसंग्राम दुरापास्त किंवा अशक्यहि झाला असता. एखादें युद्ध होऊन गेल्यावर अल्पावधींत ( आणि शतकें उलटत जातात त्या मानानें अधिक अल्पावधींत ) एक सत्य बहुतेक सर्वांच्या स्पष्टपणें लक्षांत येत असतें. तें म्हणजे दोन्ही लढाऊ पक्षांच्या मूळ गुन्ह्यांत, दोषांत, प्रथम वाटत होतें तेवढें अंतर मुळींच नसतें. त्यानंतर असें आढळून येतें कीं, एका पक्षाचा ( बहुतकरून पराभूत पक्षाचाच ) मूळ प्रश्नाबद्दल पूर्णपणें गैरसमज झाला होता. खरे मुद्दे कोणते हेंच त्या पक्षाला समजलें नव्हतें. राज्यकर्त्यांमुळें, भावनांच्या भारामुळें ( किंवा दोन्हींच्या प्रभावा-मुळें ) ते लोक चुकीच्या मार्गानें गेले आणि साराच ब्रह्मघोटाळा झाला ! किंवा (कंकॉर्ड शहरांतील) एका शिक्षकानें म्हटल्याप्रमाणें अनेक गैरसमज सांचत जाऊन, त्यांचाच अखेर हा परिपाक झाला.

त्या वेळीं, हल्लींसारखी एखादी लोकमताची चांचणी घेतली असती, तर दोन्ही पक्षांतील आत्मविश्वासांत मोठाच कमकुवतपणा दिसून आला असता. आधुनिक कसोटी लावून पाहिलें असतां ब्रिटन आणि अमेरिकन वसाहती या दोन्ही देशांतील जनतांचा आत्मविश्वास, धैर्य हीं या लढाईंत नष्ट झालीं होतीं, असेंच दिसून येतें. अशी कल्पना करा कीं इ. स. १७६० सालापासून, वसाहतींत झालेल्या सर्व सभा, सर्व घटना, सर्व तक्रारी यांचीं मुलाखती व चित्रांसह संपूर्ण बातमीपत्रें ब्रिटिश वार्ताहरांनीं मायदेशाला पाठविलीं असतीं; त्याप्रमाणें, इंग्लंडमध्यें असलेल्या पन्नास अमेरिकन

वार्ताहरांनीं तेथील पार्लमेंटमधील वादविवाद, सार्वजनिक प्रतिक्रिया यांबद्दल सविस्तर बातमीपत्रें अमेरिकेंत पाठविलीं असतीं, तर काय झालें असतें ? सर्वांना एकमेकांचीं मनें कळलीं असतीं – कदाचित् त्या योगानें पुढील लढाईहि राजकीय दृष्टचा अशक्यच झाली असती ! !

## उपनगर

धुरानें काळवंडलेल्या लोकलगाडीच्या डब्यांतला, हातांत वृत्तपत्र घेतलेला, हा पांढऱ्या केसाचा, सुरकुतलेल्या मायाळू चेहऱ्याचा एक म्हातारा गृहस्थ आहे. आपण त्याला विचारूं या. – " बाबासाहेब ! कुठें राहतां हो तुम्ही ?" – गाडींतून उतरल्यावर रस्ता ओलांडा, औषधविक्रेत्याचें दुकान, किराणा वस्तु भांडार, स्थावर व्यवहार कचेरी, बँक, या इमारती मागें टाकून, पेट्रोलपंपाच्या बाजूनें वळा; रस्ता ओलांडून जा. मग एक चौक वर जाऊन, अर्धा चौक पुढें व्हा. झाडांच्या छायेंत, जाळीच्या पडवीपुढें 'लॉरेल'चीं झुडपें दिसतात तेंच त्यांचें घर !

घराच्या दोन पायऱ्या चढून जाळीचें दार उघडा, पडवी ओलांडून बैठकीच्या खोलींत प्रवेश करा. स्वयंपाकघराच्या दाराकडे नजर टाका. तें दार उघडेल आणि आंतून गृहिणीचा आवाज येईल –

– " कोण, तुम्ही कां ते ?"

– " काय ग ?"

– " जेवायचं झालंय्, म्हटलं !"

कोचासमोरच्या कॉफीच्या टेबलावर घडी केलेलें वृत्तपत्र ठेवा. जेवण झाल्यावर वाचण्यासाठीं तें हाताशीं हवेंच. तुमचा ओव्हरकोट फडताळांत टांगून ठेवा आणि टोपी मांडणीवर ठेवून द्या. लाकडी जिन्यावरून वर जाऊन, डावीकडील दार उघडा. आंतून मुलाचा आवाज येईल –

– " कोण, बाबा का ?"

– " काय रे ? जेवण तयार आहे असं तुझ्या आईनें सांगितलंय्."

– " ठीक आहे."

सारें कांहीं जसें असायला हवें तसेंच आहे. अगदीं ठाकठीक ! न्हाणीघरांत ऊन पाणी आहे. सुगंधी साबण आणि जवळच अंगपुसणेंहि ठेवलें आहे.

– आतां हा तुकतुकीत काळाभोर केसांचा, चलाख नजरेचा, सोन्याची अंगठी बोटांत घातलेला तरुण पाहा. तुमची स्वारी आज रात्रीं बाहेरच मेजवानी झोडणार असेल बहुतकरून !

आतां आगगाडींतून उतरा. प्लॅटफॉर्म ओलांडून, तुम्हीं सकाळीं उभ्या करून ठेवलेल्या मोटारीकडे चला. जरा हात लावला कीं, ती सुरेख मोटार सुरू झालीच. आतां असे हमरस्त्यावर या. हें वळण घेऊन पुढें चला – समोरच्या टेकडीवर तें घर दिसत आहे त्या दिशेनें. जॉर्जियन पद्धतीच्या पांढऱ्या स्तंभांमध्यें दिवा तेवत आहे – तेंच तुमचें घर !

पत्नीला घेऊन जेवणासाठीं बाहेर पडण्याआधीं तुम्ही एखादा प्याला घ्याल आणि मुक्कामावर पोंहचल्यावर – आणखी एखादा दुसरा. देवाशपथ, तुम्हांला त्याची जरुरी आहेच. किती दगदगीचा दिवस गेला हा !

– ठीक. मग एकूण कसं काय चाललंय् तुमचं सारं ? अन्, काय हो ! या सुंदर मुलीशीं कसं काय लग्न जुळविलंत तुम्हीं, राजेश्री ? जरा ऐका तर खरं तिचं लाडिक बोलणं !

– " चार्ली ! कित्ती कित्ती प्रेमळ आहेस रे तूं ! "

– " चार्ली ! तूं दिसलास अन् माझे डोळे निवले रे राजा ! "

– " अन् मॉली ! लाडके ! तुझ्याहून अधिक आनंद मला झालाय् तू दृष्टीला पडल्यावर ! माझी मॉली ती...."

हं चला पुढें ! आतां या दोघांकडे आणखी पाहात राहूं नये आपण !

आतां रात्र होत आहे. दिवसभराचें काम संपवून खाद्य-वस्तु-भांडार बंद होत आहे. त्यांतले गोठविलेले खाण्याचे पदार्थ शहरांतल्या शेंकडों कढयांतून आणि भट्ट्यांतून शिजत आहेत. डबे उघडले गेले आहेत, त्यांतलीं खाद्यपेयें मिसळून तयार करण्यांत आलीं आहेत. भांडाराच्या भल्याथोरल्या कांचेच्या खिडक्यांतून फक्त एक दिवा तेवतांना दिसत आहे. भिंतीवरून आणि बाजूला रांगेनें मांडून ठेवलेलें पदार्थांचें वैभव दाखविण्यास तेवढा प्रकाश पुरेसा आहे. अशा अन्नासाठीं पृथ्वीच्या दुसऱ्या भागांतील लोक चोरी आणि खूनहि करण्यास मागेंपुढें पाहणार नाहींत. पण आतां, इथें, या उपनगरांत तसे प्रकार घडणार नाहींत. या खिडक्या कोणी फोडणार नाहीं. (कारण)

२२५५० दि. ३१-५-५७
२२३ नों. दि. ३०।११।५७



या उपनगरांत कोणीहि भुकेनें तडफडत नाहीं. तसें म्हटलें तर रात्रीं दहा वाजेपर्यंत मिठाईचीं दुकानें उघडीं असतातच !

आइस्क्रीमच्या दुकानांतील यांत्रिक फोनोग्राफ आतां मूक झाला आहे. बाहेरचे रंगीत दिवे अजून गरगर फिरत असून त्यांच्या छटा एकांत एक मिसळत आहेत. माध्यमिक शाळेंतलीं मुलें आतां रात्रीचीं जेवायला घरीं गेलीं आहेत. शेजारच्या दुकानांतल्या तो छोटा ग्रीक मनुष्य तेवढा घडवंची पुशीत उभा आहे. ‘ चिन-ली ’ हा चिनी परीट घडवंचीमागें उभा राहून कपड्यांना इस्तरी करीत आहे. मध्यरात्रीपर्यंत त्याचें काम चालूं राहील – आणि पुन्हा सकाळीं सात वाजतां त्याचें दुकान उघडेल. रेडियोच्या दुकानांतली रोषणाई पदपथावर पसरली आहे. दुकानांतले भव्य टेलिव्हिजन सेट, टोस्ट भाजणारीं यंत्रें, केस सुकविणारीं, केर काढणारीं यंत्रें, सूर्य-किरणांचें कार्य करणारे दिवे आणि ध्वनिमुद्रिकांचीं शीर्षकें या साऱ्यांवरून हा प्रकाश ओघळून खालीं येत आहे. ‘ टोनी ’ या इटालियन गृहस्थाच्या उपाहारगृहाच्या अंधुक पिवळसर रंगाच्या अंतर्भागांत आतां फारशी गर्दी नाहीं, तरी त्यावरील विजेच्या अक्षरांची निळी पाटी अजून चमकत आहे. शेजारच्या मॅडेलिन बाईच्या वेषभूषेच्या दुकानांत आतां कोणीच नाहीं. पेट्रोलपंपावर सारी सामसूम आहे. पण स्टेशनवरून येणाऱ्या मोटारी आणि पदपथावरील एकटेदुकटे लोक अजून घराकडे जातांना या कोपऱ्यावरून पुढें वळतात.

रस्त्यावर जरा पुढें असलेल्या घरांतून कष्टानें काढलेले पियानोचे सूर घुमत आहेत. ‘ रॅचमिनॉफ् ’ या संगीतकारानें बांधलेल्या एका चिजेचा हा बाळबोध मुखडा आहे. येथें एका मुलाच्या हातांबोटांना ही मेहनतीची तालीम मिळत आहे. चुकतमाकत तो सुरांवर बोटें टाकीत आहे.

या आवाजांतून दुसरेहि अर्थ निघतात. सध्यां हें संगीत या पांढऱ्या रंगीत घरांतून येत आहे. कुंपण नसलेल्या हिरवळीमागें उभें असलेलें हें घर अमेरिकेच्या एका उपनगरांतलें आहे. पण हेंच संगीत लंडनच्या उपनगरांतील एखाद्या लाल विटांच्या घरांतूनहि येऊं शकेल; पॅरिसच्या उपनगरांतील एखाद्या जुन्या, करड्या रंगाच्या घरांतून, बर्लिनमधील पडक्या घरांतून, किंवा मॉस्कोंतील एखाद्या भिकार, न रंगविलेल्या घरांतूनहि येऊं शकेल;

आणि तें तसें येतेंहि. जगभर सारेच लोक आपापल्या गांवांतल्या रस्त्यांतून संध्याकाळीं फिरत असतात. हे लोक, हीं घरें, हीं उपनगरें सारीं सारखीं नसतात. पण एखादा मुलगा (किंवा मुलगी) रॅचमिनॉफ्च्या चिजेचा मुखडा वाजविण्याचा सराव करीत असेल तर मात्र त्या संगीतांत एकाहि स्वराचा किंवा मात्रेचा फरक पडणार नाहीं !

## ठीक चाललंय् !

'व्हर्जिनिया'तील या वृत्तपत्रकचेरींत, आणि विशेषत: हे वृद्ध गृहस्थ काम करीत असलेल्या खोलींत दीर्घ, सुस्त अशी शांतता वास करीत आहे. पांच वर्षांपूर्वी प्रसिद्ध झालेल्या एका खास अंकाच्या शोधार्थ हे गृहस्थ बाहेर गेले होते. ते दारांतून बाहेर पडल्याबरोबर ती खोली (जणूं काय) अंगाचा मुटकुळा करून शांतपणें डुकली घेऊं लागली. उघड्या खिडकीच्या जाळीशीं एक माशी घोंघावूं लागली. बाहेरच्या मोठ्या 'एल्म्'च्या झाडावर थोडी फडफड झाली. हमरस्त्यावरील एका मोटारीच्या कर्ण्याचा दुरून अस्पष्टसा आवाज आला. त्या उबदार, उन्हांत न्हालेल्या खोलींत याहून दुसरे कसलेहि आवाज आले नाहींत.

त्या वृद्ध गृहस्थाच्या टेबलावर पुस्तकें, कागदाचे कपटे, तंबाखूचे डबे आणि शाईच्या वाटल्या यांचा खच पडला होता. भिंतींच्या रंग उडालेल्या कागदी आच्छादनावर पेट्रोलपंपाचें एक कॅलेंडर आणि व्हर्जिनिया संस्थानाचा एक नकाशा या वस्तु टांगलेल्या होत्या. खिडकीजवळच्या टेबलावर वृत्त-पत्राची एक अस्ताव्यस्त फाइल उघडी पडली होती. केराच्या मोडक्या टोपलीभोंवतीं पाकिटें आणि छपाईच्या लेखांच्या गुंडाळ्या पडल्या होत्या. गालिच्यावरील नक्षीकाम जेथें पूर्णपणें विरून गेलें नव्हतें, अशा थोड्याच जागा होत्या. त्यांपैकीं एका जागेवर ही टोपली ठेवलेली होती. तो वृद्ध गृहस्थ पुन्हा परत येईपर्यंत, आणि त्याला या वस्तूंची गरज लागेपर्यंत खोलींतील या साऱ्या वस्तु अशा निस्तब्ध शांततेंत बुडून गेल्या होत्या.

जाळीच्या एका भोंकांतून ती माशी बाहेर पडली. 'एल्म्' वृक्षावरून तो पक्षीहि उडून गेला. तो वृद्ध खोलींत परत येण्यापूर्वीं कांहीं वेळ तेथें संपूर्ण

शांतता नांदत होती. टेबलाशीं बसून त्या गृहस्थानें तो खास अंक उघडला. नवे उद्योगधंदे, वाढते कर, आणि एक नवें इस्पितळ यांविषयीं सर्व माहिती त्या खास अंकांत होती.

तो वृद्ध गृहस्थ भेटीस आलेल्या गृहस्थाकडे चष्म्यांतून रोखून पाहात म्हणाला, " मोठमोठ्या रकमा देणाऱ्या लोकांची ही यादी. यांतले बहुतेक लोक येथें अनेक वर्षे राहणाऱ्या घरंदाज घराण्यांतले आहेत. '**व्हर्जिनिया मधील पहिल्या दर्जाचीं कुटुंबें**' या नांवानें तीं ओळखलीं जातात. कांहींना हीं आवडत नाहींत. त्यांना ते लोक ' जादा शिष्ट ' म्हणून नांवें ठेवतात. "

तो वृद्ध गृहस्थ समजूतदारपणानें जरा हसून म्हणाला, " असं असलं तरी असे लोक जवळपास असलेले फार चांगले—विशेषतः तुम्ही एखादं इस्पितळ बांधीत असलांत तर ! "

( भेटीस आलेला मनुष्य म्हणाला ) " ठीक आहे. फार आभारी आहें मी आपला. हा अंक मी नंतर परत करीन तुम्हांला. "

—" या शहरांत जरा फिरून येणारच असाल तुम्ही ? "

—" होय ! शहर तर छान, भरभराटीला आल्यासारखं दिसतंय्. "

—" हं ! एकंदरींत आमचं ठीक चाललं आहे इथं. कोणी विशेष श्रीमंत नाहीं, कोणी विशेष गरीब नाहीं–साऱ्यांचं आपलं ठीक चाललंय् एवढंच. "

—" इथं निग्रो लोकांचीहि बरीच वस्ती आहे, नाहीं का ? "

" होय ! त्यांचा कांहींएक त्रास होत नाहीं आम्हांला. गोऱ्या लोकांपेक्षांहि अधिक चांगले वागतात ते लोक. त्यांचंहि चांगलं चाललं आहे. त्यांच्यापैकीं खूपशा लोकांचीं स्वतःच्या मालकीचीं घरं आहेत. फार चांगले नागरिक आहेत ते. "

आतां मुख्य रस्त्यावर कडक ऊन पडलें होतें. नीटनेटक्या चौकोनी हिरवळी-मागील न्यायालय आतां बंद झालें होतें. गांवचा पोलीस-पाटील हातांचें स्वस्तिक करून आरामांत पडवींत बसला होता. रिकाम्या पडलेल्या कोठ-ड्यांत हवा खेळती राहावी म्हणून तुरुंगाचे दरवाजे उघडे ठेवले होते.

हमरस्त्याच्या दोन्ही बाजूंना मोटारी उभ्या होत्या. पदपथावरून लोक संथपणें फिरत होते, दुकानांतून आंत बाहेर करीत होते. हमरस्त्यावरील

चित्रपटगृहांत 'डुरांगो किड्' (डुरांगोचा कुमार) 'ट्रेल टू लारेडो' (लारेडोच्या मार्गावर) हे चित्रपट लागले होते. तिकिट-विक्रीच्या खिडकीवर लिहिलें होतें "**सर्व जागांचा एकच दर–पंचवीस सेंट.**" कांचेच्या खिडकीमागें एक मुलगी केस विंचरीत होती. शेजारच्या चौकांतील औषधांच्या दुकानाचा दर्शनी भाग नव्यानें बांधला जात होता. त्यामुळें त्याभोंवतीं फळ्या मारल्या होत्या, परंतु त्यांतील व्यवहार नेहमींसारखा चालू होता. पांच आणि दहा सेंटच्या वस्तु विकणारें दुकान जवळ जवळ रिकामें होतें. त्यांतून फोनोग्राफचा आवाज येत होता. रेकॉर्डवर एक मुलगी उंच, करुण स्वरांत एक गाणें गात होती. त्याचा भावार्थ असा—"संकटकाळीं उपयोगीं पडतो तोच खरा मित्र—अन् आतां मला अशा मित्राची फारच निकड आहे!"

त्या खालच्या चौकांत, चष्मा लावलेली, एक उंच निग्रो मुलगी कापड-दुकानाच्या दाराशीं येऊन एक रेघांचा फ्रॉक आपल्या उंचीला बरोबर आहे कीं नाहीं हें पाहण्यासाठीं तो आपल्या अंगाला लावून पाहत होती. मळकट सदरा घातलेला एक लहान मुलगा जवाहिऱ्याच्या दुकानांतील साखर-पुडाच्या मुद्रिका ठेवलेल्या तबकाकडे टक लावून पाहात होता.

शर्ट, ब्रेसेस आणि जाड निळ्या कापडाची पाटलोण या वेषांतला एक पहाडी शेतकरी एक भरलेलें पोतें उचलून किराणा दुकानांतून बाहेर आला. त्याच्या पत्नीनें घाईनें पुढें होऊन एका जुन्या मोटारीचें दार उघडलें. तिच्या अंगावर एक मळकट, सुती फ्रॉक होता, आणि तिचीं मुलें तिच्या मागेंच उभीं होतीं. त्यांतली एक लहान मुलगी रेडियो दुकानांतल्या एका पांढऱ्या, चकचकीत इस्तरीकडे टक लावून पाहण्यासाठीं जरा थांबली आणि मग तीहि त्या मोटारीकडे धांवत गेली.

रेल्वेच्या फाटकाजवळ एक पाटी लागली होती—'**या पायऱ्यांवर भटकण्याची सक्त मनाई आहे.**' दोन्ही दिशांना नीट न्याहाळून पाहून एक म्हातारा निग्रो रस्ता ओलांडूं लागला. एक गवती साहेबी टोपी त्याच्या कपाळावर बरीचशी खालीं ओढून बसविली होती.

—व्हर्जिनियांतली ही एक शांत, उबदार अशी संध्याकाळ होती, आणि तेथील साऱ्या लोकांचें एकंदरीनें ठीक चाललें होतें!

● ● ●

## तुफान मेल !

मेलगाडींतील क्लबच्या डब्यांतून सारख्या अंतरानें कांहीं विशेष आवाज येत होते. बर्फाचे खडे पेल्याच्या बाजूनें सरकत जाऊन, तळाशीं पडतांना त्यांचे ते आवाज होत होते. याशिवाय इतर आवाजहि त्या डब्यांत येत होते; ते म्हणजे रेडियोच्या संगीताचे, लोकांच्या संभाषणाचे. ही आगगाडी अफाट माळरानावरून पश्चिमेकडे धावत जात होती. संध्याकाळच्या संधिप्रकाशाचें रूपांतर हळूहळू अंधारांत होत होतें. थोड्याच वेळानें त्या अंधारांत तारे चमकणार होते.

क्लबच्या डब्यांत सर्वत्र समाधानाचें वातावरण पसरलें होतें. जेवणांतली ' सेलरी 'ची कोशिंबीर बर्फासारखी गार आणि खुसखुशीत झाली होती. त्यानतरचें पक्वान्नहि छान झालें होतें. त्यावर पिस्त्याचें आइसक्रीम आणि नंतर छानशी कॉफी असा बेत होता. डब्यांतले बहुतेक लोक गप्पागोष्टी करण्याच्या मनःस्थितींत होते; परंतु त्या सर्वांतून एकीकडे बसलेला एक मनुष्य उठून दिसत होता. तो जरा ठेंगणा व चांगला जाडजूड असून त्याला अर्धवट टक्कल पडलें होतें. चौकड्यांच्या कापडाचा कोट, गडद पिवळ्या रंगाची ढिली पाटलोण आणि पिवळ्या रंगाचे, कोंकराच्या कातड्याचे छानसे बूट असा त्याचा वेष होता. त्याच्या मनगटावर एक मोठेंसें सोन्याचें घड्याळ होतें. गोल, पिवळ्या काड्यांच्या चष्म्यामागून दिसणारे त्याचे डोळे चिंता आणि अस्वस्थता यांनीं भारावले होते. त्याच्या हातांत एक मासिक असून तें न वाचतांच तो त्याचीं पानें उलटीत होता, आणि असें करीत असतां त्याची नजर रागीट दिसत होती. त्याच्याकडे पाहणाऱ्या लोकांना असें वाटे कीं या गृहस्थाच्या डोक्यांत चिंतापूर्ण विचारांची रांगच रांग लागली असावी. आणि म्हणूनच कोणी त्यास त्रास देत नसावें.

आगगाडी आपल्या ठरलेल्या मार्गानें माळरानावरून धांवत होती. क्लबच्या डब्यांत ऊब होती, सौख्य होतें. चालत्या आगगाडीचा जो संथ, सतत, आरामशीर आवाज येत असतो तो त्या डब्यांत भरून राहिला होता. असें असूनहि तो तुळतुळीत डोक्याचा, जाडजूड मनुष्य मधून मधून कांहीं पेय पीत होता, हातांतलें मासिक वाचण्याचा बहाणा करीत होता, रागानें पाहात होता आणि चिंतातुर होऊन बसला होता.

डब्यांतील एक गृहस्थ उत्साही स्वरांत म्हणाला "बरं का मंडळी ! या आगगाडीचे रूळ थेट लॉस अँजेलिस्‌पर्यंत 'सांटा-फे' या जुन्या रस्त्यावरून, पावलापावलानें मागोवा घेत चालले आहेत. मीं ऐकिलेली एक मौजेची गोष्ट तुम्हांला सांगतों. ज्या जागेवरून हे रूळ जातात त्यावरून पूर्वी गाडया, घोडे आणि बैल जाऊन ती इतकी कठीण झाली होती कीं तिचा शेतीसाठीं उपयोगच करितां येईना. शेतकरी ती जमीन नांगरण्याचा प्रयत्नहि करिनात. अजूनहि ती जमीन तशीच आहे." त्या मनुष्यानें आपलें मद्यपान संपवून पेला खालीं ठेवला. त्यांतील बर्फाचा खडा घसरत तळाशीं येऊन आपटला.

इ. स. १९१२ सालीं 'न्यू मेक्सिको' हा देश संयुक्त संस्थानांना येऊन मिळाला त्या वेळीं या डब्यांत आतां बसलेले लोक बाल्यावस्थेंतच असतील. त्यांच्या वडिलांनीं त्यांच्या बाल्यावस्थेंत किंवा तारुण्यांत या 'सांटा-फे' रस्त्यानें घोडयावरून प्रवास केला असेल. या रस्त्याची जमीन मऊ असतांना जे पहिले एक हजार व्यापारी त्यावरून गेले, त्यांत या लोकांचे आजोबा देखील असूं शकतील. कोंकराच्या कातडयाचे सुंदर बूट घालून बसलेला, हा टक्कल पडलेला मनुष्य जसा चिंतातुर झालेला आहे. तसेच त्याचे आजोबाहि त्या वेळीं चिंतातुर झाले असतील. आज ही आगगाडी माळरानाच्या ज्या जागेवरून धांवत जात आहे त्याच जागेवर कदाचित् ते देखील चिंताग्रस्त होऊन बसले असतील आणि त्या वेळीं तारे उगवण्यापूर्वींच्या अंधारांत त्यांच्याभोंवतींहि संधि-प्रकाशाचें असेंच रूपांतर होत चाललें असेल.

आधुनिक तरुणा ! तुला तुझ्या चिंता आहेत हें खरें. तुझ्या आजोबांच्या चिंतांपेक्षां त्या तुला कमी त्रस्त करीत असतील असें मला म्हणावयाचें नाहीं. इ. स. १८४० सालीं तुझे आजोबा माळावरील ज्या जागीं चिंतातुर होऊन बसले असतील, त्याच जागेवरून तूंहि या क्षणीं जात आहेस, हा विचित्र योगायोगच म्हणावयाचा. पण दोस्ता ! यालाच जीवन म्हणतात ! तुझ्या अडचणींपेक्षां तुझ्या पूर्वजांच्या अडचणी कळणें आज अधिक सुलभ झालें आहे. तुझ्या अडचणींची चर्चा करतां येत नसल्यानें तुझ्या पूर्वजांच्या अडचणींचाच आपण तपशीलवार विचार करूं. त्यासाठीं तुला त्या पार्श्वभूमीची थोडी माहिती असणें जरूर आहे.

त्या वेळीं हे तुझे पूर्वज पंचेचाळीस वर्षांचे असून पत्नी आणि चार मुलें असा त्यांचा परिवार होता. सोईसाठीं त्यांच्या पत्नीला आपण 'मेरी बक्स्किन्' असें नांव देऊं या. त्यांच्या चार मुलांपैकीं सर्वांत धाकटा मुलगा हा तुझा पिता. तुझ्या वडिलांचें नांव काय होतें बरें? तें कोणतेंहि असो. आपण त्यांना 'सॅम्' म्हणूं या. अशा रीतीनें आपल्याला एवढी माहिती मिळाली कीं हें बक्स्किन् मंडळीचें कुटुंब आपल्या गाडींत वसून 'मिसुरी' संस्थानांतील 'इन्डिपेन्डन्स्' या गांवापासून बावीस दिवसांचा प्रवास करून याच जागेवर थांबलें होतें. बरोबरच्या काफिल्यासह रात्रीं विश्रांति घेण्यासाठीं त्याची तयारी चालली होती.

ही वाट बक्स्किन्च्या चांगल्या ओळखीची होती. कारण याच 'सांटा-फे' मार्गानें तो मेक्सिकन लोकांशीं व्यापार-उदीम करण्यासाठीं जात असे. किराणा माल, लोखंडी वस्तु, सोन्याचांदीचें किडूक-मिडूक आणि 'वीव्हर' प्राण्यांचीं कातडीं या वस्तूंचा व्यापार तो करीत असे. हें काम कष्टाचें होतें खरें; पण त्यांतून त्याला चांगला नफा होत असे. कॅलिफोर्निया प्रांताची वाट धरून तेथें स्थायिक व्हावें, असा त्यानें विचार केला होता. सांटा-फे येथें असतांनाच पॅसिफिक किनाऱ्यावरील हिरव्यागार, सुपीक शेतांच्या कथा ऐकून तो त्यांच्याबद्दलचीं सुखस्वप्नें पाहूं लागला होता. अशा रीतीनें सांटा-फे मार्गावरील ही त्याची अखेरची सफर होती. आतां 'सांटा-फे' पासून तो 'चि-हुआ-हुआ' या गांवाला जाणार, आणि तेथून कॅलिफोर्नियाकडे. त्याची सारी चीजवस्तु आणि त्याच्या मायेचीं सारीं माणसें या प्रवासांत त्याच्या बरोबरच होतीं. आजच्या तरुणा! तूंहि याच मार्गानेंच चालला आहेस ना?

ठीक, (आतां पुढें पाहूं.) बक्स्किन् आतां मोठ्या संकटांत सांपडला आहे. त्याचा छोटा मुलगा सॅम् आजारी पडला आहे. बक्स्किन् गेले तीन दिवस बैलगाडी बरोबर चालत आहे आणि धक्के बसत असलेल्या गाडींत छोट्या सॅम्ला खूपशा शालींत गुंडाळून त्याची पत्नी मेरी या मुलाची शुश्रूषा करीत बसली आहे. गाडीचा खडखडाट, लाकडांचे 'ची-ची' आवाज, धूळ आणि दिवसभराच्या उष्णतेमुळें येणारा घाम यामुळें तो मुलगा

अधिकाधिक चिडखोर बनत चालला आहे. त्याला खूपसा ताप भरला आहे आणि तो चांगलाच आजारी आहे, यांत आतां शंका नाहीं. काफिल्यांतील स्त्रिया त्याची काळजी घेत आहेत, आणि त्यांना जें जें करतां येणें शक्य आहे, तें तें सारें त्यांनीं करून पाहिलें आहे. पण त्यांच्यांपैकीं कोणालाहि फारसें करतां येण्यासारखें नाहीं. कोणाजवळहि 'ॲस्पिरिन' हें औषध नाहीं, कारण हें औषध अद्याप जगांत कुठेंच तयार झालेलें नाहीं. या मुलाला पिण्यासाठीं पाणी देणें आणि ओल्या फडक्यानें त्याचें धगधगणारें कपाळ थंड करण्याचा प्रयत्न करणें, एवढेंच त्यांना करतां येण्यासारखें आहे. त्या सान्यांना हें माहीत आहे, कीं आजारी मुलाला विश्रांति, झोंप व ऊब मिळाली, तर त्याची प्रकृति कधीं कधीं सुधारते; नाहींपेक्षां त्याला मृत्यु येतो. जर हा मुलगा वारलाच, तर माळरानावर एक खांच खणून त्याला तेथेंच मूठमाती द्यावी लागली असती आणि त्या कुटुंबाला आपला प्रवास पुढें चालू ठेवावा लागला असता.

आजच्या तरुणा ! तुझ्या आजोबाला कोणता निर्णय घ्यावा लागला असेल आणि तो कां चिंतातुर होऊन बसला होता, याची आतां तुला कल्पना आली असेल. गाड्यांचा तांडा दुसऱ्या दिवशीं पुढें निघणार, त्या वेळीं या मुक्कामावरच थांबण्यासाठीं मेरीनें त्याची विनवणी केली होती. तसें केल्यास सॅम्ला विश्रांति मिळेल आणि तो कदाचित् बरा होईल, हें खरें; पण तसें केलें, तर तें कुटुंब त्या माळरानावर एकटें पडणार. मग ते मागें फिरोत किंवा पुढें जावोत; त्या सान्यांच्या मृत्यूचा धोका पूर्वीपेक्षां शतपटीनें अधिक वाढला असता. भोंवतालीं जंगली रेडइंडियन लोकांचा संचार चालू होता. नुकत्याच मागें टाकलेल्या दलदलींत गाडीचें एक चाक आधींच पिचलें होतें. तें जर मोडून पडलें, तर सान्यांची गच्छन्तीच व्हावयाची !

तुझी ही परिस्थिति आजच्या एखाद्या सस्त्या "वेस्टर्न" (पश्चिम अमेरिकन धाडसी) चित्रपटांतील परिस्थितीसारखी दिसते, असें (उपहासानें) सांगून बक्स्किन्ला कांहीं फायदा होण्यासारखा नव्हता. आधुनिक तरुणा ! असें (हेटाळणीनें) बोलून तुलाहि कांहीं फायदा होण्यासारखा नाहीं. सुमारें शंभर वर्षांपूर्वी अमेरिकेंतलें जीवन कसें होतें, याबद्दलच्या कागदपत्रांचें

थोडेंसें संशोधन केलें तरी स्पष्ट दिसून येईल, कीं नेहमींच अशा प्रकारचे निर्णय ' बक्स्किन् 'ला अथवा त्याच्या मित्रांना खरोखरच घ्यावे लागले होते.

तरुणा! आज तुला तरी कोणते निर्णय घ्यावयाचे आहेत? लागेल तो खर्च करून, आपल्याला हव्या असलेल्या सिनेमातारकेला मेरीचें काम करायला लावून एखादा चित्रपट काढावा, कीं काय याबद्दल तुला निर्णय घ्यावयाचा असेल. हा प्रश्न खरोखरच कठीण आहे. असें चित्र पैसा मिळवून देईल कीं नाहीं, त्यामुळें आपला लौकिक वाढेल कीं कमी होईल, हे प्रश्न त्या निर्णयाशीं निगडित झाले आहेत. आजच्या परिस्थितींत, लौकिक आणि अर्थार्जनविषयक निर्णय घेतांना मनुष्यावर बराच ताण पडत असतो, हें मी नाकबूल करीत नाहीं. आतां उद्भवतो तो प्रश्न असा.

हा आगगाडीचा आरामशीर डबा या अफाट माळरानावरून धावत आहे. आकाशांत आतां तारे चमकूं लागले आहेत. गेल्या शतकाच्या मध्यावर, याच परिस्थितींत ज्या अमेरिकनांना असे निर्णय घ्यावे लागले, ते लोक आणि या शतकाच्या मध्यावर पुढें आलेले प्रश्न, ज्यांना सोडवावयाचे आहेत, ते अमेरिकन लोक हे दोन्ही एकच अमेरिकन लोक आहेत काय? हाच तो प्रश्न होय. जीवित धोक्यांत असलेला मनुष्य आणि लौकिक धोक्यांत असलेला मनुष्य या दोघांच्या भावना आणि विचार एकाच प्रकारचे असतील काय? या दोघांपैकीं कोणाला अधिक यातना होत असतील? मागील शतकांतील मनुष्याला त्या अधिक होत असतील, असें निश्चितपणें म्हणतां येणार नाहीं. मानसिक आणि शारीरिक (दोन्ही) दृष्टींनीं यातना सहन करण्याची त्याची तयारी कदाचित् अधिक चांगली असूं शकेल.

शंभर वर्षांपूर्वीच्या अमेरिकन मनुष्याच्या जीवनांत आजच्या जीवनाहून मानसिक ताण आणि यातना यांचें प्रमाण कमी होतें, कीं काय हें आज कळणें शक्य नाहीं. तें तसें असो किंवा नसो. त्या वेळचा तो ' बक्स्किन् ' आणि आजचा हा त्याचा नातू हे दोघेहि एकाच देशाचे नागरिक आहेत. पण तेवढ्यानें त्यांचें व्यक्तिमत्त्व सारखेंच आहे, असें म्हणणें बरोबर आहे काय? कारण त्या दोघांच्या जीवनानुभवांत एक शतकाच्यापेक्षांहि अधिक अंतर पडलेलें आहे. केवळ तीन पिढ्यांच्या काळांत जींत इतके मनस्वी बदल घडून आले आहेत, अशी दुसरी संस्कृति इतिहासांत सांपडणार नाहीं. तेंच (एकच)

माळरान हे दोघेहि ओलांडून जात आहेत, हे दोघेहि एकाच देशाचे नागरिक आहेत. पण अमेरिकेंतील आजोवा आणि नातू यांचे मानसिक संबंध इतर देशांतील तशा लोकांसारखेच असतील, असें गृहीत धरणें बरोबर होणार नाहीं. विसाव्या शतकांतील मध्यकाळांतील अमेरिकन मनुष्याच्या व्यक्तिमत्त्वाचा विचार करणाऱ्या व्यक्तीनें वरील तत्त्वाची दखल न घेतल्यास त्याचीं अनुमानें वहुधा चुकीचीं ठरतील.

## उपस्थित असलेल्यांपैकीं

"तुम्हांला ही कल्पना कशी सुचली ?" असा प्रश्न लोक सौ. गेरिरी यांना करूं लागले, तेव्हां त्यांनाहि नीटसें आठवेना कीं इंग्लंडची राजकन्या एलिझाबेथ आणि राजपुत्र फिलिप यांच्या विवाहाबद्दलची बातमी आपण वाचली–ती १९४७ च्या जुलै महिन्यांत कीं ऑगस्टमध्यें ? वृत्तपत्रांतील त्या बातमींत असें म्हटलें होतें कीं लग्न आणि मधुचंद्र या समारंभासाठीं लागणारीं अनेक वस्त्रें राजकन्येला वेळेवर खरेदी करितां येणार नाहींत. कारण इंग्लंडमध्यें त्या वेळीं कापडनियंत्रण चालू होतें. सौ. गेरिरी यांनीं ही बातमी वॉशिंग्टन शहरांत वाचली. त्या वेळीं संध्याकाळ उलटून गेली होती. हवा गरम होती. कॉर्नेला, लुआ-मारी आणि मेरी-ॲन् हीं लहान मुलें झोंपी गेलीं होतीं. रिचर्ड हा त्यांचा बारा वर्षांचा मुलगा घरचा अभ्यास करीत होता. सौ. गेरिरीचे पति, लुई, हे कोलंबिया जिल्ह्याच्या रस्ते खात्यांत काम करीत असत. या वेळीं ते वृत्तपत्रांतील क्रीडा विभाग वाचीत बसले होते. सतराशें घरें असलेल्या (त्या) चौकांतील एका घराच्या वरच्या मजल्यावरील गाळ्यांत शांतता भरून राहिली होती. अशा वेळीं सौ. गेरिरी या त्यांना नुकत्याच सुचलेल्या विचाराबद्दल चिंतन करीत बसल्या होत्या.

यानंतरचा बराच वेळ त्यांनीं फक्त विचारांतच घालविला. कारण दुसरें कांहीं ( लगेच ) करूं लागणें त्यांना मूर्खपणाचें वाटत होतें. पण नंतर मात्र त्यांनीं एकदम कांहींतरी निश्चय केला, आणि घराबाहेर जाऊन 'टफेटा' जातीचें, हिरव्या रंगाचें सहा वार कापड विकत घेतलें. आपण काय करणार आहोंत, याबद्दल त्यांनीं कोणालाहि कांहींहि सांगितलें नाहीं. त्या तें हिरवें

कापड शिवीत असतांना पाहून लुईची अशी कल्पना झाली कीं, त्या स्वतः-साठींच कांहीं कपडे शिवीत असाव्या. परंतु ती वेषभूषा राजकन्या एलिझाबेथ यांच्यासाठीं होती.

त्यांनीं गोल गळ्याची एक साधी चोळी शिवून तिला पाठीमागें हिरवीं बटणें लावलीं. या चोळीच्या बाह्या कोपरांपर्यंत घट्ट असून त्याच्या वरच्या बाजूस मात्र त्या सैल ठेवल्या होत्या. खालचा, झग्याचा घोळ चांगला रुंद आणि मोकळा ठेवला होता. त्या झग्यासाठीं त्यांनीं चार वार कापड वापरलें, आणि झग्याची लांबी पाऊणपट ठेवली. हा पोषाख तयार झाल्यावर त्यांनीं त्याला नीट इस्त्री केली आणि त्याची घडी घालून तो एका पेटींत बंद केला. राजकन्येसाठीं एक चिठ्ठीहि त्यांनीं त्याच पेटींत लिहून ठेवली. त्या चिठ्ठींतला मजकूर असा होता – "आपल्याला हा पोषाख स्वीकारतां आला नाहीं, तरी मला मुळींच राग येणार नाहीं. माझ्या तें ध्यानांत येईल. तुम्ही तो पोषाख परत केला तरी चालेल."

सौ. गेरिरी ती पेटी पोस्टांत घेऊन गेल्या. ती पेटी बकिंगहॅम राजवाड्यांत पाठविण्यास आठ डॉलर शेहेचाळीस सेंट एवढा आकार पडणार आहे, असें कळल्यावर मात्र त्यांची क्षणभर बरीच चलबिचल झाली. त्यांनीं शिवलेल्या दुसऱ्या एका पोषाखाचे पैसे त्याच वेळीं त्यांच्या हातीं आले होते. तसें झालें नसतें, तर त्यांना ही रक्कम खर्च करतां आली नसती. आठ डॉलर आणि शेहेचाळीस सेंट म्हणजे त्यांच्या गाळ्याचें एक आठवड्याचें भाडें होतें.

कांहीं महिन्यांनंतर सौ. गेरिरी यांना एक पत्र मिळालें, तें लेडी मार्गारेट सेमूर यांचें होतें. त्यांतील मजकूर असा – "राजकन्येनें आपण पाठविलेल्या पोषाखाचा मोठ्या आनंदानें स्वीकार केला असून तुमचे आभार मानण्या-साठीं मला आज्ञा केली आहे. नोव्हेंबर १८ रोजीं सेंट जेम्स राजवाड्यांत लग्नानिमित्त आलेल्या देणग्यांचें प्रदर्शन आहे, तें पाहण्यासाठीं आपण उपस्थित राहूं शकाल अशी राजकुमारींना आशा वाटते," असा मजकूरहि त्या पत्रांत शेवटीं जोडला होता.

सौ. गेरिरी यांचे पति कामावरून घरीं परत आल्यावर हें पत्र त्यांनीं त्यांना दाखविलें. क्षणभर पतिराजांच्या तोंडून शब्दहि उमटेना. पण पति-

पत्नीला हें कळून चुकलें होतें कीं, या आमंत्रणाचा स्वीकार करण्याची संधि आपल्याला लाभणें शक्य नाहीं.

संध्याकाळीं त्यां उभयतांच्या परिचयाची एक मुलगी त्यांच्या भेटीसाठी आली. श्री. गेरिरी यांना आतां आपल्या पत्नीबद्दल थोडा अभिमान वाटूं लागला होता, म्हणून त्यांनीं त्या मुलीला हें पत्र दाखविलें. 'वॉशिंग्टन् पोस्ट' या वृत्तपत्राला टेलिफोन करून ही मुलगी वरील बातमी देईल, अशी श्री. किंवा सौ. गेरिरी यांना कल्पनाहि आली नव्हती.

पुढें हा मजकूर आणि सौ. गेरिरी यांचें छायाचित्र 'पोस्ट' या वृत्तपत्रांत प्रसिद्ध झालें. या वृत्तपत्रानें 'S' रस्त्यावरील त्यांच्या बिऱ्हाडीं आपला एक वार्ताहर पाठविला. त्यानें सुचविलेल्या योजनेमुळें लुईला धक्का बसून जवळजवळ घेरीच आली. ती योजना अशी – या वृत्तपत्रानें सौ. गेरिरी यांचा लंडनला जाण्यायेण्याचा ( विमानमार्गे होणाऱ्या ) प्रवासाचा खर्च करावा. त्याखेरीज एक हजार डॉलर्सपर्यंत त्यांचा वरकड खर्चहि भागवावा. या खर्चाच्या मोबदल्यांत सौ. गेरिरी यांनीं त्या वृत्तपत्राशीं असा करार करावयाचा कीं – आपण लंडनमधील आपले अनुभव स्वतःच्या शब्दांत, बातमीपत्रांच्या स्वरूपांत त्या वृत्तपत्राला ( वॉशिंग्टन येथें ) तारेनें पाठवावयाचे.

लुई आणि सौ. गेरिरी या दोघांनींहि त्या वार्ताहराला आणि परस्परांनाहि निश्चितपणें सांगितलें कीं, याप्रमाणें होणें अगदीं अशक्य आहे. सौ. गेरिरी यांनीं कधीं विमानांत पदार्पणहि केलें नव्हतें कीं अमेरिकेबाहेर कधीं प्रवास केला नव्हता. इतकेंच नव्हे तर त्या एक रात्रभरहि आपल्या मुलांना सोडून कधीं बाहेर राहिल्या नव्हत्या. हा प्रवास करणें अगदीच अशक्य आहे असें त्या वृत्तपत्राला समजावून सांगावें, अशी त्या दोघांनीं त्या वार्ताहराला विनंति केली....

●

ता. १७ नोव्हेंबर रोजीं सौ. गेरिरी T. W. A. विमानानें लंडनला येऊन पोंचल्या. त्या दिसण्यास नीटस व सडपातळ असून बांध्यानें लहान होत्या. घरींच शिवलेला छानसा पोषाख त्यांनीं परिधान केला होता. त्यांचे विपुल केस पिंगट रंगाचे असून त्यांचें वागणें नेहमीं मोकळेंचाकळें व खेळीमेळीचें असे.

नॉर्थ कॅरोलिना विभागांतील ' हॉर्स-शू ' नांवाच्या अगदीं लहान गांवांत त्याचा जन्म झाला. त्यांचे वडील किराणा मालाचें दुकान चालवीत. त्या अठरा वर्षे वयाच्या असतांना लुई यांचेबरोबर त्यांचें लग्न झालें होतें. आतां त्या एकतीस वर्षांच्या होत्या, पण वयाच्या मानानें त्या अधिक तरुण दिसत; आतांहि त्या तशाच दिसत होत्या. विमानांत त्यांना फक्त दोन तास झोंप मिळाली होती तरीहि.

न्यूयॉर्क येथील ' ट्रिब्यून ' या वृत्तपत्राच्या लंडन येथील कचेरीनें सौ. गेरिरी यांना त्यांचीं बातमीपत्रें तयार करण्यांत आणि तीं वेळेवर तारेनें रवाना करण्यांत मदत करण्याचें कबूल केलें होतें. सौ. गेरिरी यांनीं आपलें पहिलें बातमीपत्र त्या रात्रीं, टेम्स् नदीच्या परिसरांतील वृत्तपत्र कचेरीच्या कचेरींत बसून ( तोंडानें मजकूर सांगून ) तयार केलें. त्यांत त्यांनीं असें नमूद केलें होतें – " ब्रिटिश लोकांना आठवड्यांतून एक अंडें मिळालें, तर ते ती भाग्याची गोष्ट समजतात. राजकन्या एलिझाबेथ मोत्याचे अलंकार परिधान करते. मोत्यें माझ्या आवडीचीं असल्यानें मला ते पाहून विशेष आनंद झाला.. .इंग्लंडमधील साखऱ्या ' एप्सम्सॉल्ट ' सारखा जाडाभरडा असतो. लंडनमधील रस्ते खडबडीत असून त्यांपैकीं कांहींतर फारच अरुंद आहेत."

सौ. गेरिरी यांनीं पुढें म्हटलें " मीं आतांपर्यंत कधींहि ' हॅट ' ( साहेबी टोपी ) घातलेली नाहीं. परंतु सेंट जेम्स् या राजवाड्यांतील भोजन-समारंभासाठीं मला ती घालणें अवश्य होतें. ब्रिटिश परराष्ट्रीय खात्यांतील, अमेरिकाविषयक माहिती विभागांतील सौ. अॅनी गार्नेट यांनीं माझ्यासाठी कांहीं ताजीं फुलें खरेदी करण्याचें आश्वासन दिलें आहे. त्या मला थोडें जाळीचें कापडहि उसनें देणार आहेत. ( लंडनमध्यें जाळीचें कापड विकत मिळत नाहीं. ) या वस्तु वापरून मी माझी हॅट स्वतः तयार करणार आहे."

हा भोजनसमारंभ त्यानंतरच्या दिवशीं होता. त्या दिवशीं भोजनाच्या वेळेआधींच ही हॅट तयार झाली. पुढें घडलेल्या घटनांत या वस्तूचा एक महत्त्वाचा भाग होता. त्या रात्रीं लिहिलेल्या बातमीपत्रांत सौ. गेरिरी यांनीं या हॅटचें असें वर्णन केलें होतें. " लालसर रंगाच्या ' लिली ' फुलांचें

दोन गुच्छ निवडून घेऊन मीं ते तारेनें एकत्र बांधले. त्यांपैकीं एक गुच्छ डोक्यावर येत असून, दुसरा माझ्या चेहऱ्याच्या डाव्या बाजूला येतो."

पथिकाश्रमाच्या शेजघरांतील आरशांत त्यांनीं या हॅटची पाहणी केली. तेव्हां ती फार छान दिसते, असें त्यांना वाटलें.

आमंत्रणपत्रिकेंत लिहिल्याप्रमाणें बरोबर अडीच वाजतां सौ. गेरिरी सेंट जेम्स् राजवाड्याशीं येऊन हजर झाल्या आणि लोकांच्या समुदाया-बरोबर आंत शिरल्या. यानंतरच्या बातमींत लिहिल्याप्रमाणें त्यांच्या प्रथमच लक्षांत आलें, कीं दर दहा स्त्रियांपैकीं दोन स्त्रियांच्या अंगावर खऱ्या मोत्यांचे दागिने होते; मग त्यांचा बाकीचा वेष कितीहि भिकार असो !

आपण पाठविलेला हिरव्या 'टफेटा' कापडाचा पोषाख कोठें दिसतो कीं काय हें पाहण्यासाठीं सौ. गेरिरी यांनीं चौफेर नजर फिरविली. परंतु तेथें इतक्या ( मोठमोठ्या ) देणग्या होत्या, आणि लोकांची इतकी गर्दी होती, कीं त्यांनीं त्याचा शोध करणें सोडून दिलें. अलंकारांचें प्रदर्शन असलेल्या खोलीच्या दाराकडे त्या निघाल्या. त्याच क्षणीं एका नोकरानें त्यांच्या हाताला जरा स्पर्श करून त्यांना थोडें बाजूला होण्यास सांगितलें; कारण राजकुटुंबांतील व्यक्ती तिकडूनच येऊं लागल्या होत्या.

सौ. गेरिरी त्या नोकराशीं त्वरेनें बोलूं लागल्या. आपण थेट अमेरिकेंतून एवढ्या दूरवर या समारंभासाठीं येथें आलों आहोंत असें सांगून, त्याच्या जवळच उभें राहण्याची परवानगी त्यांनीं मागितली. त्या नोकराचें उत्तर येण्याआधींच राजकन्या एलिझाबेथ आणि राजपुत्र फिलिप यांनीं त्या दारांतून प्रवेश केला. बादशहा, महाराणी आणि राजकन्या मार्गारेट या व्यक्ती त्या दोघांच्या मागून येत होत्या.

यानंतर सौ. गेरिरी यांनीं लिहिलें होतें – "माझ्या शिरोभूषणामुळें राणीसाहेबांचें लक्ष माझ्याकडे गेलें असावें. त्या थांबल्या, हसल्या आणि त्यांनीं माझा हात आपल्या हातांत घेतला.

मी म्हणालें, 'माझं नांव सौ. गेरिरी. मी अमेरिकेंतून आलें आहें.'

मान डोलावून राणीसाहेब म्हणाल्या, 'अगबाई ! खरंच का ?'

मी म्हणालें, 'होय ! मीच तो हिरव्या टफेटा कापडाचा पोषाख राजकन्या एलिझाबेथ यांना पाठविला होता.'

यानंतर मी म्हणालें, 'माझा हा परदेशांतला पहिलाच प्रवास. वॉशिंग्टनच्या 'पोस्ट' या वृत्तपत्राला मी इथलीं बातमीपत्रं पाठवीत असतें.'

मग राणीसाहेबांनीं मला विचारलं, 'इथं ठीक चाललंय् ना तुमचं ?'

– अन् मी म्हणालें, 'हो !'

हें सारें बोलणें चाललें असतांना त्यांनीं माझा हात धरून ठेवला होता. यानंतर तो सोडून, राजेसाहेबांच्या दंडाला धरून त्या म्हणाल्या – 'या बाई अमेरिकेंतून आल्या आहेत बरं का !'

माझ्याशीं हस्तांदोलन करून राजेसाहेब म्हणाले, 'कसं काय ! ठीक आहे ना ?'

त्यानंतर ते दोघेहि हसले आणि मान डोलवून पुढें निघाले.

माझे गुडगे (पाय) लटपटूं लागले होते, म्हणून मला (पद्धतीप्रमाणें) लवून नमस्कार करतां आला नाहीं. मी गुडगे वाकवून त्यांना तसा नमस्कार केला असता, तर मग मला वर उठतांच आलें नसतें.

सौ. गेरिरी यांना एवढें मात्र आठवत होतें कीं, राणीसाहेबांनीं मोत्याचे दागिने परिधान केले होते. सौ. गेरिरी यांचे शब्द असे, 'त्यांचें (मोत्यांचें) सौंदर्य मला वर्णन करतां येत नाहीं ...राजेसाहेब आणि राजपुत्र फिलिप हे दोघेहि देखणे असून महाराणी आणि राजकन्या एलिझाबेथ या दोघीहि फार सुंदर आहेत. राजकन्या मार्गारेट या फार लाजाळू दिसल्या आणि माझ्या मनांत त्यांच्याबद्दल कळवळा निर्माण झाला. त्याहि फार देखण्या असून त्यांच्या अंगकाठीचा नंबर १० किंवा १२ चा असेल. त्यांच्यासाठीं एक घट्ट अंगाचा आणि मोकळ्या घेराचा एखादा पोपाख तयार करावा, असें मला वाटूं लागलें. हा पोपाख निळ्या मखमलीचा असून त्याला समोरच्या बाजूनें खालपर्यंत लहान लहान बटणें असावीं. झग्याखालून जरा दिसणारा गुलाबी रंगाच्या टफेटा कापडाचा चुणीदार परकरहि त्याच्या जोडीला असावा....'

ता. २० नोव्हेंबर रोजीं भल्या पहाटेस सौ. गेरिरी यांना अॅटलांटिक महासागरापलीकडे घेऊन जाणाऱ्या विमानानें उड्डाण केलें. राजकन्येच्या लग्नसमारंभाआधीं कांहीं तास हें विमान निघालें. सौ. गेरिरी यांना त्या

विवाहाची मिरवणूक पाहण्यासाठीं तिकिट मिळालें नव्हतें. शिवाय सेंट जेम्स् राजवाड्यांतील तो भोजन समारंभ संपल्यावर त्यांना आपल्या पतिराजांबद्दल आणि मुलांबद्दल काळजी वाटूं लागली होती. सौ. गेरिरीच्या प्रयाणानंतर त्यांची व्यवस्था पाहणाऱ्या, त्यांच्या कामांत त्यांना मदत देणाऱ्या लंडनमधील तीन चार लोकांना जरा हायसेंच वाटलें. याचें कारण म्हणजे त्या खेळीमेळीनें वागणाऱ्या, कदरदान अशा होत्या हें खरें; पण नीट कांहीं खावें प्यावें असें त्यांना पटवून देणें जवळजवळ अशक्यच झालें होतें. यामुळें त्यांच्याभोंवतीं असलेल्या प्रत्येक व्यक्तीला काळजी वाटूं लागली होती. ब्रिटनमध्यें असलेल्या कडक अन्नधान्य-नियंत्रणपद्धतीमुळें त्यांना धक्काच बसला असावा, असें स्पष्ट दिसत होतें. लंडनमध्यें असलेला अन्नधान्याचा सांठा आपण ( जेवणखाण करून ) आणखी कमी करूं नये, असा त्यांचा निर्धार झालेला दिसला.

आपण कोण आहोंत, आणि कोठें जाऊन आलों आहोंत, हे सांगितल्यावर न्यूयॉर्कमधील जकात अधिकाऱ्यांनीं विलकूल विलंब न करतां त्यांना बाहेर जाऊं दिलें. आपलीं मुलेंबाळें सुखरूप आहेत असें त्यांना आढळून आलें. श्री. लुई यांना मात्र या साऱ्या घटनेमुळें अद्याप थोडी अस्वस्थता वाटत होती. सौ. गेरिरी या आपल्या मैत्रिणीला म्हणाल्या, 'मी विमानांतून हिंडलें फिरलें, राजाराणीशीं गप्पा मारल्या, यामुळें माझ्यांत फरक पडेल, आणि मला प्राप्त परिस्थितीबद्दल असमाधान वाटूं लागेल; अशी यांना धास्ती वाटत असावी.' अर्थात् सौ. गेरिरी यांनीं ही कल्पनाच धुडकावून लाविली. घरीं परत आल्यानें त्यांना आनंद झाला होता आणि यानंतर बराच काळपर्यंत तरी कोठलाहि प्रवास नको, असें त्यांना वाटूं लागलें होतें.

वॉशिंग्टन येथील 'पोस्ट' या वृत्तपत्रांतील त्यांची वातमीपत्रें ज्यांनीं वाचलीं होतीं, त्यांपैकीं कांहीं व्यक्तींनीं त्यांना टेलिफोन करून, राजकन्या एलिझावेथसाठीं त्यांनीं जो पोषाख शिवला होता, तसाच पोषाख आपल्या-साठीं किंवा आपल्या मुलीसाठीं शिवण्याची विनंति केली. पण सौ. गेरिरी यांनीं दिलगिरी व्यक्त करून, 'मला तसें करतां येणार नाहीं' असें कळविलें.

अमेरिकेस परतल्यावर त्यांनीं इंग्लंडच्या राणीला एक पत्र लिहिलें. त्यांतला मजकूर असा होता – या भेटीनें मला फार आनंद झाला. प्रत्यक्ष

लग्नसमारंभ जरी मला पाहतां आला नाहीं, तरी माझे आशीर्वाद त्यांना आणि राणीसाहेबांना कळावें, अशी माझी इच्छा आहे.'

सौ. गेरिरी यांनीं आपल्या मुलांचें एक छायाचित्र या पत्रासोबत पाठविलें. वॉशिंग्टनच्या आग्नेय भागांत लवकरच कपड्यांचें एक दुकान सुरू करण्याची आपली इच्छा आहे असेंहि त्यांनीं या पत्रांत कळविलें होतें.

कांहीं आठवड्यानंतर नॉरफॉक्मधील सँड्रिगहॅम राजवाड्यांतून सौ. गेरिरी यांना एक पत्र आलें. त्यावर राजमुद्रा उठविलेली होती. त्यांतील मजकूर असा होता –

प्रिय सौ. गेरिरी यांस,

आपलें पत्र, त्यांतील आकर्षक छायाचित्र आणि कात्रणें हीं आपण आस्थेवाईकपणें श्री. सौ. राणीसाहेबांना पाठविल्याबद्दल त्यांचे आभार आपणांस कळविण्याची मला आज्ञा झाली आहे.

राजकुमारी एलिझाबेथ यांच्या विवाहप्रसंगीं योजिलेला भोजनसमारंभ आपणास आनंददायक वाटला, हें वाचून श्री. सौ. राणीसाहेबांना समाधान वाटत आहे, असेंहि आपणांस कळविण्याची त्यांची आज्ञा झाली आहे. खुद्द आपण, आपले यजमान आणि आपलीं चार मुलें यांना राणीसाहेबांनीं प्रणाम कळविले आहेत. तसेंच आपल्या दुकानाचीहि भविष्यांत भरभराट होवो अशी त्यांची शुभेच्छा आहे.

आपली स्नेहांकित,
डेलिया पील.

(सही) सौ. डेलिया पील
हुजूर मानकरी.

## प्रत्येक देशाचें बहिरंग

अगदीं परवां परवांपर्यंत सर्व जपानी लोकांना आश्चर्यकारक चिमुकले लोक असें म्हणण्यांत (समजण्यांत) येत असे. पुन्हा लवकरच ते तसे होतीलहि. इंग्लिश लोक आणि त्यांचा देश म्हणजे 'बनियाचा देश' – स्कॉच् लोक हे कंजूप आणि एरिश लोक सदा गयावया करणारे अशी सामान्यतः समजूत

असते. (याच सुरावर म्हणावयाचें म्हणजे) फ्रेंच लोक सदान्‌कदा आनंदी नि रंगेल, तर जर्मन लोक भारी स्वच्छ. त्यांची मनोवृत्ति शास्त्रीय आणि स्वत:च्या मोठेपणाबद्दल त्यांच्या भलत्या भावना असावयाच्या. अन् ते अमेरिकन ? – अहो अमेरिकन् म्हणजे मोठे पक्के, सदा पैशापाठीमागें लागलेले आणि दुसऱ्यांच्या मनाची पर्वा न करणारे. युरोपांतील उपाहारगृहांत व पानगृहांत तसेंच आगबोटींच्या दिवाणखान्यात अमेरिकन् लोकाबद्दल असेच उद्‌गार निघत.

जेव्हां इंग्रज मनुष्यानें हत्तींवर पुस्तक लिहिलें, तेव्हां त्यानें त्याला नांव '**हत्तींची शिकार**' असें दिलें. फ्रेंच मनुष्याच्या पुस्तकाचें नांव '**हत्तींचा प्रणय**' होतें; तर जर्मन गृहस्थाच्या पुस्तकाचें नांव काय तर '**हत्तींचें मानसशास्त्र.**' रशियन मनुष्यानें आपल्या पुस्तकाला '**हत्ती – त्याला अस्तित्व आहे काय ?** ' असें नांव दिलें, तर अमेरिकन मनुष्यानें आपल्या पुस्तकाला '**हस्तिदंत ! – लक्षावधि डॉलर्स मिळविण्याची सुवर्णसंधि !**' किंवा दुसरें म्हणजे '**जगांतील सर्वांत मोठा हत्ती !**' असें शीर्षक दिलें.

अमेरिकन मुली म्हटल्या म्हणजे राकट. अशी गोष्ट सांगतात कीं, एक फ्रेंच मुलगी म्हणाली कीं, "प्रेम म्हणजे जीवन," तर रशियन मुलगी म्हणावयाची "(मी प्रेम देईन पण) माझा आत्मा मात्र देणार नाहीं." इंग्रजी मुलगी एवढेंच म्हणेल, "आतां तुम्हांला बरं वाटतंय् ना ?" अमेरिकन मुलीच्या तोंडचे शब्द म्हणजे, "चला उठा वरं ! आपल्याला या खोलीचं छत जरा नीट करायला हवं !"

गेल्या दोन महायुद्धांच्या दरम्यानच्या शांततेच्या कालखंडांत नाटकांतल्या अमेरिकन मनुष्याची वेषभूषा अशी असे – त्याच्या डोक्यावर पांढरी कापडी टोपी असावयाची आणि गोल्फचे खेळाडू घालतात, तशी अघळपघळ गुडघ्या-पर्यंत येणारी 'प्लस फोर' पद्धतीची पाटलोण तो नेसलेला असे. गुडघ्या-पर्यंत येणाऱ्या त्याच्या लोकरीच्या पायमोज्यांवर लाल, निळ्या, जांभळ्या, पिवळ्या आणि हिरव्या रंगाच्या चौकटी असावयाच्याच. श्रीमंतीची खूण म्हणून त्याच्या तोंडांत भला मोठा चिरूट असावयाचा आणि तो वारंवार मोठ्यानें अनुनासिक आवाजांत म्हणावयाचा "ठीक-ठीक" (waal) – 'मला अस्सं वाटतं – अन्‌ माझा अस्सा तर्क आहे' (I kinda guess and calcalate).

नाटकांत दाखविलेली अमेरिकन तरुणी नेहमीं ('च्युइंग गम') चिकी चघळीत असायची आणि तिचे ओठ नेहमीं लालचुटूक असायचे. तिचे पाय सुंदर लांबलचक असायचे आणि निदान एका प्रवेशांत तरी आपला गार्टर सांवरण्याच्या मिषानें ती एका संपूर्ण तंगडीचें (पायाचें) प्रदर्शन करावयाची. विशेषतः एखाद्या इंग्रज किंवा फ्रेंच मनुष्याकडून तिला कांहीं साधावयाचें असेल, तेव्हां ती त्याची प्रतिकार-शक्ति शिथिल करण्यासाठीं हा नखरा करावयाचीच. इतकें असूनहि प्रत्येक प्रेक्षकाला मात्र एवढें माहीत असावयाचें कीं यापलीकडे त्या मनुष्याला कांहींच मिळावयाचें नाहीं. कारण आपलें काम झाल्याबरोबर ती अमेरिकन मुलगी त्याच्याकडे पाठ फिरविणारच !

या दोन नमुन्यांपैकीं अमेरिकन पुरुषच प्रेक्षकांना अधिक पसंत पडत असे. त्याचें कारण म्हणजे तो सरळवृत्तीचा, व्यापारी पेशाचा मनुष्य असे; तर लाडांत वाढलेल्या त्याच्या सुंदर मुलीच्या अंगीं इतर अनेक गुण असावयाचे. तिच्याबद्दल सर्वांत सभ्य शब्द वापरावयाचा म्हणजे ती '**श्रीमती ४२०**' किंवा **स्त्री-ठकसेन** असे, असें स्थूलमानानें म्हणतां येईल.

रंगभूमीवर कधींकधीं एखादा अमेरिकन मुलगाहि दाखविला जाई. तो म्हणजे त्याच्या वडिलांची छोटी प्रतिकृतिच ! फरक इतकाच कीं त्याच्या तोंडांत चिरूट नसे आणि तो एक सप्तक चढ्या सुरांत बोलत असे.

विनोदी गप्पागोष्टींतील व नाटकांतील या अमेरिकन व्यक्ती इतर अमेरिकन, इंग्रज व फ्रेंच लोकांपेक्षां अधिक अपमानास्पद रीतीनें वर्णिलेल्या असत, असें म्हणतां येणार नाहीं. कारण अशा गप्पागोष्टींतील इंग्रज देखील पक्के बावळट दाखविले असून त्यांच्या डोक्यांवर नरसाळ्यासारख्या उंच टोप्या आणि डोळ्यावर एकाक्ष चष्मे असावयाचेच. नाटकी फ्रेंच लोक अत्यंत वैषयिक प्रवृत्तीचे दाखविले असून त्यांना छोटया, टोंकदार दाढ्या असत. नाटकी स्कॉच लोक पक्के कृपण असून त्यांच्या पंचेवजा '**किल्ट**' खालून त्यांचे हाडकुळे गुढगे नेहमीं दिसावयाचेच.

अशा रीतीनें नाटकांत दाखविलेल्या या लोकांपैकीं कोणाचेंहि प्रत्यक्ष जीवनांतील त्या राष्ट्रांतील व्यक्तीशीं पुसटतें साम्यहि दिसत नसे. ज्या काळीं बहुतेक लोकांना दुसऱ्या राष्ट्रांविषयीं केवळ वरवरची जुजबी माहिती

पुरेशी वाटत असे, त्या काळांत ह्या माहितीवरून काढलेले निष्कर्ष अशा प्रकारचे असत.

निरनिराळ्या देशांतील लोकांचीं स्थूलमानानें काढलेलीं चित्रें कशीं असावीं (बाह्यरूपें कशीं असावीं,) त्यांतील सामान्य गुण कसे असावे, ते कोणी ठरवावे, वगैरे प्रश्नांचा आतां विचार करणें निरर्थकच ठरेल. याचें कारण म्हणजे पृथ्वीच्या बहुतेक भागांत हा बहिरूपांचा खेळ आतां (चालू शतकाच्या मध्यावर) जवळजवळ संपुष्टांतच आला आहे. अमेरिकेच्या बाबतींत बोलावयाचें तर या स्थूलस्वरूपाच्या कल्पना नष्ट करण्यांत चित्रपटांनीं बराच हातभार लावला. गेल्या महायुद्धानें त्यांना अखेरचा तडाखा दिला, आणि मार्शल-मदत योजनेनें त्यांना कायमची मूठमाती दिली. अनेक पिढ्यांनंतरहि जेथें जेथें संस्कृति जीवंत आहे, तेथें तेथें असलेल्या लक्षावधि शाळांच्या वर्गांतून मार्शल मदत–योजनेची स्तुति होत राहील. लोकसभेच्या वादविवादांत सांगतां येईल, अशी या फायद्याची व्याख्या करणें मात्र कठीण आहे. भावी काळांतील मुलें त्यांना वर्गांत शिकविलेल्या माहितीपैकीं बरीच माहिती ऐकल्यावर लवकरच विसरूनहि जातील. असें झालें, तरी त्यांच्या जीवांत जीव असेपर्यंत या संस्कृतीची कथा त्यांच्या मनांत घर करून राहील, हें मात्र संभवनीय आहे.

लोखंडी पडदा ( Iron Curtain ) कायमचा ठोकला जाण्यापूर्वीं म्हणजे १९४७ सालीं चार परराष्ट्र-मंत्री एका सभेनिमित्त रशियांत गेले होते. त्यांच्याबरोबर त्यांनीं आगगाड्या आणि विमानें भरभरून पाश्चिमात्य राष्ट्रांतील वृत्तपत्रकार आणि अधिकारी बरोबर नेले होते. पण त्या वेळीं वर उल्लेखिलेल्या बहिरंगाच्या ठराविक वर्णनांतली खरी मौज निघून गेली होती. मॉस्कोच्या नाटकगृहांतील साध्या नाटकांत, किंवा तमाशांत (देखील) दाखविलेले नाटकी अमेरिकन हे केवळ तिरस्करणीय असे दाखविले जात. आतां पांढऱ्या कापडी टोप्या आणि पोकळ पाटलोणी असा त्यांचा वेष नसे. व्यापारीपेशाला साजेल,अशा नीटनेटक्या सूट-बुटांतले, पाताळयंत्री,युद्धपिपासु, स्वतःच्या दुर्दम्य महत्वाकांक्षेसाठीं असहाय जनतेचाहि बळी देणारे लोक असे, त्यांना दाखविण्यांत येई. १९४७ सालानंतर जे लोक या लोखंडी पडद्यामागें तेथेंच राहिले होते, त्यांची अशी बातमी आहे कीं यानंतरच्या

काळांत तेथील रंगभूमीवरील अमेरिकन व्यक्ती अधिकाधिक तिरस्करणीय अशी दाखविली जाई.

● ● ●

## लोकसंख्या.

इ. स. १९५० सालीं अमेरिकेंत मुलांची आणि विशेपतः अर्भकांची संख्या सर्वांच्या अपेक्षेपेक्षां अधिक होती. लोकसंख्येचा अभ्यास करणारे तज्ज्ञ या बाबतींत सपशेल तोंडघशी पडले होते. नेहमींची कसर (फरक) सोडून त्यांनीं कमी, मध्यम व सर्वोच्च अवस्थांचे आडाखे बांधले होते. जननशक्ति, मृत्यु आणि देशांतर ह्यामुळें होऊं शकणारे फरक देखील त्यांनीं हिशेबांत धरले होते. लोकसंख्येच्या या तज्ज्ञांचें विवेचन अगदीं स्पष्ट होतें. त्यांच्या मतें दुसरें जागतिक युद्ध संपल्याबरोबर अमेरिकेंतील लोकसंख्या प्रथम खूपशी वाढणार. त्यानंतर मात्र हा सर्वोच्च बिंदु मागें पडून लोकसंख्या हळूहळू स्थिरावत जाणार. यानंतर लवकरच तिचें मान कमी कमी होत जाणार. १९४७ किंवा १९४८ सालीं बहुप्रजेचें युग संपणार व लोकसंख्येंतील घट दिसूं लागणार. थोड्याच दशकांत ही लोकसंख्या सारखी उतरणीला लागेल. वास्तविक रीत्या इ. स. १९९० च्या सुमारास १७६०००,००० ही अमेरिकेची कमाल लोकसंख्या होईल असा त्यांचा अंदाज. त्यानंतर ही घसरगुंडी सुरू होणार होती.

इ. स. १९४६ सालाच्या अखेरीपर्यंत तज्ज्ञांचा हाच सूर होता. त्या वर्षाच्या सप्टेंबर महिन्यांत इ. स. १९५० सालांतील लोकसंख्येचा अधिकृत अंदाज तयार करण्यांत आला होता. परंतु इ. स. १९५० सालाच्या मध्यावर आल्यानंतर कळून आलें कीं वरील संख्याविपयक अंदाज सुमारें ६०००,००० एवढ्या प्रचंड संख्येनें तोकडा ठरला होता. ही घोडचूक आढळून आल्यावर असे दूरदूरचे अंदाज बांधण्याची पद्धत अगदीं मूर्खपणाची वाटूं लागली. बदललेल्या परिस्थितींत असें आढळून आलें कीं विसाव्या शतकाच्या द्वितीयार्धांत कमींत कमी ५०,०००,००० अमेरिकन माणसांची लोकसंख्येंत भर पडणार होती. कदाचित् हा आंकडा यापेक्षांहि वर जाण्याची शक्यता होती. सर्वोच्च बिंदु, त्यानंतरचा उतार याबद्दल कांहींच निश्चित अंदाज करणें शक्य नव्हतें. लोकसंख्येंत एकाएकी आणि संपूर्णपणें अनपेक्षित अशी वाढ झाली होती.

**फॉरेन अफेअर्स** या मासिकांतील एका व्यासंगपूर्ण लेखांतून तज्ज्ञांची ही चूक दाखवून देत असतां जोसेफ एस्. डेव्हिड यांनीं पुढील उद्‌गार काढले होते. "या घटनांचा सविस्तर उलगडा सहजपणें होण्यासारखा नाहीं." लोकसंख्या–तज्ज्ञांच्या मतें इ. स. १९३० पासून लांबणीवर पडलेली वाढ आणि इ. स. १९५० सालाच्या सुमारास होणारी भविष्यांतली वाढ या दोन गोष्टी जमेस धरल्यास या ३०००,००० पासून ६०००,००० पर्यंत घडून आलेल्या अनपेक्षित वाढीची उपपत्ति लावतां येईल. परंतु या विधानाची कसोटी अजून लागावयाची आहे.

लोकसंख्येच्या तज्ज्ञांना त्यांचे नवे अंदाज, त्यांच्या उपपत्ति, कसोट्या वगैरे कार्य करण्यासाठीं येथेंच सोडून आपण पुढें जाऊं या. हे तज्ज्ञ लोक मानवी हृदय तेवढें वगळून बाकी साऱ्या क्षेत्रांत सत्याचा शोध करण्यासाठीं भटकत असतात.

लक्षावधि अमेरिकन जोडप्यांनीं या विषयाची कदाचित् चर्चा केलीहि असेल. उपनगरांतील पांढऱ्या शुभ्र घरांतून, हमरस्त्यावरील चाळींतल्या खोल्यांतून किंवा धुळीच्या रस्त्यावरील एकीकडे असलेल्या शेतांतून आणि झोपड्यांतून शांत वेळीं त्यांनीं अशी चर्चा केली असेल. सध्यांच्या आर्थिक परिस्थितींत आपल्याला काय परवडेल, भविष्यकाळीं आपल्याला आणखी पैसा मिळविण्याची कितपत संधि आहे, या सर्व बाबीदेखील त्यांनीं विचारांत घेतल्या असतील. अर्थशास्त्रज्ञांच्या क्षेत्राबाहेरच्या विषयांबद्दल हीं बोलणीं असतील. लक्षावधि जोडप्यांच्या लक्षांत ही गोष्ट आली असेल, कीं आजकाल लोकांना कांहीं धरावं लागतं व कांहीं सोडावं लागतं. हा मुद्दा अगदीं स्पष्ट करणें सोपें नाहीं. स्पष्टपणें बोलून दाखविण्यापेक्षां तो भावनेनं जाणून घेणेंच अधिक सुलभ आहे. ॲटम बॉंब आहे, रशियन लोक आहेत आणि वृत्तपत्रें व मासिकें इतक्यांतच ठळक मथळे देऊन भावी युद्धाची चर्चा करूं लागलीं आहेत. हवेंत तरंगणाऱ्या काळ्याकुट्ट ढगासारखी मूर्खपणा, अन्याय आणि अविचार यांचा परिपाक असलेली ही अभद्र चीज अद्याप जगांत अस्तित्वांत आहे. ती कोणालाहि नको असली तरीहि कांहीं लोक असहायपणें तिची निर्मिति करण्यांत ( तयारींत ) गुंतलेले आहेत. एकूण ही सारी परिस्थिति निराशाजनक वाटल्यानें यापुढें अशा जगांत आणखी नवे जीव

जन्मास घालणें हा मूर्खपणा होय असें या जोडप्यांना वाटलें, तर तें बरोबरच ठरेल.

दुसरें महायुद्ध आणि या शतकाचा मध्यकाळ यामधील कालखंडांत वरील निर्णायक क्षणाची जाणीव झालेलीं लक्षावधि जोडपीं असूं शकतील. हें चालू असलेलें मत आपण स्वीकारणार आहोंत का? आपण निराश झालो आहोंत काय? – का आपल्याला अजून आशा वाटते? आपले स्वतःचे असे खाजगी निर्धार आहेत काय? आतां आपण मुलांबद्दल बोलत आहोंत. कांहीं गोष्टी करण्यासारख्या असतात. कांहीं तशा नसतात. मुलेंबाळें असलीं, तर बरें, असें आपल्याला वाटतें काय? आपण ज्या जगांत राहतों, त्याबद्दल कोणीं कांहींहि सांगितलें तरी, परिस्थिति कशीहि असली तरी, आपल्याला मुलेंबाळें असावीं, असें आपल्याला खरोखर वाटतें काय? परिस्थिति कशीहि असली, तरी त्यांची व्यवस्था नीट लागेल, असें आपल्याला वाटतें काय?

हीं मुलें १९३० च्या कालखंडांतून उशिरां जन्माला आलेलीं असोत किंवा १९५० च्या कालखंडांतून अगाऊ उसनीं घेतलेलीं असोत. तीं तज्ज्ञांच्या आलेखांत बसणारीं असोत किंवा नसोत. हीं मुलें अमेरिकेंत जन्माला आलीं आहेत, हें मात्र खरें. हा देश स्वतंत्र आहे आणि कोणालाहि त्याच्या पसंतीप्रमाणें कोणतीहि उपपत्ति स्वीकारण्याची मुभा आहे. परंतु या सर्वांहून बिनचूक वाटणारी उपपत्ति म्हणजे लक्षावधि अमेरिकन जोडप्यांनीं आपल्या सहजप्रवृत्तीनें एक निर्णय नाकारून (मुलांना जन्म देण्याचा) दुसरा निर्णय घेतला असावा, अशी ती उपपत्ति होय. तुम्हांला आशा वाटो, निराशा वाटो. अखेरच्या हिशेबानें पाहतां, आपण जें वाचलें किंवा ऐकलें असेल, त्यापेक्षां आपल्याला मनापासून जें वाटत व पटत असेल, त्यावरून आपला मार्ग ठरविणें हें अधिक श्रेयस्कर असतें.

अनुक्रमांक 22450 दि: 31-5-57
क्रमांक 2223 नोंद दि: 30/7/1960

## सुशिक्षित जंगली

"संयुक्त संस्थानांत सुमारें १६०,००० प्राथमिक शाळा असून त्यांत २३०००,००० विद्यार्थी आहेत. यांपैकीं सुमारें ९० टक्के मुलें सार्वजनिक मोफत शाळांत शिक्षण घेतात. या शाळा स्थानिक किंवा प्रांतिक सरकारच्या

मदतीनें चालल्या आहेत...या शाळांतील शिक्षण काम करतां करतां मिळतें. स्वतंत्र विचार करण्यास मुलाला प्रोत्साहन देण्यांत येतें व आपल्या कल्पने-प्रमाणें कार्याच्या योजना हातीं घेण्यास त्याला उत्तेजन मिळतें. याला 'पुरोगामी शिक्षणपद्धति' असें म्हणतात. कमी अधिक अंशानें हीच पद्धत सर्व ४८ संस्थानांतील शाळांतून पसरलेली आहे."

हीं लहान मुलें शाळेच्या पिवळ्या रंगाच्या मोटारींतून जात असून त्या मोटारींच्या मागें आणि दोन्ही बाजूंना ठळक काळ्या अक्षरांत '**थांबा**' असा शब्द लिहिलेला असतो. हीं मुलें सकाळीं मोटारींतून खालीं उतरून हें कृतिप्रधान शिक्षण घेण्यासाठीं आपापल्या वर्गाकडे निघालीं, म्हणजे खेड्यांतल्या किंवा शहरांतल्या शाळेवरील रस्त्यांतली वाहतूक खरोखरच थांबत असे. अगदीं अद्यावत् साधनसामुग्री असलेल्या मोठमोठ्या, नव्या इमारतींत कांहीं वर्ग भरत. या इमारती विटा आणि काँक्रीट यांनीं बांधलेल्या असून, त्यांच्या खिडक्या मोठ्या असत व त्यांत धूळ शोषून घेणारीं यंत्रेंहि बसविलेलीं असत. परंतु इतर कांहीं वर्गांची परिस्थिति यापेक्षां फार निराळी असे. पूर्वीं लष्करासाठीं बांधलेल्या झोपड्यांत, तळघरांत, देवळांत, पडदा घालून आडोसा केलेल्या नाटकगृहांत, कोठीच्या खोल्यांत, गुदामांत, धान्याच्या कोठारांत किंवा मोटारीच्या तबेल्यांतहि कांहीं वर्ग भरत असत. इ. स. १९५० च्या सुरुवातीला प्राथमिक शाळांत होणाऱ्या गर्दीमुळें अमेरिकेंतील लोक अस्वस्थ होऊं लागले होते.

साऱ्या देशांत जागृति होऊन संस्थानांनीं व शहरांनीं ( मध्यवर्ती सरकारच्या मदतीनें किंवा तिच्याशिवाय ) तत्परतेनें नव्या शाळा बांधल्या नसत्या, तर ही गर्दी यापेक्षांहि अधिक वाढली असती. सर्व समाज जागा झाला, म्हणजे अमेरिकन लोक तितक्या लवकर नव्या इमारती बांधूं शकतात, तितकी चपळाई दुसरे लोक दाखवूं शकत नाहींत, हें खरें. पण इ. स. १९५० मार्च मध्यें बहुजनसमाजांत अशी जागृति झाली नव्हती. याच सुमारास, 'महायुद्धानंतरच्या " अगदीं अनपेक्षित लोकसंख्येच्या वाढी "मुळें झालेला पहिला व्यापक परिणाम शिक्षणखात्यानें लोकांच्या नजरेस आणला.

इ. स. १९६० सालाच्या सुमारास प्राथमिक शाळांतून १०,५००,००० अधिक मुलें असतील असा त्या खात्याचा अंदाज आहे. यामुळें ३५०,०००

पेक्षां जास्त शिक्षकांची जरूर लागेल. वर्ग, ग्रंथालयें, व्यायाम-शाळा, सभागृहें, उपाहार-गृहें, परिचारिकांचीं वसतिगृहें व क्रीडांगणें यांची सोय करण्यासाठीं १०,०००,०००,००० डॉलर्स एवढी प्रचंड रक्कम लागेल.

अशा रीतीनें लहान मुलांसाठीं खूपच खर्च लागणार आहे. कर भरणाऱ्या जनतेला दर मुलामागें १००० डॉलर्सचा खर्च लागणार होता. पण इ. स. १९५० च्या सुमारास युद्धसामुग्री, युरोपसाठीं मदत, दूर पूर्वेसाठीं आणि मागासलेल्या देशांसाठीं मदत या बाबतींबद्दलच सामान्य जनता खूप बोलत असे आणि वाचीत असे. वृत्तपत्रांतून याच बाबींची चर्चा चालू असे; रेडियोवरहि सारा दिवसभर याच विषयाची चर्चा चाले.

हीं वृत्तपत्रें सकाळीं न्याहरीच्या वेळीं वाचलीं जात. शहरांतील उघड्या खिडक्यांतून जेव्हां रेडियो ऐकूं येत असे. त्या वेळीं हीं लहान मुलें रस्त्यांतून शाळेकडे हसत खिदळत चाललेलीं असत. या मुलांचे कपडे व बूट त्या वेळीं स्वच्छ असत. कारण पुढें दिवसभर सुरू होणारी दंगामस्ती, आरडाओरड, आदळआपट तेव्हां फारशी सुरू झालेली नसे. या खिडक्यांजवळून शाळेकडे निघालेल्या लहान मुलींचे केस व्यवस्थित विंचरलेले असत. संध्याकाळीं हीं सारीं मुलें परत येत. कृतिप्रधान शिक्षणांतील त्यांचा एक भाग म्हणजे खडूनें काढलेलीं चित्रें, रंगीत (चकचकीत) कागद कापून तयार केलेलीं कुत्रीं, मांजरें या वस्तु घेऊन हवेंत टोप्या उडवीत हीं मुलें घरीं जात. या सुमारास त्यांची स्वच्छता आणि टापटीप बरीच कमी झालेली असावयाची हीं मुलें स्वच्छ असोत, घाणेरडीं असोत; मर्यादशील असोत, वाह्यात असोत; त्यांच्याकडे पाहून आपण केलेले श्रम आणि भरलेले कर यांचें सार्थक झालें, असें लोकांना वाटे.

" संयुक्त संस्थानांत २०,००० उच्च व माध्यमिक शिक्षण देणाऱ्या शाळा आहेत. त्यांपैकीं ८० टक्के शाळा सार्वजनिक असून मोफत शिक्षण देतात. वरिष्ठ आणि कनिष्ठ माध्यमिक शाळांतील दरवर्षींची प्रवेश-संख्या ७०००,००० पेक्षां बरीच अधिक आहे."

" हीं सारीं मुलें काय शिकतात, त्यांचा अभ्यास चांगला चालला आहे कीं नाहीं, त्यांना मिळणारें शिक्षण चांगलें आहे, कीं वाईट, याबद्दल तें शिक्षण न घेणाऱ्या लोकांत चर्चा चालत असे. युरोपांतील व विशेषतः

ब्रिटनमधील शिक्षणशास्त्रज्ञ वारंवार म्हणत कीं अमेरिकन माध्यमिक शाळांतील शिक्षण हलक्या दर्जाचें आहे. कांहीं अमेरिकन शिक्षकदेखील असेंच म्हणत.

पूर्वी अशी समजूत असे, कीं प्रत्येक शिक्षक हा त्याच्या विषयांत पारंगत असला पाहिजे. ही जुनी कल्पना टाकून देऊन प्रत्येक शिक्षकानें सर्वच विषयांचें (सर्वसामान्य) शिक्षण द्यावें, ही नवी शिक्षणपद्धति कांहीं अमेरिकन शिक्षकांना अस्वस्थ करीत असे. हा वाद अमेरिकेच्या कोन्याकोपऱ्यांतून धुमसत होता. डेनव्हर ( कोलॅराडो संस्थान ) येथील एका शिक्षकानें पुढील उद्‌गार काढले होते, असें विश्वसनीय रीत्या कळतें. हे शब्द वृत्तपत्रांतहि प्रसिद्ध झाले होते. तो म्हणाला—" चिमूटभर एक विषय, चिमूटभर दुसरा विषय अशा रीतीनें शिकविण्याची संवय माझ्या मुळींच अंगवळणीं पडत नाहीं. माझें अध्ययन झालेलें आहे, तें फक्त इंग्रजीचें संपूर्ण अध्यापन करण्यासाठीं; पण आतां या विषयांतच इतिहास, भूगोल, अर्थशास्त्र आणि विज्ञान यांचा समावेश करून अध्यापनाची एक पंचमेळ मेजवानीच विद्यार्थ्यांपुढें ठेवावी लागत आहे."

याला उत्तर म्हणून खात्याच्या मध्यवर्ती कचेरींतील एका अधिकाऱ्यानें असे उद्‌गार काढल्याचें तितक्याच विश्वसनीयरीत्या कळतें. ते म्हणाले " जो शिक्षक अशा रीतीनें 'हा माझा विषय नव्हे' असें सांगून आपला बचाव करतो आणि स्वतःच्या विषयालाच चिकटून राहतो, तो एखाद्या नटासारखा असतो. तो आपल्या वर्गासमोर स्वतःच्या विद्वत्तेचें प्रदर्शन करीत असतो. लहान मुलांच्या जीवनांत जे प्रश्न उपस्थित होत असतात, त्यांची त्याला विस्मृति झालेली असते. एखादा विषय शिकविण्यापेक्षां प्रत्यक्ष मुलाला शिकविणें हें नवें शैक्षणिक तत्त्वज्ञान होय. "

या दोन्ही बाजूंमध्यें तथ्य असूं शकेल. माध्यमिक शाळांतील ब्रिटिश मुलांना गणित, लॅटिन, इंग्लिश आणि इतिहास या विषयांचें अधिक ज्ञान होतें, असें मला निश्चितपणें म्हणतां येणार नाहीं. सध्यां तसें धरून चालूं या. पुरेसा पुरावा नसतांहि तात्पुरता निष्कर्ष काढतां येईल, कीं ब्रिटिश शाळांच्या तुलनेनें अमेरिकन शाळांचा शैक्षणिक दर्जा हलक्या प्रतीचा आहे. ज्या तज्ज्ञ अमेरिकन शिक्षकांना ही जाणीव झाली व गणित, फ्रेंच, लॅटिन वगैरे विषय

अधिक प्रमाणांत शिकविण्याची ज्यांना इच्छा झाली, त्या शिक्षकांविषयीं तुम्हांला सहानुभूति वाटणें शक्य आहे. कदाचित् तुम्ही असेंहि मान्य कराल: कीं जुन्या पद्धतीनें शिकलेलीं मुलें अधिक शांत, अधिक स्थिरवृत्तीचीं (कमी गोंधळलेलीं) असून त्यांच्या मनांवर झालेले संस्कार अधिक खोल असतात.

खरी पंचाईत अशी आहे कीं असा, निर्णय घेणाऱ्या लोकांना वाटायचें कीं येथेंच सारा वाद आटोपला. पण शिक्षणक्रम आणि अध्यापनपद्धति यांचा विचार आटोपल्यावरहि प्रत्यक्ष मुलांचा प्रश्न शिल्लक राहतोच. या साऱ्या चर्चेनंतरहि हें स्पष्टपणें दिसून आलें कीं, बहुसंख्य अमेरिकन मुलांनीं स्थैर्य, हुशारी, आत्मविश्वास आणि विनोदबुद्धि हे गुण बऱ्याच मोठ्या प्रमाणांत हस्तगत केले होते. मग त्यांचें शिक्षण अर्धवट असो कीं, चुकीच्या पद्धतीनें झालेलें असो. ज्या लोकांना एखादी कांटेकोर शैक्षणिक पद्धति आवडत असे, त्यांना हा निष्कर्ष फार बेचैन करीत असे.

या शतकाच्या मध्यकाळांतील मुलांत चैतन्य आणि (एक प्रकारचा) उल्हास असे. माध्यमिक शाळांत भडक लाल, पिवळे किंवा निळे गणवेष घातलेल्या मुलांचीं वाद्यपथकें असत. पडघम वाजविणाऱ्या मुली या पथकां-पुढें नाचत बागडत चालत असत. हीं वाद्यपथकें उडत्या चालींचें संगीत मोठमोठ्यानें वाजवीत समारंभाच्या दिवशीं साऱ्या देशांतील रस्त्यांतून शिस्तवार पावलें टाकीत जात. क्रीडांगणांच्या कडेला घोषणा-प्रमुखांच्या रांगा असत. त्यांच्या भोंवतीं आरडाओरड करणाऱ्या, उड्या मारणाऱ्या मुलांचे घोळके असत. हीं मुलें दिसण्यांत निरोगी असून चांगलीं धीट होतीं. उपाहार-गृहें, व्यायाम-शाळा आणि शाळांचे वर्ग मुलांनीं भरलेले असत. हीं मुलें चांगलीं उंच असून त्यांचे खांदे रुंद असत व तीं सारखीं सहज हसतमुख असत.

'अगदीं उत्तम' आणि 'भयंकर वाईट' या दोन टोकांत कोठें तरी बसवितां येईल, अशी त्यांची चालरीत असे. त्यांतले अगदीं शिष्ट असे फार थोडे. आपण आळशी आहोंत, असें ते अनेकदां भासवीत; पण खरोखरच आळशी असे फार थोडे. शिरगणती खात्याचा अभिप्राय पुढीलप्रमाणें आहे.

"महायुद्धापूर्वी शाळेच्या वेळानंतर बाहेरचीं कामें करणाऱ्या विद्यार्थ्यांचें

प्रमाण २५ मुलांत एक असें होतें, तर १९४९ सालीं माध्यमिक शाळेंतील दर सहा विद्यार्थ्यांपैकीं एक विद्यार्थी असें काम करीत असे."

हीं मुलें किराणा-माल घरीं पोंचवीत, वस्तु-भांडारांत ( दुकानांत ) नोकरी करीत, लहान मुलांना संभाळीत, मालमोटारी हाकीत, साफ-सफाई करीत, जमीन खणीत, व रंग-काम पॉलिशकाम करीत. सुमारें ५००,००० मुलें वृत्तपत्रें विकीत किंवा घरोघर पोंचवीत. ठराविक क्षेत्रांत वृत्त-पत्रांचें वाटप करणें, ही कांहीं आरामशीर नोकरी नव्हे. त्यासाठीं आठवड्याचे सहा दिवस पहाटे ५॥ वाजतां उठावें लागे आणि रविवारीं तर बहुधा त्यापेक्षांहि लवकर उठावें लागे. एखाद्या लाडावलेल्या, बेशिस्त मुलाचें हें काम नव्हे.

कधीं कधीं असें म्हणण्यांत येतें कीं, अमेरिकन मुलें वाजवीपेक्षां अधिक उत्तेजित मनोवृत्तीचीं असून भावी काळांत त्यांना मज्जातंतूचे रोग होण्याची शक्यता असते. मानसिक ताण आणि टेलिव्हिजन ( दूरदर्शकाचा ) चा फाजील नाद यांना बळी पडलेल्या मुलांचीं कांहीं उदाहरणें होतीं, यांत शंका नाहीं. परंतु जागेपणीं इतका वेळ सुखांत राहणारीं व रात्रीं गाढ झोंपीं जाणारीं हीं मुलें मज्जातंतूंच्या रोगांना बळी पडण्याची फारशी शक्यता आहे, असें त्यांच्याकडे पाहिल्यावर वाटणें कठीणच होतें. हीं मुलें चैतन्यपूर्ण व उद्योगी असून तीं अनेक गोष्टी शिकत होतीं, हें स्पष्टपणें दिसून येई. हीं मुलें शाळेंत व शाळेबाहेर, भगिनी-मंडळांत आणि बंधु-समाजांत, दुकानांत आणि क्रीडांगणांत हें ज्ञान मिळवीत असत. त्यांच्या करावयाच्या साऱ्या गोष्टी करण्याइतका वेळ त्यांना बहुधा कधींच मिळत नसे. शाळेच्या शिक्षणक्रमांत त्यांचा किती तोटा होत असे, आणि शाळे-बाहेरील कार्यक्रमांतून त्यांना किती फायदा मिळत असे, याबद्दल मात्र विश्वसनीय आंकडे उपलब्ध नाहींत.

कांहीं काळ गेल्यावर हीं मुलें शाळेंतून बाहेर पडून उद्योगाला लागत, किंवा विद्यापीठांत ( कॉलेजांत ) प्रवेश करीत. " संयुक्त संस्थानांतून आतां २,३००,००० पेक्षां अधिक कॉलेज विद्यार्थी आहेत. १२०० पेक्षां अधिक कॉलेजें सहशिक्षण देणारीं आहेत. ... संयुक्त संस्थानांतील कॉलेजचें शिक्षण थोड्या श्रीमंतापुरतें मर्यादित राहिलेलें नाही."

हें खरें असलें तरी उच्च शिक्षण अद्याप सर्वांच्या आवांक्यातलेंहि झालेलें नाहीं. याहून अधिक म्हणजे उच्च शिक्षण घेण्याचा हक्क खरोखरच तितका मूल्यवान् आहे कीं, नाहीं हाहि वादाचा विषय होता.

या शतकाच्या मध्यावर अशी स्थिति होती कीं प्राथमिक शाळेंत जाणाऱ्या दर एक हजार अमेरिकन मुलांपैकीं १४७ मुलें आठवी इयत्ता पुरी होण्या-आधीच (म्हणजे १४ वर्षांचीं होण्याआधींच) शाळा सोडून जात. यानंतर उरले ८५३. हीं मुलें माध्यमिक शाळेंत जात. पण त्यांपैकीं ३३६ मुलें शालान्त–परीक्षेचें प्रमाणपत्र मिळविण्यापूर्वींच ( म्हणजे १८ वर्षांचीं होण्यापूर्वींच ) बाहेर पडत. म्हणजे आतां उरलीं ५१७. हीं मुलें शालान्त-प्रमाणपत्रें मिळवीत. पण त्यांपैकीं ३८८ मुलें उच्च शिक्षणांत पदार्पण करीत नसत. म्हणजे उरलीं फक्त १२९ मुलें. हीं कॉलेजांत प्रवेश करीत; परंतु त्यांच्यापैकीं ७९ मुलें पदवी घेण्यापूर्वींच कॉलेज सोडून जात. एकूण विद्यापीठांतलें चार वर्षांचें शिक्षण पुरे करणारे विद्यार्थी फक्त ५० असत.

अशा रीतीनें सुमारें १५ टक्के मुलें विद्यापीठांत प्रवेश करीत आणि त्यांपैकीं सुमारें ५ टक्केच पदवी घेत. तरी हे आंकडे यापूर्वी कधीं नव्हते, एवढे मोठे होते ! जगांतील कोणत्याहि राष्ट्राच्या नागरिकांत उच्च ( विद्यापीठाचें ) शिक्षण घेणाऱ्या मुलांचें प्रमाण एवढें मोठें नसेल. परंतु उच्च शिक्षण बहुजनसमाजाच्या आवाक्यातलें असावें, असा ज्यांचा आग्रह होता. त्यांचें समाधान करूं शकतील, इतके हे आंकडे मोठे नव्हते. नोकरी करून उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या तारीफ करण्याएवढी मोठी असली, तरी बहुसंख्य होतकरू मुलें-मुली केवळ त्यांच्या पालकांना (नोकऱ्या असूनहि ) परवडत नव्हतें म्हणून उच्च शिक्षण घेऊं शकत नव्हतीं हें देखील खरें होतें. मुलांनीं नोकरींत मिळविलेला पैसा कुटुंबाच्या खर्चासाठीं पाहिजे, म्हणूनहि कितीतरी मुलें विद्यापीठाबाहेर राहात असावीं, ही परिस्थिति सत्य होती. बहुतेकांनीं मान्य केलें होतें, कीं शिष्यवृत्त्यांची संख्या वाढविली पाहिजे.

यावरून असेंहि सिद्ध होत नाहीं काय, कीं श्रीमंत आई-बापांच्या अयोग्य मुलांनाच मुख्यत्वेंकरून उच्च शिक्षणाचा लाभ होत होता ? ('अयोग्य' म्हणजे ज्यांना उच्च शिक्षण आत्मसात् करतां येत नाहीं, किंवा त्याचा

योग्य उपयोग करतां येत नाहीं अशा. ) अशी परिस्थिति असतांना शिक्षणाचा यथायोग्य उपयोग करतां येणाऱ्या योग्य व्यक्तींना अशा शिक्षणाचा लाभ मिळत नव्हता, ही परिस्थिति नाकारतां येत नव्हती.

या परिस्थितीमुळें कॉलेजांतील शिक्षणाचा दर्जा हिणकस बनणें अपरिहार्यच आहे. अयोग्य व निरुपयोगी व्यक्तींसाठी ठेवलेली शिक्षणपद्धति हिणकस व्हावयाचीच. कधीं कधीं कुलगुरूंना देखील निराशा वाटत असे, आणि भीति वाटे. एक म्हणे, "आपल्या शिक्षणाचा कसच कमी होत चालला आहे." दुसरा म्हणे, "असे खूपसे अयोग्य विद्यार्थी विद्यापीठांत घेतल्यानें आपल्या शिक्षणक्रमाची पात्रता कमी होईल, आणि देशांतल्या उच्च शिक्षणाची पातळी अगदीं सामान्य दर्जावर येऊन ठेपेल."

अशी खऱ्याखोट्या मुद्द्यांची एकच गल्लत होत होती. इकडे हा प्रकार चालू असतां २,३००,००० अमेरिकन मुलेंमुली कॉलेजांतून आपल्या कुवती-प्रमाणें आपल्याला हवा तो लाभ मिळवीत होतीं. कॉलेजें विद्यार्थ्यांनीं भरून गेलीं होतीं, आणि त्यांतच माजी सैनिकांची भर पडली होती. हे विद्यार्थी अर्थात् अधिक प्रौढ आणि गंभीर मनोवृत्तीचे असत. त्यांच्या-बरोबर त्यांचीं बायकामुलें असून कधीं कधीं ते सारे कॉलेजच्या आवारा-जवळ असलेल्या भिकार लष्करी झोपड्यांतच बिऱ्हाडें करून राहात. कॉलेजांना लागूनच या लोकांचीं धुणीं दोऱ्यांवरून फडफडत असत. जगांतल्या साऱ्या तरुणांच्या अंगीं असणारे सुप्तावस्थेंतील गुण या विद्यार्थ्यांच्या अंगांतहि असत. त्यांच्या बोलण्यावरून, हसण्यावरून, कपड्यांवरून व खाण्यापिण्यावरून त्यांच्या मनांत कसलें तेज तेवत आहे हें कोणालाहि कळण्यासारखें होतें.

कांहीं वर्षांपूर्वीं अमेरिकन शिक्षणाचें मुख्य कार्य म्हणजे आपल्या राष्ट्राशीं मनापासून इमान राखणारे नागरिक तयार करणें हें होतें. हें कार्य आतां चांगल्या तऱ्हेनें पार पडलें आहे. परंतु त्यानंतर अमेरिका आणि जगांतील अमेरिकेचें स्थान यांत बदल घडून आला आहे. आतां भावनात्मक इमाना-बरोबर बौद्धिक इमानहि राखणारे नागरिक तयार करण्याची अधिक जरुरी आहे. जितक्या सहजपणें आणि तत्परतेनें भावना अनुभविल्या जातात,

तितक्याच तत्परतेनें आणि सहजतेनें विचार करूं शकणारे नागरिक आतां तयार झाले पाहिजेत.

( आजच्या ) शाळांतले विद्यार्थी निष्काळजी, आत्मसंतुष्ट, सुरक्षितता आणि लौकिक, यश, यांच्या मागें लागणारे आहेत, असें टीकाकारांना वाटतें आणि ते चिडतात. " आजच्या बहुसंख्य विद्यार्थ्यांच्या अंगीं स्वतंत्र विचार करण्याची शक्ति फार तोकडी आहे. विचार करण्यास त्यांना प्रोत्साहनहि फार थोडेंच मिळत आहे. मग आजचें शिक्षण यशस्वी झालें आहे, असें कसें म्हणतां येईल ?" ते विचारतात.

परंतु ही शक्ति इतकी सहज आणि चटकन मोजतां येण्याइतकी नाहीं. कदाचित् पुढें असेंहि दिसून येईल कीं, या पिढीला कोडें होऊन बसलेल्या या तरुणांनीं चालू शिक्षणांतून आपल्याला आज वाटतें त्यापेक्षां बरेंच अधिक ज्ञान मिळविलें आहे.

## अंधुक देखावा

एके दिवशीं मेरीलंडमधल्या एका पदपथावर चार लहान मुली दोरीच्या उड्या खेळत होत्या. दोऱ्या वर खालीं फिरत असतां त्या एक गाणें म्हणत होत्या. त्या गाण्याचे शब्द असे होते:–

**एका डोंगरावर रहाते एक बाई ।**
**ती आहे कोण, ठाऊक नाहीं बाई!**
**चांदी अन् सोनं हवं आहे तिला ।**
**आणि एक छानसा, तरुण दादला ॥**

परदेशांतून आलेला एक मनुष्य हें गाणें ऐकण्यासाठीं तेथें थांबला. त्याला अमेरिकेंत येऊन एक आठवडाहि अजून लोटला नव्हता. आपण जें ऐकलें, त्यावर प्रथम त्याचा विश्वासच बसेना. मग त्याला धक्का बसला असावा. तो विचारमग्न झाल्यासारखा दिसूं लागला. त्याच्या नंतरच्या बोलण्याचा आशय असा " लहान मुलींच्या तोंडीं हें गाणें !" लहान मुली अमेरिकन जीवनपद्धति किती चटकन् उचलतात !"

हें गाणें आणि त्यांतले शब्द, यांना कांहीं विशेष सामाजिक दृष्टया महत्त्व

नाहीं. पैशाची आणि नवऱ्याची पारध करणें हें ध्येय लहान अमेरिकन मुलींना शिकविण्यांत येत नाहीं, हें त्या मनुष्याला सांगण्यांत अर्थ नव्हता. त्याला वाटलें कीं अमेरिकन जीवनाविषयीं आपण एक महत्त्वाचा शोध लावला आहे. कांहीं आठवड्यांनंतर तो स्वगृहीं परतला, तेव्हांहि त्याची अशीच समजूत होती.

आपल्याविरुद्ध जाणारा, अपायकारक पुरावा आपल्या टीकाकारांच्या हातीं सतत देत जाण्याची अमेरिकन लोकांना फार पूर्वींपासून एक खोड आहे. वर दिलेलें उदाहरण हा त्याचा एक वैशिष्ट्यपूर्ण नमुना होय.

अमेरिकन लोकांवर जे आरोप करण्यांत येतात, त्यांतला जवळ जवळ प्रत्येक आरोप स्वतः अमेरिकन लोकांच्याच विधानाचा किंवा कृत्याचा मार्मिक उपयोग करून पुराव्यानिशीं सिद्ध करतां येण्यासारखा आहे. एखादें (अमेरिकन) पुस्तक, चित्रपट, नाटक, भाषण, लेख, प्रवचन, फलक किंवा चित्र, हीं स्वतंत्रपणें घेऊन, किंवा त्यांचा मनोरंजक मिलाफ करून अशा आरोपाचा पाठपुरावा करतां येईल. टीकाकारांच्या कैक पिढ्यांनीं या भरगच्च पुराव्याचा मोठ्या आनंदानें उपयोग केला आहे. अमेरिकन लोक हे भौतिकवादी, स्त्रीस्वाधीन, रूढिप्रिय, युद्धपिपासु, एकदां एक व एकदां दुसरेंच बोलणारें आणि अपक्व किंवा पोरकट आहेत, असें या लोकांनीं आपल्या वाचकांच्या गळीं उतरविलें आहे आणि स्वतःचीहि तशीच समजूत करून घेतली आहे. विशेषतः अमेरिकन लोक हे ' अपक्व बुद्धी 'चे आहेत, असें सिद्ध करणें फार लोकप्रिय झालें आहे.

विसाव्या शतकाच्या मध्यावर अमेरिकन मनुष्याच्या वयाची सरासरी सुमारें ३० वर्षांची होती. पन्नास वर्षांपूर्वी हें वय २३ वर्षांखालीं असून शंभर वर्षांपूर्वी तें १९ वर्षांखालीं होतें. दीडशें वर्षांपूर्वी दर ३८ अमेरिकन लोकांपैकीं एक मनुष्य ६५ वर्षांपुढील वयाचा होता. तर १९५० सालीं दर १३ मनुष्यांपैकीं एक याच वयापुढें गेलेला होता. या एका भूमिकेवरून पाहिलें, तर असें दिसून येईल कीं अमेरिका हें राष्ट्र अद्यापि कोंवळें असलें, तरी प्रौढावस्थेच्या दिशेनें त्यानें बरीच मजल मारलेली आहे. ' अमेरिकन लोक पोरकट आहेत ' हें सिद्ध करूं पाहणारे लोक आंकड्यांचा आधार क्वचितच घेत असतात. शारीरिक वयापेक्षां मानसिक वयाबद्दल बोलणें ते

बहुधा नेहमीं अधिक पसंत करितात, आणि असें सुचवितात कीं या दोन चर्यांमध्यें जणूं कांहीं संबंध नसतो.

'अमेरिकन लोक पोरकट आहेत' हें सिद्ध करूं पाहणाऱ्या निरीक्षकाचें काम सुरुवातीपासून अगदींच सुलभ असे. प्राथमिक संशोधनांतच त्याला वृत्तपत्रांतील एखादा ठळक मथळा निश्चितपणें सापडला असता. त्यांतले शब्द असे – " छोटी '**कुमारी अमेरिका**' आपल्या नखाच्या पॉलिशच्याच रंगाच्या टोमॅटोची लागवड करते!"

या मथळ्याखालीं एका हातांत दोन टोमॅटो आणि दुसऱ्या हातांत नखाच्या पॉलिशची एक बाटली घेतलेल्या, सतरा वर्षे वयाच्या एका मुलीचें चित्र असे. 'कॉंग्रेशनल रेकॉर्ड' नांवाच्या वृत्तपत्रांत त्याला पुढील स्वरूपाचा स्तुतिपर मजकूर दिसून आला असता. " वेस्ट कोलंबिया: टेक्स येथील, राष्ट्रीय पितृदिन स्थापना करण्याबाबत अनेक वर्षे अश्रांत व सफल चळवळ करणाऱ्या सौ. झुला लॉगिन्स यांच्या सन्मानार्थ –"

सामाजिक घडामोडी आणि ठळक व्यक्ति यांची माहिती देणाऱ्या एका वृत्तपत्रकाराच्या लेखनांत पुढील मजकूर त्या निरीक्षकाला सापडला असता. – " जेवतांना आपली बशी वाकडीतिकडी होऊं देणें ही चांगली चालरीत नव्हे. पण दुसऱ्या बोटाच्या सांध्यानें ती जरा उचलून, आपल्या-विरुद्ध दिशेनें थोडी खालीं करण्यास हरकत नाहीं." अशा प्रकारच्या मजकुरांचा पुरावा एकत्र करून, त्या निरीक्षकाला त्याच्या निदर्शनास आलेली एक वर्तमानपत्रांतील जाहिरात त्या पुराव्याला जोडतां आली असती. त्या जाहिरातींतला मजकूर असा –

" आपण या जगांत कां आलों आहोंत – हा प्रश्न तुम्हांला कधीं पडला आहे काय? विश्वात्मक जाणीव साध्य केल्यावरच खऱ्या मानसिक आणि आध्यात्मिक शांततेचा तुम्हांला लाभ होईल!"

या निरीक्षकाला प्रतिनिधि-सभेनें नुकत्याच मंजूर केलेल्या एका ठरावाचें कात्रणहि मिळूं शकलें असतें. साऱ्या देशांत आंखूड (झालरीच्या) झग्यां-बद्दलच्या चळवळीचा एक आठवडा सुरू करण्याबद्दलचा हा ठराव होता. या साऱ्या पुराव्यानें त्याचें मन प्रसन्न होऊन त्याचे डोळे लुकलुकूं लागले असते. कारण त्याला जें सिद्ध करावयाचें होतें, तेंच या साऱ्या बातम्या सिद्ध

करीत होत्या. या विषयावर एखादें पुस्तक, भाषण किंवा प्रवचन किंवा एखादा लेख याला पुरेल एवढी सामुग्री त्याला अल्पावधींत मिळाली असती. या साऱ्यांवरून त्यानें असें दाखवून दिलें असतें कीं, अमेरिकन लोक पोरकट आहेत, हें त्यांच्याच कृतींवरून दिसून येतें.

अनेक वर्षें अवलंबिलेल्या ह्या तंत्रानें कांहीं निश्चित परिणाम घडले असते, हें खरें. पण ह्यासाठीं अशा निरीक्षकांनीं एकाच प्रकारचीं उदाहरणें एकत्र करून, त्यांतून एकाच प्रकारचे निर्णय काढले असते, तरच तें शक्य झालें असतें. पद्धतशीर नसला तरी सतत पुढें येणारा, आणि विपुल असा, समकालीन अमेरिकन लोकांनीं पुढें मांडलेला स्वतंत्र पुरावा या निष्कर्षाला पुष्टि देणारा ठरला असता, तरच हे निर्णय निश्चित स्वरूपाचे ठरले असते. परंतु अमेरिकन लोकांच्या पोरकटपणाबद्दलचा पुरावा जितका झटपट पुढें येई, तितक्याच तांतडीनें त्या देशांतील राजकीय, शास्त्रीय, औद्योगिक, कलात्मक किंवा तत्त्वज्ञानात्मक प्रगतिशीलतेचा पुरावाहि पुढें येऊन पहिल्या पुराव्याला काट मिळत असे ! एखादी उपपत्ति सिद्ध होते, न होते तेवढ्यांत तिला तडे जात किंवा तिचें खंडन होई. अमेरिकन लोकांच्या एका गटावरून जें खरें वाटूं लागे ते दुसऱ्या गटाच्या, किंवा त्याच गटाच्या निरीक्षणानें खोटें वाटूं लागे.

यामुळें अमेरिकन लोकांना स्वतःची ओळख पटणें कठीण झालें होतें, हें तर खरेंच; परंतु युरोपसारख्या देशांतील लक्षावधि लोकांच्या मार्गांत खरोखरच मोठ्या अडचणी निर्माण झाल्या. पूर्वींचे लोक प्रत्येक देशाची केवळ ठोकळमानानें किंवा बाहेरच्या रंगरूपावरून माहिती करून घेत. हे (आजचे) लोक त्या काळानंतर जन्मास आले होते. ते दिवस एकदां मागें टाकल्यावर त्यांना पुन्हा त्या कालखंडांत जाणें शक्य नव्हतें.

स्वतःच्या देशांतील वृत्तपत्रें व मासिकें, किंवा अधूनमधून दृष्टीस पडणारीं अमेरिकन वृत्तपत्रें व मासिकें, अमेरिकन चित्रपट, अमेरिकन भाषणें, अमेरिकन गाणीं, अमेरिकन प्रवासी, तेथील सैन्य, विनोदी पुस्तकें, कादंबऱ्या, रेडिओवरील कार्यक्रम, ट्रॅक्टर, आयतीं तयार घरें, सुकविलेलीं अंडीं, — या सर्वांचें निरीक्षण करून हे लोक अमेरिकेची ओळख करून घेण्याचा प्रयत्न करीत असत. साम्यवादी प्रशासकांनीं पुरविलेली अमेरिकेबद्दलची ( विकृत ) माहितीच तेवढी ऐकणारे

लक्षावधि लोक आपण या हिशेबांतून वजा करूं. अमेरिकेला सतत दिलेल्या शिव्या, तिच्याबद्दलचा तिरस्कार व तिचा धिक्कार एवढ्याच गोष्टी या लोकांच्या कानांवर पडत. युरोपमध्यें राहणाऱ्या आणि अमेरिकेबद्दल साधारणतः सत्य अशी माहिती मिळूं शकणाऱ्या लोकांबद्दलच आपल्याला विचार करावयाचा आहे. अॅटलांटिक व पॅसिफिक या महासागरांच्या मध्यभागीं असलेल्या या खंडप्राय देशांत ( खंडांत ) गेल्या दोन शतकांच्या पेक्षां थोड्या काळांत जें कांहीं घडलें तें समजून घेण्याचा हे लोक प्रयत्न करीत होते. येथील प्रत्येक मोठ्या शहरांत टेलिफोन ग्राहकांची भलीमोठी यादी पुस्तकरूपानें छापलेली असते. इटालियन, जर्मन, अँग्लोसॅक्सन ( इंग्लिश ) स्कँडिनेव्हियन, ग्रीक, डच, पोलिश, स्पॅनिश, स्लाव्हिक, केल्टिक, अरब आणि पौरस्त्य नांवाचा एक विचित्र, बहुरंगी गालिचाच या यादींत पसरलेला दिसे. इंग्रजी बोलणारी एखादी अमेरिकन स्त्री ही ब्रुकलिन शहरांतील एका गाळ्यांत राहणाऱ्या एखाद्या तुर्की गृहस्थाची मुलगी आहे, असें आढळून येतें. असाच एखादा मुलगा, व्योमिंग संस्थानांतील एखाद्या खेड्यांतील कच्च्या रस्त्याच्या टोकाशीं असलेल्या शेतावर राहणाऱ्या नॉर्वेजियन स्त्रीचा पुत्र असूं शकतो. ही परिस्थिति या लोकांनीं समजून घेणें अवश्य होतें.

परंतु कॉंक्रीटनें बांधलेल्या नव्या शहरांत राहणाऱ्या मनुष्याचें जीवन कसें असतें, निळ्या डोंगराच्या छायेंत कामावर जाणाऱ्या मनुष्याची नाडी शहरांतील मनुष्याच्या नाडीपेक्षां किती संथपणें चालतें, हें त्यांना कळण्यासारखें नव्हतें. या अर्धशतकांत अमेरिकेमध्यें कोणकोणत्या घटना घडून आल्या. याचा अंदाज त्यांना घेतां येत नव्हता. अनेक भौतिक सुखें ज्यांच्या आवाक्यांत आलीं आहेत, अशा लोकांची मनःस्थिति या लोकांना माहीत नसे. ज्या लोकांच्या प्रत्यक्ष अनुभवास हीं सुखें आलीं नव्हतीं, तीं त्यांना निदान अगदीं जवळच्या टप्प्यावर आलेलीं अशीं दिसत. थोडे अधिक डॉलर मिळविले, थोडें अधिक यश मिळविलें कीं, तीं सौख्यें त्यांच्या हातांत आलींच असतीं.

या निरीक्षकांनीं अशी कल्पना आपल्या मनाशीं धरून ठेवली होती कीं, या अमेरिकन लोकांना व्यावहारिक यशाचें फार वेड आहे. ही कल्पना सर्वांना सहज समजण्याजोगती होती. त्या लोकांचा असा ग्रह झाला होता,

कीं, अमेरिकेंतील प्रत्येक मनुष्य लौकिक यशाचा उपासक आहे. आपल्याजवळ पुरेसा पैसा, लौकिक किंवा सत्ता असली म्हणजे आपण सुखी होऊं अशी त्यांची कल्पना असावी, असें त्या लोकांना वाटे. युरोपांतील स्वतंत्र देशांतील लोकांना पुन्हा पुन्हा असेंच सांगितलें जात असे कीं, अमेरिकन लोक यशाची उपासना करतात आणि पुष्कळदां स्वतः अमेरिकन लेखकच त्यांना तसें सांगत असत...असें असलें तरी बहुतेक सारेच असें म्हणत कीं निश्चितपणें अपयशी ठरलेल्या, आणि दलित अशा लोकांविषयीं अमेरिकन लोकांना फाजील जिव्हाळा वाटतो. ही गोष्ट सिद्ध करणाऱ्या अनेक गोष्टी आणि अनेक पुस्तकें अस्तित्वांत आहेत.

(तरीहि) लोक म्हणतच असत कीं अमेरिकन हे पोरकट आणि पौगंड वयांतील एका राष्ट्रांतले लोक आहेत. पांढऱ्या केसांचे प्रौढवयस्क गृहस्थ, बँकेंत जबाबदारीच्या जागेवर काम करणारे अधिकारी, डॉक्टर, वकील असें लोकहि " जादूच्या राज्यांतील बुरखेवाल्या प्रेषितांच्या गूढ पंथाचे सदस्य !" अशा पदव्या स्वतः धारण करून, चमत्कारिक टोप्या घालून, बँड लावून, रस्त्यांतून मिरवत जातात, ही गोष्ट खरी आहे काय ? होय ! ती खरी आहे. त्याप्रमाणें हेंहि खरें आहे कीं याच लोकांनीं, किंवा त्यांच्या शेजाऱ्यांनीं ओकब्रिज येथील अणुशक्तीचे कारखाने उभारले आहेत. किरणोत्सर्गाच्या शक्तीनें, धन किंवा ऋण विद्युत्शक्ति नसलेल्या **मेसन*** या कणांतील अर्धे अणू किती वेळांत लय पावतात याची सेकंडाच्या एक

---

* ॲटम (अणु) च्या अंतर्भागांतील 'प्रोटॉन' आणि 'न्यूट्रॉन' या कणांच्या परस्पर संबंधांत 'मेसन' या कणाचा महत्त्वाचा भाग असतो, असें समजण्यांत येतें. एखाद्या पदार्थावर 'कॉस्मिक' किरणांचा मारा झाला म्हणजे त्यांतून हे 'मेसन' बाहेर पडतात, असा शोध ॲंडरसन आणि नेडरमेयर या अमेरिकन शास्त्रज्ञांनीं १९३६ सालीं निरीक्षण करून लावला. हे 'मेसन' कण अत्यंत अल्पजीवी असून वर नमूद केलेल्या अल्पावधींत विरून जातात. १९४८ सालीं पहिला मनुष्यनिर्मित 'मेसन' लॉरेन्स यांनीं आपल्या 'सायक्लोट्रॉन' यंत्रांत तयार केला. अणुशक्तीच्या निर्मितींत या कणांचा महत्त्वाचा भाग आहे.

ट्रिलियन इतक्या ( $\frac{१}{१०००००००००००००}$ ) अतिसूक्ष्म कालापर्यंत त्यांनीं मोजणी केली आहे, हेंहि तितकेंच खरें आहे.

युरोपांतील एखाद्या मनुष्याच्या वाचनांत असें येई किंवा त्याच्या कानांवर असें येई कीं, अमेरिकन लोकांना सामर्थ्य, साधेपणा आणि कळकळ यांची फार आवड असते. अशी आवड अॅब्रॅहॅम लिंकनच्या जीवनांत दिसून येते. परंतु असें ऐकल्यावर त्याच्या पुढें येई, तें म्हणजे अमेरिकन कॉंग्रेसच्या एखाद्या सदस्यानें केलेलें ठराविक ठशाचें देशभक्तिपर भाषण. तें भडक, भंपक आणि अर्थशून्य असून त्यांत कळकळीच्या भावनांचा पूर्णपणें अभाव असे.

"मजा करून घ्या ! आतांच फार उशीर झाला आहे." अशा अर्थाचें एखादें (अमेरिकन) गाणें ऐकून हे लोक निष्कर्ष काढीत कीं अमेरिकन लोक माणूसघाणे ( तुसडे, तिरसट ) आणि केवळ सुखवादी आहेत. पण या मागोमाग वाद्यमेळाच्या साथींत गायकानें गाइलेलें पद "बाबांची लाडकी लेक" असेंहि ( भावनापूर्ण ) असे.

या लोकांच्या वाचनांत असें येई, कीं अमेरिकेंतील निर्भय, स्वतंत्र बाण्याचीं वृत्तपत्रें आणि रेडियो हीं वाटेल तेथून सत्य हुडकून काढतात व या संस्था अमेरिकेला भूषणभूत आहेत. यावर त्यांचा विश्वासहि बसे. पण यानंतर (लगेच) त्यांच्या कानांवर अशी बातमी येई कीं रेडियोवरील एका प्रवक्त्यानें **घोडनवरी** असा शब्दप्रयोग वापरल्यामुळें त्याच्यावर फार गहजब करण्यांत आला. त्यामुळें त्यानंतर त्याला अविवाहित स्त्रियांसाठीं 'न खुडलेले गुलाब' असा वाक्प्रयोग करावा लागला !

पॅरिसमधील उपाहारगृहांत किंवा लंडनमधील पानगृहांत तुम्ही बसलां असाल, तर कोणती अमेरिका खरी असा तुम्हांला प्रश्न पडेल – मुलींकडे पाहून शीळ घालणाऱ्या लोकांची अमेरिका खरी कीं, मातृदिन पाळणाऱ्या लोकांची ? गेल्या महायुद्धांतील 'फुगवट्याची लढाई' या नांवानें प्रसिद्ध असलेला घनघोर संग्राम लढणाऱ्या लोकांची अमेरिका खरी कीं, ऑरसन् वेल्स् या गृहस्थानें रेडियोवर सादर केलेल्या, मंगळावरील लोकांनीं पृथ्वीवर केलेल्या हल्ल्याचें वर्णन ऐकून भयभीत होऊन पळ काढणाऱ्या लोकांची अमेरिका खरी ?

बहुजनसमाजाला बातमी पुरविणारीं साधनें यापूर्वी इतक्या विपुल प्रमाणांत

कधींच उपलब्ध झालीं नव्हतीं. अमेरिकेबद्दल इतकी माहितीहि पूर्वी कधीं मिळत नसे. पण महासागरापलीकडील लक्षावधि लोकांना या माहितींतून सत्याचा निर्णय करणें खरोखरच कठीण वाटत असे.

युरोपांतील स्वतंत्र देशांचे लोक खरोखर मूर्ख नव्हते. तसे ते बहुतकरून मत्सरी, दुर्गुणी किंवा कावेबाजहि नव्हते. कधीं कधीं एखादा अमेरिकन मनुष्य युरोपांतून स्वगृहीं परत येऊन सांगू लागे कीं, या अगर त्या देशांतल्या लोकांचा अमेरिकेविरुद्ध ग्रह झालेला आहे, अशा मनुष्यानें ही माहिती कोणत्याहि कडवटपणावांचून, अगदीं शास्त्रीय भूमिकेवरून पुरविली तरी याला बहुधा त्यामुळें दुःख वाटे.

युरोपांतील अशा नागरिकांच्या विरोधी भाषणांमागें अमेरिकेविषयीं अज्ञान नसे; परंतु पुष्कळशी पण अव्यवस्थित माहिती हेंच त्याचें खरें कारण असे. यापूर्वी कधींहि घडून आली नाहीं, एवढ्या मोठ्या प्रमाणांत अमेरिकेंतून माहितीची निर्यात होत आहे; पण ती माहिती अपुरी असते. यामुळें त्यांतील दोन तीन बाबी तेवढ्या एखाद्या मनुष्याच्या मनांत घर करून राहतात, मग तो त्यांनाच महत्त्व देऊन म्हणतो, " हो! ते अमेरिकन लोक ना ? अहो, ते तर लक्ष्मीचे लाल, सुखासीन, हृदयशून्य आणि पाखंडी आहेत." आपलें विधान सिद्ध करण्यासाठीं तो त्याला आठवणाऱ्या त्या तीन चार बाबींचाच उल्लेख करतो. त्या बाबींच्या सत्यतेविषयीं संदेह उत्पन्न करणारी दुसरी घटना तुम्हीं त्याला सांगितली, तर तो अस्वस्थ होईल, आणि कदाचित् त्याला रागहि येईल !

## संज्ञाप्रवाह

या शतकाच्या मध्यांतले अमेरिकन लोक कधीं कधीं आशावादी असत तर कधीं कधीं ते निराश होत. ते घरीं बसून वृत्तपत्रें वाचीत, आणि रेडियो ऐकत. ते बाहेर पडून भाषणें करीत किंवा तीं ऐकत. मित्रांशीं आणि शेजारच्या परक्या लोकांशीहि ते गप्पागोष्टी करीत. ते निर्जन प्रदेशांतून मोटारीनें लांब लांबवर प्रवास करीत. आपल्या घराच्या पडवींतील झुलत्या खुर्चीवर ते झोके घेत किंवा अंथरुणावर पडून विचार करीत–

–" अरेच्या ! एकंदर परिस्थिति कांहीं फारशी वाईट नाहीं बरं का !'

अमेरिकन प्रगतीबद्दल त्यांच्या वाचनांत, ऐकण्यांत जें आलें होतें, जें त्यांना समजलें होतें, त्यांबद्दल ते विचार करीत आणि म्हणत किती आश्चर्यकारक शतक आहे हें! काम कमी पण प्रत्येकास प्राप्ति जास्त.–पन्नास वर्षांपूर्वी दर डोई, दर तासाला जितका माल तयार होई, त्याहून चौपट माल आज तयार होत आहे.–विमानें व मोटारी, शीतयंत्रें व कपडे धुण्याचीं यंत्रें, नायलॉन्चे कपडे, चित्रपट, रेडिओ, टेलिव्हिजनचे सेट, (अवेळी) डिसेंबर महिन्यांत देखील मिळणारीं गोठविलेलीं स्ट्रॉबेरीचीं फळें–ही खरी प्रगति! प्रत्येक मनुष्याला प्रत्येक वस्तु आज अधिक प्रमाणांत मिळत आहे.

आठवड्यांतील कामाचे तास कमी झाले आहेत, आयुर्मर्यादा वाढली आहे. बालकांना मोफत शिक्षण मिळत आहे. संधि आणि शक्यता यांना अंतच राहिला नाहीं. अहो! आजपासून पन्नास वर्षांनीं तर...बाकीच्या जगाशीं, निदान त्याच्या बहुतेक भागाशीं येथील परिस्थितीचा किती विस्मयकारक विरोध आहे बरें? ही सुसंपन्न अमेरिका! ही च स्वतंत्र अमेरिका!

–एक क्वार्ट (दोन पिंट) ताज्या दुधासाठीं नऊ मिनिटें काम केलें कीं भागतें. एक रेडिओ सेट विकत घेण्यासाठीं दोन दिवस, एक झगा विकत घेण्यासाठीं अडीच तास काम केलें कीं पुरें! अशी परिस्थिति दुसरीकडे कोठेंहि नाहीं.

विजेचा सुकाळ असलेल्या या देशांत प्रत्येक मनुष्यासाठीं पुरेसा पुरवठा आहे. स्वच्छ कपडे घातलेले कामगार, आणि नीटनेटक्या पेहरावांतील, या त्यांच्या गृहिणी यांच्यासाठीं मोठाल्या कागदी पिशव्यांत भरलेला किराणा माल तयार आहे. त्यांच्या सुंदर मुलीसाठीं छानसे झगे, तलम मोजे, ओष्ठशलाका आणि उंच टाचांचे बूट तयार आहेत. जगाचें हें अंतिम आणि उत्कृष्ट आशास्थान होय. येथें कोणालहि काम करण्यास लाज वाटत नाहीं आणि प्रत्येकाला भविष्यकाळाविषयीं विश्वास वाटत आहे..."

असो! (वरील स्थिति असूनहि) या शतकाच्या मध्यावर मात्र अमेरिकन लोकांना परिस्थितीबद्दल थोडी शंका वाटूं लागली, आणि ते म्हणूं लागले, "प्रत्येकाला भविष्यावर विश्वास **ठेवावासा वाटतो**, हें तरी खरें! लोकांना स्वतंत्रता दिली, काम करूं दिलें आणि इच्छेप्रमाणें शोध लावूं दिले, तर... पण लोकांना ही स्वतंत्रता मिळेल तेव्हां ना?"

कधींच उपलब्ध झालीं नव्हतीं. अमेरिकेबद्दल इतकी माहितीहि पूर्वीं कधीं मिळत नसे. पण महासागरापलीकडील लक्षावधि लोकांना या माहितींतून सत्याचा निर्णय करणें खरोखरच कठीण वाटत असे.

युरोपांतील स्वतंत्र देशांचे लोक खरोखर मूर्ख नव्हते. तसे ते बहुतकरून मत्सरी, दुर्गुणी किंवा कावेबाजहि नव्हते. कधीं कधीं एखादा अमेरिकन मनुष्य युरोपांतून स्वगृहीं परत येऊन सांगूं लागे कीं, या अगर त्या देशांतल्या लोकांचा अमेरिकेविरुद्ध ग्रह झालेला आहे, अशा मनुष्यानें ही माहिती कोणत्याहि कडवटपणावांचून, अगदीं शास्त्रीय भूमिकेवरून पुरविली तरी याला बहुधा त्यामुळें दुःख वाटे.

युरोपांतील अशा नागरिकांच्या विरोधी भाषणांमागें अमेरिकेविषयीं अज्ञान नसे; परंतु पुष्कळशी पण अव्यवस्थित माहिती हेंच त्याचें खरें कारण असे. यापूर्वीं कधीहि घडून आली नाहीं, एवढ्या मोठ्या प्रमाणांत अमेरिकेंतून माहितीची निर्यात होत आहे; पण ती माहिती अपुरी असते. यामुळें त्यांतील दोन तीन बाबी तेवढ्या एखाद्या मनुष्याच्या मनांत घर करून राहतात, मग तो त्यांनाच महत्त्व देऊन म्हणतो, " हो! ते अमेरिकन लोक ना ? अहो, ते तर लक्ष्मीचे लाल, सुखासीन, हृदयशून्य आणि पाखंडी आहेत." आपलें विधान सिद्ध करण्यासाठीं तो त्याला आठवणाऱ्या त्या तीन चार बाबींचाच उल्लेख करतो. त्या बाबींच्या सत्यतेविषयीं संदेह उत्पन्न करणारी दुसरी घटना तुम्हीं त्याला सांगितली, तर तो अस्वस्थ होईल, आणि कदाचित् त्याला रागहि येईल !

## संज्ञाप्रवाह

या शतकाच्या मध्यांतले अमेरिकन लोक कधीं कधीं आशावादी असत तर कधीं कधीं ते निराश होत. ते घरीं बसून वृत्तपत्रें वाचीत, आणि रेडियो ऐकत. ते बाहेर पडून भाषणें करीत किंवा तीं ऐकत. मित्रांशीं आणि शेजारच्या परक्या लोकांशीहि ते गप्पागोष्टी करीत. ते निर्जन प्रदेशांतून मोटारीनें लांब लांबवर प्रवास करीत. आपल्या घराच्या पडवींतील झुलत्या खुर्चीवर ते झोके घेत किंवा अंथरुणावर पडून विचार करीत–

–" अरेच्या ! एकंदर परिस्थिति कांहीं फारशी वाईट नाहीं बरं का !'

अमेरिकन प्रगतीबद्दल त्यांच्या वाचनांत, ऐकण्यांत जें आलें होतें, जें त्यांना समजलें होतें, त्यांबद्दल ते विचार करीत आणि म्हणत किती आश्चर्यकारक शतक आहे हें! काम कमी पण प्रत्येकास प्राप्ति जास्त.–पन्नास वर्षांपूर्वी दर डोई, दर तासाला जितका माल तयार होई, त्याहून चौपट माल आज तयार होत आहे.–विमानें व मोटारी, शीतयंत्रें व कपडे धुण्याचीं यंत्रें, नायलॉन्चे कपडे, चित्रपट, रेडिओ, टेलिव्हिजनचे सेट, (अवेळी) डिसेंबर महिन्यांत देखील मिळणारीं गोठविलेलीं स्ट्रॉबेरीचीं फळें–ही खरी प्रगति! प्रत्येक मनुष्याला प्रत्येक वस्तु आज अधिक प्रमाणांत मिळत आहे.

आठवड्यांतील कामाचे तास कमी झाले आहेत, आयुर्मर्यादा वाढली आहे. बालकांना मोफत शिक्षण मिळत आहे. संधि आणि शक्यता यांना अंतच राहिला नाहीं. अहो! आजपासून पन्नास वर्षांनीं तर...बाकीच्या जगाशीं, निदान त्याच्या बहुतेक भागाशीं येथील परिस्थितीचा किती विस्मयकारक विरोध आहे बरें? ही सुसंपन्न अमेरिका! ही च स्वतंत्र अमेरिका!

–एक क्वार्ट (दोन पिंट) ताज्या दुधासाठीं नऊ मिनिटें काम केलें कीं भागतें. एक रेडिओ सेट विकत घेण्यासाठीं दोन दिवस, एक झगा विकत घेण्यासाठीं अडीच तास काम केलें कीं पुरें! अशी परिस्थिति दुसरीकडे कोठेंहि नाहीं.

विजेचा सुकाळ असलेल्या या देशांत प्रत्येक मनुष्यासाठीं पुरेसा पुरवठा आहे. स्वच्छ कपडे घातलेले कामगार, आणि नीटनेटक्या पेहरावांतील, या त्यांच्या गृहिणी यांच्यासाठीं मोठाल्या कागदी पिशव्यांत भरलेला किराणा माल तयार आहे. त्यांच्या सुंदर मुलीसाठीं छानसे झगे, तलम मोजे, ओष्ठशलाका आणि उंच टाचांचे बूट तयार आहेत. जगाचें हें अंतिम आणि उत्कृष्ट आशास्थान होय. येथें कोणालहि काम करण्यास लाज वाटत नाहीं आणि प्रत्येकाला भविष्यकाळाविषयीं विश्वास वाटत आहे..."

असो! (वरील स्थिति असूनहि) या शतकाच्या मध्यावर मात्र अमेरिकन लोकांना परिस्थितीबद्दल थोडी शंका वाटूं लागली, आणि ते म्हणूं लागले, "प्रत्येकाला भविष्यावर विश्वास ठेवावासा वाटतो, हें तरी खरें! लोकांना स्वतंत्रता दिली, काम करूं दिलें आणि इच्छेप्रमाणें शोध लावूं दिले, तर... पण लोकांना ही स्वतंत्रता मिळेल तेव्हां ना?"

अशा रीतीनें या शतकाच्या मध्यावर अमेरिकन लोक अस्वस्थ होऊन, कपाळीला आठ्या घालून पाहूं लागले, आणि चुळबूळ करूं लागले. (मधेंच ते त्रासून म्हणत,) " दुसरं युद्ध होय ? अंऽ! आमच्या मनांत आलं तर आणि जरूर पडली तर, आम्ही त्या रशियन लोकांची दाणादाण उडवून देऊं."

आणखी एक युद्ध अटळ आहे, अशी पुष्कळ लोकांची समजूत आहे. यामुळें तें आतांच नव्या मोटारी विकत घेऊं लागले आहेत. त्यांना वाटतें कीं, पुढल्या वर्षी अशी नवी मोटार मिळणें अशक्य होईल. (यावर ते म्हणतात.) " ठीक आहे ! जर युद्ध व्हायचंच असेल, तर..." (होऊन जाऊं द्यात दोन हात !)

खरी अडचण अशी आहे, कीं ॲटम बॉंब आणि हायड्रोजन बॉंब यांबद्दलची, आवश्यकतेपेक्षां अधिक माहिती लोकांना सांगण्यांत आली आहे. अशा फाजील धास्तीमुळें मानसिक रोगांचीं इस्पितळें तुडुंब भरलीं आहेत, हें चांगलें नव्हे. अलीकडे भयदायक परिस्थिति वाढली आहे. जो पाहावा तो घाबरलेला दिसत असून त्याच्या मज्जातंतूवर फाजील ताण पडत आहे.

(अशा रीतीनें) या शतकाच्या मध्यावर सामान्य अमेरिकन मनुष्य उदास आणि विटलेला दिसूं लागला. तो म्हणे, " काय त्रास आहे बुवा ! कशाचीच शाश्वति नाहीं–नोकरीची, आरोग्याची, स्वतःची अन् स्वतःच्या कुटुंबियांच्या सुरक्षिततेची–कशा कशाचीच शाश्वति वाटत नाहीं. आपण जें करतों तेंच सर्वांत चांगलें, हेंहि निश्चित वाटत नाहीं. नुसत्या उच्च जीवनमानाची भाषा करून काय उपयोग आहे ? नुसती पैशासाठीं धडपड करणें, आणि बर्फयुक्त पेयें ढोसणें याशिवाय जीवनांत इतर (अधिक महत्त्वाच्या) गोष्टी असल्या तर ?... "

(जीवनांत खरोखर) अशा दुसऱ्या गोष्टी आहेत. मनुष्यप्राणी त्यांना मुकत आहे. अतिश्रमानें तो खंगून जात आहे. ग्रंथ, संगीत, चित्रें आणि निसर्ग यांसारख्या श्रेष्ठ गोष्टींकडे त्याचें दुर्लक्ष होत आहे. या साऱ्या जंजाळांतून बाहेर पडावें, एखाद्या ओढ्या कांठच्या झोपडींत जाऊन राहावें, निळ्या आकाशाखालीं, मोकळ्या हवेंत बसून मासे धरावे, तसें न करणारा मनुष्य मूर्ख होय. (असेंहि त्या वेळी कित्येकांना वाटत असे.)

पण या उलट, या काळांतले इतर अमेरिकन लोक म्हणत, " मूर्ख आहांत

१०७ ५१

झालं ! सदान्कदा मासे धरीत बसणं कोणाला आवडणार आहे ? सगळेच मासे मारीत बसूं लागले, तर देशांतील कारखाने, आगगाड्या, उद्योगधंदे, आणि सारा देश यांची काय वाट ?"

कला, संगीत, निसर्ग यांना महत्त्व आहे, हें खरें; पण ज्याला कामं करायचीं आहेत त्याला आपला सारा वेळ याच गोष्टींच्या मागें लागून घालवितां येणार नाहीं.

हेंहि ठीकच आहे. 'कर' नांवाची एक वस्तु आहे. (हें विसरतां येणार नाहीं.) तें एक प्रचंड यंत्र असून, सार्वजनिक हिताच्या दृष्टीनें तें सतत चालूं राहिलें पाहिजे. तात्पुरत्या का होईना, मदतीची आवश्यकता असलेल्या परदेशांतील बहुसंख्य लोकांच्या हिताच्या दृष्टीनेंहि हें यंत्र चालूं राहिलेंच पाहिजे. अर्थात् ही वस्तु कायमची नसून तात्पुरती असावी; (हें रास्त आहे.) पण त्या लोकांना तसेंच वाऱ्यावर सोडून देणेंहि योग्य होणार नाहीं..."

असे विचार आले म्हणजे याच अमेरिकन लोकांना एकदम उत्साह वाटूं लागे. ते म्हणत, " या लोकांनीं खुशाल आमच्या प्रिय देशावर विश्वास ठेवावा–त्यांनींच काय–साऱ्यांनीं खुशाल आमच्यावर भार टाकावा. आम्हांला काय अशक्य आहे ?

–यापूर्वीं आम्हीं मोठमोठीं कामं केलीं आहेत आणि यापुढेंहि तीं करूं शकूं !..

–नवी परिस्थिति म्हणतात ती हीच ना ?

–अशी 'नवी परिस्थिति' तर नेहमींच असते.

(अशा) नव्या परिस्थितीची आम्हांला भीति वाटत नाहीं. पूर्वीं आमच्या हातून झालेल्या चुका, आणि पदरीं आलेलें अपयश यांची पुन्हा उजळणी व्हावी असें आम्हांला वाटत नाहीं. परिस्थिति बदलून टाकणारे (कांहीं तरी करून दाखविणारे) आम्ही लोक आहोंत.

" परिस्थिति कशीहि असो ! आम्ही कांहीं तरी करून दाखवूंच !"

● ● ●

## राजकारण

" द्रव्य, विद्वत्ता, वारसाहक्क, किंवा आर्थिक सामर्थ्य यांचा उपयोग करून कोणत्याहि गटाला (पक्षाला) अमेरिकेंतील सार्वजनिक जीवनावर

सत्ता किंवा कायमची हुकमत चालविण्याचा हक्क वळकविता येणें कधींहि शक्य होणार नाहीं."

फ्रँक्लीन डी. रुझवेल्ट

विसावें शतक अर्धे संपलें. या काळांतले अमेरिकन लोक पापभीरु, सुवृत्त, शांतताप्रिय आणि ध्येयवादी होते. हे लोक खरोखर पूर्णपणें सुधारलेले, परिस्थितीशीं जुळवून घेणारे, पाशवी मनोवृत्तीवर ताबा मिळविणारे आणि तत्त्वज्ञानानें सर्व हिंस्र भावनांचें उदात्तीकरण करणारे होते, असें म्हणतां येईल काय ? खरं म्हणजे लोक इतके सुधारलेले आणि इतके मिळून मिसळून वागणारे असे नव्हते.

परंतु एवढें मात्र खरें कीं, ज्या वेळीं जगांतील अनेक लोकांना ध्येयसिद्धीसाठीं बंड आणि युद्ध यांची अद्याप जरूर भासत असे, त्या वेळीं सनदशीर राजकारणांतून ध्येयसिद्धि प्राप्त करून घेणारी एक पद्धत अमेरिकेंत तयार झाली होती, हें साऱ्यांना माहीत झालें होतें. पाश्चात्य जगांतील हा एक प्रबळ आणि उत्साही देश जर युद्ध आणि विजय यांच्यामागें लागला असता, तर कोणालाच फारशी शांतता मिळाली नसती.

पण कोणत्याहि मार्गानें कां होईना, असें घडलें होतें कीं, जगांतील इतर लोकांच्या मनांत ज्या भावना युद्धाच्या छायेमुळें यापूर्वीं उत्पन्न होत, त्या अमेरिकन लोकांच्या मनांत राजकारणामुळें उत्पन्न होत. असें बोलणें मोहक आणि समाधानकारक होतें, हें खरें; पण तें पूर्णपणें पटण्यासारखें नव्हतें. त्यांच्यापेक्षां अधिक दांडग्या आणि प्रबळ लोकांना आवडणाऱ्या युद्धवारुणीपासून सहजपणें परावृत्त होण्यासारखे हे अमेरिकन लोक सात्त्विक आणि मऊ होते, असें यावरून समजावयाचें काय ? युद्धवारुणीऐवजीं ऐसपैस जाहिरात केलेल्या एखाद्या राजकारणरूपी साध्या पेयानें त्यांची तहान भागण्यासारखी होती काय ? ( हा खरा प्रश्न होता. ) राजकारण हा एक मोठा खेळ आहे, असें अमेरिकन लोक म्हणत असत.

दांडगाईचा कां होईना, हा खेळ, केवळ खेळासाठीं आपण खेळत बसून रक्तरंजित लढाया खेळण्याचें काम दुसऱ्या लोकांवर सोंपविणें त्यांना अधिक पसत होतें काय ?

'खेळासाठीं खेळ' हें तत्त्व इंग्लिश शाळांतून फार पूर्वीपासून शिकविलें जात असे, आणि एकंदरीनें त्याचे परिणाम चांगले झाले होते. अँग्लोसॅक्सन वंशाच्या लोकांना हें तत्त्व चांगलें मानवत असे. कारण त्यामुळें सर्व

परिस्थितीचा शांतपणें व खोलवर विचार करण्यास प्रोत्साहन मिळत असे. "सर्वांत महत्त्वाच्या गोष्टी सर्वांत आधीं" या तत्त्वानुसार वागणाऱ्या लोकांचा वंश चांगल्या रीतीनें वाढण्यास यामुळें मदत झाली. अमेरिकेंतहि ग्रँटलँड प्राइस या लेखकानें लिहून ठेवलें होतें.–" जेव्हां चित्रगुप्त तुमच्या नांवापुढें तुमचा हिशेब मांडील, तेव्हां तुम्ही जिंकलांत कीं, हरलांत हें न लिहितां, तुम्ही कशा रीतीनें खेळलांत, तेवढेंच तो नमूद करून ठेवील." या उताऱ्यावरून या तत्त्वाचा प्रभाव अमेरिकेंतहि सर्वमान्य झाला होता असें दिसून येईल.

(पण) अमेरिकेची अशी ख्याति आहे कीं, तेथें अनेक तत्त्वांना मान्यता मिळूनहि तीं तत्त्वें पूर्णपणें आचरणांत मात्र आणलीं जात नाहींत. तसेंच कांहीं उच्च तत्त्वें आधुनिक परिस्थितींत आचरावयास इतकीं कठीण समजलीं जात कीं त्यांना केवळ तात्त्विक दृष्टचा ध्येय म्हणून समोर ठेवणें, हेंच सर्वांत चांगलें असें समजण्यांत येत असे. अमेरिकेंत कांहीं तत्त्वांकडे कधीं सतत तर कधीं धास्तीनें लक्ष दिलें जाई; इतर कांहीं तत्त्वांकडे दुर्लक्ष तरी होई किंवा त्यांची वरवर वासलात लावण्यांत येई. "विजय किंवा पराभव याला महत्त्व नसून तुम्ही कसें खेळलांत, हें खरोखर महत्त्वाचें आहे," हें तत्त्व या दुसऱ्या वर्गांत मोडणारें होतें. (कांहीं) अमेरिकन शाळांतून तर खेळाडूंना अगदीं उघडपणें असें सांगण्यांत येई, कीं खरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे (वाटेल तें करून) विजय मिळविणें हीच होय. केवळ खेळासाठीं खेळ म्हणून खेळत बसणाऱ्या संघाचे सामने पाहात बसण्यास अमेरिकन प्रेक्षकांना वेळ नसतो, हें फार पूर्वींपासूनच सर्वांच्या निदर्शनास आलें होतें. एकूण, इतर लोकांना युद्ध आणि बंड यांतून जें आध्यात्मिक समाधान मिळत असे, तें "खेळासाठीं खेळ" या तत्त्वानुसार चालणाऱ्या राजकारणांतून मिळविण्यास अमेरिकन लोकांना उद्युक्त करणें, हें अगदीं असंभाव्य दिसत होतें.

अमेरिकन लोकांत खोलवर रुजलेल्या इच्छा आणि प्रवृत्ति यांचें पोषण राजकारणांतून व्हावें, असा हेतु असल्यास, केवळ (शुद्ध) राजकारणास यथायोग्य महत्त्व देण्यानेंच तो साध्य होण्यासारखा होता. ज्या गोष्टी लोकांना हव्याशा वाटतात, त्या साऱ्या राजकारणांतून मिळतील अशी व्यवस्था केल्यानेंच हें होऊं शकलें असतें. अमेरिकन लोकांच्या मतें प्राप्त करून घेण्यासारख्या गोष्टी कोणत्या आहेत, याबद्दल कधींच फारसा संदेह नव्हता. अनियंत्रित आणि

चढाओढीच्या कार्यपद्धतीनें तें कधींच निश्चित केलें होतें. हा मार्ग साऱ्या-समोर नेहमीं स्वच्छ आणि स्पष्ट दिसत असे. अमेरिकन लोकांच्या दृष्टीनें जगांत मिळविण्यासारख्या कांहीं गोष्ठी असल्या तर त्या–यश, संपत्ति, लौकिक, उच्च जीवनमान आणि समाजानें यशस्वी म्हणून गौरविलेल्या व्यक्तीला प्राप्त होणारी सुस्थितीची भावना याच होत्या.

अमेरिकन लोकांची प्रवृत्ति म्हणजे प्रत्येक गोष्टीचा ( राजकारण जमेस धरून ) उपयोग एखादी महत्त्वाची गोष्ट मिळविण्यासाठीं करावयाचा ही होय. मात्र अशा गोष्टी अमेरिकन लोकांच्या दृष्टीनें महत्त्वाच्या असावयास पाहिजेत.–उदाहरणार्थ, व्यापार, शेती किंवा कारखानदारी यांतून मिळणारा निश्चित आणि भरपूर नफा ! हा नफा खाजगी, चढाओढीच्या उद्योगधंद्यांतून मिळणारा नफा होय. अशा रीतीनें आपली राजकारणाची पद्धत योग्य रीतीनें चालू राहावी; यासाठीं जरूर ती सारी मेहनत हे अमेरिकन लोक करीत असत. परंतु अमेरिकन लोकांनीं साध्य केलेलें हें कार्य किती शांततापूर्ण आणि प्रशंसनीय आहे, याची त्याकडे पाहणाऱ्या लोकांनीं फारशी दखल घेतली नाहीं. ( कारण ) दुरून पहाणाऱ्या लोकांना अमेरिकन राजकारणांतील साधनांपेक्षां साध्यांचें दर्शन फार कमी प्रमाणांत होत असे.

आपलें राजकारण देशाच्या दृष्टीनें उपयुक्त व्हावें, यासाठीं अमेरिकन लोकांनीं केलेल्या कार्याची माहिती जेव्हां बाहेरील निरीक्षकांस मिळाली, तेव्हा त्या कार्याबद्दल त्यांनीं आश्चर्य, तिरस्कार किंवा सात्त्विक धिक्काराचे उद्गार काढले. त्यांना असें सांगण्यांत आलें होतें, कीं अध्यक्षीय निवडणुकीच्या पूर्वतयारीसाठीं अमेरिकन लोकांना विचित्र अशा सार्वजनिक समारंभांची जरूर लागते. या समारंभांना, " उमेदवारी निश्चित करण्याच्या सभा " असें नांव असून त्या अर्धवट सर्कस आणि अर्धवट तमाशा अशा स्वरूपाच्या असतात. या निरीक्षकांना असेंहि आढळून आलें कीं, साऱ्या देशभर " नफा-विभागणी " नांवाची एक पद्धत अमेरिकेंत सुरू असते. या पद्धतीप्रमाणें, जे प्रतिनिधि निवडून येतील, त्यांनीं त्यांना निवडणुकींत मदत करणाऱ्या लोकांना सरकारी नोकऱ्यांच्या रूपानें बक्षिसें द्यावयाचीं असतात. याशिवाय असेंहि दृष्टोत्पत्तीस आलें होतें कीं एकदां अधिकार प्राप्त झाला म्हणजे हे राजकारणी पुरुष आपल्या फेरनिवडणुकीस उपयोगी पडतील, असे कायदे करून घेतात. त्यांच्या या कृत्यांना सामान्यतः ' गटबाजी ' किंवा परस्पर सहकार्य असें म्हणतात.

22540 ग्रं. ५५८।२७
क्रमांक 2223 ना: दि: 30/9/1980


या प्रकारामुळें राजकीय प्रतिस्पर्धीतहि एकमेकांना पाठिंबा देण्याच्या वचनांची देवाणघेवाण होते. हे आणि असे इतर अनेक अमेरिकन रीतिरिवाज नजरेस आल्यानें जगांतील निरीक्षकांना अनेकदां धक्का बसत असे.

उमेदवारी ठरविण्याच्या सभा आणि नफा-विभागणीची पद्धत या संस्था जर अमेरिकन राजकारणी लोकांनीं निर्माण करून पूर्णतेस नेल्या नसत्या, तर त्या राष्ट्रांत इतर कोणत्या घटना घडून आल्या असत्या हें त्या देशाबाहेरील लोकांच्या नजरेस स्पष्टपणें आलें नव्हतें. शिवाय दुसऱ्या कांहीं देशांच्या राजकारणपद्धतीचीच अधिक माहिती आपल्या कानांवर कां येते, असा या निरीक्षकांनीं प्रश्न केला नाहीं. त्याचप्रमाणेंच अमेरिकेंत राजरोसपणें चर्चिल्या जाणाऱ्या कांहीं गौण स्वरूपाच्या कार्यपद्धति इतर देशांतहि लपून-छपून चालू असतील, कीं नाहीं या प्रश्नाबद्दल देखील अशा लोकांनीं फारसें कुतूहल दाखविलें नाहीं. आपली राजकीय पद्धत आणि तिचे परिणाम यावर स्वतः अमेरिकन लोकांनीं फार काळजीनें देखरेख केली होती.

संयुक्त संस्थानांच्या घटनेंत, राजकीय पक्षाच्या तत्त्वप्रणालींत, उद्‌घाटन-प्रसंगीं आणि राजसभेंत केलेल्या भाषणांतून आणि अनेक प्रकारच्या सरकारी कागदपत्रांतून जीं उच्च तत्त्वें नमूद केलेलीं असत, त्यांच्याशीं वरील कांहीं परिणामांचा स्पष्टपणें विरोध दिसून येई. हा विरोध कधीं कधीं इतका अस्वस्थ करणारा होता, कीं कांहीं अमेरिकन लोकांनीं त्याबद्दल कडक उपाय योजिले होते. या लोकांनीं ध्येय आणि व्यवहार यांची तात्पुरती किंवा कायमची तडजोड घडवून आणली, हें खरें; परंतु जाहीर घोषणा आणि प्रत्यक्ष कृति यांतील अनेक झगड्यांकडे अमेरिकन लोकांनीं दुर्लक्षच केलें होतें. त्यांनीं योग्य आणि अयोग्य यांमधली एक सीमारेषा ओढून ठेवली, हें खरें; पण ती इतकी सुलभ आणि सर्वांच्या आवाक्यांतील होती, कीं कोणालाहि त्या मर्यादेंत वागणें सहज शक्य असे. कधीं कधीं असेंहि वाटे कीं ही सीमारेषा जरुरीपेक्षां पुष्कळच खालती ओढलेली आहे. पण साधारणपणें हें निश्चित होतें कीं बहुसंख्य अमेरिकन लोकांना ही रेषा जेथें असावी, असें वाटत होतें, जवळ जवळ त्याच स्थळीं ती ओढलेली होती. दुसऱ्या शब्दांत बोलावयाचें म्हणजे अमेरिकन लोकांना ज्या गोष्टी महत्त्वाच्या वाटतात त्या साध्य होण्यास अडथळा होईल अशा उच्च पातळीपलीकडे ही रेषा कधींहि जात नसे.

जगाच्या इतर कांहीं भागांत जें वारंवार घडत होतें, त्याच्याशीं ठसठशीत विरोध करणारें दृश्य म्हणजे कांहीं झालें तरी ही अमेरिकन पद्धत सुरळीतपणें चालत असे, हेंच होय.

## संगीत तांडवनृत्य

उमेदवारांची निवड करण्याच्या परिषदेंतील परिश्रम आणि आनंद यांची खरी कल्पना साऱ्या जगांत फक्त अमेरिकन लोकांना असते. अशी परिषद यशस्वीपणें भरविण्यासाठीं आवश्यक असें वातावरण तेच लोक निर्माण करूं शकत. प्राथमिक तयारी, मतमोजणी, वृत्तपत्रांतले लक्षावधि शब्द, आणि लोकशाहींतील हजारों घोषणांची देशव्यापी आरडाओरड यांचा आनंद कसा असतो, यांचीहि जाणीव केवळ त्यांनाच असे.

आतांच पाहा ! २००० प्रतिनिधी, थाटमाट केलेले पक्षनेते, सर्वांच्या परिचयाचे लोक, त्यांचे (सहकारी) नोकर, वृत्तपत्रें, रेडिओ आणि टेलिव्हिजन यांची व्यवस्था करणारे १२०० स्त्री-पुरुष–आणि ध्वज लावून सुशोभित केलेल्या क्रीडांगणाच्या अगदी वरच्या मजल्यापर्यंत जितके लोक ठेचून मावूं शकतील, तितके सारे लोक, हे हजारोंच्या संख्येनें येथें जमले आहेत. निरनिराळ्या प्रकारच्या खाद्यपेयांच्या विक्रीची सोयहि येथेंच आहे. प्रत्येक नाट्यमय प्रसंगाबरोबर उजळणाऱ्या आणि मालवणाऱ्या दिव्यांच्या रांगाहि येथें आहेत. सगळीकडे संगीताचे सूर घुमत आहेत.

पांढरा गणवेष घालून एक वाद्यमेळ ( बँड ) अगदीं वरच्या मजल्यावर उभा आहे, त्यांतील 'ट्राम्बोन' या वाद्याच्या दांड्या लखलखीत प्रकाशांत चमकत आहेत. ध्वनिवर्धक यंत्रापुढें वाजविलेलें हें संगीत अनेकपटीनें वाढत जाऊन सगळीकडे घुमूं लागलें आहे. अशा समारंभासाठीं आवश्यक असलेल्या ऑर्गनच्या ( भरदार ) सुरांमुळें हा प्रचंड आवाज आणखी वाढत आहे. पांढरे शर्ट घातलेले पुरुष आणि सुती झगे घातलेल्या स्त्रिया जमिनीपासून छतापर्यंत दाटीदाटीनें रांगा करून बसल्या आहेत. सारें वातावरण घामट, चिकट, गरम आणि कोंदलेलें असें झालें आहे. क्रीडाभवनाच्या अगदीं वरच्या कोपऱ्यांतील पंख्यांच्या गरगरण्यानें तेथें टांगलेलीं निशाणें फडफडत आहेत. पायऱ्यांवरचे आणि जमिनीवरचे, दाटीदाटीनें बसलेले सारे लोक वृत्तपत्राच्या

घड्या करून सारखे वारा घेत आहेत. पण उकाडा कमी करण्यासाठीं त्यांना फारसें कांहीं करतां येत नाहीं. एखादा मनुष्य फार तर आपली गळपट्टी (टाय्) काढून घेईल; परंतु त्याच्या शर्टची पाठ खांद्यापासून कंबरेपर्यंत घामानें भिजून चिंब होत असतेच. एखादी स्त्री ओल्याचिंब झालेल्या रुमालानें आपल्या चेहऱ्यावरील घाम टिपीत राहील, तरी तिचा चेहरा लालभडक झालेला असेल आणि तिच्या केसाच्या बटा तिच्या कपाळावर आणि मानेवर चिकटून बसत असतील.

आतां व्यासपीठावर दिव्यांचा लखलखाट झाला आहे. मागेंच उभारलेल्या रेडिओच्या खोलीच्या मोठ्यामोठ्या खिडक्यांवरहि तो तळपत आहे. हा प्रकाश दोन बाजूंना अरुंद लाकडी टेबलांशीं बसलेल्या वृत्तपत्रांच्या प्रतिनिधींच्या ओळींवरून ओघळत आहे. नुकत्याच कापलेल्या लाकडांना जो वास येत असतो, तो वास या लांकडांना येत आहे. अजून घाई करण्याचें कांहीं कारण नाहीं. पक्षाचा उमेदवार आणि त्याचा सहकारी यांची निवड होण्यास निदान चार दिवस तरी लागतील. मतदानाला सुरुवात करण्यास हरकत नाहीं, असें ठरण्यापूर्वीं अनेक महत्त्वाचे विधि उरकावयाचे असतात.

आतां मुख्य धर्मगुरु आणि पुरोहित यांचा कार्यक्रम होणार आहे. देशभक्तिपर पद्यें व्हावयाचीं आहेत, आणि समित्यांची निवडणूक व्हावयाची आहे. स्वागतपर भाषण तर झालें पाहिजेच आणि एका तात्पुरत्या कार्याध्यक्षाला व्यासपीठापर्यंत मिरवीत नेलें पाहिजे. यानंतर त्यानें कार्याचें दिग्दर्शन करणारें भाषण करावयाचें असतें. हें झाल्यावर कायम स्वरूपाच्या कार्याध्यक्षाचें आगमन व्हावयाचें. तो आपलें भाषण करतो. नंतर आमंत्रित थोर व्यक्तींची ओळख करून देऊन त्यांना भाषण करण्यास विनंति करितो.

या प्रसंगीं उपस्थित असलेले हे प्रतिनिधि या थोर देशाच्या इतिहासांतील एका आणीबाणीच्या क्षणीं येथें जमलेले आहेत, असा (ठराविक) उल्लेख या स्वागतपर भाषणांत असतो. अमेरिकन राजकीय स्वातंत्र्याच्या उच्च परंपरेस अनुसरून येथें निर्णय घेतले जातील, असा विश्वासहि या भाषणांत व्यक्त केलेला असतो.

यापूर्वींच्या नेत्यांनीं आपल्याला जो वारसा दिला त्याचें चिंतन करून, येथें जमलेल्या या थोर पक्षाच्या प्रतिनिधींनीं आपली शक्ति पुन्हा मिळवावी.

आतांपासून पुढच्या नोव्हेंबरपर्यंत चालणाऱ्या या प्रचंड राजकीय मोहिमेच्या सुरुवातीस या लोकांनीं हें कार्य करावें, असें प्रास्ताविक भाषणांत म्हटलेलें असतें. स्वतंत्र अमेरिकन लोकांच्या मूलभूत राजकीय आणि मानवी हक्कांसाठीं सर्वांना पवित्र वाटणाऱ्या तत्त्वांच्या पाठपुराव्यासाठीं या पक्षानें सुरुवातीपासून लढा दिला आहे, असें विचार केला असतां कळून येईल, असा या भाषणाचा मथितार्थ असतो.

हा पक्ष सत्तारूढ असल्यास त्यानें अलीकडे केलेल्या कार्याचें समालोचन या प्रास्ताविक भाषणांत केलेलें असतें. तो सत्तारूढ नसल्यास सध्यां पक्षासमोर असलेलीं ध्येयें त्यांत विशद केलेलीं असतात. अमेरिकन जनता तिची इमानें इतबारें सेवा करणारें सरकार बदलल्यास नाखूप आहे, अशी अढळ निष्ठा या भाषणांत व्यक्त केलेली आढळते, किंवा उलटपक्षीं कधीं कधीं असें म्हटलेलें असतें कीं सत्तारूढ पक्षाच्या उधळपट्टीनें आणि अव्यवस्थित कारभारानें अमेरिकन जनता अगदीं विटून गेलेली आहे, आणि येत्या नोव्हेंबर महिन्यांत या लोकशाही राष्ट्राच्या इतिहासांतील सर्वांत मोठी साफ-सफाईची मोहीम चालूं होणार आहे; याबद्दल बिनचूक पुरावा आपल्या नजरेस आला आहे असेंहि कधींकधीं म्हटलेलें असतें.

देशांतील आणि देशाबाहेरील गंभीर परिस्थितीनें या परिषदेंतील प्रतिनिधींवर केवढी मोठी जबाबदारी येऊन पडली आहे,या मुद्द्यावर कायमकार्याध्यक्षाच्या भाषणांत जोर दिलेला असतो. अनियंत्रित उद्योगधंद्याची पद्धत, सामाजिक प्रगति आणि अमेरिकन जीवनपद्धतीचें संरक्षण ह्यांची उत्कृष्ट रीतीनें जपणूक करूं शकणाऱ्या उमेदवारांचीच अध्यक्ष आणि उपाध्यक्ष पदासाठीं ही सभा निवडणूक करील, असें भाकीत त्या भाषणांत केलेलें असतें.

यानंतर त्या पक्षाची ठरलेली कार्यक्रम-पत्रिका पुढें येते. या दस्तऐवजावर कैक दिवस एका समितींत दमछाट होईपर्यंत वादविवाद झालेले असतात. कांहीं वृत्तपत्रांत ती संपूर्णपणें छापलेली असते. पण अमेरिकन लोकांपैकीं केवळ एक चतुर्थांश लोकच ती वाचतात. त्यांपैकींहि अगदींच थोडे लोक तींत काय आहे, हें ध्यानांत ठेवतात. या पत्रिकेंत तडजोडीचे शब्द आणि विधानें हींच प्रामुख्यानें असल्यानें प्रागतिक आणि रूढिप्रिय या दोन्ही पक्षांतील लोकांचें मुळींच समाधान होत नाहीं.

यानंतर कार्यक्रम समितीचे कार्याध्यक्ष म्हणतात, " हा कार्यक्रम प्रागतिक व पुरोगामी असून आजच्या प्रश्नांना वास्तववादी रीतीनें तोंड देणारा आहे आणि अमेरिकन जनतेला भविष्य-काळाबद्दल खरी आशा देणारा आहे. म्हणून तो पुढें ठेवण्यास आणि त्याला पाठिंवा देण्यास मला अभिमान वाटतो."

यानंतरचे वक्ते कार्यक्रम-पत्रिकेबद्दलच्या या मताला दुजोरा देतात. जर विरोधी पक्षाची कार्यक्रम-पत्रिका यापूर्वीं प्रसिद्ध झाली असेल, तर तिची पक्षाच्या पत्रिकेशीं तुलना करण्यांत येऊन तिच्याबद्दल नापसंती व्यक्त करण्यांत येते. या विरोधी पक्षाच्या कार्यक्रम-पत्रिकेंत आपला मार्ग नीटपणें ओळखूं न शकणाऱ्या लोकांचे राजकीय लपंडाव आणि द्व्यर्थी विधानें भरलेलीं आहेत, असें दाखवून देण्यांत येतें.

या साऱ्या प्रकारांत केवळ सलामीपेक्षां दुसरें कांहीं नसतें. आतां क्रीडा-भवनांत एक प्रकारची अस्वस्थता भरून राहिलेली दिसूं लागते. ऑर्गनवर वाजविल्या जाणाऱ्या संस्थानगीताच्या गर्जनेनें ती अल्पकालच दूर होऊं शकते. ( पहिल्यानें ) हीं गाणीं भावनापूर्ण रीतीनें म्हणण्यांत येतात. ऑर्गनवर आपापल्या संस्थानांचीं गीतें वाजूं लागलीं, म्हणजे त्या त्या संस्थानाचे प्रतिनिधि उठून उभे राहतात. लोक टाळ्या वाजवून त्यांचा जयजयकार करतात. "सुंदर ओहायओ", "न्यूयॉर्कच्या पाउलवाटा", "कॅलिफोर्निया ! हा मीं आलों", " माझ्या व्हर्जिनियांत मला न्या हो !" वगैरे गाणीं वाजूं लागलीं म्हणजे लोकांना अभिमान आणि उत्साह वाटतो. परंतु सारीं गाणीं संपेपर्यंत, साऱ्या प्रतिनिधींना टाळ्या मिळेपर्यंत हा प्रकार चालूं राहत नाहीं; कारण उकाडा अत्यंत वाढत असतो. मध्यंतराची घोषणा होण्याआधींच सारे लोक कंटाळले आहेत, हें स्पष्टपणें दिसून येतें. प्रतिनिधि उठून उभे राहतात, एकमेकांशीं बोलूं लागतात, आंत-बाहेर करूं लागतात; कारण त्यांना या प्रास्ताविक स्वरूपाच्या कार्याचा कंटाळा आलेला असतो.

निवडणुकीच्या भाषणांची सुरुवात झाली म्हणजे ही परिषद पुन्हा सावरून बसते. सर्वांना ठाऊक असतें कीं, सर्वांत महत्त्वाचा भाग अद्याप यावयाचा आहे. पक्षाचे बिनीचे वीर म्हणून आतां कोणाचीं नांवें आधीं सुचविलीं जाणार आहेत ?

(यांचें वर्णन करतांना वक्ते म्हणतात–) या लोकांचें चारित्र्य इतकें उज्ज्वल आहे, त्यांची कामगिरी, त्यांची सार्वजनिक सेवेची वृत्ति, दूरदृष्टि आणि धैर्य हे गुण इतके विरळा आहेत कीं, असे लोक समाजांत फार वरच्या दर्जाचे ठरतात. ग्रीक व रोमन लोक त्यांच्या देवतांची स्तुति अशीच करीत असत. लखलखीत प्रकाशानें उजळलेल्या व्यासपीठावरील वक्तेदेखील आपापल्या संस्थानांच्या प्रियपुत्रांचीं नांवें सुचवितांना आणि त्यांना दुजोरा देतांना त्यांची अशीच स्तुति करीत असतात. या लोकांपैकीं कोणाचीहि निवड होण्याची यत्किंचितहि शक्यता नाहीं, ही पक्की खात्री असल्यानें त्यांच्या उत्साहाला अधिकच जोर येत असतो.

कारण या वेळेपर्यंत अशी बातमी पसरते कीं, दोनतीन वजनदार उमेदवारांनीं बऱ्याच मतांचे गट काबीज करून ठेवले आहेत. पहिल्या मतदानाच्या वेळीं त्यांचा चांगला परिणाम होईल, अशी अपेक्षा असते. ही माहिती असल्यानें उमेदवारांचीं नांवें सुचविणाऱ्या व्यासपीठावरील वक्त्यांनाच नव्हे, तर सभागृहांतील प्रतिनिधींनाहि अगदीं मोकळेंचाकळें वाटूं लागतें. आपल्या नेत्यांवर खुशाल वाटेल तेवढीं स्तुतिसुमनें उधळण्याची हीच संधि असते, कारण त्यामुळें कोणतेंहि वचन दिल्यासारखें होत नाहीं आणि त्याचे कोणतेहि राजकीय परिणाम होण्याची भीति नसते. आजकालच्या काळांतील धकाधकीपासून अलिप्त असलेल्या, सर्वगुणसंपन्न अशा राजकीय विश्वाचें हें ओझरतें दर्शन होय. या विश्वांत ज्या ज्या मनुष्याच्या नांवाचा उल्लेख होतो, तो मनुष्य सुज्ञ आणि चांगलाच असतो; [ असें समजण्यांत येतें. येथें असलेले सर्व लोक पुन्हा ताजेतवाने झाले आहेत आणि ते सारे आतां खरोखर महत्त्वाच्या कामासाठीं सज्ज झाले आहेत.

आतां सुरू झालेल्या निवडणुकीच्या भाषणांत एक सूक्ष्म फरक दिसून येऊं लागला आहे. हीं भाषणें आतां अधिक काळजीपूर्वक अशीं होत आहेत. त्यांची आखणी अधिक कौशल्यानें केलेली असते, आणि लोकांचा विश्वास बसावा, अशा रीतीनें त्यांची रचना केलेली असते. आतां या सभागृहाचें रूपांतर पुन्हा प्रत्यक्ष कार्यक्षेत्रांत झालेलें आहे. यानंतर जें जें बोलण्यांत आणि करण्यांत येतें, तें सारें महत्त्वाचें असतें.

आतां प्रतिनिधींच्या रांगारांगांतून काठ्यांवर ठोकून बसवलेले फलक लपूनछपून वाटले जात आहेत. त्यांचीं तोंडें खालीं वळविलीं असल्यानें

त्यांवरील नांवें अजून दिसत नाहींत. आतां एका वजनदार आणि झुंझार प्रतिनिधींचें नांव एक वक्ता सुचवीत आहे. त्याचा आवाज ध्वनिवर्धकांतून ओसंडून सर्वत्र घुमत आहे. वक्त्याचा चेहरा घामानें आणि भावनेच्या तीव्रतेनें चमकूं लागला आहे.

आपले बाहू पसरून वक्ता गर्जना करतो, " मी या गृहस्थाला ओळखतों. तो माझा मित्र आहे. स्वत: कष्ट करून त्यानें आपली उन्नति करून घेतली, म्हणून मला त्याचें कौतुक वाटतें. एका लहान गांवांत त्याचा जन्म झाला आणि ( सामान्य ) सार्वजनिक शाळांतून त्याचें शिक्षण झालें. स्वत: कष्ट करून (स्वावलंबनानें) त्यानें कॉलेजमध्यें शिक्षण घेतलें. यामुळें मला त्याचें कौतुक वाटलें. आपलें शिक्षण पूर्ण करावें कीं आपल्या आजारी पडलेल्या आईच्या मदतीस जावें, असा पेंचप्रसंग उत्पन्न झाला असतां, वैयक्तिक महत्त्वाकांक्षा बाजूला सारून, न डगमगतां, आपलें कर्तव्य करण्यास तो पुढें सरसावला, म्हणून मला त्याचें कौतुक वाटतें..."...पण या भाषणांत थांबण्याची योग्य अशी एक वेळ असतेच आणि ती आल्यावर तो वक्ता म्हणतो,–" आणि या थोर पक्षाचा उमेदवार म्हणून **जोसेफ पी. झिल्च** याचें नांव मी सुचवितों. अमेरिकेला ज्याची गरज आहे, असा मनुष्य हाच."

जो झिल्च याच्या बाजूच्या ( पक्षाच्या ) लोकांतून एक आनंदाची गर्जना उठते. त्यापूर्वी अर्धा क्षणच ऑर्गनचे स्वर वाजूं लागतात. निशाणें उभारलीं जातात, त्यांच्या खालीं झिल्च याचें स्मितयुक्त छायाचित्र झळकूं लागतें. "**अमेरिकेला झिल्च पाहिजे**" हे शब्द त्याखालीं दिसूं लागतात. आतां सभागृहांत काठ्यांच्या टोंकांशीं ठोकलेले शेंकडों फलक इकडून तिकडे फिरूं लागले आहेत, वर खालीं होऊं लागले आहेत. हे फलक हातांत धरणारे लोक-आपापल्या जागांवरून उठून, रांगांतून बाहेर पडून मिरवणुकीच्या तोंडाशीं जाऊन उभे राहात आहेत. बहुतेक सारे लोक आतां उठून उभे राहिले आहेत. या साऱ्या गोंगाटानें हवेंत लाटा उठत आहेत. यापूर्वी नुसतें उकडत होतें, आतां वाफा निघण्याइतकें हें वातावरण गरम झालें आहे. अरुंद रांगांतून मार्ग काढणाऱ्या, पांढरे शर्ट घातलेल्या लोकांच्या हनुवटयांवरून घामाचे थेंब ठिबकूं लागले आहेत. हे सारे लोक पोलीस शिपायांच्या आणि छायाचित्रकारांच्या बाजूनें पुढें जाऊन, कोपऱ्यावरून पलीकडे वळतात. हे लोक

मंदगतीनें चालत, ओरडत, जयजयकार करीत, फलक वरखालीं हलवीत चालले आहेत. ऑर्गनचे सूर आणि त्यांचे पडसाद सर्वत्र घुमत आहेत. निरनिराळा वेळ दाखविणारीं हजारों घड्याळें एकाच वेळीं टिक्‌टिक् करीत असावीं, अशा रीतीनें वृत्तपत्रकारांच्या टेबलांवरील टाईपरायटर टिक्‌टिक् करीत आहेत. हा प्रकार बराच वेळ चालू राहतो.

तो तसाच चालू राहावा, हें महत्त्वाचें आहे. कारण वृत्तपत्रलेखक तो काळ नोंदून ठेवतील. गबिन्स आणि डोक्स या दोन जबर प्रतिस्पर्धी उमेदवारांची मोहीम जे लोक एकाग्रतेनें आंखीत आहेत, ते देखील तिकडे लक्ष देत आहेत. या उमेदवारांची निवडणुकीचीं भाषणें अद्याप व्हावयाचीं आहेतच. तीं जेव्हां होतील तेव्हां आणखी कांहीं नवीन प्रकारांची यांत भर पडेल. सज्जांतून कागदांच्या कपट्यांचा पाऊस पडेल. याहूनहि अधिक मोठे आणि रंगीबेरंगी फलक तयार केले जातील. ऑर्गनशीं चढाओढ करणारे वाद्यमेळ सभागृहांत उभे ठाकतील, गाणीं म्हटलीं जातील, टोप्या हवेंत फेकल्या जातील. उमेदवारांच्या नांवांचीं अक्षरें रंगविलेले फलक हातांत धरून, लोकांच्या समोरून सुंदर मुली मिरवत जातील, लोक त्यांचें कौतुक करतील. एकाग्र चित्तानें ही सारी आंखणी करणाऱ्या व्यवस्थापकांनीं जर परिस्थितीचा आढावा योग्य रीतीनें घेतला असेल, आणि पुरेशी मेहनत केली असेल, तर या वेळीं पूर्वींपेक्षांहि मोठ्या आणि अधिक चांगल्या प्रमाणावर आरडाओरड होईल. यानंतर मतमोजणीला सुरुवात होईल. संस्थानांचीं नांवें मोठ्या गांभीर्यानें वाचलीं जातील.

"आलाबामा."

आलाबामाच्या प्रतिनिधिमंडळाचे कार्याध्यक्ष चट्कन् उठून ध्वनिवर्धकासमोर गंभीर आवाजांत म्हणतील,

"आलाबामा संस्थान झिल्च यांना अठरा मतें देत असून डोक्स यांना चार मतें देत आहे."

टाळ्या !

"आरिझोना"

दुसरा एक आवाज उत्तर देतो, "आपली सहांपैकीं सहाहि मतें झिल्च यांना देण्यास आरिझोनाला आनंद आणि अभिमान वाटत आहे."

अधिक जोराच्या टाळ्या !

" आरकान्सास ! "

आणखी एक आवाज, " आरकान्सास डोक्स यांना अठरा मतें देत आहे."

टाळ्या पडतात आणि लोकांत चलबिचल सुरू होते.

" कॅलिफोर्निया "

कॅलिफोर्निया गबिन्स यांना चार मतें, डोक्स यांना अठरा मतें आणि झिल्च यांना बावीस मतें देत आहे.

भयंकर आणि दीर्घकालीन टाळ्या !

" कोलोराडो ! "

क्षणभर स्तब्धता. एक नवा आवाज म्हणतो, " रंगीबेरंगी कोलोराडो आश्चर्यकारक व्योमिंग संस्थानाला अग्रेसरत्वाचा मान देत आहे. "

वाहवा !

" व्योमिंग ? "

" व्योमिंग आपलीं सहा मतें जोसेफ पी. झिल्च या थोर अमेरिकन गृहस्थाला देत आहे. "

...वाहवा ! केवढी मेहनत आणि किती काळजी, किती उत्साह आणि किती प्रांजलपणा ! वजनदार थोर लोक आणि गोंधळलेले सामान्य लोक, ऑर्गनचें संगीत, घाम आणि थकवा ! खिडक्यांतून प्रभातकालाचा प्रकाश आंत येत असतो, त्या वेळीं पथिकाश्रमाच्या सज्जांतून उपाहाराचीं तबकें फिरत असतात आणि अखेरीस अध्यक्ष आणि उपाध्यक्ष पदासाठीं एकेका उमेदवाराची निवड होते. स्वीकाराचीं भाषणें होतात. जमलेले सारे प्रतिनिधि शहरांतील रात्रींच्या करमणुकीच्या जागीं खूपशी मौजमजा करतात आणि नंतर आपल्या घरीं जातात.

## बातमीपत्र

हा परदेशी बातमीदार आपल्या लांबसडक, फिकट बोटांनीं इटालिक वळणाचीं अक्षरें असलेल्या टाइपरायटरवर मजकूर टाइप करीत बसला आहे; त्याच्या जवळ आपण चौकशी करूं या.

" काय हो महाशय ! या साऱ्या प्रकाराबद्दल तुमचं फारसं अनुकूल मत झालेलं दिसत नाहीं, हें खरं ना ? तुम्ही इतक्या लांबून अमेरिकेंतील उमेदवारांच्या निवडणुकींची परिषद् पाहण्यासाठीं प्रथमच आलां आहांत. अमेरिकन लोकांबद्दल माहिती असणाऱ्या, किंवा तशी माहिती वाचनांतून मिळविणाऱ्या तुमच्या देशबांधवांनीं तुम्हांला या परिषदेच्या स्वरूपाबद्दल आधीं इषारा दिला होता, नाहीं का ? कांहीं तरी जगावेगळे प्रकार आपल्या नजरेस पडणार अशी तुमच्या मनाची तयारी झाली हें खरें आहे ना ? तुमची ताठर अंगयष्टि, फिकट निळ्या डोळ्यांतील गंभीर, भावनाशून्य चमक पाहून तुम्हांला ( दरबारी थाटाचे ) उच्चवर्णीय बुद्धिमान् गृहस्थ म्हटलें, तर तें चूक होईल काय ? कांहीं हरकत नाहीं. आतांच, या जागीं तुमच्याशीं बोलत बसणें चुकीचें होईल. तुम्हांला दूरदेशांत असलेल्या तुमच्या वृत्तपत्राला बातमीपत्र पाठवायचं असेल–अन् तेंहि इटालिक टाइपांत !

तुमच्या नजरेस आलेले सारे प्रकार पोरकट, थिल्लर, असंस्कृत आणि शोचनीय आहेत, असें तुमच्या बातमीपत्रांत लिहिलेलें किंवा सूचित केलें असेल काय ? अथवा उच्च सांस्कृतिक पातळीवरून केलेला उपहास आणि उपरोध यांनीं सजविलेला खुसखुशीत लेख लिहिणें, हें तुमचें वैशिष्टच आहे काय ? तसें असलें तरी हरकत नाहीं. फक्त वाईट वाटतें तें एवढ्यासाठींच कीं ज्या सर्वमान्य गोष्टी अध्याहृत असतात, त्या उघडपणें बोलून दाखविण्यास अशा परिषदेच्या वेळीं कोणालाहि वेळ नसतो. प्रत्येक मनुष्य कार्यमग्न आणि क्षुब्ध मनस्थितींत आहे. त्याचा आवाज बसला असेल किंवा तो इतका दमला असेल, कीं हे शब्द त्याला बोलून दाखवितां येत नसतील. ही परिस्थिति लक्षांत घेण्यासारखी आहे. समजा, परिषदेंत वेळ मिळाला असता, आणि कोणाजवळ तितका जोर शिल्लक असता, तरी हे अध्याहृत शब्द कोठें बसवावे, हें ठरविणेंहि कठीण होतें.

प्रास्ताविक भाषणांत त्यांचा समावेश करतां आला नसता, हें उघडच आहे. तात्पुरत्या किंवा कायमच्या कार्याध्यक्षांनाहि तें व्यक्त करणें सोईचें झालें नसतें. सर्व प्रतिनिधींसमोर या उमेदवारांना असें सांगणें योग्य ठरलें नसतें कीं " बाबांनो, तुमचा पक्ष आणि त्याच्याशीं लढा देण्यास सिद्ध झालेला हा दुसरा पक्ष–हे दोघेहि खरेखुरे, निरनिराळे पक्ष नव्हतच मुळीं ! "

(बातमीदार महाशय) युरोपमध्यें ज्या अर्थानें तुम्ही 'पक्ष' हा शब्द वापरतां त्या अर्थानें हे दोन पक्ष निरनिराळे नाहींत. समान हितसंरक्षण, आणि समान धोरण यांचा पाठपुरावा करण्यासाठी जमलेल्या समान विचाराचे स्त्रीपुरुप म्हणजे एक पक्ष. अमेरिकेंतील पक्षांचें स्वरूप असें नसतें. परंतु ज्या पक्षाच्या पुढील प्रगतीसाठीं हे सारे लोक येथें जमले आहेत, त्यांना वरील तत्त्व सांगणें अयोग्य व अशक्य ठरलें असतें, पण महाशय ! हे ऑर्गनचे सूर कां घुमत आहेत, हे इतके लोक आपला घाम गाळून या मिरवणुकी कां काढीत आहेत याचें आपल्याला यथायोग्य ज्ञान व्हावें, अशी तुमची इच्छा असल्यास ही गोष्ट तुमच्या नजरेस येणें अवश्य आहे.

निरनिराळे हितसंबंध असलेल्या, भिन्न मनोवृत्ति आणि जीवनक्रम असलेल्या स्त्रीपुरुपांचे मोठे, यदृच्छेनें एकत्र आलेले जमाव म्हणजे हे दोन अमेरिकन पक्ष. यांची रचना पूर्वीपासून अशीच आहे, हें तुमच्या निदर्शनास आलें असेलच. तांबड्या भडक 'ब्रेसेस' पेहरलेला तो लठ्ठ मनुष्य पाहिलांत का तुम्ही ? तो उद्योगपति आहे. त्याच्याच मागचा तो फाटका फलक धरणारा मनुष्य ! तो मोटारच्या तबेल्यांत यांत्रिक दुरुस्ती करणारा कामगार आहे. पांढरपेशे लोक, व्यापारी, शेतकरी, कारखानदार, धंदेवाईक, तसेंच नवे हितसंबंध आणि जुने हितसंबंध असलेले लोक हे सारे बघा प्रत्येक (रेंगाळत जाणाऱ्या) मिरवणुकींत दिसून येतात. या मिरवणुकींतील लोक, याच उमेदवाराला पाठिंबा देणारे फलक घेऊन कां चालत आहेत, याला खरोखर कांहीं प्रबल असें कारण नाहीं. भोंवतालीं चाललेला गोंधळ आणि हा उकाडा या परिस्थितींतहि ही गोष्ट तुमच्या नजरेस येणें फार महत्त्वाचें आहे. हा पक्ष ज्यांच्यासाठीं आहे, असे लोक कोणत्याहि एका वर्गाचे, प्रदेशाचे किंवा एका ठराविक हितसंबंधाचे नाहींत. तत्त्वदृष्ट्या म्हणायचें तर हेच लोक दुसऱ्या पक्षाच्या उमेदवाराला पाठिंबा देणारे फलक घेऊन त्यांच्या मिरवणुकींत सामील झाले असते, तरीहि कांहीं बावगें झालें नसतें. दोन्ही पक्षांचे सद्स्य एकमेकांतून निवडून काढतां येणार नाहींत, असे आहेत.

या लोकांपैकीं कांहीं यदृच्छेनें डेमॉक्रॅटिक पक्षाच्या कुटुंबांत जन्मले, तर कांहीं रिपब्लिकन पक्षाच्या कुटुंबांत. कांहीं लोकांनीं विचार करून किंवा प्रत्यक्ष कार्यांत भाग घेऊन एका पक्षांतून दुसऱ्या पक्षांत पदार्पण केलें असेल.

परंतु तसें कांहीं विधिलिखित ठरलेलें नाहीं. एखादा शेतकरी रिपब्लिकन पक्षाचा असेल आणि पांढरपेशा मनुष्य हा डेमॉक्रॅट पक्षाचा असेल, असें अपरिहार्यपणें घडून येण्यासारखी कोणतीहि परिस्थिति नाहीं. आपल्या नोकरांनीं ज्या पक्षांत प्रवेश केला आहे, त्याला विरोध करणारा पक्ष स्वतःच्या दृष्टीनें अधिक समाधानकारक वाटेल, असें कोणतेंहि आश्वासन त्याच्या मालकाला मिळूं शकत नाहीं. फक्त पश्चिमेकडील शेतजमिनी किंवा फक्त पूर्वेकडील शेतजमिनी यांचाच हितसंबंध पाहाणारा असा कोणताहि पक्ष अमेरिकेंत अस्तित्वांत नाहीं. दोन्ही पक्ष दोन्ही बाजूंच्या शेत जमिनीच्या हिताकडे पाहतात. बहुतेक सान्या हितसंबंधाची हीच कथा आहे.

ज्या पक्षाच्या उमेदवार ठरविण्याच्या समारंभाला आपण आतां हजर होतों, त्या पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणींत ४८ संस्थानांतील प्रत्येक संस्थानाचा एकेक प्रतिनिधि असतो. दुसऱ्या पक्षानेंहि अशीच व्यवस्था केलेली आहे. पक्षांतील प्रत्येक प्रतिनिधीला हें ठाऊक असतें कीं, कांहीं विशिष्ट धोरणाचा अवलंब केला असतां आपल्या स्वतःच्या संस्थानाला अधिक लाभ होऊं शकेल. परंतु हें धोरण ज्या इतर संस्थानांना घातक ठरेल त्या संस्थानांचे प्रतिनिधीहि त्या पक्षाच्या कार्यकारिणीवर असल्यानें आपल्याच धोरणाचा पाठपुरावा करावा असें पक्षाचें मन वळविण्याची संधि त्याला मिळत नाहीं. अर्थात् दुसऱ्या पक्षाच्या प्रतिनिधींनाहि अशाच मर्यादा स्वीकाराव्या लागतात. या स्थितीचा परिणाम असा होतो कीं, विरोधी पक्षाच्या कार्यक्रमाहून संपूर्णपणें भिन्न असा कार्यक्रम तयार करणें कोणत्याहि पक्षाला शक्य होत नाहीं, किंवा तशी अपेक्षाहि ठेवतां येत नाहीं. कांहीं बाबतींत सर्वसामान्य धोरणाबाबत कमी अधिक प्रमाणांत जोर दिलेला दिसून येईल. एक पक्ष सत्तारूढ असतां त्यानें जें धोरण स्वीकारलें त्यावर दुसरा पक्ष कडक टीका करील. परतु जोंपर्यंत प्रत्येक पक्षांत समान विचार असलेले सदस्य आहेत, तोंपर्यंत डाव्या गटाचा मोठा पक्ष किंवा उजव्या गटाचा मोठा पक्ष हे येथें असूंच शकत नाहींत, तर मध्यम मार्गानेंच जाणारे दोन पक्ष येथें असूं शकतात.

बहुतेक सर्व बाबतींत बदल आणि सुधारणा घडवून आणण्याची उत्सुकता असलेले सुधारणावादी लोक, आणि आज (किंवा काल) चालू असलेली परिस्थिति कायम राहावी, अशी इच्छा करणारे जुन्या वळणाचे लोक हे प्रत्येक पक्षांत असतातच. अशा रीतीनें दोन्ही पक्षांत परस्पर विरोधी

कल्पनांचा आणि हितसंबंधांचा सतत संघर्ष चालू असतो. या अंतर्गत मतभेदांचा समन्वय नीट रीतीनें घडवून आणून, मतदारांच्या विश्वासाला आणि कौतुकाला पात्र होणारी प्रबळ आणि संघटित आघाडी निर्माण करणें हें प्रत्येक पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीचे प्रमुख कार्य असतें.

सदस्यांच्या संख्येंत विशेष गळती न होऊं देतां हें कार्य करण्याची एकच पद्धत आहे. निरनिराळीं मतें आणि हितसंबंध यांची एक संयुक्त आघाडी पक्षाच्या चौकटींतच उभारण्यानें हें शक्य आहे. पक्षांतील सदस्यांच्या संख्येच्या प्रमाणांत प्रत्येक मताला आणि हितसंबंधाला असें प्रतिनिधित्व द्यावयाचें असतें. उमेदवारांची निवड करण्यासाठीं भरलेल्या परिषदेसारख्या प्रसंगीं हें कार्य राष्ट्रव्यापी प्रमाणावर करून त्यावर शिक्कामोर्तब करण्यांत येतें. हें कार्य करण्याचा याहून चांगला मार्ग असलाच तर तो अजून तरी कोणाला सांपडलेला नाहीं, हें कोणीं न बोलून दाखविलेलें एक सत्य आहे.

उमेदवार निश्चित करणाऱ्या अशा परिषदा नसत्या तर अमेरिकेंत कदाचित् लहान लहान पक्षांची एकच गर्दी उडाली असती. प्रत्येक संस्थानांतहि एक किंवा अनेक पक्ष निर्माण झाले असते. अशा रीतीनें अमेरिकेंत इतके छोटे छोटे गट निर्माण झाले असते कीं त्यापुढें आजचा फ्रान्सदेखील राजकीय दृष्टया एकजिनसी वाटला असता, किंवा दुसरें म्हणजे रशियांत कम्युनिस्टांनीं व जर्मनींत नाझींनीं केलें त्याप्रमाणें एकाच पक्षानें निर्दयपणें आणि भयंकर रीतीनें साऱ्या राष्ट्रावर आपला पगडा बसविला असता. या प्रचंड राष्ट्रांत जीं भिन्न भिन्न मतें आहेत, त्यांचा समन्वय साधण्यासाठीं अशा परिषदा नसत्या तर अमेरिकेंत सारा गोंधळ माजला असता, अस्थिरता निर्माण झाली असती. त्यांतून वर उल्लेखिलेली दुर्घटना घडून येणें सहज शक्य होतें.

याशिवाय येथें चाललेलें दुसरें कार्य म्हणजे छोटया छोटया गटांच्या विविध मतांचा समन्वय करून, छोटया निवडणुकी आधींच त्यांची संयुक्त आघाडी बनविणें. युरोपांत यापेक्षां अधिक माहीत असलेली आणि उपयोगांत येत असलेली दुसरी पद्धत म्हणजे मतदारांनीं स्वतंत्र, विरोधी पक्षांना आपापलीं मतें द्यावयाचीं. ( हें मतदान होईपर्यंत समन्वयाचें कार्य पुढें ढकलावयाचें. ) अशा रीतीनें प्रत्येक पक्षानें शक्य तितक्या आपल्या सदस्यांना निवडून आणल्यावर बहुसंख्य प्रतिनिधींचा पक्ष दुसऱ्या प्रतिनिधींशीं

वाटाघाट करून एक संयुक्त (सरकारी)पक्ष स्थापन करण्याची जबाबदारी स्वीकारतो. परंतु या देशाची घडी नीट बसविण्याच्या काळांत ( प्राथमिक अवस्थेंत ) अथवा त्यानंतरच्या काळांत या पद्धतीचें काय परिणाम झाले असते, याची तुम्हांला कल्पना आहे काय ?

आपली स्वतःची निवडणूक होण्यापुरतींच ( परंतु खरी सत्ता हातांत येण्यास.मात्र, पुरेशी नव्हे इतकीं ) मतें मिळविणारे राष्ट्राध्यक्ष ' व्हाइट हाउस ' या राष्ट्रपति–भवनांत स्थानापन्न झाले असते. या अध्यक्षांना त्यांच्यापेक्षां कमी मताधिक्य असलेल्या पक्षांतील सदस्य आपल्या मंत्रि–मंडळांत घ्यावे लागले असते. विशिष्ट हितसंबंधांचें संरक्षण करण्यासाठींच निर्माण झालेल्या पक्षाच्या सदस्यांनीं त्या हिताच्या दृष्टीनें वरील सौदा करण्यास सुरवात केली असती. जेव्हां फायद्याचें वाटेल तेव्हां यांपैकीं प्रत्येक सदस्यानें आपला पाठिंबा काढून घेण्याची धमकी त्या अभागी अध्यक्षाला दिली असती. मंत्रिमंडळांतल्या अशा राजीनाम्यामुळें वारंवार राजकीय आणीबाणीची परिस्थिति निर्माण झाली असती. ज्या छोटया गटांच्या आधाराशिवाय राष्ट्रसभेंतलीं विधेयकें संमत होणें शक्य झालें नसतें, अशा सर्व छोटया गटांचेंहि समाधान होईल अशी व्यवस्था बहुतेक विधेयकांत करणें भाग पडलें असतें. अशा प्रकारच्या राज्यव्यवस्थेखालीं संयुक्त संस्थानांची प्रगति कितीशा झपाटयानें झाली असती बरें ?

परंतु परिषदेच्या प्रास्ताविक भाषणांत यांपैकीं कोणतेहि विचार व्यक्त केले नव्हते. ही सर्व माहिती अमेरिकन लोकांना आहे, असें गृहीतच धरण्यांत येतें. परिषदेच्या कार्याचा सुसंबद्ध वृत्तान्त देतां येईल ( इतपत ) माहिती त्यांना नसली, तरी ती त्यांना मूळचीच अवगत असते. पण साऱ्या अमेरिकन लोकांना–पक्षांतील कार्यक्षम सदस्यांना देखील–आपण कां व कसें वागत आहोंत, हें पूर्णपणें माहीत असतें असें सिद्ध करणें नेहमींच शक्य होत नाहीं. आतांच पाहा. हा एक भक्कम बांध्याचा प्रतिनिधि आपल्या जागीं उठून उभा राहिला आहे. कुशल ऑर्गन वादकानें वाजविलेल्या “ केंटकीमधलें माझें प्रियघर ” या गाण्याला जोरजोरानें हातवारे करून ताल देत आहे. केवढ्या मोठ्या देशसेवेच्या कार्याला आपण हातभार लावीत आहोंत, याची त्याला फारशी स्पष्ट जाणीव दिसत नाहीं. कदाचित् ती त्याला मुळींच नसेल. पण

आणखीहि एक मुद्दा येथें लक्षांत घेण्यासारखा आहे. या मनुष्याची नाडी जोरांत चालत आहे, त्याचा रक्तदाब वाढला आहे. हा मनुष्य खरें जीवन जगत आहे, आणि तुम्ही त्याच्याकडे नुसते तटस्थपणें पाहात आहांत.

दूरदूर असलेल्या मतदारांवर या परिषदेमुळें जो परिणाम होतो, तो तर महत्त्वाचा आहेच, परंतु पक्षनेत्यांवर तिचा होणारा परिणाम या अमेरिकन राज्यपद्धतीच्या गुणाचा एक प्रमुख भाग आहे. अशा प्रसंगीं भिन्न भिन्न मतांचा समन्वय घडून येतो, पक्षाचे लागेबांधे जोडले जातात; एवढेंच नव्हे तर अध्यक्ष व उपाध्यक्ष पदांसाठीं उमेदवारांची निवड उरकल्यावर उच्च प्रकारचें धैर्य, लढ्यासाठीं तयारी आणि एका मोठ्या साहसयुक्त कार्याची जाणीव या गोष्टीहि या कार्यक्रमांतून निर्माण होतात, ज्या भावनेचीं चिन्हें आतां आपल्या नजरेस येत आहेत त्या भावनेच्या भरांत लोकांना एक राष्ट्रीयत्वाचा आनंद उपभोगतां येतो. भिन्न परिस्थितींत मात्र याच लोकांनीं एकमेकांच्या हेतूंबद्दल संशय व्यक्त केला असता. अशा प्रकारची बंधुभावना निर्माण झाली म्हणजे एखाद्या साध्या जमावाचें शिस्तवार सैन्यांत रूपांतर होतें. भांडखोर, स्वतंत्र वृत्तीच्या लोकांच्या अव्यस्थित पक्षाचें बांधेसूद, सुव्यस्थित संस्थेंत रूपांतर घडून येतें.

आतां हेंहि खरें आहे कीं, कांहीं पक्षांच्या कारवाया त्यांच्या निवास-स्थानांतल्या धुरकट खोल्यांत चालू असतात, कट शिजत असतात आणि हितसंबंधाची स्वार्थी देवाणघेवाण चालू असते. निवडणुकीसाठीं ज्यांच्या-कडून पक्षाला द्रव्याची अपेक्षा असते, असे लोक त्या जोरावर कांहीं वचनें पदरांत पाडून घेतात. आपल्याच नियमांत गुरफटून गेल्यामुळें कधीं कधीं असेहि प्रसंग येतात कीं, प्रबळ, कार्यक्रम आणि लोकांचा भक्कम पाठिंबा असलेले दोन उमेदवार बाजूला टाकून, एकच दुबळा आणि भित्रा उमेदवार उभा करावा लागतो. त्याची लायकी एवढीच असते कीं, तो बापडा एखाद्याला राग येईल असा एकहि शब्द कोणालाहि कधींहि बोललेला नसतो. (अशा कांहीं घटना) कांहीं वेडींविद्रीं दृश्यें हीं अशा परिस्थितींत निर्माणच झालीं नाहींत, असा बहाणा करतां येत नाहीं हेंहि तितकेंच खरें आहे.

परंतु मोठ्या प्रमाणावर राजकीय सत्ता काबीज करण्याच्या एका प्रयत्नाचें आपण विवेचन करीत आहोंत. सोंवळ्या नीतिविशारदांना हें कार्यक्षेत्र बिनविरोध प्राप्त होण्यासारखें नाहीं. नीतिनियमांची फारशी पर्वा

न करणाऱ्या, स्वतःला भरभक्कम मोबदला कसा मिळू शकेल याच विवंचनेंत असणाऱ्या गटांनाहि या कार्यात भाग घ्यावयाची इच्छा असते आणि आपल्याला अनुकूल असा राजकारणाचा डोलारा उभारण्याची ते खटपट करीत असतात. असा मोबदला मिळविण्यासाठीं कोणते मार्ग योग्य आहेत, कोणते अयोग्य आहेत, पक्षांतला ' दादा ' कोण, कोणाचे हेतु शुद्ध आहेत, कोणाचे अशुद्ध—या साऱ्या बाबी त्या त्या पक्षांनींच ठरवावयाच्या असतात. ( या साऱ्या उलाढालींत ) नीतीची पर्वा न करणाऱ्या गटांना वाजवीपेक्षां अधिक सत्ता मिळण्याचे प्रसंग येतच नसतील, अशी कल्पना करणें वास्तवतेला सोडून होईल. परंतु प्रत्येकाला हें माहीत असतें कीं, जो पक्ष चालू राजकीय नीतिनियमांचें बेगुमानपणें उल्लंघन करणाऱ्या हालचाली चालू देतो, तो अशा कृत्यामुळें स्वतःच्याच पायावर धोंडा पाडून घेत असतो. चर्चेच्या सतत प्रवाहांत अशीं पापें तेव्हांच वर येतात, लोकांच्या डोळ्यांत भरतात आणि त्यांना योग्य ती शिक्षाहि भोगावी लागते. योग्य आचरणाची सीमारेषा कोठें ओढावी, हें जनतेला चांगलें माहीत असतें, कारण तिनेंच ती (पूर्वी) ओढलेली असते. वर उल्लेखिल्याप्रमाणें त्या नीतिनियमांचा भंग करणाऱ्या पक्षाला सत्तेचीं फळें चाखतां येऊं नयेत अशी काळजी जनता घेत असतेच.

दुसऱ्या पक्षानें आपली परिषद् भरविली म्हणजे अशाच सर्व प्रसंगांची पुनरावृत्ति तेथेंहि होते. 'फ्लोरिडा कीज्' या स्थानापासून ' पुजेट साउंड '-पर्यंतच्या, 'बँगॉर'पासून 'सॅंडिगो'पर्यंतच्या हजारों उमेदवारांवर या दोन परिषदांतील ४००० प्रतिनिधींच्या कार्यामुळें उत्साहाचें वारें संचारत असतें. एखादी घोडचूक घडली नसल्यास हा परिणाम नेहमींच दिसून येत असतो. परंतु एवढ्यानेंच सारें कांहीं संपलें नाहीं !

ह्या दमट सभागृहाबाहेर अमेरिकन लोकांचा एक मोठा समूह उभा आहे. या लोकांना राजकारण हा एक फावल्या वेळेचा व्यवसाय वाटत नसून तो पोटापाण्याच्या उद्योगाचा एक भाग वाटतो. राज्यपाल, संस्थानी लोकसभेचे सभासद आणि प्रतिनिधि, नगराध्यक्ष, व्यवस्थापक, कार्याध्यक्ष, पर्यवेक्षक, न्यायाधीश, वकील, कोतवाल, हिशेबतपासनीस, फौजदार, अग्निप्रतिबंधक खात्याचे अधिकारी, शिक्षण खात्यांतील व्यवस्थापक, आरोग्याधिकारी, करवसूल करणारे, बाजारखात्याचे अधिकारी आणि त्यांचे मदतनीस, कारकून आणि चिटणीस, रात्रींचे रखवालदार आणि कुत्रीं पकडणारे—

हा सारा अधिकाऱ्यांचा मोठा वर्ग राजकारणाच्या मार्गानें निवडून आलेला असतो आणि त्यांच्या नेमणुकीमागें राजकारणाची दृष्टि असते. संयुक्त संस्थानांच्या एकट्या पोस्टखात्यांत २२०० राजकीय दृष्टचा केलेल्या नेमणुका आहेत, ( किंवा कालपर्यंत होत्या, ) हें कोणीं तुम्हांला सांगितलें आहे काय ?

निवडलेल्या आणि नियुक्त केलेल्या या अधिकाऱ्यांचें जीवनमान, लक्षाधीश आणि एखादा भिकारी या दोन ध्रुवांच्यामध्यें कुठेंतरी असतें. सुस्थितींतले आणि कंगाल, शहरांतले आणि खेड्यांतले, उच्चविद्याविभूषित आणि फक्त शालेय शिक्षण घेतलेले, तरुण, मध्यमवयस्क आणि म्हातारे, महत्त्वाकांक्षी चळवळे आणि स्थितप्रज्ञ–असे सर्व प्रकारचे लोक या समुदायांत सांपडतील या लोकांत कांहीं ठळक देशभक्त आहेत आणि कांहींना राजकारण म्हणजे एक बौद्धिक कसरत आहे असें वाटतें. परंतु राजकारणाच्या क्षेत्राची मशागत करून आपल्या आणि आपल्या कुटुंबियांचा योगक्षेम चालविणारे लोकच या वर्गांत बहुसंख्य आहेत.

अधिकारपदावर निवडून आलेल्या लोकांकडून ज्यांना नोकऱ्या मिळतात त्यांना राजकीय दृष्ट्या आश्रय मिळाला असें सामान्यत: म्हणतां येईल. असा आश्रय, आणि त्याच्याशींच जोडलेली देवाणघेवाणाची पद्धत वगैरे शब्द अमेरिकन लोक अनेकदां तुच्छतेनें वापरतात. इतकीं वर्षे उलटलीं तरीहि राजकारणांतील ही आश्रयाची पद्धत (बक्षिसें) कमी करण्यासाठीं अमेरिकन लोकांनीं कांहींहि हालचाल केली नाहीं. इतकेंच नव्हे तर अशा बक्षिसांची वाढच होऊं दिली आहे. येथें असें नमूद करतां येईल कीं, आश्रय देण्याच्या या पद्धतीला अमेरिकन लोक जितकें हीन लेखण्याचा आव आणतात, त्यापेक्षांहि परदेशांतील बहुतेक लोक त्याविषयीं प्रतिकूलता दाखवितात. मला तर वाटतें कीं, विशेषत: ब्रिटिश लोकांचें असें सोवळें मत असतें कीं, ज्या मनुष्याला असा राजकीय आश्रय मिळतो, तो मनुष्य नेहमीं आश्रयदात्याच्या मुठींतच राहतो आणि यामुळें अत्यंत अयोग्य कारभारास उत्तेजन मिळतें. परंतु इंग्लंडमध्यें अनेक शतकें धार्मिक आश्रय, म्हणजे धार्मिक खात्यांत नोकऱ्या देण्याचा हक्क त्या देशाच्या सर्वांत जुन्या सरदार आणि घरंदाज घराण्याच्या हातीं होता व ही प्रथा पूर्णपणें योग्य समजली जात असे; या गोष्टीची त्या लोकांना आठवण देण्यास बहुधा कोणीहि जवळपास नसते.

अशा आश्रयदात्यांकडून ज्या इंग्रज धर्मगुरूंना आपापलीं स्थानें प्राप्त झालीं आहेत, त्यांना तेवढ्याच कारणावरून कमी मान मिळत नाहीं. यावरून असा युक्तिवाद लढवितां येईल कीं, ज्या लोकांनीं असा जन्मजात आश्रय देण्याचें तत्त्व मान्य केलेलें आहे, अशा लोकांनीं अमेरिकेंतील लोकनियुक्त प्रतिनिधींनीं तेंच आश्रयाचें तत्त्व आचरणांत आणलेलें पाहून वेशुद्ध पडण्याचें सोंग करूं नये. इंग्रज लोक अशी तत्त्वज्ञानाची ढोबळ कसोटी त्यांच्या प्राचीन आणि पवित्र संस्थांना लावीत नाहीत. कदाचित् त्यांना असा विचार मनांतल्या मनांत येत असेल कीं, एखादा अकार्यक्षम धर्मगुरु पाणीपुरवठाखात्याच्या त्याच प्रतीच्या अधिकाऱ्याइतकें नुकसान करूं शकणार नाहीं. धर्मगुरूचें कार्यक्षेत्र आत्म्यांच्या हिताकडे पाहणें एवढेंच असतें; उलटपक्षीं पाणी-खात्याच्या हलगर्जीपणामुळें साऱ्या जनतेंत विपमज्वराची साथ पसरण्याचें भय असतें !

आळशी, स्वार्थी आणि अकार्यक्षम अशा लोकांना पूर्णपणें वगळून, फक्त उद्योगी, निःस्वार्थी आणि कार्यक्षम अशाच लोकांची नेमणूक अमुक एका पद्धतीमुळें करतां येते असा दावा बहुधा कोणत्याहि एका पद्धतीला मांडतां येणार नाहीं. आश्रयाच्या पद्धतीविरुद्ध भूमिका ज्या तर्कावर आधारलेली आहे, तो असा–इतर उमेदवारांबरोबर खुली चढाओढ करून ज्यांना कधींहि नोकऱ्या मिळाल्या नसत्या, अशा बहुसंख्य नालायक लोकांना या पद्धतीमुळें खात्रीनें सरकारी नोकऱ्या मिळतात. आपली लायकी सिद्ध करण्यासाठीं केवळ राजकीय पक्षाला देणग्या देण्यापलीकडे या लोकांनीं दुसरी कोणतीहि कामगिरी केलेली नसते.

अमेरिकेंतले बहुसंख्य लोक असें धरून चालतात कीं यशस्वीपणें खूप पैसा मिळविणारा मनुष्य मोठ्या मानाला पात्र असतो. हें अमेरिकन मत, आणि वर उल्लेखिलेलें मत या दोघांत एक मजेदार विरोध आहे. सामान्यपणें असा मुद्दा मांडण्यांत येतो कीं असा पैसा मिळविणारा मनुष्य हुशार अथवा उद्योगी असलाच पाहिजे; कारण असे कांहीं गुण त्याच्यांत नसते तर त्याला इतका पैसा मिळवितांच आला नसता. अशा रीतीनें संपत्ति म्हणजे गुणदर्शक शिफारस [अमेरिकेंत] सामान्यतः समजण्यांत येते. [अर्थात् ही संपत्ति केवळ वारसा हक्कानें आलेली नसावी; आणि ती तशी अमेरिकेंत

क्वचित्‌च येते. ] इतकें असूनहि जेव्हां एखाद्या श्रीमंत मनुष्याला राजकारणाच्या क्षेत्रांत बढती मिळते, तेव्हां एका गोष्टीकडे नेहमींच दुर्लक्ष करण्यांत येतें. ती म्हणजे त्याच्या अंगीं असलेले गुण अमेरिकन जीवनाच्या इतर क्षेत्रांतहि त्याला चांगले उपयोगी पडले असते. [ निदान आपटी खाल्लेल्या उमेदवाराऐवजीं यशस्वी उमेदवारांसाठीं खटपट करण्याएवढी अक्कल बक्षिसादाखल नोकरी मिळविणाऱ्या त्या मनुष्यानें दाखविली ! एवढें श्रेय देखील त्याला बहुधा मिळत नाही. ]

यावर आणखीहि म्हणतां येण्यासारखें आहे कीं यशस्वी उमेदवारांस एवढें समजण्याची अक्कल असली पाहिजे कीं जर आपल्या हातीं असलेल्या नोकऱ्या आपण अक्कलशून्य लोकांना दिल्या, तर आपल्यालाच त्याचे बरेच दुष्परिणाम भोगावे लागतील आणि आपली फेरनिवडणूक होण्याच्या शक्यतेलादेखील त्यामुळें धोका पोंचण्यासारखा आहे. परंतु कांहीं म्हटलें, तरी हे केवळ तात्त्विक आणि तपशीलाचे विचार आहेत. आश्रय देण्याच्या पद्धतीचें त्यामुळें खरें समर्थन होत नाहीं. राजकारण हें केवळ वेळ घालविण्याचें साधन नसून तो एक धंदा आहे, असें समजणाऱ्या लोकांची संख्या या पद्धतीमुळें अनेक पटीनीं वाढते. त्यामुळें राजकारणास निराळाच दर्जा मिळतो. आपला आणि आपल्या कुटुंबाचा योगक्षेम राजकारणामुळें होऊं शकेल, हें बहुसंख्य लोकांना पटूं लागतें. सरकारी नोकऱ्यांसाठीं ज्या अटी आवश्यक असतात, त्या असे लोक पुऱ्या करूं शकत नाहींत. [ तरीहि त्यांना अशी सेवेची संधि मिळते ]. धंदेवाईक मनुष्याच्याच अंगीं जी खरी आस्था असते तिला या पद्धतीमुळें उत्तेजन मिळतें आणि राजकीय क्षेत्रांत केवळ हौस म्हणून वावरणाऱ्या लोकांचें कार्यक्षेत्र यामुळें कमी होतें.

वरील विवेचनामुळें तुमच्या आमच्या अभिमानाला मोठा धक्का बसला; तरीहि आपण तो धैर्यानें सहन केला पाहिजे. खरी गोष्ट अशी आहे कीं केवळ कौशल्यपूर्ण आणि व्यंगोक्तिपर मजकूर लिहिण्यास लोकांना संधि मिळावी; म्हणून ही परिषद भरविली जात नाहीं. तिचें खरें कार्य म्हणजे अनेक अमेरिकन राजकारणी लोकांची संघटना करणें, त्यांचें समाधान करणें आणि त्यांना स्फूर्ति देणें. हे लोक लोकशाही राजकारणपद्धतीचे भोक्ते असतात. खुली मतदान पद्धत जिला वारसा हक्कानें मिळालेली

आहे, अशी जनता हीच आपल्या निर्वाहाचें साधन आहे, असा दृश्य पुरावा अशा परिषदेंत पुढें येतो आणि त्यामुळें या लोकांची लोकशाहीवरील भक्ति सतत फोंफावत जाते.

● ● ●

## शतक-मध्यांतील राष्ट्राध्यक्ष

पश्चिम आणि वायव्य दिशेला असलेल्या दूरदूरच्या स्थळांना भेट देण्यासाठीं इ. स. १९५० च्या वसंतऋतूंत राष्ट्राध्यक्ष एका आगगाडींतून प्रवासास निघाले होते. एका रविवारीं संध्याकाळीं ही आगगाडी वॉशिंग्टन शहरांतून बाहेर निघाली. त्यानंतर सात आठवड्यांनीं कोरियांतील युद्ध पेटणार होतें. परंतु त्या वेळीं ही घटना अतर्क्य अशा भविष्य-काळांतच लपली होती.

भल्या पहाटेपासून रात्रीं बराच उशीर होईपर्यंत, सुमारें नऊ दिवस श्री. ट्रूमन व्याख्यानें देत असत. हीं व्याख्यानें कधीं कधीं वाटेवरच्या शहरांच्या आणि गांवांच्या सभागृहांत होत असत. कधीं कधीं तीं रेल्वे-स्टेशनांजवळ मुद्दाम उभारलेल्या, बिनरंगी परंतु पुष्पहारांनीं शृंगारलेल्या लाकडी व्यासपीठावर देखील होत असत. परंतु बहुतेक भाषणें राष्ट्राध्यक्षांच्या डब्याच्या मागील अरुंद सज्जावरून केलेलीं असत.

ही आगगाडी 'ओहायो' आणि 'इंडियाना' संस्थानांतील शेतें ओलांडून, 'इलिनॉइज्' आणि 'आयोवा' या संस्थानांपलीकडे, 'नेब्रास्का' व 'व्योमिंग' या संस्थानांतून गेली. चार दिवसांनंतर ती सपाट मैदानांवरून पश्चिमेकडील भू-भागाकडे धांवत जाऊं लागली. तेथें करड्या, तपकिरी आणि लाल रंगाच्या उंच उंच खडकाळ टेकड्या होत्या. जेथें जेथें खडक फुटून खालीं बसले होते त्या त्या खोलगट भागांतून उंच अशीं पाईनचीं झाडें उगवलीं होतीं. फिकट निळ्या रंगाच्या आकाशाच्या पार्श्वभूमीवर या खडकांच्या विचित्र अशा छायाकृति उमटत. उंच प्रदेशावर बर्फ अजून [कायम] पडून राहिलें होतें. लाल मातींतील गारगोट्यांवर आणि रुळाच्या बाजूंना असलेल्या तारेच्या आडव्या खांबांवरील चिनी मातीच्या निळ्या टोपणांवर, अस्तास जाणाऱ्या सूर्याचे किरण चमकत होते.

'इडाहो 'मधील 'सोल्जर मौंटन' पर्वताच्या पायथ्यानें ही आगगाडी जात होती. हिरवे डोंगरपायथे, आणि वरचें निळें आकाश यांच्यामध्यें बर्फमय शिखरांचे निळेकाळे डोंगर फार उठून दिसत होते. त्यानंतर मैलांमागून मैल फक्त गवत आणि झाडेंझुडपें यांचीं माळरानें पसरलीं होतीं. त्यानंतर 'ओरेगॉन' आणि 'वॉशिंग्टन' संस्थानांतील सुंदर दऱ्या आणि जंगलें रुळांच्या दोन्ही बाजूंनीं अर्धचंद्राकृति पसरलेलीं दिसूं लागलीं. 'स्पोकेन' मागें टाकून श्री. ट्रुमन यांनीं 'मोन्टाना' संस्थानांतून आपल्या प्रदीर्घ परतीच्या प्रवासास सुरुवात केली. भव्य खडकाळ टेकड्या वारा आणि पाऊस यांनीं घासून पुसून लांबट गुळगुळीत बनविलेले प्रचंड दगड यांमधून त्यांचा मार्ग जात होता. पुढें गेल्यावर 'बुटी' येथील तांबड्या जमिनी लागल्या, आणि त्यानंतर तो मार्ग हिरव्यानिळ्या प्रदेशांतून आणि शुभ्र लाटा उसळत असलेल्या नद्यांच्या परिसरांतून पुढें गेला.

दिवसांतून अनेकदां या गाडीचा वेग मंद होऊन ती थांबे. पूर्वी ठरविलेल्या जागीं लोकांचे समुदाय जमलेले असत. शाळांचें वाद्यमेळ (बँड) वाद्यें वाजवीत असत. राष्ट्राध्यक्ष आपल्या खास डब्याच्या मागील सज्जांत येऊन उभे राहत. स्मितमुद्रेनें (आनंदानें) लोकांकडे पाहून हात हालवीत आणि भाषणास सुरुवात करीत. हा श्रोतृवृंद कधीं कधीं शें-दोनशें लोकांचा असे तर कधीं कधीं हजारों लोकांचा असे. भर उन्हांत, डोळ्यांवर आडवा हात धरून, डोळे किलकिले करून हे लोक राष्ट्राध्यक्षांकडे पाहत आणि लक्ष देऊन त्यांचें भाषण ऐकत. कित्येक लोक आपल्या मुलांना उचलून वर धरीत, तर कित्येक आपल्या हातांची घडी करून मूकपणें उभे राहत.

तरुण लोक उन्हानें काळवंडलेले होते. लोंकरीचे शर्ट आणि जाड्याभरड्या कापडाच्या पाटलोणी असा त्यांचा वेष असे. श्रोतृवृंदांत कांहीं जोडपींहि होतीं. कांहीं प्रौढ लोकांना टक्कल पडलेलें होतें. कांहींचे केस पांढरे झाले होते. कांहीं लोक फारच म्हातारे असून, जीवनभर केलेल्या कावाडकष्टाच्या खुणा त्यांच्या चेहऱ्यावर कोरलेल्या दिसत. दूरदूरच्या प्रदेशांतील स्त्री-पुरुषांच्या तीन पिढ्या या श्रोतृवृंदांत (दिसत) होत्या.

गाडीमागील सज्जावर ठेवलेल्या टेबलाला ध्वनिवर्धक जोडलेला असे. त्यामागें डबलब्रेस्ट पद्धतीचा निळा सूट घातलेले राष्ट्राध्यक्ष उभे असत.

त्यांचे केस वाऱ्यांत भुरभुरू उडत आणि त्यांच्या गोल काचांच्या चष्म्यावर सूर्याचे किरण चमकत असत. एखाद्याला दरारा वाटावा, अशा सत्तेची आणि इभ्रतीचीं कोणतींहि चिन्हें त्यांच्या भोंवतीं नव्हतीं. त्यांच्या आवाजांतहि ओज किंवा आकर्षकपणा नव्हता. पण या साऱ्यांपेक्षां कांहींतरी निराळाच गुण त्यांत होता. डब्याच्या भोंवतालीं अर्धवर्तुळ करून उभ्या राहिलेल्या लोकांत आणि त्यांच्यांत आत्मीयता होती.

याचा अर्थ असा कीं राष्ट्राध्यक्ष आणि हे लोक परस्पर परिचयाचे होते. असा परिचय असलेल्या व्यक्तींमध्यें मोकळेपणा व अनौपचारिकपणा अशा प्रसंगींहि दिसत होता. कोणताहि भडक परिणाम मुद्दाम घडवून आणण्यासाठीं विशेष प्रयत्न करावयाचे नाहींत, ह्याविषयीं त्यांचें एकमत झालें होतें. राष्ट्राध्यक्ष म्हणाले— " १९४८ सालापासून माझ्यांत कांहीं बदल झालेला नाहीं, हें तुम्हांला सांगण्यासाठीं मी येथवर आलों आहें.

—" तुमचा नोकर म्हणून तुमच्याशीं बोलत असतां......

—" १९४८ सालीं मी तुमचीं मतें मागण्यासाठीं आलों होतों, तेव्हां मी जसा होतों तसाच मी अजून आहें— मला ' ग 'ची बाधा झाली नाहीं हें तुम्हांला दिसून यावें......

—"मी तुमच्यासाठीं कष्ट करीत आहे, हें तुम्हांला समजावें अशी माझी इच्छा आहें. "

[ त्या दूरदूरच्या प्रदेशांतील लोकांना हेंच हवें होतें काय ? एखादा बलिष्ठ नेता किंवा राजकीय वैभव यांची त्यांना जरूर नसून, सत्तेमुळें आपण बिघडलों नाहीं, याची नम्रपणें ग्वाही देणारा नोकरच त्यांना हवा होता काय ? ]

राष्ट्राध्यक्ष पुढें म्हणाले— " १२ एप्रिल रोजीं राष्ट्राध्यक्षाचें पद माझ्या वाट्यास आलें. तेव्हांपासून विश्वशांति साध्य व्हावी, ही एकच माझी महत्त्वाकांक्षा होती. चिरस्थायी, सर्वांना उपयुक्त आणि सर्व जगाला सुखी करणारी शांतता मला हवी होती.

—" साऱ्या जगांतील लोकांचें कल्याण व्हावें, असें आम्हांला वाटतें. कोणाचाहि गैरफायदा घेण्याची आमची इच्छा नाहीं. लोकांना मदत करण्याची आमची इच्छा आहे. लोकांना अधिक चांगल्या रीतीनें राहतां

22480 दि. ...
क्रमांक उद्याच्या उंबरठ्यावर ता. दि. 30/9/1958
223

येईल, अशी जगाची घडी आम्हांला बसवावयाची आहे. मनुष्य म्हणून (मानानें) जगण्याची संधि प्रत्येक व्यक्तीला मिळावी आणि आपल्या शेजाऱ्यांबरोबर मित्रत्वानें राहतां यावें, अशी संधि प्रत्येकाला मिळवून द्यावी, अशी आम्हांला इच्छा आहे. यामुळेंच जगांत शांतता नांदेल आणि या साठींच माझी खटपट चालली आहे."

[ या सांगण्यांत किती तथ्य होतें बरें ! त्या दूरच्या प्रदेशांतील लोकांना साऱ्या जगांतील लोकांना मदत करण्याची इच्छा होती, आणि त्यांना सुखी करावयाचें होतें, असें म्हणतां येईल काय ? सर्वसामान्यपणें हें खरें दिसत होतें. राष्ट्राध्यक्षांच्या डब्याच्या सज्जाभोंवतीं जमलेल्या लोकांच्या चेहऱ्यांकडे पाहिल्यावर कोणालाहि म्हणावेसें वाटलें असतें कीं, या लोकांचें जगांतील बाकीच्या लोकांशीं कांहीहि वैर नसेल.

कोणताहि देश जिंकण्याची त्यांची तयारी चालली नव्हती आणि ते कोणाचाहि द्वेष करीत नव्हते. राष्ट्राध्यक्षांनीं मांडलेली सुखी जगाची कल्पना त्यांना पसंत पडली असावी मनुष्य म्हणून जगांत प्रत्येकाला सुखा-समाधानानें जगण्याची संधि मिळावी, यासाठीं स्वतःच्या कुवतीप्रमाणें मदत करण्यास त्यांची तयारी दिसली. अर्थात् हें कसें करावयाचें हें त्यांना कळलें तर ! ]

राष्ट्राध्यक्ष पुढें म्हणाले—"ही थंडी लढाई जगांत दीर्घ काळपर्यंत चालणार आहे. तिचा शेवट करण्याचा सुलभ आणि त्वरित असा मार्ग दिसत नाहीं.

—"आपल्याला शांतता मिळूं शकेल, पण त्यासाठीं सक्त मेहनत आणि खूपसा खर्च करण्याची जरुरी आहे. मागील युद्धखर्च भागवून, भावी युद्ध टाळण्यासाठीं आपल्या अर्थसंकल्पांतील सात टक्के रक्कम आपण खर्च करीत असतों. लष्कराच्या खर्चांत कपात करणें आणि साम्यवादी सत्तेशीं झगडून जिवंत राहण्याची धडपड करणाऱ्या युरोपांतील राष्ट्रांची मदत बंद करणें हीं कामें सोपीं आहेत. असें केलें तर आपलें उत्पन्न व खर्च यांचा चांगला मेळ बसूं शकेल, पण शेवटीं आपल्याला त्याचीं फळें भोगावीं लागतील. तिसरें महायुद्ध टाळण्याच्या प्रयत्नांमुळें हा आर्थिक बोजा आपल्याला सहन करावा लागत आहे, आणि त्यामुळें आपल्या बजेटांतहि

तूट येत आहे. पण शांतता नष्ट झाल्यास आपल्याला जी किंमत द्यावी लागेल, तिच्याशीं तुलना करतां ही किंमत—हा खर्च—कांहींच नाहीं असें मला तुम्हांला कळकळीनें सांगावयाचें आहे. ”

[ या कार्यासाठीं पैसा खर्च करावा लागणार आहे आणि त्यामुळें करांचा बोजा वाजवीपेक्षां अधिक प्रमाणांत वाढणार आहे. या व्यापक विचाराबद्दलहि कोणाचा मतभेद दिसत नव्हता. पण ही भावी खर्चाची तरतूद झाल्यावरहि जगाचें कल्याण कसें साधावयाचें हाच मुख्य प्रश्न होता. ]

— राष्ट्राध्यक्ष पुढें म्हणाले :—

“ तुम्हांला माहीत आहे कीं कैक अत्यंत कठीण प्रश्नांना मला तोंड द्यावें लागलें आहे. मीं जो मार्ग चोखाळीत आहे, तो लोकांच्या हिताचा आहे, अशी त्यांची खात्री पटवून देण्यासाठीं सारा देशभर दौरे काढीत फिरणें मला अशक्य होईल असें १९४८ सालीं सांगण्यास आलें होतें, याची कदाचित् तुम्हांला आठवण असेल. मी त्यांची खात्री पटवूं शकलों आणि आपला विजय झाला. आपण योग्य मार्गानें चाललों आहोंत, हें आतांहि अशाच रीतीनें जगाला पटवून देण्याची माझी इच्छा आहे. या कार्यांतहि आपल्याला विजय मिळेल; कारण या ( थोर ) कार्यात परमेश्वर आपला पाठीराखा आहे, असा माझा विश्वास आहे. मला असेंहि वाटतें कीं जगांतील लोकांना अमेरिकेबद्दलची खरी माहिती कळली, तर ते साम्यवादी सत्तेची बाजू न घेतां ते आपली बाजू घेतील. ”

[ म्हणजे आपण १९४८ सालीं निवडणुकीची मोहीम जशा रीतीनें चालविली तशाच रीतीनें जगाचें कल्याण करण्याची मोहीमहि हातीं घ्यावयाची आहे अशी राष्ट्राध्यक्षांची समजूत होती काय ?आज ही मोहीम निराशाजनक वाटत असली, तर १९४८ सालीं तो मोहीमहि तशीच निराशाजनक दिसत होतीच कीं ! अमेरिकेचा मार्ग सर्वांत चांगला आहे याबद्दल एकदां बाकीच्या जगाची खात्री पटली, तर हा नवा आणि व्यापक कठीण प्रश्न इतर प्रश्नांप्रमाणेंच सोडविला जाईल. ]

राष्ट्राध्यक्ष म्हणाले—“ आपल्या थोर संयुक्त संस्थानांत मला समतोल स्वरूपाची अर्थव्यवस्था स्थापन करावयाची आहे. शेतकऱ्याला राष्ट्रीय उत्पन्नाचा योग्य वाटा मिळाला पाहिजे. शेतांत उत्पन्न होणारे जिन्नस

विकत घेण्यासाठीं कामगारांना चांगली मजुरी मिळाली पाहिजे. मोठ्या आणि छोट्या व्यापाऱ्यांची भरभराट झाली पाहिजे. जनतेला आवश्यक असलेल्या वस्तूंचें वाटप या व्यापाऱ्यांना योग्य रीतीनें करतां आलें पाहिजे. अशा पद्धतीनेंच आपला देश थोर होऊं शकेल. अशा देशांत सर्वांना संपत्तीचा ( योग्य ) वाटा मिळविण्याची समान संधि मिळते. आपल्याला जर असें ( खरोखरच ) करतां आलें, तर आपली राज्यपद्धति जगांत आणि जागतिक इतिहासांत सर्वोत्कृष्ट आहे असें आपल्याला (अभिमानानें) म्हणतां येईल. जर आपल्याला असें करतां आलें तर जागतिक शांतताहि आपल्याला प्राप्त करतां येईल. पूर्वी झाली तशी तरुणांची कत्तल होण्याची त्यासाठीं जरूर भासणार नाहीं."

—"गतकाळांत ज्या ज्या घातक शस्त्रांचा शोध लागला, त्यांपैकीं बहुतेक सर्वांचा अखेर शांततेच्या कार्यासाठीं उपयोग झाला आहे. भयंकर अणुशस्त्रांचा उपयोगहि असाच करण्याचें कौशल्य, आणि तसा सूज्ञपणा आपल्यापाशीं नसेल, तर मी ( स्पष्ट ) सांगतों कीं नष्ट होण्याचीच आपली योग्यता आहे. आणि मी हेंहि सांगतों कीं आपला असा नाश होणार नाहीं, कारण मानवजातीच्या नाशासाठीं नव्हे, तर कल्याणासाठींच आम्हीं या प्रचंड शक्तीचा उपयोग करणार आहोंत."

--"आमची पिछेहाट होत नसून उत्तरोत्तर प्रगतिच होत आहे. १९६०-१९८०-२००० या सालांकडे आपण निघालों आहोंत. प्रत्येक शतकाच्या सुरुवातीस आपली जी स्थिति असते तिच्यापेक्षां तें दशक उलटल्यावर आपली सुधारणा होणार आहे. जर तुम्ही त्या कार्यांत मनापासून सहकार्य केलें, त्यासाठीं कष्ट केले तर आपल्याला हें सारें साध्य करतां येईल. तुम्हीं हें कार्य करावें असें माझें तुमच्याजवळ मागणें आहे."

--"आपण अशा एका नवयुगाच्या उंबरठ्यावर येऊन पोंचलों आहोंत कीं त्याच्याशीं तुलना करतां गेलीं पन्नास वर्षें अगदीं मध्ययुगासारखीं वाटूं लागतील, असें मला वाटतें. आपल्याला शक्य असलेल्या पूर्णतेच्या दिशेनें आपण प्रगति केली पाहिजे. ( करावी अशी माझी इच्छा आहे. )

"तरुणांनो ! जगांतल्या इतिहासांतील सर्वश्रेष्ठ लोकसत्ताक राष्ट्राचे सुयोग्य नागरिक कसें व्हावें, हें जर तुम्ही शिकाल, योग्य तऱ्हेचें शिक्षण

घ्याल तर तुम्हांला या ध्येयाकडे सर्व लोकांना घेऊन जातां येईल. आतां आपल्या समोर असलेलीं मोठमोठीं कार्यें करण्यास, विश्वशांतीसाठीं प्रयत्न करण्यास जगांतली कोणतीहि शक्ति आपल्याला अडवूं शकणार नाहीं. अखेरीस ती शांतता आपल्याला लाभणारच, कारण ती रास्त आहे आणि तिच्या प्राप्तीचे आमचे प्रयत्नहि रास्तच आहेत."

अशा ओबडधोबड शद्बांतले हे राष्ट्राध्यक्षांचे विचार त्या दूरदूरच्या प्रदेशांतील लोकांनीं वेळोवेळीं ऐकले. खास डब्याच्या मागील सज्जावर उभे राहून राष्ट्राध्यक्ष आपलीं भाषणें वाचीत किंवा आयत्या वेळीं सुचलेले विचार बोलून दाखवीत. त्यानंतर आगगाडी पुढें निघाली म्हणजे ते लोक टाळ्या वाजवीत किंवा जयजयकार करीत, हात हालवीत आणि निघून जात. जगांतील कोणत्याहि देशाचा नेता राष्ट्राध्यक्ष, मुख्य प्रधान, राजा किंवा हुकूमशहा अशा रीतीनें बोलत नव्हता. याहूनहि अधिक महत्त्वाची गोष्ट म्हणजे या दूरदूरच्या प्रदेशांतील लोकांनीं मूकपणें संमति दिलेल्या या कार्याचा स्वीकार जगांतील इतर कोणत्याहि भागांतील लोकांनीं केला नव्हता. [जगांतील दुसरे कोणतेहि लोक या दूरच्या प्रदेशांतील लोकांनीं मूकपणें स्वीकारलेल्या कार्यासारखें कार्य करण्यास तयार नव्हते]. "सारें जग अधिक चांगलें आणि अधिक सुखी करण्यासाठीं आम्ही कामाला लागत आहोंत" असें म्हणणारे हे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष आणि तेथील लोक तेवढेच. कांहीं राष्ट्रांना केवळ आपला जीव बचावण्यापलीकडे दुसऱ्या कोणत्याहि प्रश्नांचा विचार करण्यासाठीं फारसा वेळ मिळत नव्हता. आपल्याला जगतां येईल आणि आज ना उद्यां आपला उत्कर्षहि होईल, अशी दुसऱ्या कांहीं राष्ट्रांची अपेक्षा होती. कांहीं देशांच्या अंगावर आपल्या सरहद्दीपलीकडील दूरदूरच्या जबाबदाऱ्या होत्या. जगावर साम्यवाद लादून त्यावर वर्चस्व मिळवावें अशी 'क्रेमलीन' [रशिया] येथील लोकांची खटपट चाललेली दिसत होती. वसाहतींतील लोकांवर असलेली सत्ता कायम ठेवण्याची इच्छा कांहीं राष्ट्रांत स्पष्ट दिसत होती. परंतु जगांतील सर्व लोकांचें [illegible] कल्याण व्हावें, अशी निरपेक्ष इच्छा, संयुक्त-संस्थानां-खेरीज कोणत्याहि राष्ट्रानें व्यक्त केली नव्हती. मानवजातीच्या कल्याणाविषयीं इतक्या मोकळेपणानें बोलून दुसऱ्या कोणत्याहि राष्ट्रनेत्यानें बावदूक लोकांची हेटाळणी स्वतःवर ओढून घेतली नव्हती.

याहिपलीकडील सत्य म्हणजे अमेरिकन इतिहास सुरू झाल्यापासून संयुक्त संस्थानांच्या दुसऱ्या कोणत्याहि राष्ट्राध्यक्षाला श्रीयुत ट्रूमन यांच्या-सारखें निर्भयपणें बोलतां आलें नसतें. या जगाची सुधारणा करण्याचें, प्रत्येकाला मनुष्य म्हणून जगण्याची संधि देण्याचें, विश्वशांति प्राप्त करण्याचें, सर्व देशांतील लोकांना अधिक सुखी करण्याचें हें कार्य इतक्या दूर दूर राहणाऱ्या अमेरिकन लोकांनीं हातीं घेण्याची (अशी) तयारी यापूर्वी कधींहि दाखविली नव्हती.

शतकाच्या मध्यावरील या राष्ट्राध्यक्षाला आपल्या उच्च पदाबरोबर इतरहि कांहीं गोष्टी वारसा हक्कानें मिळाल्या होत्या. थोड्याच काळापूर्वी अमेरिकन लोकांना बाकीच्या जगाबद्दल कोणतीहि सामुदायिक जबाबदारी वाटत नसे. परंतु या सुमारास विचारांत आमूलाग्र फरक पडून आलेल्या [प्रगतिशील] अमेरिकन लोकांचा श्रोतृवृंद त्यांना लाभला होता.

१९४० सालीं लोकांच्या मोटारींच्या काचावर 'त्रयस्थ रहा' 'अमेरिकेला युद्धक्षेत्राबाहेर ठेवा' असा संदेश देणाऱ्या लहान लहान तांबड्या, पांढऱ्या आणि निळ्या पट्ट्या चिकटविलेल्या असत. याउलट १९५० सालीं जे लोक मोटारी हाकीत होते, त्यांना अमेरिका युद्धक्षेत्राबाहेर राहावी; असें वाटत होतेंच, पण तिनें त्रयस्थ राहून हें कार्य होण्यासारखें नाहीं, असें त्यांना वाटे. एक विशिष्ट भूमिका घेऊन आणि बाकीच्या जगाचा पाठिंबा मिळवूनच हें कार्य करतां येण्यासारखें आहे, असा त्यांना विश्वास वाटूं लागला होता.

असें वातावरण असतांना श्री. ट्रुमन सत्तारूढ झाले आणि त्यांनीं हें मत दृढ करण्यास मदत केली. त्यांच्या राज्यकारभाराच्या काळांत अमेरिकेची खूपशी भरभराट झाली. पूर्वी जवळजवळ प्रत्येक मनुष्य म्हणत असे. "आमचेच प्रश्न आम्हांला भरपूर झाले आहेत त्यांत आणखी दुसऱ्या लोकांचीं विकत श्राद्धं कशाला? त्यांनाच निस्तरूं द्या त्यांच्या भानगडी."

पण आतां असें कोणी म्हणत नसे. या जगांत सर्वत्र सुखासमाधानाची वृद्धि व्हावी असें सांगणाऱ्या या राष्ट्राध्यक्षाचें भाषण दूरदूरचे लोक शांतपणें ऐकूं लागले. पढीक आणि दमल्याभागल्या राजकारणी पुरुषांच्या दृष्टीनें हें बोलणें बालिश आणि अननुभवी होतें, खरें; पण दूरदूरचे लोक हें भाषण कसलाहि विरोध न करतां नीट लक्ष देऊन ऐकत.

१९५० सालांतील वसंतऋतूंतील 'जेफर्सन' जयंतीनिमित्त भरलेली 'शिकागो' शहरांतल्या क्रीडाभवनांतील सभा हा राष्ट्राध्यक्षांच्या सफरीचा सर्वोच्च बिंदु होय. सहा वर्षांपूर्वी याच स्थळीं उपराष्ट्राध्यक्ष पदासाठीं श्री. ट्रुमन यांची उमेदवारी निश्चित करण्यांत आली होती.

या ( जयंतीनिमित्त भरलेल्या ) सभेची व्यवस्था फार कौशल्यानें करण्यांत आली होती. राष्ट्राध्यक्षांच्या भाषणापूर्वी एक मिरवणूक निघाली होती आणि मोकळा राहिलेला वेळ भरून काढण्यासाठीं 'हॉलिवुड' येथील नटनटींची योजना करण्यांत आली होती. सारें क्रीडाभवन श्रोत्यांनीं भरून गेलें असून ( त्यांची ) आरडाओरड चालली होती.

रस्त्यांवरून लोकांचे समूह शिस्तीनें, हातांत फलक घेऊन चालले होते. त्या फलकांवर लिहिलें होतें.

**हॅरी ट्रुमन यांचें स्वागत असो**—( १५ वा विभाग )

**सुबत्तेसाठीं न्यायाचें पालन करा**—( २८ वा विभाग )

राष्ट्राध्यक्षांच्या भाषणाची वेळ अगदीं येऊन ठेपेपर्यंत त्या गजबजलेल्या क्रीडाभवनांत ही प्रास्ताविक करमणूक उत्साहानें चालली होती. त्यानंतर ऑर्गनवर एका नव्या गाण्याचे सूर जोरजोरानें वाजूं लागले. भरगच्च व्यासपीठावर हें गाणें खूप उत्साहानें गाइलें गेलें. त्याचें पालुपद असें होतें—

हा पहा हॅरी—**एक बलिष्ठ राष्ट्राध्यक्ष !**
हा पहा हॅरी—**समाजाचा मित्र !**
हा पहा हॅरी—**थोर वजनदार नागरिक !**
**जय जय हॅरी ! —खरा अमेरिकन !**

हें गाणें ऐकत असतां राष्ट्राध्यक्षाच्या चेहऱ्यावर त्यांचें नेहमीचें स्मित कायम होतें. हा खरोखर संस्मरणीय असा प्रसंग होता. परंतु चारच दिवसांपूर्वी 'स्पोकेन' येथील 'गॉन्झागा' विद्यापीठांतील एका सूर्यप्रकाशांत न्हालेल्या हिरवळीवर झालेल्या समारंभांत अगदीं निराळ्या शब्दांत केलेलें आपलें वर्णन राष्ट्राध्यक्षांनीं ऐकलें होतें. सदर विद्यापीठ कॅथॉलिक पंथाचे 'जेझुइट' धर्मगुरु चालवीत असत. या विद्यापीठांत मोठ्या गांभीर्यानें आणि आदरानें राष्ट्राध्यक्षांना एक मानपत्र अर्पण करण्यांत आलें होतें. त्यांत असा मजकूर होता.

( आम्ही राष्ट्राध्यक्षांना हें मानपत्र अर्पण करीत आहोंत. )

..." कारण त्यांनीं आपल्या सार्वजनिक भाषणांतून पुढील मूलभूत सत्यें मोठ्या धैर्यानें आणि दूरदर्शीपणानें वारंवार जाहीर केलीं आहेत. [ तीं सत्यें अशीं ].

—( या ) देशाचा कायदा परमेश्वरी नियमांवर आधारलेला आहे.

—नैतिक नियम म्हणजेच सुस्थिर राज्यकारभाराचा पाया. नीतीचें अधिष्ठान नसलेल्या राज्याचा शेवट अखेरीस जुलुमी राजवटींत होतो.

—परमेश्वराच्या ( पितृवत् ) अधिष्टानाखालींच मानवसमाजाचे हक्क सुरक्षित राहतील.

यासाठीं आतां या गॉन्झागा विद्यापीठाचे अध्यक्ष आणि अध्यापक मिळून आम्ही अमेरिकेच्या संयुक्त संस्थानांचे अध्यक्ष श्रीयुत हॅरी ट्रुमन यांना हें मानपत्र अर्पण करीत आहोंत. देशप्रेम आणि परमेश्वराच्या छत्राखालील स्वातंत्र्याबद्दल भक्तिभाव यांतून आम्हांला स्फूर्ति मिळाली आहे."

राष्ट्राध्यक्षांच्या अंगीं सर्वसामान्य प्रतिष्ठित नागरिकापेक्षां कांहीं अधिक गुण आहेत कीं नाहींत, तें ठरविण्याचा अबाधित हक्क त्यांच्या समकालीन लोकांचाच होता. त्यांच्या अंगीं धैर्य आणि दूरदृष्टि असून, परमेश्वरी नियमावर आधारलेले असे देशाचे कायदे ते जाहीर करीत होते, कीं काय हें देखील, त्या लोकांनींच ठरवावयाचें होतें. राष्ट्राध्यक्ष स्वतःबद्दल जें म्हणत त्याची ते लोक आपल्या इच्छेनुरूप दखल घेऊं शकत. पर्वताच्या पायथ्यावरील हिरवळीवरच मुक्काम करण्याची अपेक्षा असलेल्या या मनुष्याला भाग्यानें पर्वताच्या शिखरावर नेऊन बसविलें होतें. या पदाचा स्वीकार करावा कीं त्याला नकार द्यावा हें त्यांच्या मर्जीवर अवलंबून होतें. यापूर्वीच्या लढ्यांतून त्यानें संपादिलेले धडे त्याहून मोठ्या जागतिक लढ्यांत ( राष्ट्राच्या ) उपयोगाला यावे, अशी कांहीं भवितव्यता घडविली जात असेल, या कल्पनेवरहि विश्वास ठेवावा किंवा ठेवूं नये, हें देखील त्यांच्या ( लोकांच्या ) मर्जीवरच अवलबून होतें. लोकांचा विश्वास असो किंवा नसो, स्वतः राष्ट्राध्यक्षांचा मात्र अशा (दैवी) घटनेवर विश्वास होता, असे पुरावे लोकांसमोर होते.

समोर असलेल्या प्रश्नांची चर्चा करण्यास राष्ट्राध्यक्षांच्या समकालीन लोकांना मोकळीक होती. त्यांना इतिहासांतून मदत मिळण्यासारखी नव्हती. समकालीन लोकांनीं त्यांच्या ( तत्कालीन ) राष्ट्राध्यक्षांविषयीं केलेले अदाज किती चुकीचे असू शकतात एवढें मात्र त्यांना इतिहासांतून कळण्यासारखें होतें.

❁ ❁ ❁

## राष्ट्रसभेविरुद्ध ओरड

वृत्तपत्रें नेहमींच राष्ट्रसभेविरुद्ध लिहीत. राष्ट्रसभा ही कायदे करण्यासाठीं होती. त्यांची अंमलबजावणी करण्यासाठीं राष्ट्राध्यक्ष होते. घटनेमुळें प्राप्त झालेल्या लोकांच्या हक्कांवर राष्ट्रसभा अथवा राष्ट्राध्यक्ष यांनीं कोणतेंहि अतिक्रमण करूं नये, याची खबरदारी घेण्यासाठीं सर्वोच्च न्यायालयहि होतें. हा सारा आराखडा व्यवस्थित होता. माध्यमिक शाळांच्या पाठ्यपुस्तकांतून त्याचें केलेलें स्पष्टीकरण अगदीं सरळ वाटत असे. विसावें शतक अर्धें उलटल्यावर या आराखड्याभोंवतीं जी चित्रविचित्र वेलबुट्टी काढली गेली, जो पूरक भाग जोडला गेला, जे बदल करण्यांत आले आणि त्याला ज्या टीपा जोडण्यांत आल्या त्या सर्वांचा समावेश अशा पाठ्यपुस्तकांत कसा होणार ?

लिथुआनियासारख्या ( दूरच्या ) देशांतून निर्वासित बनून जे लोक अमेरिकेंत येऊन उतरले आणि अमेरिकन नागरिक होण्यासाठीं ज्यांनीं उत्साहानें प्रयत्न सुरू केले, त्यांच्या मनांतील बौद्धिक अन्तःसमर हा खरोखरच अत्यंत निकराचा असें म्हणावें लागेल. या लोकांना पाठ्यपुस्तकें आणि वृत्तपत्रें हीं दोन्ही वाचावीं लागत. पाठ्यपुस्तकांत अमेरिकन राज्यकारभाराचा आराखडा एखाद्या ग्रीक स्तंभाप्रमाणें शुद्ध, स्वच्छ आणि सरळ दिसत असे. उलटपक्षी वृत्तपत्रीय विवेचनांत त्याचेंच स्वरूप स्टाइनबर्ग या चित्रकारानें काढलेल्या व्हिक्टोरियन दिवाणखान्याच्या चित्रासारखें ( अव्यवस्थित आणि कोंदट ) दिसून येई. वृत्तपत्रांतील स्फुटांचे लेखक आणि संपादक वरिष्ठ न्यायालयाच्या राजकीय स्वरूपावर टीका करीत किंवा राज्यकारभारांतील परस्परसंबद्ध अशा कृत्यांबद्दल रागानें आणि कडवटपणानें लिहीत. अशा लेखांतून राष्ट्रसभेच्या ५३१ सदस्यांपैकीं सर्वांबद्दल किंवा बहुतेकांबद्दल तिरस्कार आणि शिसारी व्यक्त करण्यांत येत असे.

पाठ्य-पुस्तकांतील विवेचनाकडून अशा (शिवराळ) लेखनाकडे वळल्यानंतर आपलें एक सुंदर स्वप्न भंगून गेलें, असें वाटून ते लिथुआनियन निर्वासित कदाचित् अश्रूहि ढाळीत असतील. त्यांनीं जर सर्व वृत्तपत्रें काळजीपूर्वक वाचलीं असतीं, तर राष्ट्रसभेच्या बहुतेक कृत्यांबद्दल त्यांना अश्रूच ढाळावेसे वाटले असते.

एखाद्या व्यंग-चित्रकाराच्या दृष्टिकोनांतून पाहिल्यास राष्ट्रसभेचा सर्वसामान्य सदस्य दिसत असे तो असा :-तो वयानें प्रौढ असून त्याचे केस वाढलेले आणि विस्कटलेले असे असत. तो आलटून पालटून कधीं घमेंडखोर आणि कधीं भित्रा असा दिसे. तो अनेकदां धूर्त आणि लोभी असाहि दिसत असून बहुधा नेहमीं बालिश मात्र असे. आपली फेरनिवडणूक निश्चित होण्यासाठीं हा सदस्य बहुधा कोणतेंहि कृत्य करण्यास मागेंपुढें पाहात नसे. एखाद्या प्रबळ गटाच्या धमकीला तो सहज बचकत असे. आपल्या मतदारसंघामध्यें लोकप्रिय होण्यासाठीं राष्ट्राचा पैसा ओढून घेऊन एखादी निरुपयोगी योजनादेखील तो सुचवीत असे. राजकारणांतील वारे जसे वाहतील, तशी तो पाठ फिरवीत असे. लोकप्रिय होत असलेल्या चळवळींत तो घाईघाईनें सामील होई. लोकांच्या मर्जीतून उतरलेल्या कार्याला शिव्या देई. त्याच्या बडबडण्याला अंत नसे. घाबरण्यासारखा प्रसंग आल्याबरोबर अशा घबराटींत तो अनेकदां साऱ्या लोकांसारखा घाबरून जाई. प्रत्येक सार्वजनिक प्रसंगीं तो मिरवत असे आणि मोठमोठीं लांबलचक भाषणें करीत असे. आपली खाजगी संपत्ति वाढविण्यासाठीं तो संशयास्पद अशा मार्गांचाहि अवलंब करीत असे. व्यंगचित्रांत वर्णिलेल्या अशा राष्ट्रसभेच्या सभासदाबद्दल कोणालाहि प्रेम किंवा आदर वाटणें शक्य नव्हतें.

जुनाट, निष्काळजी समित्यांचा कारभार, हक्कांचा दुरुपयोग (विशेषतः अब्रुनुकसानी आणि बदनामीच्या कायद्यांतून सदस्यांना दिलेल्या सवलतीचा दुरुपयोग) गटागटांच्या विशिष्ट हितसंबंधापुढें लाचारी, वेळ व्यर्थ घालविणारीं भाषणें, राष्ट्रसभा आणि राज्यसभा यांतील दीर्घसूत्री कार्यपद्धति, स्वार्थी आणि बेजबाबदार मतदान, सार्वजनिक संपत्तीवर हात मारून घेण्याची प्रवृत्ति—या सर्व दोषांचीं उदाहरणें राष्ट्रसभेंत वारंवार दिसून येत असत. वृत्तपत्रांतून ज्या तक्रारी आणि टीका सतत होत असत त्यांचें दृश्य स्वरूप म्हणजे असें व्यंगचित्र.

दर आठवड्यास, वृत्तपत्रांतून हे टीकाकार राष्ट्रसभेवर तोंडसुख घेत असत. तसें करण्याचा त्यांना हक्क होता आणि तें कार्य सुरक्षितहि होतें. राष्ट्रसभेच्या एखाद्या सदस्याला एखाद्या सरकारी खात्यांतील अधिकाऱ्यावर जितक्या बिनधोकपणें टीका करतां आली असती तितक्याच बिनधोकपणें एखाद्या वृत्तपत्राला राष्ट्रसभेवर टीका करतां येत असे.

भंपक, वावदूक, वेळ मारून नेणारे आणि स्वार्थी अशा लोकांवर हे हल्ले होत. परंतु अनेकदां ते चांगल्या, मेहनती लोकांवरहि होत असत. सारा दिवस कचेरींत काम करून, आपण केलेलें मतदान न्याय्य आणि सूज्ञपणाचें होतें कीं नाहीं, या विवंचनेंत रात्रीं अपरात्रीं जागरणें करणारे लोकदेखील अशा टीकेंतून सुटत नसत.

स्वत: टीकाकारांनींच कबूल केल्याप्रमाणें राष्ट्रसभेंत असे लोक होते, हें कोणालाहि दिसून आलें असतें. अनेकदां राष्ट्रसभेचे सदस्य एक निश्चित भूमिका घेऊन आपल्या निष्ठेस अनुसरून, धोका पत्करूनहि मतदान करीत. यामुळें कधीं कधीं त्यांचें भवितव्यहि धोक्यांत येई, आणि त्यांना बेकार होण्याची धास्ती वाटूं लागे. आपलीं मुलेंबाळें कॉलेजांत धाडावीं अशी इच्छा त्यांनाहि असे. सर्वसामान्य अमेरिकन लोकांचीं जीं सुखस्वप्नें असत, त्यांपासून तेहि अलिप्त नव्हते. त्यांनाहि यशाची तीव्र इच्छा असे. कांहीं सदस्यांनीं आपल्या सदसद्विवेक बुद्धीशीं केलेली प्रतारणा (तडजोड) व्यापारी, शिक्षक, डॉक्टर किंवा वृत्तपत्रकारांच्या तशाच कृत्यापेक्षां अधिक भडकपणें जाहीर होत असे, हें मात्र खरें. परंतु असे प्रकार अधिक प्रमाणांत किंवा वारंवार घडत, किंवा ते अधिक तिरस्करणीय असत व अधिक सहजपणें करण्यांत येत असें म्हणण्यास मात्र कोणताहि पुरावा नाहीं.

ज्या मनुष्यानें स्वत: व्यवहारासाठीं कधीं तत्त्वाचा बळी दिला नाहीं, स्वदेश किंवा मानवता एतद्विषयक कर्तव्यापेक्षां ज्यानें कौटुंबिक कर्तव्याला कधींच अग्रस्थान दिलें नाहीं, सत्याचा मार्ग अधिक खर्चिक व धोक्याचा असूनहि ज्यानें कधींहि सुरक्षित व फायदेशीर मार्गाचा अवलंब केला नाहीं, अशाच मनुष्याला राष्ट्रसभेच्या टीकाकाराची न्याय्य भूमिका घेतां येईल. ५३१ व्यापारी, शिक्षक, डॉक्टर किंवा वृत्तपत्रकारांचीं उदाहरणें घेतलीं, तर त्यांच्यांत वरील ५३१ राष्ट्रसभेच्या सदस्यापेक्षां नैतिक गुण अधिक प्रमाणांत असतात, असें कोणीहि प्रसिद्ध केलेलें नाहीं.

राष्ट्रसभा आणि (व्यक्तिश:) त्यांतील सदस्य हे राष्ट्रसभेबाहेरील बड्या कारखानदारांच्या आणि बलिष्ठ गटांच्या ताटाखालील मांजरें बनून त्यांच्या हितसंबंधांना जपतात किंवा उलटपक्षीं स्वत:च्या मतदारांच्या (खाजगी) कामकाजांत वेळ घालवितात या आरोपांमागील भूमिका तर यापेक्षांहि अस्पष्ट आहे. अशा दोन्ही प्रकारच्या कामांमुळें राष्ट्रसभा आणि राज्यसभा यांचे सदस्य फेरनिवडणुकीसाठीं आपल्या मतदारांची निश्चिती करून ठेवण्यासाठीं काय काय करूं शकतात, हें दिसून येतें, असा तिरस्करणीय आरोपहि कधीं कधीं करण्यांत येतो.

मतदारांच्या इच्छांना मान देऊन लोकप्रतिनिधींनीं स्वत:साठीं मतें मिळविणें, हें निंदास्पद आहे, अशी एक अमेरिकन लोकशाहींतील कल्पना लोकांच्या मनांत घर करून राहिली होती. या विचित्र, अर्धकच्च्या कल्पनेची नीट तपासणी कधीं झाली नव्हती. राष्ट्रसभेचे अनेक सुशिक्षित टीकाकार वर उल्लेखिलेलें मत उराशीं बाळगून त्याबरोबरच असेंहि मत व्यक्त करीत कीं राज्यसत्तेला आपले अधिकार बहुजनसमाजाकडूनच मिळतात. हें मत ते स्वातंत्र्यदिनाच्या दिवशीं बोलून दाखवीत लिंकनच्या जन्मदिनाच्या दिवशीं ते (त्याच्या शब्दांत) म्हणत कीं लोकांचें, लोकांनीं चालविलेलें, आणि लोकांसाठी असलेलें सरकार हेंच अमेरिकेचें ध्येय होय.

आपल्या विशिष्ट हितसंबंधास अनुकूल असे कायदे करून घेण्यासाठीं दडपण आणूं इच्छिणाऱ्या विशिष्ट गटांशीं असा युक्तिवाद लढवितां येई कीं बहुजनसमाजाच्या हिताचा बळी देऊन अशा गटांच्या हितसंबंधांना प्राधान्य देतां कामा नये, तरीहि कधीं कधीं हें प्राधान्य दिलें जाई आणि त्यानंतर राष्ट्रसभेचे टीकाकार एकच क्रोधाची गर्जना करीत असत बहुजनहिताबद्दल आपल्याला फार आस्था वाटते असें सर्व समाजानें जर राष्ट्रसभेला पटवून दिलें असतें, तरच अशा गर्जनेला अधिक वजन आणि तीव्रता प्राप्त झाली असती.

स्वत:ला जें हवें असेल तें प्राप्त करून घेण्यासाठीं "आम्ही स्वत: आम्हांला गोळा करतां येतील तितक्या मतदारांची संघटना करण्यास तयार आहोंत." असें आश्वासन कित्येक लोक आपल्या प्रतिनिधींना देत. अर्थात् अशाच लोकांच्या विशिष्ट हितसंबंधांकडे राष्ट्रसभा लक्ष देत असे. भोंवतालीं

काय चाललें आहे याबद्दल जे लोक कसलीहि आस्था दाखवीत नसत अशा लोकांच्या हितसंबंधांकडे राष्ट्रसभेचें दुर्लक्ष होत असे. बहुजनसमाजाचे हितसंबंध म्हणजे १९४६ च्या मध्यावर झालेल्या निवडणुकींत मतें देणाऱ्या, दर तीन मतदारांपैकीं एका मतदाराचा हितसंबंध एवढाच अर्थ नसून, त्यांपैकीं ज्या दोन मतदारांनीं मत देण्याचीहि तसदी घेतली नाहीं, त्यांचाहि हितसंबंध होय.

राष्ट्रसभेविरुद्ध केलेल्या कडक टीकेचा मतितार्थ सूक्ष्म निरीक्षणानंतर बहुधा एवढाच दिसून येई कीं, त्यांतील प्रतिनिधि मतदारांच्या हक्कांविषयीं जागरूक असणाऱ्या मतदारांकडेच अधिक लक्ष देतात, आणि सार्वजनिक कार्याविषयीं आस्था न दाखविणाऱ्या, आणि मतदानाचीहि तसदी न घेणाऱ्या लोकांकडे तितकेसें लक्ष देत नाहींत. जे मतदार पत्रानें किंवा इतर तऱ्हेनें लोकप्रतिनिधींना स्वतःचीं मतें कळवीत असत. त्या मतदारांपैकीं बहुसंख्य लोकांना जें पाहिजे असेल तें हे प्रतिनिधि तत्परतेनें करीत असत अशा प्रसंगीं टीकाकार त्यांचा उपहास करीत कीं, राष्ट्रसभा ही त्यांना आलेल्या पत्रांची बंदी गुलाम आहे! जी राष्ट्रसभा स्वतःच्या मतदारसंघांनीं व्यक्त केलेल्या इच्छांप्रमाणें न वागतां त्यांच्याकडे दुर्लक्षच करील आणि स्वतःच्याच विचारांप्रमाणें वागेल ती राष्ट्रसभा कशी असूं शकेल याचा मात्र या टीकाकारांनीं विचार केलेला दिसत नव्हता.

टीकाकारांचें मत होतें कीं राष्ट्रसभेनेंच (देशाचें) नेतृत्व करावें. राज्य-घटनेनें नेतृत्वाची बहुतेक सारी जबाबदारी राष्ट्राध्यक्ष आणि राज्ययंत्रणेवर सोंपविली होती, आणि कायदे करण्याची पद्धतहि मंद गतीची ठेवली होती या गोष्टी सहजासहजीं घडलेल्या नव्हत्या. राष्ट्रसभेनें याहि पुढें दोन पावलें जाऊन, लोकमताची संघटना केल्यास देशाचा फायदा होऊं शकेल असे प्रसंगहि *कधीं कधीं* येत. परंतु बहुतेक प्रसंगीं लोकप्रतिनिधींचें (खरें) कार्य त्याचें नेतृत्व करण्यापेक्षां त्यांचें प्रतिनिधित्व करणें–हेंच होतें हें स्पष्ट होय. आपल्याला काय हवें आहे हें सांगण्याची ज्या लोकांनीं तसदी घेतली त्यांची आज्ञा पाळण्यांत हे प्रतिनिधि आपलें कर्तव्यच करीत होते. यामुळें या लोकशाही राष्ट्राची सुरक्षितता आणि त्याचें कल्याण या कार्यांना मदतच होत असे.

जनतेची आज्ञा पाळण्यापेक्षां (ज्यांची आज्ञा मोडण्याची भीति वाटे अशा) हुकुमशहांची आज्ञा पाळणाऱ्या कांहीं राष्ट्रसभा विसाव्या शतकांत होऊन गेल्या. राष्ट्रसभा तिला निवडून देणाऱ्या मतदार-जनतेसमोर सतत नम्रता धारण करते. हा देखावा मोठा समाधानकारक आणि आशास्पद असा होता. कधीं कधीं ही सभा अडथळे व विलंब लावी. कधीं कधीं निश्चित धोरण आखण्याऐवजीं ती अनिश्चित दिसे. कधीं कधीं ती सुरक्षिततेच्या मागें लागे आणि राजकीय वारे वाहतील, त्याप्रमाणें पाठ फिरवीत असे. पण तिनें जरी असें मधून मधून केलें असलें तरी त्यामुळें कधीं सर्वनाश ओढवला नव्हता. उतावीळ टीकाकार ज्या प्रकारच्या राष्ट्रसभेच्या स्वरूपाला उत्तेजन देत होते, तें स्वरूप सध्यांच्या राष्ट्रसभेनें धारण केलें असतें, तर मात्र अशी सर्वनाशाची परिस्थिति येऊन पोंचली असती. तशा स्वरूपाची राष्ट्रसभा म्हणजे चलाख पण उद्दाम लोकांबद्दल बेपर्वाई दाखविणारी आणि त्यांच्या कामांकडे (आज्ञाकडे) दुर्लक्ष करणारी अशी राष्ट्रसभाच होय.

हीं कामें लक्षावधि लोकांच्या हिताचीं होतीं. या लक्षावधि लोकांना वेळोवेळीं त्यांच्या प्रतिनिधीशिवाय दुसरा कोणताहि आसरा नसे. वजनदार मतदारांच्या नातलगांना नोकऱ्या मिळवून देण्यासाठीं किंवा त्यांच्या हिताचीं इतर कामें करण्यासाठीं राष्ट्रसभेचे सदस्य जो वेळ घालवीत, त्याबद्दल टीकाकार मोठा गहजब करीत. परंतु अडचणींत सांपडलेल्या स्त्रीपुरुषांच्या मदतीसाठीं हे प्रतिनिधि राज्यसभेंत आणि कचेऱ्यांत जो वेळ खर्च करीत त्याला मात्र हे टीकाकार फारसें महत्त्व देत नसत.

हे लोक संस्कृतीच्या चक्रांत सांपडलेले असून वेळींच त्यांना संरक्षण मिळालें नाहीं तर त्यांचा चक्काचूर होत असे. राष्ट्रसभेच्या सदस्यांकडे अनेक मतदार लहान मोठ्या अन्यायांबद्दलच्या तक्रारी घेऊन येत. या सदस्यांखेरीज मदत करण्याचा प्रयत्न (तरी) करतील, असे कोणतेहि अधिकार अशा मतदारांच्या परिचयाचे नसत.

असे मतदार कधीं कधीं अशुद्ध भाषेंत लिहिलेलीं पत्रें लिहीत, कधीं कधीं ते चिटणीसांच्या, बाहेरच्या कचेरींतील गुळगुळीत खुर्च्यांवर, आपल्या टोप्या हातांत धरून कॉंग्रेसमन किंवा सिनेटर त्यांना भेटायला मोकळा होईपर्यंत बसून राहात. गोरे आणि काळे लोक एकमेकांशेजारीं रोज सकाळीं येऊन

काय चाललें आहे याबद्दल जे लोक कसलीहि आस्था दाखवीत नसत अशा लोकांच्या हितसंबंधांकडे राष्ट्रसभेचें दुर्लक्ष होत असे. बहुजनसमाजाचे हितसंबंध म्हणजे १९४६ च्या मध्यावर झालेल्या निवडणुकींत मतें देणाऱ्या, दर तीन मतदारांपैकीं एका मतदाराचा हितसंबंध एवढाच अर्थ नसून, त्यांपैकीं ज्या दोन मतदारांनीं मत देण्याचीहि तसदी घेतली नाहीं, त्यांचाहि हितसंबंध होय.

राष्ट्रसभेविरुद्ध केलेल्या कडक टीकेचा मतितार्थ सूक्ष्म निरीक्षणानंतर बहुधा एवढाच दिसून येई कीं, त्यांतील प्रतिनिधि मतदारांच्या हक्कांविषयीं जागरूक असणाऱ्या मतदारांकडेच अधिक लक्ष देतात, आणि सार्वजनिक कार्याविषयीं आस्था न दाखविणाऱ्या, आणि मतदानाचीहि तसदी न घेणाऱ्या लोकांकडे तितकेसें लक्ष देत नाहींत. जे मतदार पत्रानें किंवा इतर तऱ्हेनें लोकप्रतिनिधींना स्वतःचीं मतें कळवीत असत. त्या मतदारांपैकीं बहुसंख्य लोकांना जें पाहिजे असेल तें हे प्रतिनिधि तत्परतेनें करीत असत अशा प्रसंगीं टीकाकार त्यांचा उपहास करीत कीं, राष्ट्रसभा ही त्यांना आलेल्या पत्रांची बंदा गुलाम आहे ! जी राष्ट्रसभा स्वतःच्या मतदारसंघांनीं व्यक्त केलेल्या इच्छांप्रमाणें न वागतां त्यांच्याकडे दुर्लक्षच करील आणि स्वतःच्याच विचारांप्रमाणें वागेल ती राष्ट्रसभा कशी असूं शकेल याचा मात्र या टीकाकारांनीं विचार केलेला दिसत नव्हता.

टीकाकारांचें मत होतें कीं राष्ट्रसभेनेंच ( देशाचें ) नेतृत्व करावें. राज्य-घटनेनें नेतृत्वाची बहुतेक सारी जबाबदारी राष्ट्राध्यक्ष आणि राज्ययंत्रणेवर सोंपविली होती, आणि कायदे करण्याची पद्धतहि मंद गतीची ठेवली होती. या गोष्टी सहजासहजीं घडलेल्या नव्हत्या. राष्ट्रसभेनें याहि पुढें दोन पावलें जाऊन, लोकमताची संघटना केल्यास देशाचा फायदा होऊं शकेल असे प्रसंगहि कधीं कधीं येत. परंतु बहुतेक प्रसंगीं लोकप्रतिनिधींचें (खरें) कार्य त्याचें नेतृत्व करण्यापेक्षां त्यांचें प्रतिनिधित्व करणें—हेंच होतें हें स्पष्ट होय. आपल्याला काय हवें आहे हें सांगण्याची ज्या लोकांनीं तसदी घेतली त्यांची आज्ञा पाळण्यांत हे प्रतिनिधि आपलें कर्तव्यच करीत होते. यामुळें या लोकशाही राष्ट्राची सुरक्षितता आणि त्याचें कल्याण या कार्यांना मदतच होत असे.

जनतेची आज्ञा पाळण्यापेक्षां (ज्यांची आज्ञा मोडण्याची भीति वाटे अशा) हुकुमशहांची आज्ञा पाळणाऱ्या कांहीं राष्ट्रसभा विसाव्या शतकांत होऊन गेल्या. राष्ट्रसभा तिला निवडून देणाऱ्या मतदार-जनतेसमोर सतत नम्रता धारण करते. हा देखावा मोठा समाधानकारक आणि आशास्पद असा होता. कधीं कधीं ही सभा अडथळे व विलंब लावी. कधीं कधीं निश्चित धोरण आखण्याऐवजीं ती अनिश्चित दिसे. कधीं कधीं ती सुरक्षिततेच्या मागें लागे आणि राजकीय वारे वाहतील, त्याप्रमाणें पाठ फिरवीत असे. पण तिनें जरी असें मधून मधून केलें असलें तरी त्यामुळें कधीं सर्वनाश ओढवला नव्हता. उतावीळ टीकाकार ज्या प्रकारच्या राष्ट्रसभेच्या स्वरूपाला उत्तेजन देत होते, तें स्वरूप सध्यांच्या राष्ट्रसभेनें धारण केलें असतें, तर मात्र अशी सर्वनाशाची परिस्थिति येऊन पोंचली असती. तशा स्वरूपाची राष्ट्रसभा म्हणजे चलाख पण उद्दाम लोकांबद्दल बेपर्वाई दाखविणारी आणि त्यांच्या कामांकडे ( आज्ञाकडे ) दुर्लक्ष करणारी अशी राष्ट्रसभाच होय.

हीं कामें लक्षावधि लोकांच्या हिताचीं होतीं. या लक्षावधि लोकांना वेळोवेळीं त्यांच्या प्रतिनिधीशिवाय दुसरा कोणताहि आसरा नसे. वजनदार मतदारांच्या नातलगांना नोकऱ्या मिळवून देण्यासाठीं किंवा त्यांच्या हिताचीं इतर कामें करण्यासाठीं राष्ट्रसभेचे सदस्य जो वेळ घालवीत, त्याबद्दल टीकाकार मोठा गहजब करीत. परंतु अडचणींत सांपडलेल्या स्त्रीपुरुषांच्या मदतीसाठीं हे प्रतिनिधि राज्यसभेंत आणि कचेऱ्यांत जो वेळ खर्च करीत त्याला मात्र हे टीकाकार फारसें महत्त्व देत नसत.

हे लोक संस्कृतीच्या चक्रांत सांपडलेले असून वेळींच त्यांना संरक्षण मिळालें नाहीं तर त्यांचा चक्काचूर होत असे. राष्ट्रसभेच्या सदस्यांकडे अनेक मतदार लहान मोठ्या अन्यायांबद्दलच्या तक्रारी घेऊन येत. या सदस्यांखेरीज मदत करण्याचा प्रयत्न (तरी) करतील, असे कोणतेहि अधिकार अशा मतदारांच्या परिचयाचे नसत.

असे मतदार कधीं कधीं अशुद्ध भाषेंत लिहिलेलीं पत्रें लिहीत, कधीं कधीं ते चिटणीसांच्या, बाहेरच्या कचेरींतील गुळगुळीत खुर्च्यांवर, आपल्या टोप्या हातांत धरून कॉंग्रेसमन किंवा सिनेटर त्यांना भेटायला मोकळा होईपर्यंत बसून राहात. गोरे आणि काळे लोक एकमेकांशेजारीं रोज सकाळीं येऊन

ओळीनें आंत प्रवेश मिळेपर्यंत बसत असत. पुराव्यासाठीं आणलेल्या दस्तै-वजांवरून त्यांचीं बोटें फिरत असत. या लोकांच्या अडचणी त्यांना फार मोठ्या वाटत. नाहींपेक्षां ते तेथवर आलेच नसते.

एके रात्रीं पूर्वेकडील एका शहरांत एक निग्रो टॅक्सी ड्रायव्हर आपल्या मोटारींत बसलेल्या उतारूला म्हणाला–" मी या अपघातांत सांपडलों आणि हा माणूस म्हणाला हा तुझाच दोष आहे–आतां खेंचतों मी तुला कोर्टांत." मग मी कोर्टांत तीन दिवस वाया घालविले. पण त्या मनुष्याचा पत्ताच नव्हता. शेवटीं सरकारी वकील मला म्हणाले," ही सारी भानगड मिटवायची आहे का तुला ?" मी म्हणालों, " अर्थात् ! तशीच इच्छा आहे माझी." मग ते म्हणाले, " हा माणूस मागत आहे ते पंचाहत्तर डॉलर देऊन टाक कसा म्हणजे हा खटला कायमचा संपेल."

कोर्टांत आणखी दिवस फुकट घालवायचे नव्हते मला, म्हणून मी म्हणालों, " एवढं केलें म्हणजे ही कटकट कायमची संपेल, पुन्हा माझ्या मागें कांहीं भानगड उरणार नाही याबद्दल खात्री आहे ना तुमची ?"

ते म्हणाले, " खात्री आहे माझी !"

म्हणून मी ७५ डॉलर भरले. मग मला हें पत्र आलं. या अपघातामुळें माझा परवाना रद्द होऊं शकेल, असा मजकूर त्यांत होता मग मी पुन्हा सरकारी वकिलांकडे गेलों, तर ते म्हणाले, ' हें खातं निराळं आहे–माझा त्याच्याशीं कांहीं एक संबध नाहीं.' त्यांनीं सांगितलेल्या ठिकाणीं मी गेलों. तर ते लोक म्हणाले, ' हें पाहा, या अपघातांत तुझी चूक होती असं तूं कबूल केलं आहेस, म्हणून तुझा परवाना रद्द होऊं शकेल, ' मी म्हणालो, ' अहो ! माझी चूक आहे असं मीं कधींच कबूल केलं नव्हतं. ' पण यावर ते म्हणाले, ' तूं ७५ डॉलर भरलेस कीं नाहीं ?' अन् मी म्हणालों ' खरं आहे.' मग ते म्हणाले, ' म्हणजे तूं गुन्ह्याची कबुली दिलीस ! ' म्हणून मी म्हणालों, या खटल्याची कटकट कायमची मिटेल, असं सरकारी वकिलांनीं मला सांगितलं म्हणून मीं हे पैसे भरले.'

ते गृहस्थ म्हणाले ' सरकारी वकील तुला काय म्हणाले याच्याशीं मला कांहीं कर्तव्य नाहीं. ते त्यांच्या खात्याचा कारभार पाहतांत, अन् मी माझ्या खात्याचा. ' खटल्याची कटकट मिटेल ' असं ते जेव्हां तुला म्हणाले ते त्यांच्या खात्यापुरतंच होतं '

अशा रीतीनें माझे तीन दिवस गेले, ७५ डॉलर्स गेले. खटला संपेल, असं आश्वासन या लोकांनीं मला दिलं, अन् आतां ते म्हणतात कीं माझा परवाना रद्द होऊं शकेल, कारण मीं गुन्हा कबूल केला आहे ! म्हणून मला आतां राष्ट्रसभेंतल्या माझ्या प्रतिनिधीची गांठ घेतली पाहिजे. मला ठाऊक आहे कीं ते मला (खात्रीनें) भेटतील. "

अन्यायानें गांजलेल्या एका निग्रो टॅक्सी ड्रायव्हरला असें वाटावें कीं संकटाच्या काळीं ज्याच्याकडे विश्वासानें जातां येईल असा कोणी तरी आपला माणूस आहे. संयुक्त संस्थानांच्या राष्ट्रसभेच्या गुणविशेषांपैकीं हा कांहीं कमी महत्त्वाचा गुणविशेष नव्हे. अशी मदत ज्याला पूर्वी लागली असेल किंवा पुढें लागण्याचा संभव आहे, त्याला ही माहिती राष्ट्रसभेच्या समित्यांतील ज्येष्ठत्वाच्या नियमांतील सुधारणेपेक्षां अधिक महत्त्वाची वाटेल.

## अपुरें कार्य

या शतकाच्या मध्यकाळांतील अमेरिकन लोकांची अशी ठाम समजूत होती कीं स्वतंत्र जगाचा साम्यवादावरील विजय हें जगांतलें सर्वांत महत्त्वाचें कार्य होय. आपल्या आरोग्याबद्दल काळजी वाटूं लागलेल्या मनुष्याच्या ध्यानांत एक गोष्ट फारशी येत नाहीं. ती म्हणजे आपल्या उद्योग धंद्या-बद्दलच्या चिंता एकाएकीं नजरेआड झाल्या आहेत. अशाच रीतीनें साम्यवाद आणि युद्धाची शक्यता याविषयीं काळजी करीत बसणाऱ्या अमेरिकन लोकांच्या हें फारसें लक्षांत आलें नाहीं कीं यापूर्वी वृत्तपत्रांत चर्चिल्या जाणाऱ्या विषयांना आतां पूर्वीइतकें स्थान मिळत नाहीं. हे विषय म्हणजे— निग्रो किंवा ज्यू लोकांविरुद्ध होणारा पक्षपात, अल्पवयीन गुन्हेगार, साहित्य व कलांची सद्यःस्थिति, स्त्रियांचे समान हक्क, मजूर-संघटनांची शक्ति, संघटित उद्योगधंदे, मक्तेदारी आणि बड्या उद्योग-धंद्यांचें सामर्थ्य.

एके काळीं मनाला मोहून टाकणाऱ्या पण आतां वयस्क झालेल्या सुंदर स्त्रिया पाहून मनाला पुढें केवळ अस्वस्थता मात्र वाटूं लागते. त्याप्रमाणें घरचे पूर्वीचे, जुनेपुराणे प्रश्न सुटले नव्हते. पण त्यांना आतां गौण स्थान मिळाल्यासारखें दिसत होतें—( इतके ते बदलले होते )

१९५० च्या उन्हाळ्यांत कोरियांत लढाई सुरू झाली. त्यानंतर वृत्त-पत्रांतल्या व मासिकांतल्या, खुल्या चढाओढीच्या गुणांची महती गाणाऱ्या

व समाजवादाच्या निराश व भयंकर परिस्थितीची माहिती देणाऱ्या जाहिराती हळू हळू नाहींशा होऊं लागल्या. यापूर्वीच्या हिवाळ्यांत आणि वसंतऋतूंत त्या ठळकपणें आणि नियमितपणें प्रसिद्ध होत असत. पुष्कळदां त्या सबंध पानभर पसरलेल्या असत आणि ती जाहिरात देणाऱ्या कंपनीचें नांव अगदीं लहान टाईपांत छापलेलें असे. हा खर्च खाजगी नफा मिळविण्यासाठीं केलेला नसून सार्वजनिक हितासाठीं केला आहे असें यावरून दाखविण्याचा त्यांचा हेतु असे.

एखाद्या जाहिरातींत मालकाच्या टेबलासमोर, कोटाशिवाय (नुसत्या शर्टानिशीं) उभ्या असलेल्या एका नोकराचें चित्र असे. तो म्हणत असे, "पण मला हवी आहे फक्त सुरक्षितता."

या चित्राखालीं मालकाचें उत्तर छापलेलें असे, तें असें—"ठीक आहे, सरकार तें तुला देऊं शकेल...पण त्यासाठीं तुला तुझ्या स्वातंत्र्याची किंमत द्यावी लागेल."

किंवा दुसऱ्या जाहिरातीची सुरुवात अशी असते. "सारें जग समाजवादाच्या रोगानें कुजून जात आहे, आणि त्यामुळें मिळकत, फायदा आणि आशा यांचा नाश होत आहे. अशा परिस्थितींत ही वार्ता ऐकून समाधान वाटेल, कीं अमेरिका अद्याप संधिसाधनाला अनुकूल असा देश आहे. ज्याला निश्चयानें प्रयत्न करावयाचा असेल त्याच्यासाठीं संधि येथें उभी आहे." अथवा—

"उंची (महाग) शब्दांची उधळपट्टी पुरे करा—स्पष्ट शब्दांत बोला—तसें म्हणावयाचें म्हणजे समाजवाद याचा अर्थ जनतेचें **संपूर्ण** जीवन **राजकारणाच्या ताब्यांत देणें** हा होय."

किंवा अशी एखादी जाहिरात एखाद्या तरुणाची कहाणी सांगे या तरुणाच्या अंगीं परंपरागत स्वावलंबनाची वृत्ति असल्यानें व त्या वृत्तीला **आजच्या** अमेरिकेंत वाव मिळत असल्यानें त्याचा भरपूर फायदा घेऊन या तरुणानें आपली उन्नति करून घेतली. अथवा एक जाहिरात पुढील घटना रंगवीत असे :—

"इ.स. १६२१ आणि १६२२ मध्यें समाजवादाच्या छत्राखालीं मॅसॅच्युएट संस्थानांत उतरलेले 'यात्रिक' भुकेनें मरण्याच्या पंथाला लागले. पण सरकारी शासनाकडे (हुकुमशाहीकडे) पाठ फिरवून त्यांनीं प्रत्येक

कुटुंवाला त्यांच्या उपयोगासाठीं जमिनीचा एक तुकडा दिल्यावर त्यांची भरभराट होऊं लागली." ही जाहिरात सबंध पानभर अत्यंत आकर्षकपणें छापलेली असे आणि तिच्याखालीं पुढील टीप असे.-"अमेरिकेंतील अनियंत्रित कार्यपद्धति कशी यशस्वी ठरते, ( कार्यकरते, ) हें या मजकुरावरून अधिक चांगल्या रीतीनें लक्षांत येईल असें आम्हांला वाटत असल्यानें" ही जाहिरात प्रसिद्ध केली आहे.

अशा प्रकारच्या जाहिराती वृत्तपत्रांत येणें वंद झालें. परंतु हा मुद्दा लांबणीवर टाकण्यांत आला एवढेंच. शांततेच्या काळांत तो अमेरिकेंतला बहुधा सर्वात आघाडीचा मुद्दा ठरला असता.

( राष्ट्राध्यक्ष ) वुड्रो विल्सन म्हणाले होते," पुरुष, स्त्रिया आणि मुलें यांना मोठमोठ्या औद्योगिक किंवा सामाजिक घडामोडींत वदल घडवून आणतां येत नाहीं, त्यांचें नियंत्रण करतां येत नाहीं कीं एकेकट्यानें त्यांना तोंडहि देतां येत नाहीं. या मोठमोठ्या घटनांचे जे परिणाम होतात त्यांच्या-पासून अशा स्त्री-पुरुषांच्या जीवनांचें, चैतन्याचें योग्य संरक्षण न झाल्यास त्याना समानसंधि कधींहि मिळू शकणार नाहीं.

संरक्षणाची ढाल केवढी असावी आणि कशा प्रकारची असावी हाच वादाचा मुद्दा होता. जर ती तोकडी पडली तर लोकांना इजा होत राहील. जर ती फाजील मोठी असली तर ती उचलण्यास ( पेलण्यास ) लोकांना फार जड जाईल. प्रगति करण्याऐवजीं ते खालीं बसून तिच्या आड लपतील. या मुद्द्यावर एकवाक्यता झाली. परंतु सुरक्षिततेच्या दृष्टीनें ही संरक्षणाची ढाळ केवढी मोठी असावी ? ती अधिकाधिक मोठी होत चालली होती, यावद्दल शंका नव्हती. जेव्हां जेव्हां तिचा विस्तार करण्यांत येई तेव्हां तेव्हां लोकांना भीति वाटूं लागे कीं तिची परिणति समाजवादांत होईल, लोकांची धडाडी नष्ट होईल आणि अमेरिकन कार्यपद्धतीचा नाश होईल. अनियंत्रित कार्यपद्धतीच्या भवितव्यावद्दल धास्ती घेतलेल्या अमेरिकन लोकांनीं या मुद्द्यांवर संरक्षणाच्या विस्ताराला प्रत्येक वेळीं विरोध केला होता, परंतु निदान आतांपर्यंत तरी अनियंत्रित कार्यपद्धतीनें टिकाव धरला होता; या पद्धतीला एकेकाळीं आवश्यक वाटणारीं आणखी किती कार्ये सरकारला आपल्या हातीं घेतां येतील ? लोकांना किती संरक्षणाची ( खरोखर ) आवश्यकता असते ? कोणत्या अवस्थेंस गेले असतां हें संरक्षण वाजवीपेक्षां अधिक असें ठरेल ? ( हे मुद्दे चिंतनीय आहेत. )

● ● ●

## सरासरीविषयीं एक टीप

अमेरिकेंत प्रत्येक राजकीय निर्णय घेण्यापूर्वी एका खोलवर रुजलेल्या आणि सन्मान्य अशा अमेरिकन समजुतीची दखल घेणें आवश्यक असतें. ह्या समजुतीवर पक्का विश्वास असणाऱ्या लोकांना ती सुसूत्रतेनें व्यक्त करतां येत नसे. अनेक सुधारकांना ती नीटशी समजलीहि नव्हती.

आहे त्या परिस्थितीहून अधिक चांगली परिस्थिति असली पाहिजे, आणि ती सुधारलेली परिस्थिति देशांतील प्रत्येक मनुष्याच्या आवाक्यांत असली पाहिजे. ह्यावर अमेरिकन लोकांचा दृढ विश्वास आहे. जे अधिक कष्ट करतील, जे अधिक जलदपणें विचार करतील, अधिक दूरवर पाहूं शकतील आणि अधिक धोका पत्करतील, त्यांची स्थिति इतरांपेक्षां चांगली राहिली पाहिजे. जे चलाख आहेत, भाग्यवान् आहेत, स्थिति सुधारण्यासाठीं जे कष्ट करतात आणि ज्यांना अशी स्थिति दैववशात् प्राप्त होते, त्या साऱ्यांच्या कार्याचें चीज झालें पाहिजे. हा न्याय होय. अमेरिकेंत नेहमीं असें घडत आलेलें आहे आणि तें तसेंच घडत राहूं दिलें पाहिजे.

इतर देशांत **सरासरी** नांवाची एक चीज आहे. अमेरिकेंत या शब्दाचा उपयोग करीत नाहींत कारण तेथील लोकांना त्या कल्पनेचीच शिसारी येते 'सरासरी' ही अपेशी लोकांसाठीं असते, असें अमेरिकन लोकांना वाटे. ते म्हणत–,' आमचा देश हा विजेचा देश आहे, त्याला विजेचे कायदेकानूच लागूं आहेत. त्याला सरासरीची जरूर नाहीं. सरासरी म्हणजे सामान्य मनुष्याला करतां येईल ती कामाची पराकाष्ठा. आमच्या देशांत नुसत्या आइसक्रीमचेच २९ प्रकार ( रुचिप्रकार )आहेत आणि उद्यां यांतहि आणखी सुधारणा होईल. जो जो अधिक कष्ट करील, अधिक चलाख आणि नशीबवान् असेल, त्याला अधिक चांगली स्थिति प्राप्त होईल. ही सरासरी जाऊं द्यात जहन्नममध्यें !"

अमेरिकन लोकांची अगदी मनापासून अशी श्रद्धा होती. कधीं कधीं वस्तुस्थिति होती त्यापेक्षां आपण अधिक बलिष्ठ आहोंत असें अमेरिकन लोकांना वाटे. एकट्याने ज्यांच्याशीं मुकाबला करतां येणें शक्य नाहीं, अशा शक्तींची त्यांना ओळख पटत नसे. परंतु अमेरिकन लोकांच्या जनतेंत जे आशेचे जिवंत झरे उसळत होते त्यांना बांध घालण्याची इच्छा करणारा

अर्थशास्त्रज्ञ, सरासरीतज्ज्ञ, सुधारक, दूरदृष्टीचा राजकारणपटु हा मूर्खच ठरला असता–मग तो त्याच्या क्षेत्रांत कितीहि कुशल असो.

ऑक्टोबर १९५० मध्यें न्यूयॉर्क येथें एका रात्रीं आपल्या भाषणाच्या शेवटीं सेक्रेटरी ऑफ् स्टेट श्री. डीन ॲचिसन यांनीं पुढील उद्‌गार काढले होते—

" चित्रकार रेम्ब्रांट आपल्या चित्रासाठीं वापरीत असे अशा गडद काळसर रंगांत आजची परिस्थिति रंगवावी लागेल. ही पार्श्वभूमि अंधारलेली असून सांवल्या दाट अशा पडलेल्या आहेत. बाह्य रूपरेषा अस्पष्ट झाल्या आहेत. तरीहि त्यांतील मध्यबिंदु तेजानें तळपत आहे. त्या तेजांत अनेकदां पोलादाची चमक दिसून येत असली, तरी अतर्क्य अशा सौंदर्यपूर्ण भागांवरहि हा प्रकाश खेळत आहे. आमच्या दृष्टीनें हा मध्यबिंदु म्हणजे सर्व जगांतील स्वतंत्र लोकांची एकी हाच होय. हीच आमची किरणशलाका, हीच आमची आशा आणि प्रतिज्ञा."

❀ ❀ ❀

## छाया

अमेरिकन लोकांची सहजप्रवृत्ति आणि त्यांच्या चारित्र्याबद्दल त्या देशाचा इतिहास आणि त्या लोकांचें कौटुंबिक जीवन यांचा परिचय असणाऱ्या कोणाहि मनुष्याला फारसा संदेह वाटला नसता. उदारवृत्ति आणि मायाळूपणा ही त्यांची सहजप्रवृत्ति आणि त्यांचें चारित्र्य प्रामाणिकपणाचें होतें; ( सरळ-पणाचें होतें. ) पण त्यांचे अलीकडील अनुभव बरेच त्रासदायक होते आणि या वेळीं त्यांची परिस्थितिहि हतभागी अशी होती.

अमेरिकेला जागतिक महत्त्वाकांक्षा नव्हती, दुसऱ्यांवर राज्य करण्याची इच्छा नव्हती, वसाहतींची जरुरी दिसून येत नव्हती. जगावें आणि जगूं द्यावें याशिवाय त्यांना दुसरें ध्येय नव्हतें. एकाएकीं दुसरें महायुद्ध संपल्यावर जागतिक जबाबदाऱ्या त्यांच्या अंगावर येऊन पडल्या. जगाचें नेतृत्व, जागतिक हितसंबंध स्वीकारणें त्यांना भाग पडलें- तसें करण्याखेरीज त्यांना दुसरा उपाय नव्हता. दुसऱ्या महायुद्धानंतर दुर्बल होण्याऐवजीं अधिक बलिष्ठ होऊन बाहेर पडलेलें एकच राष्ट्र अमेरिका हेंच होतें. जगांतील सर्वांत बलिष्ठ, सर्वांत श्रीमंत, आणि सर्वांत अधिक उत्पादन करणारें राष्ट्रहि तेंच होतें

## सरासरीविषयीं एक टीप

अमेरिकेंत प्रत्येक राजकीय निर्णय घेण्यापूर्वी एका खोलवर रुजलेल्या आणि सन्मान्य अशा अमेरिकन समजुतीची दखल घेणें आवश्यक असतें. ह्या समजुतीवर पक्का विश्वास असणाऱ्या लोकांना ती सुसूत्रतेनें व्यक्त करतां येत नसे. अनेक सुधारकांना ती नीटशी समजलीहि नव्हती.

आहे त्या परिस्थितीहून अधिक चांगली परिस्थिति असली पाहिजे, आणि ती सुधारलेली परिस्थिति देशांतील प्रत्येक मनुष्याच्या आवाक्यांत असली पाहिजे. ह्यावर अमेरिकन लोकांचा दृढ विश्वास आहे. जे अधिक कष्ट करतील, जे अधिक जलदपणें विचार करतील, अधिक दूरवर पाहूं शकतील आणि अधिक धोका पत्करतील, त्यांची स्थिति इतरांपेक्षां चांगली राहिली पाहिजे. जे चलाख आहेत, भाग्यवान् आहेत, स्थिति सुधारण्यासाठीं जे कष्ट करतात आणि ज्यांना अशी स्थिति दैववशात् प्राप्त होते, त्या साऱ्यांच्या कार्याचें चीज झालें पाहिजे. हा न्याय होय. अमेरिकेंत नेहमीं असें घडत आलेलें आहे आणि तें तसेंच घडत राहूं दिलें पाहिजे.

इतर देशांत **सरासरी** नांवाची एक चीज आहे. अमेरिकेंत या शब्दाचा उपयोग करीत नाहींत कारण तेथील लोकांना त्या कल्पनेचीच शिसारी येते 'सरासरी' ही अपेशी लोकांसाठीं असते, असें अमेरिकन लोकांना वाटे. ते म्हणत–,' आमचा देश हा विजेचा देश आहे, त्याला विजेचे कायदेकानूच लागू आहेत. त्याला सरासरीची जरूर नाहीं. सरासरी म्हणजे सामान्य मनुष्याला करतां येईल ती कामाची पराकाष्ठा. आमच्या देशांत नुसत्या आइसक्रीमचेच २९ प्रकार ( रुचिप्रकार )आहेत आणि उद्यां यांतहि आणखी सुधारणा होईल. जो जो अधिक कष्ट करील, अधिक चलाख आणि नशीबवान् असेल, त्याला अधिक चांगली स्थिति प्राप्त होईल. ही सरासरी जाऊं द्यात जहन्नममध्यें !''

अमेरिकन लोकांची अगदीं मनापासून अशी श्रद्धा होती. कधीं कधीं वस्तुस्थिति होती त्यापेक्षां आपण अधिक बलिष्ठ आहोंत असें अमेरिकन लोकांना वाटे. एकट्यानें ज्यांच्याशीं मुकाबला करतां येणें शक्य नाहीं, अशा शक्तींची त्यांना ओळख पटत नसे. परंतु अमेरिकन लोकांच्या जनतेंत जे आशेचे जिवंत झरे उसळत होते त्यांना बांध घालण्याची इच्छा करणारा

अर्थशास्त्रज्ञ, सरासरीतज्ज्ञ, सुधारक, दूरदृष्टीचा राजकारणपटु हा मूर्खच ठरला असता–मग तो त्याच्या क्षेत्रांत कितीहि कुशल असो.

ऑक्टोबर १९५० मध्यें न्यूयॉर्क येथें एका रात्रीं आपल्या भाषणाच्या शेवटीं सेक्रेटरी ऑफ् स्टेट श्री. डीन अॅचिसन यांनीं पुढील उद्‌गार काढले होते—

" चित्रकार रेम्ब्रांट आपल्या चित्रासाठीं वापरीत असे अशा गडद काळसर रंगांत आजची परिस्थिति रंगवावी लागेल. ही पार्श्वभूमि अंधारलेली असून सांवल्या दाट अशा पडलेल्या आहेत. बाह्य रूपरेषा अस्पष्ट झाल्या आहेत. तरीहि त्यांतील मध्यबिंदु तेजानें तळपत आहे. त्या तेजांत अनेकदां पोलादाची चमक दिसून येत असली, तरी अतर्क्य अशा सौंदर्यपूर्ण भागांवरहि हा प्रकाश खेळत आहे. आमच्या दृष्टीनें हा मध्यबिंदु म्हणजे सर्व जगांतील स्वतंत्र लोकांची एकी हाच होय. हीच आमची किरणशलाका, हीच आमची आशा आणि प्रतिज्ञा."

## छाया

अमेरिकन लोकांची सहजप्रवृत्ति आणि त्यांच्या चारित्र्याबद्दल त्या देशाचा इतिहास आणि त्या लोकांचें कौटुंबिक जीवन यांचा परिचय असणाऱ्या कोणाहि मनुष्याला फारसा संदेह वाटला नसता. उदारवृत्ति आणि मायाळूपणा ही त्यांची सहजप्रवृत्ति आणि त्यांचें चारित्र्य प्रामाणिकपणाचें होतें; (सरळ-पणाचें होतें.) पण त्यांचे अलीकडील अनुभव बरेच त्रासदायक होते आणि या वेळीं त्यांची परिस्थितिहि हतभागी अशी होती.

अमेरिकेला जागतिक महत्त्वाकांक्षा नव्हती, दुसऱ्यांवर राज्य करण्याची इच्छा नव्हती, वसाहतींची जरुरी दिसून येत नव्हती. जगावें आणि जगूं द्यावें याशिवाय त्यांना दुसरें ध्येय नव्हतें. एकाएकीं दुसरें महायुद्ध संपल्यावर जागतिक जबाबदाऱ्या त्यांच्या अंगावर येऊन पडल्या. जगाचें नेतृत्व, जागतिक हितसंबंध स्वीकारणें त्यांना भाग पडलें- तसें करण्याखेरीज त्यांना दुसरा उपाय नव्हता. दुसऱ्या महायुद्धानंतर दुर्बल होण्याऐवजीं अधिक बलिष्ठ होऊन बाहेर पडलेलें एकच राष्ट्र अमेरिका हेंच होतें. जगांतील सर्वांत बलिष्ठ, सर्वांत श्रीमंत, आणि सर्वांत अधिक उत्पादन करणारें राष्ट्रहि तेंच होतें

## सरासरीविषयीं एक टीप

अमेरिकेंत प्रत्येक राजकीय निर्णय घेण्यापूर्वी एका खोलवर रुजलेल्या आणि सन्मान्य अशा अमेरिकन समजुतीची दखल घेणें आवश्यक असतें. ह्या समजुतीवर पक्का विश्वास असणाऱ्या लोकांना ती सुसूत्रतेनें व्यक्त करतां येत नसे. अनेक सुधारकांना ती नीटशी समजलीहि नव्हती.

आहे त्या परिस्थितीहून अधिक चांगली परिस्थिति असली पाहिजे, आणि ती सुधारलेली परिस्थिति देशांतील प्रत्येक मनुष्याच्या आवाक्यांत असली पाहिजे. ह्यावर अमेरिकन लोकांचा दृढ विश्वास आहे. जे अधिक कष्ट करतील, जे अधिक जलदपणें विचार करतील, अधिक दूरवर पाहूं शकतील आणि अधिक धोका पत्करतील, त्यांची स्थिति इतरांपेक्षां चांगली राहिली पाहिजे. जे चलाख आहेत, भाग्यवान् आहेत, स्थिति सुधारण्यासाठीं जे कष्ट करतात आणि ज्यांना अशी स्थिति दैववशात् प्राप्त होते, त्या साऱ्यांच्या कार्याचें चीज झालें पाहिजे. हा न्याय होय. अमेरिकेंत नेहमीं असें घडत आलेलें आहे आणि तें तसेंच घडत राहूं दिलें पाहिजे.

इतर देशांत **सरासरी** नांवाची एक चीज आहे. अमेरिकेंत या शब्दाचा उपयोग करीत नाहींत कारण तेथील लोकांना त्या कल्पनेचीच शिसारी येते 'सरासरी' ही अपेशी लोकांसाठीं असते, असें अमेरिकन लोकांना वाटे. ते म्हणत–,' आमचा देश हा विजेचा देश आहे, त्याला विजेचे कायदेकानूच लागूं आहेत. त्याला सरासरीची जरूर नाहीं. सरासरी म्हणजे सामान्य मनुष्याला करतां येईल ती कामाची पराकाष्ठा. आमच्या देशांत नुसत्या आइसक्रीमचेच २९ प्रकार ( रुचिप्रकार )आहेत आणि ज्यां यांतहि आणखी सुधारणा होईल. जो जो अधिक कष्ट करील, अधिक चलाख आणि नशीबवान् असेल, त्याला अधिक चांगली स्थिति प्राप्त होईल. ही सरासरी जाऊं द्यात जहन्नममध्यें !"

अमेरिकन लोकांची अगदीं मनापासून अशी श्रद्धा होती. कधीं कधीं वस्तुस्थिति होती त्यापेक्षां आपण अधिक बलिष्ठ आहोंत असें अमेरिकन लोकांना वाटे. एकट्यानें ज्यांच्याशीं मुकाबला करतां येणें शक्य नाहीं, अशा शक्तींची त्यांना ओळख पटत नसे. परंतु अमेरिकन लोकांच्या जनतेंत जे आशेचे जिवंत झरे उसळत होते त्यांना बांध घालण्याची इच्छा करणारा

अर्थशास्त्रज्ञ, सरासरीतज्ज्ञ, सुधारक, दूरदृष्टीचा राजकारणपटु हा मूर्खच ठरला असता—मग तो त्याच्या क्षेत्रांत कितीहि कुशल असो.

ऑक्टोबर १९५० मध्यें न्यूयॉर्क येथें एका रात्रीं आपल्या भाषणाच्या शेवटीं सेक्रेटरी ऑफ् स्टेट श्री. डीन अॅचिसन यांनीं पुढील उद्‌गार काढले होते—

" चित्रकार रेम्ब्रांट आपल्या चित्रासाठीं वापरीत असे अशा गडद काळसर रंगांत आजची परिस्थिति रंगवावी लागेल. ही पार्श्वभूमि अंधारलेली असून सांवल्या दाट अशा पडलेल्या आहेत. बाह्य रूपरेषा अस्पष्ट झाल्या आहेत. तरीहि त्यांतील मध्यबिंदु तेजानें तळपत आहे. त्या तेजांत अनेकदां पोलादाची चमक दिसून येत असली, तरी अतर्क्य अशा सौंदर्यपूर्ण भागांवरहि हा प्रकाश खेळत आहे. आमच्या दृष्टीनें हा मध्यबिंदु म्हणजे सर्व जगांतील स्वतंत्र लोकांची एकी हाच होय. हीच आमची किरणशलाका, हीच आमची आशा आणि प्रतिज्ञा."

## छाया

अमेरिकन लोकांची सहजप्रवृत्ति आणि त्यांच्या चारित्र्याबद्दल त्या देशाचा इतिहास आणि त्या लोकांचें कौटुंबिक जीवन यांचा परिचय असणाऱ्या कोणाहि मनुष्याला फारसा संदेह वाटला नसता. उदारवृत्ति आणि मायाळूपणा ही त्यांची सहजप्रवृत्ति आणि त्यांचें चारित्र्य प्रामाणिकपणाचें होतें; ( सरळ-पणाचें होतें. ) पण त्यांचे अलीकडील अनुभव बरेच त्रासदायक होते आणि या वेळीं त्यांची परिस्थितिहि हतभागी अशी होती.

अमेरिकेला जागतिक महत्त्वाकांक्षा नव्हती, दुसऱ्यांवर राज्य करण्याची इच्छा नव्हती, वसाहतींची जरुरी दिसून येत नव्हती. जगावें आणि जगूं द्यावें याशिवाय त्यांना दुसरें ध्येय नव्हतें. एकाएकीं दुसरें महायुद्ध संपल्यावर जागतिक जबाबदाऱ्या त्यांच्या अंगावर येऊन पडल्या. जगाचें नेतृत्व, जागतिक हितसंबंध स्वीकारणें त्यांना भाग पडलें- तसें करण्याखेरीज त्यांना दुसरा उपाय नव्हता. दुसऱ्या महायुद्धानंतर दुर्बल होण्याऐवजीं अधिक बलिष्ठ होऊन बाहेर पडलेलें एकच राष्ट्र अमेरिका हेंच होतें. जगांतील सर्वांत बलिष्ठ, सर्वांत श्रीमंत, आणि सर्वांत अधिक उत्पादन करणारें राष्ट्रहि तेंच होतें

अमेरिकेचे राष्ट्रीय हितसंबध (कोणते हे) स्पष्ट होते. आपलें उच्च जीवनमान कायम राहील किंवहुना त्यांत सुधारणा होईल, अशा रीतीची सुस्थिर परिस्थिति निर्माण करण्यास प्रोत्साहन देणें हेंच त्यांच्या पुढील कार्य होतें. संयुक्तसंस्थानें ही ख्रिस्त धर्मानुयायी असल्याने त्या धर्माच्या आदेशाप्रमाणें, दुर्बल आणि थकल्या-भागलेल्या राष्ट्रांना नवचैतन्य प्राप्त करून देणें ही त्यांची नैतिक जबाबदारी होती.

स्वतंत्र वृत्तीनें जगणाऱ्या अमेरिकन लोकांना कधीं अशी कल्पनाहि येत नसे कीं स्थिर आणि भरभराटीस आलेल्या जगाखेरीज लोकांना दुसरी कोणतीहि गोष्ट हवी असेल. राष्ट्रपतिभवनांतील त्यांचे पुढारी आणि परराष्ट्रीय खात्यांतील मुत्सद्दी यांना सोव्हिएट तत्त्वांची अधिक चांगली कल्पना होती. परंतु त्यांना सर्वत्र मैत्रींचें वातावरण निर्माण करावयाचें होतें. कारण तशा वातावरणांतच संयुक्त संस्थानें चांगल्या रीतीनें जगूं शकलीं असतीं. या दोन्ही प्रकारच्या लोकांना वर उल्लेखिलेल्या कारणाशिवाय कोणतेंहि दुसरें धोरण स्वीकारतां येत नव्हतें.

रुझवेल्ट यांच्या मृत्यूनंतर पांच वर्षांनीं सोव्हिएट साम्यवादाच्या कटकटी वाढल्यानंतर कांहीं अमेरिकन टीकाकार त्यांना दोष देऊं लागले. ' याल्टा ' येथील परिषदेंत त्यांनीं रशियन लोकांना झुकतें माप दिलें. अशी त्यांची तक्रार होती. पण त्या वेळीं रशियन लोकांना कमी माप घातलें असतें, तर त्याचे जे काय परिणाम ओढवले असते, त्यांना तोंड देण्याची पाळी रुझवेल्ट-प्रमाणें या पश्चाद्बुद्धि टीकाकारांना कधींच आली नव्हती.

टीकाकारांचें म्हणणें मान्य केलें असतें तर याचा अर्थ असा झाला असता कीं शांतता (वह) शक्य होईल कीं नाहीं याची कोणालाहि कल्पना येण्यापूर्वीच रुझवेल्टनें ती आशा नष्ट करून टाकावयाची होती. टीकाकारांचें म्हणणें होतें कीं, रशियनांवर विश्वास टाकण्यांत रुझवेल्टनें मूर्खपणा केला. पण जेव्हां जगाची फाळणी टाळण्यांतच साऱ्या जगाचें हित होतें, तेव्हां ही फाळणी रुझवेल्टने (माल्टा येथें) अटळ करून टाकली असती, तर रुझवेल्टचें कृत्य कोणत्या स्वरूपाचें ठरलें असतें, याचें या टीकाकारांनीं उत्तर दिलेलें नाहीं. आपल्या कारकीर्दीवर कोणताहि नैतिक डाग पडूं नये, हें तत्त्व लोकसत्ताक राष्ट्राला किती महत्त्वाचें असतें याचा लोकांना फार लवकर विसर पडला.

अमेरिकन लोकांना इ. स. १९४५ सालीं रशियाला उसनवार किंवा देणगी म्हणून द्रव्य देतां आलें असतें. रशियन कारखाने पुन्हा बांधून काढण्यास, शहरें दुरुस्त करण्यास, रशियन रेल्वेमार्ग पुन्हा आखण्यास आणि रशियन दुकानांत पुन्हा माल भरण्यास त्यांनीं मदत केली असती. रशियन लोकांनीं साम्यवादाचा त्याग करावा अशी अट घातल्याशिवाय त्यांनीं हें सारें केलें असतें. नुसत्या मैत्रीच्या चिन्हांच्या मोबदल्यांत त्यांनीं तसें केलें असतें.

परंतु अमेरिकेंतील सामान्य नागरिकाला हें कळत नव्हतें कीं, पाश्चात्य राष्ट्रांतील माल आणि नव्या नव्या कल्पना यांना सोव्हिएट सरहद्द मोकळी केली, तर सोव्हिएट साम्यवाद त्यानंतर दीर्घकाळ टिकूं शकणार नाहीं. 'क्रेमलिन्'च्या रशियन राजवटीकडे सहकार्याची मागणी करणें म्हणजे नव्या रशियन राज्यक्रांतीची मागणी करणें होय हें त्याला कळत नव्हतें. महायुद्धानंतरच्या काळांतील मोडतोड आणि दारिद्र्य हीच आक्रमक साम्यवादाच्या प्रसाराची सुवर्णसंधि होय हा निर्णय क्रेमलिनच्या मार्क्सवादी लोकांनीं कोणत्या तार्किक पद्धतीनें घेतला हें कळणें त्याला त्याहूनहि दुष्कर होतें. शांतता आणि सुस्थिरता हवीशी वाटण्याऐवजीं त्यामुळें ज्यांचा तोटा होतो अशी एखादी तत्त्वप्रणाली जगांत असेल, हें निदान त्या वेळीं तरी त्याला अतर्क्य असें होतें.

अमेरिकेंतल्या सामान्य नागरिकाला या गोष्टी हळू हळू कळूं लागल्या. प्रथम त्याचा या गोष्टींवर विश्वासच बसेना, मग त्याला त्यांच्याबद्दल शिसारी येऊं लागली आणि त्यानंतर क्रोध आणि भीति यांची एक मिश्र भावना त्याच्या मनांत उत्पन्न झाली.

अमेरिकन लोकांना दिसून आलें कीं, रशियन लोकांनीं एस्तोनिया, लाट-व्हिया आणि लिथुआनिया हे देश गिळंकृत केले आहेत. पोलंड, हंगेरी, रुमानिया, बल्गेरिया, आल्बेनिया आणि झेकोस्लाव्हिया हे देश त्यांनीं गुलाम केले आहेत. पांच वर्षांत सोव्हिएट साम्राज्यांत ७,५००,००० मैलांचा नवा मुलूख सामील झाला असून ५००,०००,००० लोकांची त्या साम्राज्याच्या लोकसंख्येंत भर पडली आहे हेंहि त्यांना दिसून आलें होतें. आपला (नकाराचा) हक्क पद्धतशीरपणें गाजवून यूनोचे हेतु या रशियनांनीं कसे निष्फळ करून टाकले आणि अणु-शस्त्रावर ताबा ठेवण्याच्या योजनाहि कशा निष्फळ

केल्या, हेंहि यांच्या नजरेस आलें होतें. जर्मनीचें स्वातंत्र्य व एकता यांच्यासाठीं केलेल्या, ' पॉटस्डॅम् ' कराराला त्यांनीं मुद्दाम कसा सुरुंग लावला, हेंहि या लोकांनीं पाहिलें होतें.

ग्रीसमध्यें यादवी चेतवून आणि फ्रान्स, इटली आणि तुर्कस्थानमध्यें विध्वंसक कारवाया करून राज्यसत्ता खिळखिळी करण्याचे प्रयत्न कॉमिन्फॉर्म ही संस्था कशी करीत आहे, हें त्यांनीं पाहिलें. चीन, मलाया, हिंदु–चीन आणि फिलिपाइन्स् या देशांत रशियन राजवट बंडांना कशी उत्तेजन देते किंवा त्यांचा फायदा घेते हेंहि त्यांच्या नजरेस आलें होतें. संयुक्त संस्थानांवर अत्यंत तीव्र गरळ ओकणारी सोव्हिएट मोहीम दर महिन्याला आकारांत आणि तीव्रतेंत कशी वाढत चालली आहे हेंहि त्यांनीं पाहिलें.

या प्रचाराच्या मोहिमेंतील उन्मादाला इतिहासांत कुठेंहि तोड नाहीं. कोणत्याहि देशाच्या राजकारभाराची भाषा इतक्या खालच्या दर्जाला कधीं जाऊन पोंचली नव्हती. इतक्या मोठ्या प्रमाणावर खोटी साक्ष देण्याचें पाप कधीं आचरण्यांत आलें नव्हतें. अमेरिकेंतील कोणाहि प्रामाणिक मनुष्याला या गोष्टी पाहून शिसारीच आली असती.

रशियन लोकांनीं केलेली वैयक्तिक स्वातंत्र्याची गळचेपी, त्यांचे गुप्त-पोलिस, चौकशीवांचून दिलेल्या शिक्षा, गुलामांकडून करून घेतलेली मजुरी, आणि भयभीत देशांत उडवून दिलेला विध्वंस याविषयींच्या बातम्या ऐकून अमेरिकन लोकांना धक्काच बसला. परंतु याहूनहि भयंकर प्रकार म्हणजे लक्षावधि पुरुष, स्त्रिया आणि मुलें यांच्या मनांवर निदर्यपणें सतत चाललेला विषप्रयोग; त्यांतील पद्धतशीर खोटेपणा, जुलूम इतरांवर आक्रमण आणि निदर्यता या स्वतः आचरीत असलेल्या दुर्गुणांचा थोड्याच लोकांनीं आपल्या शत्रूंवर केलेला आरोप, त्यांतील राक्षसी सत्यापलाप–हा प्रकार म्हणजे युद्धोत्तर काळांतील सर्वांत हीन स्वरूपाचा गुन्हा होय, असे अनेक अमेरिकन लोकांना वाटूं लागलें.

युद्धोत्तर काळांत अमेरिकन लोकांनीं स्वदेशांत व परदेशांत एका विशिष्ट कार्यपद्धतीचा अवलंब केला. ही कार्यपद्धति त्यांनीं तर्क, ध्येयवाद आणि स्वसंरक्षण यांच्या दृष्टीनें आचरणांत आणली होती. कांहीं काळानंतर अमेरिकेचे सहकारी आणि स्वतः अमेरिकन लोक आंतरराष्ट्रीय जीवनांत घडलेली घटना धरून चालूं लागले–तिची या सर्वांना संवयच झाली.

22460 ... 31-5-1927
... 2223 ... नों. दि. ... 30-1991460


हा मार्गच रास्त आहे, हें स्पष्टपणें दिसत होतें. सुस्थिर व अनियंत्रितपणें व्यापारधंदा चालू शकणाऱ्या पद्धतीची पुनः प्रतिष्ठा करणें हा अशा कार्य-पद्धतीचा हेतु असल्यानें संयुक्त संस्थानांचे मूलभूत हितसंबंध यांत सुरक्षित राहात होते, कारण अशाच परिस्थितींत या देशाची भरभराट होणें शक्य होतें. अमेरिकन जनतेच्या नैतिक भावनेचेंहि यामुळें पोषण होणार होतें, कारण त्या योगानें हा बलिष्ठ व श्रीमंत देश कमकुवत आणि शिणलेल्या देशांचा हितकर्ता आणि संरक्षक आहे, अशी त्या देशाची भूमिका स्पष्ट होत असे. होऊं घातलेल्या शत्रूंची वाढ यामुळें थांबत असल्यानें त्यानें अमेरिकना सुरक्षिततेची वाढ होत असे.

या महत्त्वाच्या गोष्टी संयुक्त संस्थानांत सर्वांच्या लक्षांत आल्या. मग क्रमशः लोकशाहीच्या मार्गानें, थोडचा चर्चेनंतर त्या सर्वांना पटून स्वीकारल्या गेल्या. देशाबाहेरदेखील त्यांची दखल घेतली जाऊन त्यांचें स्वागत झालें. अमेरिकेंत किंवा त्या देशाबाहेर एक गोष्ट लोकांच्या नजरेस आली नव्हती आणि स्वीकारली गेली नव्हती. ती म्हणजे अमेरिकेच्या हितसंबंधाच्या दृष्टीनें कांहीं धोरणें आंखणें आतां जरूर झालें होतें. हीं धोरणें नवीं आणि निराळीं असून तीं अमेरिकन लोकांना अनैसर्गिक वाटण्यासारखींहि होतीं. यामुळें ज्या जनतेच्या वतीनें हीं धोरणें सुरू करण्यांत आलीं होतीं. त्या जनतेंत त्याबद्दल प्रचार करणें व तीं धोरणें लोकांच्या गळीं उतरविणें सरकारला आवश्यक वाटलें.

एक गोष्ट मात्र चटकन् विसरली गेली. ती म्हणजे अमेरिकेनें जें धोरण रास्तपणें आतां स्वीकारलें होतें,तें त्या राष्ट्रानें दीडशेंपेक्षां अधिक वर्षे देशांत चालू असलेल्या तत्त्वांविरुद्ध जोरानें जाणारें आहे. थोडीं वर्षे सोडल्यास बाकीचें या देशाचें सारें जीवन त्या तत्त्वांनुसार चाललें होतें. जे देश त्यांच्या इतिहासांत मुरलेले आणि युद्धामुळें न बदललेलें धोरणच पुढें चालवीत होते, त्यांच्या वांट्यास न येणारे धक्के आणि खेंचाखेंच यांना तोंड दिल्याशिवाय हें बदललेलें धोरणच अमलांत येणें अशक्य होतें. या गोष्टीची मात्र सारवा-सारव करण्यांत आली होती.

दीडशें वर्षांपूर्वी जॉर्ज वॉशिंग्टननें लिहिलें होतें, "परराष्ट्रांशीं वागण्याचा आपला प्रमुख नियम म्हणजे आपले व्यापारी संबंध त्यांच्याशीं जोडले, तरी त्यांच्या बरोबर शक्य तितका कमी राजकीय संबंध ठेवणें....युरोपांतील

लोकांचे कांहीं प्राथमिक स्वरूपाचे हितसंबंध आहेत. पण त्यांचा आपल्याशीं फारच थोडा, बहुतेक नाहींच, इतका संबंध आहे. यामुळें युरोपांत वारंवार तंटे चाललेले असतात, परंतु त्यांच्या हेतूंशीं आपला कोणताहि संबंध नाहीं. यासाठीं युरोपांतील लोकांच्या बदलत्या राजकारणांत कोणत्याहि कृत्रिम लागयावांध्यांनीं वांधून घेऊन आपण गुरफटून घेऊं नये. त्यांच्या मैत्रीमध्यें आणि शत्रुत्वाच्या परस्परसंबंधांतहि आपण भाग घेऊं नये. आपला देश दूरवर असल्यानें आपण निराळाच मार्ग चोखाळावा हें इष्ट आणि शक्यहि आहे."

(लोकांना) १९ व्या शतकांत असेंच सतत वाटत असे.

देवाच्या दयेनें,'मन्रो'तत्त्वांच्या जाहीरनाम्यामुळें आणि ब्रिटिश नौ-सेनेच्या अस्तित्वामुळे वॉशिंग्टनच्या या तत्त्वाच्या सत्याला धक्का बसण्यासारखें कांहीं एक घडलें नव्हतें. या तत्त्वाचा प्रभाव विसाव्या शतकांतहि दिसून येत होता. पहिल्या जागतिक युद्धांत अल्पकाळ झुगारला गेला खरा. परंतु व्हर्सायच्या तह आणि राष्ट्रसंघ हे दोघेहि स्थानभ्रष्ट झाल्यावर हें तत्त्व पुन्हा अमेरिकन लोकांच्या पसतीस उतरू लागलें. विसाव्या शतकांत लोकांची अशी समजूत घालणें शक्य होऊं लागलें कीं, मृत्यूचे व्यापारी दारुगोळ्यांचे कारखानदार ( असें नांव मिळालेलें ) हेच युद्धाला कारणीभूत असतात. यानतर हें तत्त्व पुन्हा लोकांच्या मर्जीस येऊ लागलें.

पर्लहार्बरवर जपानी हल्ला होण्यापूर्वी ( आणि कदाचित् त्यानंतरहि ) लक्षावधि अमेरिकनांची अशी समजूत होती कीं, अमेरिकेनें पहिल्या जागतिक युद्धांत पदार्पण केलें, तें राष्ट्रीय हितासाठीं नव्हे, तर केवळ ब्रिटिश लोकांच्या मतप्रचारामुळेंच, अशा रीतीनें अमेरिकन लोकांनीं युद्धपरिस्थितीची तात्त्विक उपपत्ति लावली. अर्थात् इतर अनेक राष्ट्रांच्या राष्ट्रीय कल्पनापेक्षां ही उपपत्ति कांहीं अधिक घातक नव्हती. अमेरिकन लोक शांततावादी असून त्यांना दुसऱ्या देशांवर राज्य करण्याची महत्त्वाकांक्षा नव्हती. आपल्याला स्वस्थपणें एकीकडे नांदूं द्यावें, एवढीच त्यांची इच्छा होती. दुसऱ्या महायुद्धाच्या पूर्वीच्या काळांत या अमेरिकन लोकांनीं आपली समजूत करून घेतली होती, कीं आपला देश खूप दूर आणि इतर देशांपासून तुटक असा असल्यानें आपल्याला तटस्थपणें किंवा त्रयस्थपणें राहतां येईल. इतकेंच नव्हे तर त्रयस्थतेची ही भूमिका रास्तपणाची असून ती 'सत्तेचा समतोलपणा'

८७६३

ठेवण्याच्या दुष्ट धोरणापेक्षां अधिक श्रेष्ठ असते. त्यामुळें आपला देश या देशापेक्षां अधिक श्रेष्ठ आहे.

१९३० सालच्या सुमारास आपण किती तीव्रतेने या व्यवस्थेच्या तत्त्वाची तरफदारी करीत होतों, हें अमेरिकन लोक थोड्याच वर्षांत विसरून गेले. १९४० च्या सुमारास या लोकांना अशी आठवण होईना, कीं आतां भावी संकटांच्या सूचना देणारीं हीं वृत्तपत्रें यापूर्वी जवळजवळ एकमतानें एका उच्च आणि निश्चित भूमिकेवरून त्रयस्थतेचा पाठपुरावा करीत होतीं.

परंतु आतां, १९४० च्या दशकाच्या उत्तरार्धांत युरोपांत सत्तेचा समतोलपणा राखण्यासाठीं हींच संयुक्त संस्थानें जोराची धडपड करूं लागलीं होतीं. जर्मनी व जपान या देशांत अमेरिकेचे सैनिक ( जाऊन ) राहिले होते. ग्रीस व तुर्कस्तान या देशांना मदत द्यावी, असा कायदा घोषित करणारें 'ट्रुमन-' तत्त्व आतां ( मन्रोतत्त्वाऐवजीं ) प्रस्थापित झालें होतें. "सशस्त्र अल्प-संख्याकांची मुजोरी किंवा देशाबाहेरील दडपण यांना तोंड देण्याऱ्या स्वतंत्र लोकांना अमेरिकेनें लष्करी मदत द्यावी, असें हें तत्त्व होतें, जगाच्या इतर भागांतील स्वतंत्र लोकांना मदत करणें आपलें कर्तव्य आहे, असें यापूर्वी अमेरिकेला कधीं वाटलें नव्हतें—मग हे लोक परकीयाच्या आक्रमणाला विरोध करीत असोत किंवा नसोत, समुद्रपारच्या देशांना तात्पुरती आणि 'धर्म' म्हणून मदत करण्यापलीकडे अमेरिकेनें कधीं दुसरें कर्तव्य केलें नव्हतें. दुसरें महायुद्ध सुरू होऊन थोडा काळ लोटल्यावर श्री. हेन्री वॉलेस यांनीं एका भाषणांत असे उद्‌गार काढले.

"अमेरिकेंतील रशियन राष्ट्रांचे प्रतिनिधि श्री. लिटव्हिनॉफ् यांच्या पत्नीला मी एकदां अर्धवट थट्टेनें आणि अर्धवट मनापासून म्हटलें. या युद्धाचा मुख्य हेतु असा आहे कीं जगांतल्या प्रत्येक व्यक्तीला चांगलें 'क्वार्ट'-भर दूध रोज हक्कानें मिळालें पाहिजे."

—सौ. लिटव्हिनॉफ् यांनीं उत्तर दिलें, "होय, एक पिंटभर तरी."

श्री. वॉलेस यांची अमेरिकेंत खूप थट्टा करण्यांत आली. कैक महिनेपर्यंत मागासलेल्या लोकांसाठीं दूध ही त्यांची योजना म्हणजे गगनाला गवसणी घालण्यासारख्या अफाट कल्पनाचें प्रतीक असें लोक समजूं लागले. परंतु आतां मार्शल–मदत–योजना अंमलांत आली होती. तिच्या योगानें फक्त मागासलेल्या लोकांना दूध मिळणें एवढ्यावरच भागणार नव्हतें. लक्षावधि

डॉलर्सच्या किमतींच्या वस्तु मदत म्हणून वाटण्यांत येत होत्या. या वस्तु म्हणजे—अमेरिकन खाद्यपदार्थ, कपडे, यंत्रसामुग्री, हत्यारें, शास्त्रीय उपकरणें तेल, रबर, लाकूड, कापूस, कोळसा, खतें, तंबाखू, रसायनें, औषधें, कातडी, कापड, कागद, धातु, मालमोटारी, रेल्वेच्या वाघिणी, रेल्वेचीं इंजिनें आणि विमानें या वस्तु मागासलेल्या लोकांना दिल्या जात नसून, अगदीं आतां आतांपर्यंत धोक्याचे कट, परस्परांशीं मैत्री आणि शत्रुत्वाच्या घडामोडींत भाग घेणाऱ्या लोकानाहि देण्यांत येत होत्या.

( आतां ) अशा रीतीनें अटलांटिक करार आणि लष्करी मदत देण्याबाबतचे करार हे अमलांत आले. दहा वर्षांपूर्वीं अमेरिकेचे एकविसावे राष्ट्राध्यक्ष श्री. रुझवेल्ट यांनीं हे करार करण्याचें सुचविलें असतें, तर 'राष्ट्रद्रोही' म्हणून त्यांचावर खटला भरण्यांत आला असता. तसें झालें नसतें तरी निदान त्यांचा पक्का ( राजकीय दृष्टचा ) पाडाव तरी झाल्यावाचून राहिला नसता. परंतु ( त्यांच्यानंतर आलेले ) बत्तिसावे राष्ट्राध्यक्ष श्री. ट्रुमन यांना हे करार सुचवितांना असा ठाम विश्वास वाटत होता, कीं कांही आठवड्यांच्या चर्चेनंतर या करारांना राष्ट्रसभेच्या दोन्ही विभागांची संमति मिळेल. त्यांना तशी संमति मिळाली आणि या देशांच्या संरक्षणाची महत्त्वपूर्ण जबाबदारी अमेरिकेवर येऊन पडली. काळपुरुषाच्या नेत्राचें पातें लवतें न लवतें एवढ्या अल्पकालापूर्वीं अमेरिकन लोक याच देशांना दूरचे आणि भांडखोर परके देश असें ( नेहमींच ) समजत असत.

दुसरें जागतिक युद्ध संपून उलटलेल्या पांच वर्षांच्या कालावधींत अमेरिकन लोकांनीं आपलें नेहमीचें परराष्ट्रीय धोरण अक्षरशः आमूलाग्र बदललें होतें. ही गोष्ट सुरळीतपणें, अभावितपणें, आणि ताण न पडतां होण्यासारखी नव्हती. बाह्य परिस्थितीची निकड कितीहि असो, या कार्यास उद्युक्त करणारी तात्त्विक भूमिका कितीहि बिनतोड असो, अमेरिकेंत हें सारें सुलभपणें होण्यासारखें नव्हतें. राष्ट्राचें प्रस्थापित धोरण इतक्या थोड्या कालावधींत, इतक्या पूर्णपणें बदलण्यास पूर्वीचा कोणताहि आधार नव्हता.

ही परिस्थिति लक्षांत ठेवणाऱ्या कोणाहि व्यक्तीला युद्धोत्तर काळांत अमेरिकेंतील त्रास आणि ताण यांचीं चिन्हें पाहून नवल वाटलें नसतें. अशीं चिन्हें दृश्यमान झाल्यावर, आणि वृत्तपत्रांनीं त्यांना वाजवीपेक्षां अधिक

भडकपणें प्रसिद्धि दिल्यावर त्याबद्दल इतर लोकांनीं अनेकदां कठोरपणें तिरस्कार व्यक्त केला.

अमेरिकेंतील साम्यवादी (आणि साम्यवादी, असतील अशी शंका असलेल्या) लोकांबद्दल असलेली सार्वजनिक भूमिका ही सर्वांत भडक (अतिरेकी) असून शतकाच्या मध्यकाळांत अमेरिकेला जाणवलेल्या मानसिक ताणाचें तें चिन्ह होतें.

अमेरिकन लोकांना भीति वाटण्यासारखीं कांहीं कारणें लक्षांत येऊं लागलीं होतीं खरीं. इतर देशांत ज्या मार्गांनीं साम्यवादी लोकांनीं घातपात घडवून आणले होते, ते मार्ग अमेरिकेंतहि यशस्वी होऊं नयेत, म्हणून खबरदारी घेणें योग्यच होतें. सर्व जगांत झालें होतें, त्याप्रमाणें अमेरिकेंतहि एके काळीं कांहीं लोकांना साम्यवादाबद्दल बौद्धिक आकर्षण वाटूं लागलें होतें. अमेरिकेंतील साम्यवादी लोक केंद्रिय सरकारांत उच्च पदांवर होते आणि त्यांपैकीं कांहीं लोकांनीं सोव्हिएट राष्ट्राच्या हितासाठीं खुपीनें हेरगिरी आणि फसवेगिरी करून आपल्या राष्ट्राशीं बेइमानी केली होती. राजकीय खात्यांतील ॲल्गर हिस् या विश्वासू अधिकाऱ्यावरील देशद्रोहाचे आरोप सिद्ध झाले होते. दुसऱ्याहि कांहीं व्यक्तिविरुद्ध पुरावा भरपूर आहे, असें दिसून येतें. साम्यवादी लोकांनीं राष्ट्राशीं द्रोह करूं नये, यासाठीं खबरदारी घेणें हें स्वसंरक्षणाच्या दृष्टीनें जरूर होतें. परंतु अमेरिकन लोकांनीं अंमलांत आणलेले खबरदारीचे उपाय आणि त्या मागील भीति यामुळें त्या लोकांच्या हातून कांहीं (चमत्कारिक) विचित्र आणि विद्रूप अशीं कृत्यें घडून आलीं.

या वेळीं अमेरिकन लोकांच्या मनावर खूपसा ताण पडला होता. यापूर्वी त्यांच्या अनुभवास कधींहि न आलेलें संकट त्यांच्या डोळ्यांसमोर दिसूं लागलें होतें. अगदीं पद्धतशीरपणें आखलेल्या वैचारिक हल्ल्यांचा मारा त्यांच्यावर होत होता. जगाचें नेतृत्व करण्याची जबाबदारी आणि कधीं न अनुभवलेली यातना हा सारा वारसा न मागतां त्यांच्या वाट्याला आला होता. या साऱ्या ओढाताणींत अमेरिकन लोकांनीं यापूर्वी नेहमीं उराशीं बाळगलेलीं कांहीं तत्त्वें सोडून देऊन वावग्या मार्गानें वागण्यास सुरुवात केली. त्यांनीं दीर्घ काळपर्यंत ज्यांना मान दिला होता, अशा कांहीं स्वतंत्र-

वृत्तींना त्यांनीं कात्री लावली. दीर्घकालपर्यंत ज्या एकसूत्रीपणाला त्यांनीं विरोध केला होता, त्याचीच ते आतां मागणी करूं लागले. शिक्षा देण्यापूर्वी एखाद्या मनुष्यावर पूर्णपणें एखादा गुन्हा शाबीत झाला पाहिजे, हा नियम अनेक ठिकाणीं धाब्यावर बसविला गेला, तरी त्यांना त्याचें कांहींच वाटेनासें झालें. शाबीत न झालेल्या आरोपांनाच बहुसंख्य अमेरिकन लोक प्रमाण (पुरावा) म्हणून मानूं लागले.

इ. स. १९५० च्या मे महिन्यांत, सर्वोच्च न्यायालयाचे सहकारी न्यायमूर्ति श्री. रॉबर्ट ई. जॅकसन् यांनीं पुढील मत व्यक्त केलें होतें. “ अमेरिकन राजकीय परंपरांचा नाश करण्याचा प्रयत्न करणाऱ्या साम्यवादी पक्षाशीं आपला संबंध आहे, कीं नाहीं हें शपथेवर सांगण्यास कोणालाहि भाग पाडतां येईल हें खरें. परंतु न्याय आणि स्वातंत्र्य यांच्या दृष्टीनें पाहतां, साधनाच्या तत्त्वावर आपला विश्वास आहे, कीं नाहीं असें त्याला विचारणें ( उघड करण्यास सांगणें ) योग्य होणार नाहीं.” न्यायमूर्ति जॅक्सन म्हणाले–

लोकांच्या मनांत रुजलेलीं चुकीचीं तत्त्वें काढून टाकण्याचे परिश्रम करणे हें रास्त आहे, असा युक्तिवाद नेहमीच केला जातो....असेंहि एक मत आहे, कीं तत्त्वांतूनच कृतींचा जन्म होत असतो, आणि दुष्ट विचारांतूनच निषिद्ध कृतींचा उगम होतो, असें बहुधा होत असेलहि. परंतु ( अनिष्ट ) कृत्यें करण्यास मनाई करण्याच्या सत्तेंत, विचारांना मनाई करण्याचा अनियंत्रित अधिकारहि समाविष्ट केला तर सामाजिक, आर्थिक, नैतिक व राजकीय क्षेत्रांतील सर्वच विषयांवरील मतें जबरीनें जाहीर करण्यास भाग पाडण्याची सत्ताहि (सरकारच्या हातांत) देणें सुकर होईल.

हें विधान शहाणपणाचें आणि विचारपूर्ण असें होतें. साम्यवाद्यांच्या कळपांत सामील झालेल्या अमेरिकन लोकांनीं राष्ट्राशीं बेइमानी केली होती, याबद्दल बिनतोड पुरावा होता. खोटें बोलावें, फसवणूक करावी, लोकशाहींतील न्यायविषयक पद्धतीचा, तशा स्वातंत्र्याचा अवलंब करून त्यांच्या आश्रयानें आपलीं विघातक कृत्यें करावीं, अशी साम्यवादी लोकांनीं तयारी केली होती, हें स्पष्टपणें दिसत होतें. राष्ट्रीय संरक्षणाच्या दृष्टीनें साम्यवादी लोकांवर नियंत्रणें घालणें अवश्यच होतें. या मुद्द्यावर नव्हे, तर असे साम्यवादी कोण हें निश्चित करण्याच्या प्रयत्नांत अमेरिकन लोकांनीं युद्धोत्तर काळांतील आपली सर्वांत मोठी घोडचूक केली.

त्यांना असें दिसून आलें होतें कीं ' आपण कोणी निराळेच आहोंत ' असें सोंग करणारे साम्यवादीच सर्वांत अधिक भयंकर असतात. यामुळें सर्व राष्ट्रभर एक प्रकारची गुप्तपोलिशी सुरू झाली आणि तिनें चुकीचा मार्ग चोखाळला. या चुकीच्या मार्गाची नक्की सुरुवात कोठून झाली, हें सहजपणें दिसून येण्याजोगतें नव्हतें. २१ मार्च १९४७ रोजीं राष्ट्राध्यक्ष श्री. ट्रुमन यांनीं " देशभक्तीबद्दलचा जाहीरनामा " घोषित केला, तेव्हांपासून या मार्गाची सुरुवात झाली असण्याची शक्यता आहे. या जाहीरनाम्याप्रमाणें केवढा देशद्रोही लोकांचा शोध करून त्यांना शिक्षा देणें एवढ्यापुरतीच सरकारी धोरणाची मर्यादा राहिली नाहीं. त्यापुढें जाऊन, मुख्य सरकारी वकिलांनीं जाहीर केलेल्या ( बेकायदा ) संस्थांशीं सहानुभूतिपर साहचर्य असलेल्या आणि " पुढेंमागें देशाशीं बेइमान होतील " अशी ज्या ज्या लोकांबद्दल शंका होती, त्या त्या सर्व लोकांची पारख करण्याचें धोरण यामुळें ठरून गेलें.

कांहीं विद्यापीठें आणि व्यापारी संस्था यांनीं आपल्या नोकरांकडून इमानीपणाच्या शपथा मागण्यास सुरुवात केली. लोक न्यायालयांत जाऊन शपथेवर आपल्या जबान्या नोंदवूं लागले. याबरोबरच असेंहि मानण्यांत येऊं लागलें, कीं लैंगिक विकृति असलेल्या लोकांना (ती उघडकीस आणल्यावर) धाकदपटशा देऊन आपल्या कह्यांत आणणें सुलभ असते; यामुळें त्यांना संपूर्णपणें विश्वासपात्र समजतां येत नाहीं. राष्ट्रसभेनें हें गमकहि मान्य केलें, आणि लैंगिक विकृति असलेल्या सरकारी नोकरांची पारखहि सुरू झाली.

असा एक काळ येऊन गेला कीं जेव्हां अमेरिकन लोक सरकारी व शास्त्रीय खात्यांतील चांगल्या पगाराच्या नोकऱ्याहि नाकारूं लागले, कारण या नोकऱ्या स्वीकारल्यास आपली चौकशी व छळ होईल, आणि साऱ्या लोकांत ( जाहीरपणें ) छी:थू होईल, अशी त्यांना भीति वाटे. कधी काळीं अशी स्थिति खरोखरच होती, यावर पुढें अमेरिकन लोकांचा विश्वासहि बसणें कठीण होईल. 'विध्वंसक' किंवा ' राष्ट्रविरोधी ' असा नांवापुढें शिक्का बसलेल्या कांहीं संस्थांच्या, कैक वर्षांपूर्वींच्या टपालाच्या याद्यांत नांवें सांपडलीं म्हणून कांहीं लोकांवर बाळींत पडण्याचा प्रसंग आला.

" पॉल रोबसन् या साम्यवादाशीं सहानुभूति असलेल्या गायकाच्या ध्वनिमुद्रिका तुमच्या संग्रहीं आहेत काय ? " अशा प्रश्नाला अमेरिकन लोकांना

उत्तर द्यावें लागत असे, किंवा वाद-चर्चा-मंडळ असें नांव असलेल्या संस्थेशींहि संबंध ठेवणें अमेरिकन लोकांना कधीं काळीं फार धोक्याचें वाटत असे. —अशा विधानांवरहि भावी पिढ्यांचा विश्वास बसणें अशक्य होईल... श्री. ॲचिसनसारख्या विख्यात आणि (कामसू) निष्ठावंत मंत्र्यावर (सेक्रेटरी ऑफ् स्टेटवर) आरोप करण्यांत आले, हल्ले झाले व त्यांची बदनामी करण्यांत आली; त्यांच्या देशांतील कार्याला यामुळें अडथळा आला व परदेशांत त्यांची पत कमी झाली, या गोष्टींचा उलगडा करणें कदाचित् त्यांना सर्वांत कठीण वाटेल. साऱ्या देशांतील अस्वस्थता आणि गोंधळ यांची परमावधि या प्रकारानें झाली होती. बेजबाबदार लोक, राजकीय क्षेत्रांतील बिगर माहितगार, आणि साम्यवादाशीं सहानुभूति असलेले सरकारी नोकर लोक शोधून काढणारे फुकट फौजदार यांची ही सारी कारवाई होती.

शतकाच्या मध्यावर अमेरिकेची परिस्थिति ही अशी होती. श्री. ॲचिसन यांनीं उल्लेखिलेल्या त्या अंधाऱ्या पार्श्वभूमीची, गडद सांवल्यांचीं आणि अस्पष्ट रूपरेषांचीं हीं प्रमुख कारणें होतीं.

## नवा नेता

जुन्या जगाकडून नव्या जगाकडे सत्तेचें संक्रमण होत होतें. या परिस्थितीशीं (युरोपांतील) देश अद्याप आपला मेळ घालीत होते. अमेरिकेंत या महत्त्वाच्या घटनेचें नावीन्य केव्हांच ओसरून गेलें होतें. जगाचें नेतृत्व करण्याची इच्छा अमेरिकन लोकांनीं कधींच व्यक्त केली नव्हती आणि असें नेतृत्व अपरिहार्य झाल्यावर तें त्यांनीं नाखुषीनें पत्करलें. परंतु बहुतेक अमेरिकन लोकांना लवकरच त्याची संवय झाली. हें कार्य करण्याची आपली कुवत आहे कीं नाहीं, याबद्दल मात्र त्यांना कधींच शंका वाटली नव्हती. या परिस्थितीशीं मिळतें घेण्यास अवघड वाटत होतें, तें फक्त उरलेल्या (इतर) देशांनाच. नेतृत्वांत आतां बदल झाला आहे, हें अशा देशांना कळावयाचें होतें; तसें समजून वागण्यास शिकावयाचें होतें आणि या नव्या नेत्याच्या वागणुकीची संवय करून घ्यावयाची होती.

अमेरिकन जीवनपद्धतीची श्रेष्ठता आणि स्वतःच्या देशांत ती प्रस्थापित करण्याची तयारी या दोन्ही गोष्टी मान्य नसणारे लोक जगांत आहेत, ही बातमी अनेक अमेरिकन लोकांना खरोखर आश्चर्यकारक वाटली.

अमेरिकन कल्पनांना कोणत्या भूमिकेवरून विरोध होत असतो, हें त्यांना कळत नव्हतें. मनमोकळ्या मैत्रीच्या भूमिकेवरून अमेरिकन लोकांनीं केलेल्या सूचना आणि दिलेला सल्ला इतर देशांनीं लाथाडला म्हणजे त्यांना पुष्कळदां वाईट वाटे. साम्यवादाच्या सत्तेखालील देशांकडून शिव्या खाण्याची आतां त्यांची चांगलीच तयारी झाली होती. परंतु अनेकदां स्वतःच्याच सहकारी राष्ट्रांनीं व्यक्त केलेल्या टीकावृत्तीच्या, आणि ( अनेकदां ) असहकारी वृत्तीच्या भूमिकेमुळें मात्र ते चिडत, भांबावत आणि रागावत.

सोव्हिएट राष्ट्राची अमेरिकेविरुद्धची प्रतिक्रिया आतां ठराविक पद्धतीची झाली होती आणि ती सत्यापासून फार दूर होती. यामुळें अमेरिकन लोकांना तिची शिसारी येई आणि कधींकधीं ती हास्यास्पदहि वाटे. कधींकधीं शुद्ध बाष्कळपणावर येऊन ठेपलेल्या या साम्यवादी प्रचाराचें एखादें उदाहरण दृष्टोत्पत्तीस येई आणि लोकांना हसविण्यासाठीं अमेरिकन सरकारी अधिकारी त्याचा आपल्या भाषणांत उपयोग करीत असत. उदाहरणार्थ— एखाद्या शैक्षणिक संस्थेपुढें केलेलें भाषण चटकदार होण्यासाठीं नुकतेंच ' स्लोवाक् ' रेडियोवर झालेलें भाषण एखादा सरकारी खात्याचा अधिकारी वाचून दाखवी. राष्ट्राध्यक्ष ट्रुमन याच्या मंत्रिमंडळाच्या सभेचें वर्णन त्या रेडियो-वृत्तांतांत पुढीलप्रमाणें केलेलें असे :—

—" चर्चेसाठीं घेतलेल्या ठरावाचा मसुदा वाचून दाखविण्यासाठीं जेव्हां शिक्षणमंत्र्यांना पाचारण करण्यांत आलें, तेव्हां असें कळून आलें कीं, ते मंत्रिमंडळाच्या सभांना हजर राहात नसत, कारण त्यांचा कैक वर्षांचा पगार थकला होता! अर्थमंत्र्यांनीं खुलासा केला कीं, पगार देण्यासाठीं तिजोरींत पैसाच नव्हता; कारण सारे पैसे शस्त्रास्त्रांवरच खर्च झाले होते. शिक्षण-मंत्र्यांचा पगार देण्यासाठीं हायड्रोजन बाँबमधील हायड्रोजनचें प्रमाण कमी करावें अशी एक सूचना पुढें आली, परंतु ती फेटाळली गेली. तसें केलें तर बाँबच्या धंद्याकडून तक्रार येईल आणि ' वॉल-स्ट्रीट 'वरील शेअर-बाजारांत आणीबाणीची परिस्थिति उद्‌भवेल असें सांगण्यांत आलें."

परंतु साम्यवादी प्रचाराचें काळजीपूर्वक अध्ययन करणाऱ्या अमेरिकन लोकांना त्याचें हसूं येण्याऐवजीं वाईट मात्र वाटे. सोव्हिएट साम्यवादाच्या छत्राखालीं जुलूम, अत्याचार, दारिद्रय आणि भीति इत्यादि जे प्रकार

चाललेले असतात; तसले, अमेरिकेंत त्यांतूनहि अधिकच वाईट स्वरूपांत चालू आहेत, असें दाखविण्याची साम्यवादी लोकांना संवयच असे. स्वतःच्या हेतूंचा व पद्धतींचा त्याहून अधिक प्रमाणांतला वापर आपला कट्टा शत्रु ( अमेरिका ) करीत आहे, असें भासवून साम्यवादी सत्ताधीश आपल्या लोकांना असें धोरण स्वीकारावयास प्रोत्साहन देत.

मॉस्को सरकारनें स्वतः सैन्याच्या एकशेंवीस तुकड्या उभ्या केल्या होत्या. इ. स. १९५० मध्यें अमेरिकन सरकारजवळ फार तर सैन्याच्या दहा तुकड्या होत्या. असें असूनहि साम्यवादी पुन्हा पुन्हा असें ठांमून सांगत कीं, अमेरिका हा एक वेडगळ, साम्राज्यवादी प्रवृत्तीचा, लोभी आणि युद्धपिपासू--असा देश आहे. मॉस्को राजवटीनें स्वतःच्या आणि स्वतःच्या छत्राखालील देशांतील तरुणांचीं आणि मुलांचीं मनें निर्दयपणें आपणांस हवीं तशी ठोकून, वाकवून टाकलीं होतीं, तरीहि त्यांनीं वॉशिंग्टनच्या सरकारवर पुढील आरोप केला होता, ( जनरल ऑफ सोव्हिएट पेडॉगॉजीनें या पद्धतीबद्दल असे शब्द वापरले )--या पद्धतीचा हेतु आज्ञाधारक, विचार करणारे, विरोध न करणारे असे भांडवलदार तयार करणें हा आहे. मध्ययुगांतील शाळांतून अशाच रीतीनें सरंजामशाहीचे गुलाम तयार होत. सोव्हिएट साम्यवादाचें प्रचार-यंत्र बनलेल्या मॉस्कोच्या वृत्तपत्रांनीं अमेरिकन वृत्तपत्रांचें "युद्धपिपासु लक्षाधीशांच्या हातांतील बाहुलीं" असें वर्णन केलें. "असत्य, बदनामी आणि अमेरिकन जीवन-पद्धतीचा निर्लज्ज असा प्रसार या कार्याला त्यांनीं वाहून घेतलें आहे" असा त्यांचा आरोप होता. साम्यवादाला अनुकूल असतील तेवढ्याच बातम्या ज्या राष्ट्रांत उपलब्ध होतात, तेथील एका टीकाकारानें **लिटररी गॅझेट** या नियतकालिकांत असा पुढील जाहीर आरोप केला होता कीं, "अमेरिकेंतील वृत्तपत्रें हीं फक्त एकाच दृष्टिकोनांतून बातम्यांचें महत्त्वमापन करतात...ही बातमी वॉलस्ट्रीटच्या तटबंदींत आणि बालेकिल्ल्यांत बसणाऱ्या लोकांना फार उपयुक्त वाटेल."

साम्यवादी प्रचाराला आणखीहि एक बाजू होती. आपल्या पक्षासाठीं अनुयायी मिळविणें आणि आपल्या राष्ट्राची दडपशाही आणि आक्रमण यांना पाठिंबा देणें एवढींच त्यांचीं कार्यें नव्हतीं. मार्क्स व लेनिन यांनीं केलेलीं भविष्यें घडून येत आहेत, याबद्दल वारंवार पुरावे दाखवून आपल्या लोकांना

धीर देणें हें देखील त्याचें कार्य होतें. भांडवलशाहींतूनच तिच्या नाशाची बीजें उत्पन्न होतात; ही पद्धति आतां आर्थिक अनर्थांत बुडत चालली असून स्वसंरक्षासाठीं तिला अखेर अगतिक होऊन युद्धाचा आश्रय घ्यावा लागेल— या सर्व गोष्टी या प्रचाराला स्पष्ट करून दाखविणें भाग होतें. असें असल्यानें साम्यवादी वृत्तपत्रांत आणि नभोवाणीवर अशा पद्धतीच्या वातम्या प्रसिद्ध होत.

—" अमेरिकेला जाऊन आलेल्या खलाशांच्या वृत्तावरून तेथील कामगारांची दुस्थिति स्पष्टपणें दिसून येते. **आय्. ए. झाडोर्झनी** या विद्युद्यंत्र-विशारदाला न्यूयॉर्कमध्यें अशी परिस्थिति दिसून आली. " लोकांना कपडे, जोडे, वगैरे वस्तूंची जरुरी असूनहि त्या विकत घेण्यासाठीं जवळ पैसा नसल्यानें वस्तु-भांडारें ओस पडलीं आहेत. " या मनुष्यानें अमेरिकेंतील भयंकर बेकारीचें वर्णन केलें तें असें—" कांहीं लोकांना आठवड्यांतून फक्त दहा-बारा तासच काम मिळतें. कांहींना कामच मिळत नाहीं, कांहींना त्यांचीं लायकी असलेलीं कामें करावयास मिळत नाहींत. ' ब्रुक्लिन ' येथें नीटनेटका पोशाख केलेले लोक आमच्या खलाशांजवळ अन्नासाठीं एक पेनीची भीक मागत होते. "

अपूर्व अशी भरभराट भोगीत असतां हीं व अशीं विडंबनें पाहून अमेरिकन लोकांचें असें मत होऊं लागलें, कीं साम्यवादी लोकांना स्वस्थितीचा उलगडा करून दाखविण्याचें कार्य कायमचें रद्द करावें लागणार. मध्यंतरींच्या काळांत हे साम्यवादी लोक आपल्याबद्दल आणि आपल्या धोरणाबद्दल काय बोलतात, त्यांचीं काय मतें आहेत, ह्यांकडे या अमेरिकन लोकांनीं पूर्ण दुर्लक्ष केलें. परंतु बाकीचें स्वतंत्र वृत्तीचें जग आपल्याबद्दल काय बोलतें, याबद्दल मात्र त्यांना बरीच आस्था वाटत असे.

अनेक परदेशीय मानसशास्त्रज्ञांनीं व वंशशास्त्रज्ञांनीं नमूद करून ठेवलें होतें, कीं अमेरिकन लोकांना लोकप्रियतेची आवड असते (परंतु अशा कांहीं विद्वानांनीं सूचित केलें होतें त्याप्रमाणें या इच्छेंत कांहीं मागासलेली किंवा हीन अशी प्रवृत्ति नव्हती.) दुसऱ्या महायुद्धाच्या अंतानंतरच्या काळांत आपण सर्वांशीं, विशेषतः पश्चिम युरोपांतील देशांशीं उदारतेनें आणि मैत्रीच्या भावनेनें वागत आलों आहोंत, याची अमेरिकन लोकांना जाणीव

झाली होती. कांहीं अमेरिकन लोकांना वाटत होतें. (किंवा वाटतें, असें तें म्हणत.) ही उदारता मूर्खपणाची आहे; आणि यामुळें ती चालू ठेवण्यास त्यांनीं विरोध केला. कित्येकांना या उदारतेंत केवळ ( उपकाराचा ) मुलामा दिलेला स्वार्थ दिसला. परंतु बहुतेकांचें असें मत होतें, कीं हें कार्य चांगलें आणि रास्त होतें. आचरणाचा योग्य (सुवर्ण) मार्ग आपण एवढ्या मोठ्या प्रमाणांत प्रत्यक्ष कृतींत उतरविला आहे, या जाणीवेनें त्यांना एक प्रकाराचा आनंद व अभिमान वाटत असे.

अशी परिस्थिति असल्यानें जेव्हां जेव्हां अमेरिकेविरुद्ध टीका आणि मत-प्रदर्शन होई, अमेरिकन लोकांच्या—मतें रास्त असलेल्या मार्गाला विरोध होई (विशेषतः मार्शल-योजना अमलांत असलेल्या देशांत असें होई, तेव्हां ) तेव्हां अमेरिकेंत तीव्रतेची आणि कधीं कधीं गुंतागुंतीची प्रतिक्रिया होत असे. राग, ( बेफाम ) क्रोध, शिसारी, अस्वस्था, त्रास, चिडखोरपणा यांचें प्रदर्शन होई. परंतु या रागामागें असलेली आणखी एक भावना हळुवार मनाला जाणवत असे. ती म्हणजे नवलाची. जे देश आपल्याला हक्कानें मित्र—प्रदेश असें म्हणतां येतील अशा देशांतहि अमेरिकन धोरण आणि रीत याबद्दल शंका कां असाव्यात याचे बहुतेक साऱ्या अमेरिकन लोकांना कोडेंच पडत असे.

पहिली गोष्ट म्हणजे, जागतिक युद्धामुळें सत्तेचा समतोलपणा केवढ्या मोठ्या प्रमाणांत बिघडून गेला आहे, आणि या परिस्थितीचे काय काय परिणाम झाले आहेत, याची त्यांना नीटशी जाणीव कधींच झाली नव्हती. जगावर सत्ता चालविण्याचें अधिकार-पद या अमेरिकन लोकांना प्राप्त झालें होतें. या प्रश्नांतच ते इतके गुरफटून गेले होते, कीं ज्यांच्या हातांतून ही सत्ता काढून घेतली गेली, त्या जुन्या जगांतील लोकांना याबद्दल काय वाटत आहे, त्याविषयीं विचार करण्यास त्यांना वेळच मिळाला नाहीं.

पूर्वी ज्यांच्या हातीं सत्ता असे, अशीं राष्ट्रें नव्यानें हातीं सत्ता आलेल्या राष्ट्राच्या नव्या पद्धतींचें चटकन् स्वागत करतील अशी कल्पना करणें चूक होतें. या नव्या रीति आनंदानें स्वीकारून, त्या जुन्या चालीरीतींपेक्षां अधिक चांगल्या आहेत, असें जाहीर करणेंहि त्यांना रुचलें नसतें. स्वतंत्र जगाच्या या नव्या नेत्याचा स्वभाव चांगला होता, आणि त्याची वागणूक उदारतेची

होती हें खरें. तरीहि त्याच्या सर्व इच्छा विनतक्रार पूर्ण करण्यांत याव्या अशी अपेक्षा करणें अवास्तव ठरलें असतें. अविच्छिन्न धोरणीपणा, संयम आणि सहनशीलता हे गुण या नव्या नेत्यानें आपल्या कार्यपद्धतींत समाविष्ट केले होते कीं नाहीं, असें विचारणें म्हणजे देखील अतिप्रसगच होता. परंतु पौरुषयुक्त ( दमदार ) अमेरिकन लोकसत्तेचे हे नैसर्गिक गुण नव्हते, एवढें मात्र खरें.

उच्च आणि नीच पदांवरील युरोपीय व्यक्तींना या नव्या नेत्याचें वागणें पाहून राग येई आणि तक्रार करावीशी वाटूं लागे. कांहीं प्रसग असे घडले कीं त्यांबद्दल लोक मनांत कुढूं लागले. (पुन्हा पुन्हा विचार करूं लागले.) आणि त्यांत अमेरिकन लोकांना दोषी धरूं लागले. निरनिराळ्या देशांतील लोकांच्या तक्रारी निरनिराळ्या होत्या. परंतु अमेरिकेच्या धोरणावर आणि कृत्यांवर ज्याचें प्रत्यक्ष अस्तित्वच अवलंबून होतें, अशा अनेक लोकांना ( देशांना ) अमेरिकेची बेफिकीर वृत्ति पाहूनच फार ( तीव्रतेनें ) राग येत असे.

अमेरिकेच्या व्यापार खात्याचे चिटणीस श्री. सॉयर यांनीं १९५० सालाच्या अखेरीस एका भाषणांत पुढील उद्गार काढले होते; "गेल्या चाळीस वर्षांत आपल्या लोकांची युद्धाविषयीं समजूत अशी होती कीं, लढाई म्हणजे एखादा तिरस्करणीय असा झगडा असून तो अमेरिकेबाहेरच घडून येतो, आणि त्यांत आपला [ अमेरिकेचा ] नेहमींच विजय होतो." ही गोष्ट खरी होती आणि त्यावरून अमेरिकेंत घडणाऱ्या बऱ्याच गोष्टींचा उलगडा होण्यास मदत होत असे. परंतु गेल्या चाळीस वर्षांत ज्या लोकांची युद्धाशीं एका तिरस्करणीय अशा झगड्याच्या स्वरूपांत ओळख झाली होती, आणि ज्यांनीं त्यांच्या देशाचा विध्वंस झालेला पाहिला होता, त्यांच्या किंवा त्यांच्या शेजाऱ्यांच्या आप्तेष्टांचे-पति आणि पुत्र, मुली आणि पत्नी यांचे वध झालेले पाहिले, त्यांना त्यांना अमेरिकन लोकांचें वरील मत ऐकून कांहीं समाधान वाटलें नाहीं. ज्या देशांवर शत्रूने ताबा मिळविला होता, आणि ज्यावर तो तसा मिळविला नव्हता, या दोन विभागांमध्यें आतां एक खिंडार पडलें होतें. आपला बलिष्ठ शत्रु केवळ कांहीं मिनिटांच्या विमानोड्डाणाच्या अंतरावरच आहे, ही जाणीव उराशीं बाळगूनच जे लोक

रात्रीं झोपीं जात आणि तशाच विचाराची धास्ती घेऊन सकाळीं उठत असे लोक अमेरिकेंतील या घटनेमुळें अस्वस्थ झाले.

इतर गोष्टींबरोबर या लोकांना अप्रिय वाटणारी एक गोष्ट म्हणजे अनिश्चितपणाची भावना. अमेरिकेंतील मोठमोठ्या वादविवादांत, निवडणुकींच्या मोहिमांत आणि पक्षांच्या डावपेंचांत पुन्हा पुन्हा अशी आठवण देण्यांत येई, कीं अमेरिकन धोरण नेहमीं सार्वजनिक भावनेवर आधारलेलें असतें. राष्ट्रसभा आणि सरकार या भावनेपुढें नम्र होतील आणि ज्या 'कार्याबद्दल वचन दिलें तें कदाचित् पार पडणार नाहीं. किंवा त्याहूनहि वाईट म्हणजे जें पक्कें ठरल्यासारखें दिसत असेल ते देखील (रद्द) करतां येईल. अशा अनेक भीतिदायक गोष्टींचीं अतिशयोक्त वर्णनें करण्यांत आलीं होतीं हें खरें, पण त्यामुळें युरोपमध्यें त्यांची सत्यता कमी होत नव्हती. परत ह्या गोष्टीची चर्चा झाली किंवा एखादी निवडणूक आली कीं हें भीतिदायक वातावरण परत निर्माण होई. अशा वेळीं असें सांगण्यांत येई, "अहो, ! यापूर्वी सारें कांहीं व्यवस्थित झालें आहे, आणि पुन्हा देखील बहुधा तें तसें होईल." परंतु अशा आश्वासनानें या लोकांचें पुरेसें समाधान होत नसे. प्रत्येक प्रमुख परराष्ट्रीय धोरणाची सर्व लोकांकडून सतत फेरतपासणी आणि परीक्षण (लोकशाहीच्या पद्धतींत) होत असे, याबद्दल अमेरिकन लोकांना मोठा अभिमान वाटत असे. परंतु युरोपमधील लोक कधींकधीं आपल्या जर या परिस्थितीची उलटापालट झाली, आणि दूरच्या व अल्पज्ञात अशा लोकांच्या हातांत या अमेरिकन लोकांचें नशीब घडविण्याची संधि आली तर मग त्यांना या जाहीर चर्चा कितपत आवडतील हाच प्रश्न आहे. आपल्या भविष्याचा काय निकाल होतो, हें त्यांना असहायपणें पाहत बसावें लागेल आणि त्या दूरच्या लोकांशीं त्यांना प्रत्यक्ष बोलणें करण्याचीहि संधि मिळणार नाहीं.

युरोपांतील लोकांना आत्मविश्वासाचें कौतुक वाटे आणि नेतृत्व करणाऱ्या मनुष्यांत असा आत्मविश्वास असावा अशी त्यांची अपेक्षाहि असे. परंतु आत्मविश्वास आणि (अविश्वास) यांत ते फरक करीत. हा फरक नेहमींच अचूक नसे. युरोपमध्यें लोकांची अनेकदां असें समजण्याची प्रवृत्ति असें कीं अमेरिकेनें केलेलें एखादें सरळ किंवा विवादास्पद कृत्यहि धसमुसळेपणाचें असलें पाहिजे. त्याप्रमाणेंच एखादें धाडसाचें कृत्यहि वस्तुतः भक्कम

पायावर असूनहि फक्त त्याची कार्यपद्धति धसमुसळेपणाची असे, तरी तें सारें कार्यच तशा प्रकारचें आहे, असें मानण्याकडे या लोकांची प्रवृत्ति असे. १९५० सालीं जर्मनीच्या लष्करीकरणावर, किंवा लष्करासारख्या दिसणाऱ्या संघटनेवर अमेरिकन लोकांनीं जो भर दिला, त्यामुळें अनेक युरोपियन लोकांना फार भीति वाटूं लागली. कांहीं काळ गेल्यानंतर मात्र बहुतेकांनीं असा निर्णय घेतला कीं अमेरिकेचे विचार धसमुसळेपणाचे नसून तिची कार्यपद्धति मात्र तशा प्रकारची आहे. परंतु असें होईपर्यंत (गेलेला) मनस्तापाचा काळ आणि आत्मविश्वासाला बसलेला धक्का यांची या लोकांच्या डोक्यांवर आधींच बसलेल्या बोजयांत अधिक भर पडली.

युरोपियन लोकांना अमेरिकेविषयीं धास्ती वाटणाऱ्या या अशा कांहीं बाबी होत्या. अमेरिकेच्या दोस्त देशांत आणि राजधान्यांत अनेक लोक उसासा टाकून म्हणत कीं या नव्या नियमांमुळें आम्हांला भोगावी लागणारी सर्वांत कठीण शिक्षा म्हणजे अमेरिकन लोकांची स्वतःबद्दलची आत्मप्रौढीची वृत्ति सहन करणें हीच असे. लोक रागारागानें म्हणत कीं अमेरिकेंत सतत वापरण्यांत येणाऱ्या डौलदार, आकर्षक शब्दांमुळें हा सारा घोटाळा होत असतो. अमेरिकन लोकांनीं विचारांत, शब्दांत आणि कृतींत ठराविक पंथाला चिकटून राहावें, असा एकीकडे आग्रह धरणारे लोकच दुसरीकडे स्वतंत्रतेचीं स्तुतिस्तोत्रें गात असत. महत्त्वाच्या प्रश्नांवर आपल्यापेक्षां भिन्न मतें असणारे लोक आणि देश यांना "खुशामते, चंचल, भित्रे आणि कृतघ्न" अशा शिव्या देण्याची या अमेरिकन लोकांची नेहमींच तयारी असे. जें अमेरिकेच्या हिताचें आहे, तें प्रत्येकाच्या हिताचें असलेंच पाहिजे, अशी हे लोक वारंवार समजूत करून घेत. आपलें आंतरराष्ट्रीय अस्तित्व टिकविण्यासाठीं जरूर असलेल्या आंतरराष्ट्रीय एकीचा अर्थ 'ताबडतोब आणि कोणताहि प्रतिप्रश्न न करतां अमेरिकन मताची री ओढणें' एवढाच होत असे. प्रत्येक अमेरिकन समजूतहि शाश्वत, अछिन्न आणि अप्रतिहत असें दैवी सत्य आहे, असें हे अमेरिकन लोक मोठ्या धिटाईनें प्रतिपादन करीत.

१९५० सालीं कोरियामध्यें अमेरिकेनें जें धोरण स्वीकारलें, त्यांत त्या देशाचा बेजबाबदारपणा, चंचल वृत्ति, धसमुसळेपणा आणि आत्मप्रौढी हे प्रकार युरोपियन लोकांना दिसून आले—निदान असें त्यांना वाटलें. युरोपांतील

लोकांचीं हीं मतें नेहमींच बरोबर होतीं असें नव्हे. परंतु त्यांच्या बाजूनें बरेंच बोलण्यासारखें होतें, एवढें मात्र खरें.

अलीकडे कांहीं प्रसंगीं अमेरिकन लोकांनीं अशी भूमिका स्वीकारली होती कीं शरणागति आणि लढाई हीं दोन टोकें साधणारा एखादा सन्माननीय असा मार्ग असला पाहिजे, तेवढ्यासाठीं वाटाघाट आणि देवाणघेवाण करावी अशी त्यांची विनंति होती. म्यूनिच येथें झालेल्या करारामुळें 'मनधरणी' या शब्दाला वाईट असा अर्थ चिकटला होता. या करारामुळें इंग्लंडचे पंतप्रधान श्री. चेंबर्लेन यांचें नांव कायमचें बद्दू झालें होतें.

म्युनिच करार होण्यासाठीं कांहीं आठवडे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष श्री. रुझवेल्ट यांनीं हिटलर आणि बेने यांना पुढील निरोप पाठविला होता, याची आतां कोणालाहि आठवण राहिली नव्हती. हा निरोप **अमेरिकेंतील एकशेंतीस दशलक्ष लोकांच्या** व इतरत्र असलेल्या सर्व लोकांच्या वतीनें पाठविला असून त्यांत त्यांनीं विनंति केली होती, कीं आपण सर्वांनीं आपलीं बोलणीं बंद न करतां एकमत होण्यासाठीं प्रयत्न सुरू ठेवावे. त्या वेळचें अमेरिकेचें मत राष्ट्राध्यक्ष रुझवेल्ट यांनीं व्यक्त केलें तें असें:—

–" मतभेदाचे मुद्दे कोणतेहि असोत, शांततापूर्ण तडजोड कितीहि कठीण असो, माझा असा विश्वास आहे, की कोणत्याहि महत्त्वाच्या प्रश्नाचा (योग्य) निकाल बळापेक्षां युक्तिवादानेंच करणें अधिक योग्य होईल. जोंपर्यंत या वाटाघाटी चालू आहेत, तोंपर्यंत, योग्य विचार आणि न्याय यांचा विजय होऊन नव्या युद्धाच्या वेडेपणापासून जगाचा बचाव होईल, अशी आशा कायम राहील.

यानंतर असें दिसून आलें होतें कीं, म्युनिचच्या कराराची भूमिका चुकीची होती आणि त्या करारांत निष्पन्न कांहीं झालेंच नाहीं. परंतु एवढ्यामुळें वाटाघाटी आणि वादग्रस्तप्रश्नांची शांततापूर्ण सोडवणूक करण्यासाठीं जे जे प्रयत्न करण्यांत येतात त्यांना नैतिक अधिष्ठान नाहीं, असें समजणें योग्य झालें असतें काय? म्युनिच करारानंतर दहा वर्षे उलटल्यावर, म्हणजे १९४८ सालापर्यंत ( तरी ) अमेरिकेंतील लोकांना असें वाटत नव्हतें असें दिसतें. कारण त्या सालींच डच आणि इंडोनेशियांतील लोकांनींहि आपले प्रश्न शांततापूर्ण रीतीनें सोडवावे, अशी विनंति केली होती. म्युनिच करारांत किंवा डच–इंडोनेशियांतील करारांत अमेरिकन लोक गोंवले गेले नव्हते. त्यांनीं त्रयस्थ भूमिकेवरूनच या प्रश्नाकडे पाहिलें. परंतु आतां ( कोरियन युद्धाचे वेळीं ) अतिपूर्वेकडे त्यांचा हात फार खोलवर गुंतला होता, आणि त्यामुळें

त्यांचा दृष्टिकोन आतां इतका त्रयस्थपणाचा नव्हता, ही गोष्ट समजण्यासारखी होती. पण एखाद्या झगड्यांत अमेरिकन लोक गुंतले आहेत कीं नाहीं, तया प्रश्नावर नैतिक सत्यासत्यता अवलंबून असते, ही भूमिका जगानें स्वीकारावयास हवी होती कीं काय असा प्रश्न यावरून उपस्थित झाला असता.

नव्यानें नेतृत्व करणाऱ्या या अमेरिकन राष्ट्राचें सामर्थ्य आणि उत्साह त्वरेनें घेतलेले निर्णय आणि गर्जून व्यक्त केलेलीं मतें, त्याचा आत्मविश्वास आणि स्वतःच्या मतांबद्दलची निश्चिति—या साऱ्या विशेषांकडे अमेरिकेचे सहकारी देश लक्ष देऊन पाहात होते आणि कधीं कधीं अस्वस्थ होऊन चुळबूळ करीत होते.

असें होतें तरी हे लोकहि पूर्णपणें बरोबर होते असें म्हणतां येत नाहीं. अमेरिकेची जितकी सक्त तपासणी हे लोक करीत होते तितकी त्यांचीहि तपासणी केली असती, तर त्यांपैकीं बहुतेकांची धडगत लागली नसती. अमेरिकेचे हेतु आणि तिची कुवत यांविषयीं या व इतर अनेक लोकांची फार मोठी चूक होत होती.

उच्च पदांवर असलेले आणि नसलेले बहुसंख्य युरोपीय लोक एके काळीं खाजगीपणें कुजबुजत असत कीं अमेरिका ही इतकी स्वार्थी, ऐषआरामी आणि बेफिकीर आहे कीं जागतिक युद्ध जिंकण्यास जरूर असलेले श्रम तिच्याकडून होणारच नाहींत. ही परिस्थिति बदलून अद्याप दहा वर्षे देखील झाली नव्हती.

त्यांनीं असेंहि भविष्य केलें होतें कीं, अमेरिकन विमानें इतक्या कमी दर्जाचीं असतील कीं तीं गोळीबारानें बदकांसारखीं बदाबद खालीं आपटतील. त्यांनीं असेंहि भाकीत केलें होतें कीं, अमेरिकन लोकांना आपली फौज तयार करण्यास इतका दीर्घ काळ लागेल कीं, तिचा फारसा उपयोग होणार नाहीं. तेव्हां अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांनीं विमानें, रणगाडे आणि व्यापारी जहाजें तयार करण्याच्या आपल्या योजना जाहीर केल्या, तेव्हां त्यांना "अस्ताव्यस्त, अतिशयोक्तिपूर्ण, केवळ प्रचारासाठीं मारलेल्या गप्पा" अशीं शेलकीं विशेषणें देण्यांत आलीं होतीं.

जेव्हां अगदीं अल्पावधींतच अमेरिकेनें हीं विमानें तयार केलीं आणि तीं वेगानें व उत्तम रीतीनें लढूं लागलीं, जेव्हां अमेरिकन सेना तयार झाली आणि लक्षावधि टन वजनाची नौ-सेना समुद्रावर संचार करूं लागली,

तेव्हां अनेक युरोपीय लोक लगेच मोहरा फिरवून, अमेरिकन लोकांना 'साम्राज्यवादी' म्हणण्यास तयार झाले. त्यांनीं असें भाकीत केलें कीं, युद्ध संपल्याबरोबर अमेरिकन लोक देश बळकावतील, संरक्षणाखालीं आलेल्या देशांवर भरपूर हात मारून घेतील; सत्तेच्या जोरावर सवलती लाटतील, चढाओढी करणाऱ्या जहाजांना दर्यापार हाकून देतील, बाजारपेठा काबीज करतील आणि जगाला भिकारी बनवितील. परंतु त्यांचे हे सारे अंदाज चुकीचे ठरले.

मानवी इतिहासाच्या एवढ्याच कालखंडांतील इतर कोणत्याहि देशापेक्षां अमेरिकन लोकांनीं दुसऱ्यांना दिलें अधिक आणि घेतलें मात्र कमी. ही स्थिति दिसून आल्यावरहि अनेक उच्चपदस्थ व इतर युरोपियन लोकांच्या वागण्यांत आणि बोलण्यांत अमेरिकेविषयीं अढी दिसून येई. कधीं कधीं ते आपल्या भूमिकेच्या समर्थनार्थ म्हणत कीं, अमेरिकेची भूमिका ही केवळ भौतिकवादी आहे. हें खरें नव्हतें. परंतु तें खरें असतें, तरी ज्या देशांतील नागरिकांचा अमेरिकेच्या साधनसामुग्रीमुळें फायदा झाला किंवा संकटापासून बचाव झाला त्यांनीं मात्र असें म्हटलें नसतें. या देशांचा याहून अधिक फायदा झाला असता, तर त्यांनें राजकीय व आर्थिक संकटेंहि कमी झालीं असतीं. अमेरिकन लोक आणि त्यांचें सरकार यांनीं बहुजनसमाजाच्या हितासाठीं अधिक उत्पादन आणि चढाओढ या बाबतींत जी तत्परता दाखविली, तीच तत्परता जर अशा देशा देशांनीं आणि त्यांच्या सरकारांनीं दाखविली असती आणि स्वतःच्या खास हितसंबंधांचें संरक्षण आणि मक्तेदारी यांच्याकडे कमी लक्ष दिलें असतें, तर सध्यापेक्षांहि त्यांचा अधिक फायदा झाला असता.

अमेरिकन लोकांचे परदेशीय टीकाकार कधीं कधीं अयोग्य किंवा मूर्खपणाचीहि भूमिका घेत. त्यांपैकीं कित्येकांनीं खूपशी चर्चा करून अखेर असा निष्कर्ष काढला कीं, "आम्हांला मदत केल्याशिवाय अमेरिकेला गत्यंतरच नाहीं म्हणून खरी सत्ता आमच्याच हातांत आहे."

अॅटम बॉंबच्या उपयोगाबद्दल कांहीं लोकांना धास्ती वाटत असे किंवा त्याच्या नैतिक स्वरूपाबद्दल संदेह वाटत असे. यामुळें त्यांनीं स्वतःची अशी समजूत करून घेतली कीं अणुशक्तीचें कार्यक्षम व आंतरराष्ट्रीय नियंत्रण करण्याचा मनापासूनचा प्रयत्न सोव्हिएट रशियानेंच केला; अमेरिकेनें नव्हे. दुसरे कांहीं लोक असे होते कीं त्यांच्या आळशीपणामुळें किंवा पूर्वग्रहामुळें त्यांना सत्यस्थितीचें योग्य ज्ञान होत नव्हतें. ते नकळतां असत्य अशा

सोव्हिएट प्रचाराचा पुनरुच्चार करीत होते. या लोकांनीं अशा कांहीं हालचालींना आपला पाठिंबा दिला होता, कीं त्यांना यश मिळालें असतें, तर स्वतंत्र जगाच्या संरक्षणाला धोकाच उत्पन्न झाला असता.

अमेरिकेच्या दोस्त राष्ट्रांनीं शहाणपणाचा आणि नैतिक सचोटीचा मक्ता घेतला नव्हता.

—असा मक्ता अमेरिकेनेंहि घेतला नव्हता.

परंतु एकूण आढावा घेतल्यावर असें दिसून आलें कीं, स्वतंत्र जगाची मैत्री व आधार ह्यांवर अमेरिकन लोकांचा अनिवार्य असा हक्क आहे. अमेरिकन जनतेजवळ प्रचंड भौतिक सामर्थ्य होतें; परंतु मैत्रीचा आणि आधाराचा हक्क तेवढ्यामुळेंच प्रस्थापित होऊं शकत नाहीं. ज्या देशांची मैत्री आणि आधार अमेरिकेला हवा होता, त्या देशाच्या हिताशीं अमेरिकन धोरणाचे हेतु सुसंगत आहेत, असें दाखवून देण्यानेंच हा हेतु साध्य होण्या सारखा होता.

अमेरिकन राजकीय धोरणामागील हेतु अनेकदां (स्पष्ट) व्यक्त झाले आहेत. परंतु श्री. ॲचिसन यांनीं १९५० सालीं केलेल्या स्वयंस्फूर्त भाषणांत ते जितके साधेपणानें आणि सरळपणानें व्यक्त झाले होते तसे ते इतरत्र कोठेंहि झाले नव्हते. श्री. ॲचिसन म्हणाले—" या लोकसत्ताक राष्ट्रानें इतर राष्ट्रांशीं असलेल्या संबंधाच्या बाबतींत सतत एकाच प्रकारचें प्रगतिपर धोरण ठेवलें आहे. हा देश त्या मार्गापासून कधींहि विचलित झाला नाहीं. ज्या योगानें अमेरिकेंतील स्वातंत्र्याचा हा महत्त्वाचा प्रयोग टिकून राहील, आणि त्याला अधिक चांगलीं फळें येतील, अशी परिस्थिति निर्माण करण्याच्या दिशेनें अमेरिकेनें आपले परराष्ट्रीय संबंध आखले होते."

जर अमेरिकेच्या दोस्त राष्ट्रांना असें वाटत असेल, कीं अशाच वातावरणांत [पार्श्वभूमीवर] आपणहि राहूं आणि आपलीहि उन्नति करून घेऊं; तर अमेरिकन लोकांशीं सहभागी होणें त्यांच्या दृष्टीनें शहाणपणाचें होईल. याविरुद्ध परिस्थिति आणून (निर्माण करणाऱ्या) विरोधी पद्धतीच्या डावपेंचांमुळें या लोकांनीं आपल्या मतांत फूट पडूं दिली आणि शक्ति क्षीण होऊं दिली, तर तो त्यांचा मूर्खपणाच होईल.

अमेरिकन लोक जी परिस्थिति निर्माण करण्यास आणि कायम ठेवण्यास उद्युक्त झाले होते, ती आपल्यासाठीं हितकर आहे, असा विश्वास ठेवण्यास या लोकांना तसेंच कारण होतें. युरोपमधील पुढारलेल्या देशांच्या

रहिवाशांनाहि यावर विश्वास ठेवण्यासारखें ( सबळ ) कारण होतें. आशिया खंडांत लक्षावधि लोक आतां त्यांच्या भोंवतालच्या दु:खाशीं आणि दारिद्र्याशीं झगडत होते. जी परिस्थिति निर्माण करण्याचा अमेरिकन लोकांचा हेतु होता, तिच्यामुळें या लोकांचा भरपूर फायदा होईल, असें समजण्यासहि चांगलीं कारणें होतीं. मग या लोकांना त्याची जाणीव असो कीं नसो.

युरोपमध्यें किंवा आशिया खंडामध्यें जुन्या नेतृत्वाची मक्तेदारीच चालू राहावी, असा दावा तेथील लोकहि मान्य करण्यास तयार नव्हते. जुनी पद्धत पूर्णत्वास गेली आहे, असें म्हणण्याजोगी शांतता, स्थिरता, भरभराट किंवा न्याय हे विशेष त्या पद्धतीनें कोणत्याहि देशांत निर्माण करून दाखविले नव्हते. तसेंच म्हटलें तर नवें नेतृत्व आणि नवी पद्धत या गोष्टी देखील पूर्णत्वास गेलेल्या नव्हत्या. त्यांनीं देखील शांतता, स्थिरता, भरभराट आणि न्याय निर्माण करून आपली भूमिका ठाम केली नव्हती, हें खरें आहे; परंतु भावी काळांत त्यांना तसें करतां येईल अशी आशा करण्यास मात्र जागा होती.

नव्या पद्धतीचे दोष हे अद्याप सर्वांत मोठे दोष आहेत, असें दिसत नव्हतें. तिरसट असण्यापेक्षां फार भावनाकुल असणें, हें ( कांहीं ) फारसें वाईट नाहीं. हातपाय गाळण्यापेक्षां खूपसा आत्मविश्वास अंगीं असणें हें फारसें वाईट नाहीं. प्रयोग करण्यास नेहमीं तयार असणें हें प्रयोग करण्याची कधींच इच्छा नसण्यापेक्षां वाईट नव्हे.

गेल्या दहा वर्षांत ज्या भल्याबुऱ्या घटना घडल्या त्या जमेस धरतां आतां पुढील आशा करण्यास तशींच कांहीं सबळ कारणें उपलब्ध झालीं होतीं, ही आशा म्हणजे जें जग निर्माण करण्यास अमेरिकन लोक झटत होते, तें जग दीर्घकाळपर्यंत हालअपेष्टा भोगणाऱ्या मानवजातींतील बहुसंख्य व्यक्तींना अधिक प्रमाणांत स्वातंत्र्य, न्याय आणि सुरक्षितता प्राप्त करून देईल हीच ती आशा होय.

● ● ●

## मध्यबिंदु

**“...... ( चित्रांतील ) मध्यबिंदु मात्र तेजस्वी दिसत आहे. जरी या तेजांत अनेकदां पोलादी चमक दिसून येत असली तरी त्यांतील रंग कल्पनातीत सुंदर असे आहेत.”**

१९३० च्या दशकाच्या पूर्व भागांत एक प्रचंड व्यापारी मंदी आली. आपल्या डोक्यावरचें आकाश नेहमींच निरभ्र व स्वच्छ राहील अशी अमेरिकन लोकांची अपेक्षा असतांना या मंदीच्या काळ्याकुट्ट ढगानें सारें आकाश व्यापून टाकलें. त्या वेळेपासून सर्व अमेरिकन लोकांना एक चमत्कारिक संवय लागली. विद्रूप, हेंगाडया वस्तुस्थितीच्याकडेच सारें लक्ष केंद्रित करण्याचा पंथ त्यांनीं अनुसरला.

वाईटांत वाईट पाहण्यांतच त्यांना मौज वाटूं लागली. चांगल्याबद्दल ते साशंक असत. अशा गोष्टींना ते केवळ फसलेल्या लोकांच्या इच्छेंतून उत्पन्न झालेल्या ( व्यर्थ ) कल्पना असें नांव देत.

या शतकाच्या मध्यावर—स्वतःच्या दैनिक जीवनाच्या अनेक अंगांकडे अगदी जवळून पाहिलें असतां तीं सर्व या लोकांना अत्यंत कुरूप अशीं वाटूं लागलीं. अशाच पद्धतीनें तर रेम्ब्रांटच्या तैलचित्राकडे थोडयाच इंचांवरून पाहणाऱ्या मनुष्याला त्यांतील काळसर रंग आणि छाया यांमुळें भारावून गेल्यासारखें वाटतें. मध्यभागीं असलेल्या तेजस्वी बिंदूकडे जरा दूर उभें राहून ( योग्य अंतरावरून ) पाहणारे असे लोक फार थोडेच. असे लोक हे हळवे आणि संस्कारक्षम, तरल कल्पनाशक्तीचे, तत्त्वज्ञानी आणि स्वतंत्र वृत्तीचे लोक एवढेच.

तत्कालीन परिस्थितीकडे बारकाईनें पाहिलें, तर असें स्पष्ट दिसून आलें असतें, कीं अर्धशतकांत अनेक महत्त्वाचे भौतिक लाभ झाले आहेत. बहुसंख्य कुटुंबांत वीज, टेलिफोन, शीतयंत्र, मोटारगाडी, कपडे धुण्याचें यंत्र, फोनोग्राफ, रेडिओ आणि टेलिव्हिजन हीं यंत्रें असल्यामुळें लोकांच्या जीवनांतले बरेच कष्ट दूर झाले आहेत. आतां लोकांच्या अंगावर पूर्वीपेक्षां अधिक चांगले कपडे असतात, त्यांच्या पायांत अधिक चांगले जोडे असतात. त्यांच्या अन्नाची आणि निवाऱ्याची सोय अधिक चांगली असते. आतां एकाच रात्रींत सारा अ‍ॅटलँटिक महासागर ओलांडून जाणारी तीस विमानें रोज निघतात. पेनिसिलिन व ऑरोमायसिनसारखीं प्रभावीं औषधें औषधी दुकानांतून सर्रास विक्रीला ठेवलेलीं असतात. तीस वर्षांपूर्वी मृत्यूचें प्रमाण दर हजारीं सतरा असें असे. तें आतां दर हजारीं नऊ या संख्येवर आलें आहे.

( अशा रीतीनें ) वरील चित्राच्या कॅनव्हासचा प्रत्येक धागा तपासल्यावर हे तेजस्वी रंगाचे ठिपके आणि रेपाहि दिसून येत. या तेजस्वी भागांच्या

भोंवतालीं जमलेल्या काळसर आणि विद्रूप छायांशीं त्यांचा विरोध असल्यानें ते आणखीच उठून दिसत. परंतु चित्राच्या अगदीं जवळ जाऊन पाहिलें असतां मात्र असे तेजस्वी भाग दिसून येत नसत.

अर्धशतकाच्या भौतिक लाभांचा विचार करून त्यांतून आराम आणि समाधान प्राप्त करून घेण्याच्या प्रवृत्तीमुळें राष्ट्राच्या तत्कालीन आध्यात्मिक वैभवाकडे लोकांचें दुर्लक्षच झालें. भौतिक आणि शास्त्रीय लाभांच्या बरोबरीनें आध्यात्मिक गुणांत प्रगति झाली नाहीं, असा समज सामान्यपणें प्रचलित होता. दारिद्र्याचें समूळ उच्चाटण झालें नव्हतें. ( हें खरें, पण ) तेवढ्यामुळें लोकांच्या दृष्टोत्पत्तीस असें आलें नाहीं,कीं निदान बहुजन समाजाची दारिद्र्या-विषयींची बेफिकिरी तरी बहुतेक नष्ट झाली आहे. (बहुजन) समाजाला अद्याप लढाईचा धोका होता खरा; परंतु तेवढ्या एका गोष्टीमुळें या गोष्टीचा विसर पडे कीं आतां युद्धाचीं कारणें कोणतीं, युद्धें बिनफायदेशीर, आणि असंभवनीय कशीं करतां येतील याबद्दल लोकांना बरीच माहिती झाली होती. ही परिस्थिति मात्र टीकाकारांनीं नजरेआड केली होती. गेल्या पन्नास वर्षांत साऱ्या स्वतंत्र जगांत आणि विशेषतः अमेरिकेंत डन ( Donne ) या कवीचें एक भव्य सत्य आश्चर्यकारक रीतीनें लोकांना पटूं लागलें होतें, याची फारशी जाणीव मात्र त्यांना दिसत नव्हती. तें सत्य म्हणजे," मानव-जातींत माझाहि समावेश होत असल्यामुळें प्रत्येक मानवाच्या मृत्यूनें माझा संकोच होतो आहे."

गेल्या दोन हजार दशलक्ष वर्षांपैकीं मोजक्या वर्षांत, आकाशाच्या अवकाशांतील बहुधा सर्वांत लहान ( पृथ्वी ) ताऱ्याच्या क्षेत्रफळाच्या अल्पशा भागावर राहणाऱ्या मानवजातींत एकाएकी ज्ञानाचा खूपसा प्रसार झाला होता. हें ज्ञान यातना आणि हालअपेष्टा यांतूनच निर्माण झालें होतें. हें ज्ञान म्हणजे प्रदीर्घ मानवी यात्रेंतील केवळ एक टप्पा होय. पण कांहीं म्हटलें तरी ही प्रगतीच होती. प्रगतीचें तें एक आश्चर्यकारक चिन्ह होतें.

विसाव्या शतकाच्या प्रथमार्धांतील जीवन हें अत्यंत उत्कृष्ट आणि दुष्प्राप्य असें होतें, असें त्या कालखंडाकडे पाहणाऱ्या भावी काळांतील लोकांना खास वाटलें असतें.

या काळांतील लोकसत्ताक राष्ट्रें हीं मानवी इतिहासाच्या कालावधीच्या दृष्टीनें पाहतां अल्पवयीनच म्हणावीं लागतील.

पृथ्वीवरील बहुसंख्य लोकांना अशा राष्ट्रांच्या पद्धति अजून कळल्या-देखील नव्हत्या. अंतर्गत झगडे कसे मिटवावेत, आणि साऱ्या जीवनाबद्दल आस्था बाळगून कार्य कसें करावें, याबद्दलचे मार्ग अशा राष्ट्रांना नुकतेच उपलब्ध होऊं लागले होते. असें पूर्वीं कधींहि घडलें नव्हतें. प्रत्येक युगांत साऱ्या मानवजातीविषयीं एकत्वाची भावना असणारे कवि आणि तत्त्वज्ञ होऊन गेले. परंतु आपल्यासारख्या साऱ्या मानवांची बरीच जबाबदारी आपण उचलून घेतली पाहिजे अशी निःशंक जाणीव लक्षावधि स्त्रीपुरुष आणि विद्यार्थ्यांना यापूर्वी कोणत्याहि काळीं झाली नव्हती. कदाचित् भौतिक प्रगतीचा हा प्रत्यक्ष परिणाम असेल. शास्त्रीय दृष्टया पुढारलेल्या, तंत्र-शास्त्रदृष्टया कुशल अशा लोकशाही राष्ट्रांतील लक्षावधि कामगारांचें जीवन अधिक सुखकर झालें होतें. परंतु लक्षावधि लोकांना अद्याप तसें वाटत नव्हतें. आपलें कष्ट आणि आपल्यावरील कर याबद्दल ते तक्रार करीत आणि समजत कीं, साऱ्या इतिहासांतले सर्वांत त्रस्त असे लोक आपणच आहोंत. परंतु याचें कारण असें होतें कीं, मोफत शिक्षण, कामाची निवड, न्याय मिळण्याचा अनिवार्य हक्क आणि आत्मविश्वासासाठीं जरूर असलेल्या इतर गोष्टी हे लोक आतांच हक्काच्या म्हणून धरून चालूं लागले होते.

या काळांत म्हणजे जेव्हां अंदाधुंदी आणि युद्ध यांची धास्ती मनांत घेऊन हे अमेरिकन लोक रात्रीं झोंपीं जात तेव्हां, शांतता आणि सुव्यवस्था यांची एक नवीन घडी अमेरिकेंत बसली होती. ही किती नवी होती, हें शोधून काढण्याचा एक साधा उपाय होता. "दर आठवड्यास फक्त चाळीस तास काम करून, तुझा आणि तुझ्या कुटुंबाचा अन्नखर्च आणि कपड्यांचा खर्च चांगल्या रीतीनें चालेल इतका पगार तुला मिळेल" असें जर या शतकाच्या सुरुवातीला एखाद्या मालकानें त्याच्या कामगाराला सांगितलें असतें, तर त्या कामगारानें काय म्हटलें असतें, असा एखाद्या अमेरिकन मनुष्यानें स्वतःला प्रश्न करावा. अथवा या शतकाच्या सुरुवातीस एखाद्या मालकाला कोणीं असें सांगितलें असतें कीं, "तुमचा धंदा किंवा कारखाना कसा चालवावा, याबद्दलचे तुमच्या निर्णयांना विरोध करण्याचेच नव्हे, तर आपल्या हक्कावर आक्रमण करणारे निर्णयहि फेटाळून लावण्याचे हक्क कायद्यानें कामगारांना मिळणार आहेत," तर त्यानें काय म्हटलें असतें, हाहि विचार करण्यासारखा प्रश्न आहे.

मध्यवर्ती व प्रांतिक सरकारांचा बेकारी भत्ता, सेवानिवृत्तीनंतरचें वेतन (पेन्शन) किमान वेतन, आरोग्यविषयक योजना हे सारे लाभ अमेरिकन लोकांना थोड्याच दशकांत मिळणार आहेत, असें सांगण्यात आलें असतें, तर आपल्या वडिलांना किंवा आजोबांना किती आश्चर्य वाटलें असतें, याचा कोणाहि अमेरिकन मनुष्यानें विचार करावा. गरीब, बेकार, वृद्ध आणि आजारी लोकांची कायदेशीर जबाबदारी समृद्ध, उद्योगी, तरुण व निरोगी लोकांवर आहे, हें तत्त्व पन्नास वर्षांपूर्वी अमेरिकेंत भयंकर क्रांतिकारक म्हणून समजले गेलें असतें.

आपले दृष्टिकोन आणि हितसंबंध हे एकच आहेत, या जाणिवेच्या इतके जवळ येण्यास मालकांना आणि कामगारांना बऱ्याच झगड्यांतून आणि कटुतेंतून जावें लागलें होतें. परंतु अखेर ही परिस्थिति साध्य झाली होती. अमेरिकेंत नवी शांति आणि सुव्यवस्था प्रस्थापित झाली होती. आतांपर्यंत सर्वांना ज्यांच्याबद्दल सामुदायिक रीत्या कधींच कांहीं आस्था वाटली नव्हती, अशा लोकांबद्दलच्या जबाबदारीवरच ही परिस्थिति आधारलेली होती.

या शतकाच्या मध्यावर रोजच्या जीवनांत एकमेकांवर आरोप केले जात, त्यांना उत्तरें मिळत. हल्ले–प्रतिहल्ले होत, रुसणीं–फुगणीं, शिफारसी, इषारे, बढाया, अविश्वास, बदनामी, नकार आणि पुनरुच्चार हे सारे प्रकार वरवर चालू होते. परंतु या साऱ्या घडामोडींत जीवनप्रवाहाच्या पृष्ठभागाखालून खोलवर वाहणाऱ्या अंतःप्रवाहाच्या दिशेंत झालेला बदल बहुतेकांच्या लक्षांत आला नव्हता. परंतु असा बदल घडून आला होता यांत मात्र शंका नव्हती. (अमेरिकन लोकांचा) मानवजातीशीं आत्मीयतेचा संबंध वाढत चालला होता आणि विस्तृत होत होता.

एकोणीसशें सालीं एखाद्या अमेरिकन तेलधंद्यांतील प्रमुख कारखानदाराला जर पुढील सूचना दिली असती, तर त्यानें काय म्हटलें असतें त्याची एखाद्या अमेरिकन मनुष्यानें कल्पनाच करावी; "कर तुम्ही द्यावयाचे, युरोपांतील तेल शुद्ध करण्याचा धंदा पुन्हा भक्कम पायावर उभारण्यासाठीं तुमचें ज्ञान आणि तुमचें कौशल्य त्या लोकांना तुम्हींच द्यावयाचें. अशा रीतीनें त्यांचा धंदा तयार करून, जी बाजारपेठ तुमच्या ताब्यांत आली असती, ती आपण घेऊन त्यांच्या ताब्यांत द्यावयाची!" परंतु शतकाच्या मध्यावर अमेरिकन

22840 223 क्र. ५९१२१ नों. दि. ३०।११९७१



तेलव्यवसायानें हेंच केलें. अमेरिकन कोळशाच्या धंद्यानें त्याच्याशीं चढाओढ करणाऱ्या युरोपांतील कोळशाच्या धंद्याची पुन:प्रतिष्ठा करण्यास मदत केली. अमेरिकेंतील पोलाद आणि यांत्रिक हत्यारें तयार करण्याच्या धंद्यानें युरोपांतील आपल्या प्रतिस्पर्ध्यांनीं नवजीवन देण्यासाठीं पैसा खर्च केला आणि मेहनत केली. जेव्हां युरोपांतील यंत्रशास्त्रज्ञ, कारखानदार आणि कामगार संघटनांचे अधिकारी अमेरिकेंत आले, तेव्हां अमेरिकन पुरवठ्याच्या योजनांचे आराखडे उलगडून त्यांच्या पुढें ठेवण्यांत आले.

पूर्वी कधीं न घडलेल्या अशा या वर्तनाचा उलगडा करण्यासाठीं अनेक सयुक्तिक कारणें पुढें करण्यांत आलीं. असें सांगण्यांत आलें, कीं अमेरिकेच्या सुरक्षिततेसाठीं स्थिर आणि स्वावलंबी युरोपखंडाची जरुरी आहे.एका बाजारपेठेंतून दुसरी बाजारपेठ निर्माण होते, आणि भरभराटीचे प्रदेश भिन्नभिन्न निर्माण करतां येत नाहींत, असेंहि सांगण्यांत आलें. २८,०००,०००,००० डॉलरची रक्कम दुसऱ्या महायुद्धाच्या अखेरीनंतर पांच वर्षांत परदेशांना देण्यांत आलेल्या मदतींत खर्च झाली. याबद्दल अमेरिकन लोकांनीं एकमेकांना वर उल्लेखिलेलीं कारणें सयुक्तिक होतीं आणि त्यांचा स्वीकारहि झाला. मानवजातीच्या फार मोठ्या विभागाशीं आत्मीयता असणाऱ्या अमेरिकेंतच हीं कारणें स्वीकारलीं गेलीं असतीं.

अमेरिका शस्त्रसज्ज होत होती. युद्ध हें अटळ आहे, अशी भीति एक बाजूला आणि अशी प्रबल परिस्थिति निर्माण झाल्यामुळें रशियन लोकांना, "आपल्याला युद्ध करणें परवडण्यासारखें नाहीं," असें वाटेल ही आशा दुसऱ्या बाजूला–या दोन विचारांमध्यें लोकांचीं मनें झोके घेत होतीं. या संदर्भात भाषणांतून असें म्हणण्याची एक सामान्य प्रथाच पडून गेली कीं जागतिक साम्यवादाशीं झालेल्या लढ्यांत केवळ शस्त्रास्त्रांनीं विजय मिळणार नाहीं. साम्यवादी लोक गरिबांना जीं खोटीं वचनें देत त्यांची जागा घेणारीं इतर वचनें देऊं न शकल्यानें या लढ्यांत स्वतंत्र जगाची पिछेहाट होत होती आणि त्यांना लोकांच्या मनांवर स्वामित्व मिळवतां येत नव्हतें, असे इशारेहि देण्यांत येत असत. भारताचे धोरणी मुत्सद्दी श्री. नेहरू म्हणाले, " या दोन्ही विचारसरणींपैकीं कोणत्या विचारसरणीनें अधिक फायदा होईल, हें त्यांनींच सिद्ध करून दाखवावयाचें आहे." असे सिद्धान्त प्रस्थापित करण्यासाठीं केवढा दीर्घ काळ लागेल, हें अमेरिकन लोकांना

दा. क्र. १२४ १७४३



कळत नव्हतें. युद्धामुळेंच आपल्या विचारसरणीचा विजय होईल, कीं युद्धाशिवाय, हें देखील त्यांना कळत नव्हतें.

परंतु हे लोक चित्राच्या फार जवळ उभे होते. जसजसा काळ लोटेल तसतसे हें चित्र मार्गे-सरकत जाईल आणि स्पष्ट होईल. त्यानंतर कल्पनाहि करतां येणार नाहीं, इतके सुंदर रंग त्या चित्रांत आहेत, असें दिसून येईल. त्या वेळीं या साऱ्या प्रकाराचा शेवट कोणत्या रीतीनें होणार आहे, याबद्दल कधीं काळीं शंका तरी कशी उपस्थित झाली असावी, याचेंच लोकांना नवल वाटेल.

श्रीयुत अँचिसन यांनीं उल्लेखिलेला मध्यवर्ती तेजाचा बिंदु म्हणजे साऱ्या जगांतील स्वतंत्र लोकांचें वाढतें ऐक्य हाच .अर्थात्, ऐक्यासंबंधीं निरनिराळ्या भूमिका असूं शकतील. स्वसंरक्षण ही एक भूमिका आणि आपला स्वतःचा फायदा ही दुसरी. त्या काळांत यापैकीं एकहि हेतु विफल ठरला नव्हता. यावर असा प्रश्न उपस्थित होतो, कीं अशा रीतीचें संरक्षण मिळाल्यावर आणि असा फायदा हस्तगत झाल्यावर हें ऐक्य टिकेल काय ? परंतु अद्याप हा प्रश्न त्रास देण्याइतका प्रामुख्यानें पुढें आला नव्हता.

जर या नव्या एकतेसाठीं फक्त एवढ्याच भूमिका अस्तित्वांत असत्या, तर मध्यशतकांत मनांत येणाऱ्या शंका आणि मनाला वाटणारी भीति यथार्थ ठरली असती. परंतु त्यापेक्षांहि अधिक चांगली अशी एक आशा अजून शाबूत होती. या शतकांतील मानवांच्या मनावरील ताण आणि त्यांच्या यातना या व्यर्थ होणार नाहींत अशी श्रद्धा ठेवण्यासाठीं एक अधिक चांगलें कारणहि उपलब्ध होतें. ती आशा अशी होती, कीं सर्वत्र ( पुढील ) एक ( हितकर ) संदेश प्रसृत होईल आणि स्वीकारला जाईल. तो पसरत आणि वाढत जाऊन अखेरीस मानवी प्रगतीच्या प्रवाहांत मिसळून जाईल. तो संदेश असा-" प्रत्येक मनुष्याच्या मृत्यूनें माझें जीवन संकुचित होतें; कारण मानवजातींत माझाहि अंतर्भाव होतो. आणि याच कारणामुळें, प्रत्येक मनुष्याच्या जीवनाचा विस्तार होत गेला, म्हणजे माझेंहि जीवन विशालतर होईल."

● ● ●

REFBK-0009743

कुलकर्णी ग्रंथागार
१ . ६ शनवार, पुणें २.

किंमत दोन रुपये

आगामी

जन्मदा

— ग. दि. माडगूळकर